निबंध
३४९६

डॉक्टर आंबेडकर चिंतन



केशव मेश्राम

REFBK-0026729

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

- 4 SEP 1996

(क्र. मा. पहा)
१००००–११–८९

डॉ. आंबेडकर चिंतन / केशव मेश्राम

म / ४१०
प्रथमावृत्ती / मे १९९२

© प्रा. केशव मेश्राम
४ फुलराणी, साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

मुद्रक / प्रकाशक :
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह,
भुपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

मुद्रणस्थळ :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भुपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

मुखपृष्ठ / कमल शेडगे

मूल्य : **६० रुपये**

प्रिय श्री. सुधाकरराव नाईक यांना
आपल्या सामाजिक कर्तृत्वाने माझे वऱ्हाडी मन
भारलेले होतेच.

संदर्भ
निबंध
३४६
२८७२९
२२।७।९२

डॉ. आंबेडकर चिंतन

केशव मेश्राम

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
वा. क्र. ३४६
२८७२९
२२।७।९२
ठेवा : शाखा (स्थानक प्रत)
REFBK-0026729

लोकवाङ्मयगृह

प्रिय श्री. सुधाकरराव नाईक यांना
आपल्या सामाजिक कर्तृत्वाने माझे वऱ्हाडी मन
भारलेले होतेच.

' चिंतना 'विषयी काही –

ललित साहित्य निर्मितीत आणि त्यातील समीक्षेत रस घेणाऱ्या माझे हे वेगळेच पुस्तक आहे. डोळसपणे समाजव्यवस्था कळायला लागल्यापासून मनात विचारांची वादळे उठायची. कविता, कथा, नाट्य-निबंधादी वाङ्मयाचे वाचन करताना आणि पुढे व्यवसाय म्हणून निष्ठेने आणि आवडीने पत्करल्यावरही, खूप अपुरेपण जाणवायचे. त्याची कारणमीमांसा शोधताना समाजचिंतकांनी मार्गदर्शन केले. अनेक सामाजिक तत्त्वज्ञांवर अनेकांनी केलेल्या भाष्यांनी नजरेला तेज दिले. त्यातील डावे-उजवे पारखण्याचे भान आले.

म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही दोन माणसे फारच मोठ्या उंचीची वाटली. इतकी की, शतके गेली तरी त्यांचे विचारधन नव्यानेच डोळे दिपविते. अनेक वर्षांच्या वाचनाचे फलित जन्मशताब्दीच्या असंख्य लेखन - आमंत्रणांपैकी स्वीकारलेल्या कामाने पूर्ण केले गेले.

हे मी केलेले माझे चिंतन आहे. अनेकांच्या ग्रंथसंदर्भांचा आणि विचारांचा मागोवा घेतानाच स्वतंत्ररूप धारण करणारे, आजच्या बदलत्या परिस्थितीत त्यातले व त्यातील प्रश्नसमस्यांचे ताजेपण जरी जाणकारांना भावले, तरी मला समाधान वाटेल.

डॉ. आंबेडकरांवर पुस्तके आणि विशेषांक आलेले आहेत. तरीही चिकित्सकांच्या हातात, हा ग्रंथ देताना मला फार आनंद होतो आहे.

लेखनाचा धोशा लावणारे अनेक संपादक स्नेही आणि लोकवाङ्मय प्रकाशन संस्थेचा मी मनोमन आभारी आहे.

– केशव मेश्राम

अनुक्रमणिका

१. करतो आहोत बाबासाहेबांची जन्मशताब्दी १

२. बाबासाहेबांचे सर्वसमूहस्पर्शी विचारधन १०

३. बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाहीनिष्ठा १९

४. लोकशाहीच्या भवितव्यासाठी २५

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची परिवर्तन संकल्पना ३३

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : स्वतंत्र विचार चिंतक ४५

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मचिंतनाविषयी ५६

८. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांनी दिलेली धर्मविषयक जाणीव ६८

९. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संमोहक व्यक्तिमत्व ७८


१०. म. फुले आणि डॉ. आंबेडकर : अनोखे गुरुशिष्य ८४

११. बाबासाहेब ! आपणास सांगू तरी कसे ? ९०

१२. परिवर्तनवाद, पुनरुज्जीवनवाद आणि आम्ही ९८

१३. समाजकारणावर धर्माचे सावट १०६

१४. जन्मशताब्दीतला महाराष्ट्र ११५



१. करतो आहोत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जन्मशताब्दी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाला आरंभ झाला आणि आपल्या देशात अनेक गोष्टींवर मंथन सुरू झाले. त्याआधी देशात निवडणुकांच्या मागनि एक मोठे परिवर्तन घडले होते. वेगळाली उद्दिष्टे आणि ध्येयधोरणे असणारे राजकीय पक्ष; काँग्रेस पक्ष आणि त्यांचे सरकार हटविण्याच्या, एककलमी सूत्राने एकत्र आले.

असे जेव्हा घडते, तेव्हा समान्यतः सरकार अल्पजीवी असण्याचीच उदाहरणे सापडतात. कर्तृत्वाने, मानाने आणि बऱ्याचशा मनाने नुसते लहानच नव्हे; तर प्रतिगामी, स्वयंतुष्ट, तिर्कस प्रवृत्तीच्या विघ्न संतोषी व्यक्तीही, अशा आघाडीत महत्त्वाच्या स्थानावर येणे, अपरिहार्य होऊन बसते. आघाडी सरकारात ते झाले याचे आश्चर्य वाटायला नको.

पण काँग्रेसचे सरकार गेले, ही वस्तुस्थती आहे. काही राज्य सरकारांच्या बाबतीत, हा अनुभव होताच. पण केंद्रात, नेहमीचा ठरलेला पक्ष अल्पमतात गेला. त्यापक्षाने सरकार बनविण्याची संधीही, राष्ट्रपतींनी मागितली नाही. योग्य संधीची व अनुकूल लोकमताची प्रतीक्षा करीत, तो पक्ष थांबून राहिला आहे. आश्वासनांची क्वचित पूर्ती करणाराला काळ आव्हान देणार आहे.

एवढ्या विस्ताराने या विषयाला स्पर्श करण्याचे प्रयोजन असे की, न्यायाच्या, समतेच्या स्वातंत्र्याच्या आणि माणुसकीच्या जरी गप्पा मारल्या, तरी शासनयंत्रणा हाताशी असल्यास्वेरीज काहीही प्रत्यक्षात घडत नाही. राज्यशास्त्राचा हा मुख्य सिद्धांतच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयाचे अभ्यासक होते. घटनेचे निर्माते होते. चळवळीचे प्रवक्ते होते. अनेक नामवंतांसोबत वादंग लढणारे, वादळी व्यक्तीमत्त्व होते.

दलितोद्धाराबाबत सहानुभूतीने आणि मनमतपरिवर्तन घडून येऊन, हिंदू समाज, हरीजनांना आपलासा करील. त्यांचे सगळे हक्क त्यांना प्रेमाने बहाल करील. पश्चातापाने होरपळून परिशुद्ध होईल. आणि नव्या पर्वाला आरंभ होईल, हीच, म. गाधीजींची धारणा व भूमिका होती. थोडा उशीर लागेल. पण हे एक दिवस घडणारच, अशी त्यांच्या जिवाची, पक्की खात्री होती. डॉ. बाबासाहेबांना हे स्वप्नरंजन वाटे. कर्तव्याच्या पूर्तीचे अपयश, मोकळेपणाने मान्य न करणाऱ्यांचे हे कालापव्यय करण्याचेच तंत्र

वाटे. शतकांच्या वाटचालीत न बदललेला संवेदनशून्य समाज, चमत्कार घडल्यासारखा बदलेले, हे बाबासाहेबांना कधीच पटले नव्हते. आणखी हजार वर्षे वाट पाहण्याचा खेळ, त्यांना अस्वीकृत होता. म्हणून घटना आणि कायदा हक्क प्रतिपादन करून, ते समान अधिकारने मिळविण्याची त्यांची भूमिका होती.

लोकहितवादी, म. फुले यांची चळवळ त्यांच्यापुढे होती. बाबासाहेब बोले, आगरकर, न्या. तेलंग, डॉ. भांडारकर, डॉ. लाड, सार्वजनिक काका यांचे विचार व अनुभव, बाबासाहेबांच्या गाठीशी होते. 'निबंधमाला' 'केसरीभाला' यांचे द्वयर्थी लिखाण व धोरणे, ते जाणत होते. शाहू महाराजांसारख्यालाही, सत्ता-संपत्तीही असून, काय काय सहन करावे लागले; याबाबत ते जागरूक होते.

इतकेच नव्हे तर ज्या आपल्या सर्व जाती-पोटजातीतल्या माणसांचे आणि अन्य नगण्यांचे, हितरक्षण करण्यासाठी ते झटत होते; तो माणूस किती भिन्न असंघटित, अडाणी व दुबळा आहे, याची त्यांना पक्की अटकळ होती. तात्कालिक लाभासाठी आणि संघर्ष टाळण्यासाठी हा समाज कोणाच्याही कच्छपी कसा लागतो. ज्या देवाधर्मांनी त्याला पिळवटून, पार पायरीबाहेर स्वातेऱ्यात फेकले, त्यांच्यासारखे वागण्यात आणि त्यांची मनधरणी करण्यात, हा वर्ग तयार असेल, हे सुद्धा ते ओळखत होते. मग कधी, जगजीवनराम, कधी राजभोज, कधी काजरोळकर केव्हा तपासे तर कधी आपलेच काही सहाकारी कसे कुंपणावर बसून असतात याचा अनुभवही, डॉ. बाबासाहेबांनी मोठ्या प्रमाणात घेतला होता.

कोण्याही व्यापक तत्त्वावर कितीही अचूक भूमिका जरी आपण घेतली तरी, 'स्वतंत्र मजूर पक्ष' काय किंवा 'रिपब्लिकन पक्ष' काय, आपण महार म्हणून, अन्य लोक आपणाकडे वळत नाहीत; हा कटू घोटही त्यांच्या संग्रही होताच. 'सायमन कमिशन', 'पुणे करार' आणि 'हरिजन सेवक संघ' यांच्या निर्मितीपासून बाबासाहेब आणि महात्माजी यांच्या वैचारिक संघर्षाची जुगलबंदी, विशेष रंगायला लागली होती.

महाड आणि नाशिक हे दोन मोठे लढे तर त्यांनी लढवलेच, पण देशभऱ्याच्या प्रचंड भटकंतीत आणि विदेशातल्या ज्ञानोपासनेत, त्यांनी शोषित बांधवांचे हाल, प्रत्यक्ष पाहिले होते. न्यायसंस्थेचा पक्षपातीपणा, पोलिसांच्यामधली जातीय सूडभावना, विद्वानांचे दुर्लक्ष, इंग्रज सरकारची जे घडत ..... आहे त्यात नवा बदल, दलितांच्या बाबतीत, न करण्याची वृत्ती, अनेकांची अनास्था, बनवाबनवीचे बौद्धिक प्रयोग, अशा असंख्य अनुभवांची भक्कम गंगाजळी, त्याच्या दिमतीला होती. 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत' 'जनता' व 'प्रबुद्ध भारत' ही चार वृत्तपत्रेही, त्यांनी काढली-मोडली होती. संघर्षाला भिणारा व व्यवस्थेला शरण जाणारा, आपल्यातलाही शिक्षित वर्ग; हे बाबांचे मोठे शल्य होते. जातीयतेला तार्किक आधार नाही. ती नष्ट झाली पाहिजे, असे सगळे म्हणत होते. पण तिचा धार्मिक मूलाधार, त्याचे दैवतीकरण आणि तिचे बहुसंख्याक

वर्गावर होणारे भयावह अमानुष परिणाम याबद्दल सगळे गप्प बसायचे. महर्षी दयानंद यांच्यासारख्यांनी हिंदूचे एकत्व प्रतिपादन केले. जातीयतेच्या दोषांवरही आघात केले. पण ग्रंथप्रामाण्य, विशेषतः वेदप्रामाण्य, अत्यंत हिरिरीने मांडले. 'वेद' ही देव वाणी, 'उपनिषदे' ही भाष्यवाणी तर 'स्मृतीग्रंथ' ही व्यवहार नियंत्रक वाणी पुराणे ही देव-देवतांच्या विविध अवतारलीळांच्या आणि पापपुण्यकाळी शुभाशूभ फळे देण्याबाबत अद्‌भुतकथा, असे असल्याने ह्या विचारसरणीची भुरळ जन्मदलितांना पडणे शक्य नव्हते.

ह्या विषयावर खूप आस्थेने व जबाबदारीने आपण काही सांगणार - बोलणार आहोत, असे बोलत कसे भोंगळ व सोयीचे लेखन घडते याचा नमुना, 'दलित समस्या एक विचार,' ह्या श्री. द. बां. ठेंगडी ह्याचे बावीस पृष्ठाचे छोटेखानी पुस्तक पाहण्यासारखे आहे. शके १९०० म्हणजे १९७८ सालचे स्व. नाना पालकर स्मृती समितीने काढलेले हे श्री. ठेंगडी यांच्या भाषणाचे पुस्तक आहे.

पृष्ठ पाच वरील दुसऱ्या परिच्छेदात श्री. ठेंगडी लिहितात - "पहिला asset हा की जातीयवाद, भ्रष्टाचार कितीही पसरलेला असो, basically काही सांस्कृतिक जीवनमूल्ये अजूनही सुरक्षित आहेत. चारित्र्य, सद्‌गुण, तपश्चर्या, यांच्याविषयी आदर ठेवण्याची भावना अजूनही सर्व थरांमध्ये आहे. समाजाच्या सर्व विभागात आहे." विचारवंतांना आणि परिवर्तनवादी व्यक्तींना लोकहितवादी, फुले, आंबेडकर, आगरकर, शाहू इत्यादींना श्रेष्ठ मानल्या जात असलेल्या, इतिहासात सोयीने नोंद झालेल्या अनेक नेत्यांनी व विचारवंतांनी जसे वागवले, ते पाहता, 'सांस्कृतीक जीवनमूल्ये' या शब्दातला पोकळपणा व पोचटपणाच प्रकट होतो.

या सगळ्याला बाबासाहेब आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारत' दि. १२ एप्रिल १९२१ च्या अंकातच मोठे रोखठोक उत्तर दिले आहे. नवे अभ्यासक हे सत्य वेगळ्या भाषेत सांगतात.

"बाबासाहेबांनी म्हटल्याप्रमाणे हिंदू समाजाच्या पोटातील वडवानळात बुद्ध खाक झाला होता, महावीर खाक झाला होता, बसव खाक झाला होता, चैतन्य खाक झाला होता, रामानंद खाक झाला होता, महानुभवांचा चक्रधर खाक झाला होता, भागवत संप्रदायीसुद्धा खाक झाले होते. नानक, कबीर, राममोहन रॉय, दयानंद सरस्वती, रामकृष्ण परमहंस, विष्णूबुवा ब्रह्मचारी, ज्योतीबा फुले, न्यायमूर्ती रानडे, रामकृष्ण भांडारकर, स्वामी विवेकानंद, रामतीर्थ श्रद्धानंद, लाला लजपतराय यांचीची तीच वाट हिंदु समाजाने लावली होती. त्यात आता बाबासाहेबांच्या नावाची एक भर पडली होती. जरी मी वेद मानीत नाही तरी स्वतःस मी सनातनी हिंदु म्हणवितो असा शब्दोच्चार करणाऱ्या बाबासाहेबांना शेवटी पराभूत व्हावे लागले होते. हिंदूधर्माचा त्याग करावा लागला होता.

(रत्नाकार गणवीर, प्रस्तावना, पृष्ठ ३५, 'बहिष्कृत भारता'तील डॉ.

आंबेडकरांचे ' स्फुट लेख ' रत्नमित्रा प्रकाशन, भुसावळ प्रथमावृत्ती १८ मे, १९८१)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारविश्वाला व्यासंग, विश्वास व अनुभवसिद्धतेची जोड होती. लोकहितांच्या रक्षणासाठी म्हणून लोककल्याणकारी लोकशाहीतच काही गोष्टी होऊ शकतात, यावर त्यांची श्रद्धा होती. आणि म्हणूनच राज्यकर्त्यांशी, काँग्रेसशी त्यांचे अनेक मतभेद होते. महात्माजींनी - ' गांधीजींनी आणि काँग्रेसने दलितांसाठी काय केले? ' असा परखड प्रश्न विचारणारा ग्रंथ बाबासाहेबांनी सिद्ध केला होता. पण तरीही त्यांच्या आंतरिक आचेमुळे, घटनानिर्मितीच्या ऐतिहासिक कार्यात ते सहभागी झाले. अनेक सदस्यांच्या नकारात्मक आणि अनास्थेचा दृष्टिकोन अनेकदा ध्यानात येऊनही वैयक्तिक मानपानाचा प्रश्न न करता, ते त्यात फलश्रुतीपर्यंत थांबून राहिले हे ह्यामुळेच.

१८५७ ते १९०५ पर्यंतचा काळ हा तसा भारतातील राष्ट्रवादी उठावाचा कालखंड म्हणता येईल. राणीच्या जाहिरनाम्यानंतर ब्रिटीश सत्तेने भारतात अनेक महत्वाचे हेतूपूर्ण बदल करावयास आरंभ केला होता. हे करताना, ' फोडा आणि झोडा ' या रोमन नीतीचा त्यांनी अवलंब केला होताच. त्यातील एक बदल जसा ' सरंजामशाही मूल्यांना धक्का लावला जाणार नाही, तसेच भारतीय मूल्ये व जुनी खुळचट मूल्ये दुखावली जाणार नाहीत याची गंभीर आश्वासने देण्यात आली.' (Modern Islam in India. Cantwal Smith. Page 192)

ह्या आश्वासनाचा प्रभाव ब्रिटीशांच्या भौतिक सुधारणा व सामाजिक सुधारणांच्या अंमलबजावणीचा द्वैती-दुटप्पी भूमिकेत प्रामुख्याने दिसून येते. स्वातंत्र्य-समतेची घोषणा करीतच दलितांच्या बदलांच्या संबंधात ठोस फारसे काही ब्रिटीशांनी शक्य असून ठरवून काही केले नाही. कारण असे केले असते, तर सरंजामी मूल्यांना धक्का लागला असता. शाळा खात्यात क्रमिक पुस्तके तयार करायला पोटभरू नामवंत भटभिक्षुकांचे लाभलेले साह्य मिळाले नसते. आणि त्यांच्याद्वारा इंग्रज सरकार किती दूरदर्शी, उदारमनस्क, गुणग्राहक आणि प्रगतीवादी आहे ' ही मौखिक व लेखी प्रशीस्ती त्यांना मिळाली नसती. हे ब्रिटीश राज्यकर्त्यांना चालणार नव्हते. म्हणून शिक्षणाच्या नावाखाली विशिष्ट वर्गाला गोंजारणारे - भावणारे जाळेच त्यांनी फेकले. याचीच परिणती क्रमिक पुस्तकांची भाषा, इतिहास, भूगोल, तत्त्वज्ञान, धर्म, कला आणि संस्कृतीची एक कृतक परंपरा वाढण्यात झाली. शिक्षितांची मने धर्म-कला-संस्कृती वगैरे-बद्दल जेवढी भावुक तयार होतात तितकी सामाजिक सुधारणांबद्दल, सामाजिक विषमतेबद्दल होत नाहीत. याच एका गोष्टीमुळे जातीविद्वेष, जातभांडवल आणि जातीश्रेष्ठत्व लोकशाहीला सतत बाधक ठरताना आढळतात.

आपल्या इतिहास - लेखन परंपरेचे एक ठळक उदाहरण देणे मला येथे क्रमप्राप्त वाटते.

'....मोगल साम्राज्याचा ऱ्हास ' या भारतातील सर्वात संवेदनाक्षम विषयावर

चार खंड लिहून १९२१ साली नाईटहुड मिळविणारे डॉ. जदुनाथ सरकार यांनी (भारतीय इतिहास लिहिण्याची कला) ती जोपासली.... डॉ. सरकार यांचे मोठेपण त्यांनी वापरलेल्या पद्धतीत आहे. परंतु त्यांनी वेचलेल्या घटना व त्यांनी मांडणी हेतुपुरस्सर होती. व त्यामुळे भारतातील लोकांमध्ये विभाजन करण्याच्या ब्रिटिशांच्या वसाहतवादाला मदत झाली.' (पृष्ठ ५-६.)

'..... तसेच ब्रिटिशांनी उठावानंतर इतिहासलेखनाद्वारे जातीयवादी दृष्टिकोण फैलाविण्याचा कुशलतेने व हेतुपुरस्सर प्रयत्न केला. त्याच्याशी दोन हात करण्याचे आवाहन लाला लजपतराय व सुभाषचंद्र बोस यांनी केले होते. त्यावरही डॉ. मूजुमदार टीका करतात. कार्ल मार्क्स आणि व्हि. डी. सावरकर यांनी १८५७ च्या युद्धाविषयी जे लेखन केले ज्याला आधुनिक विद्वानही मानतात, त्याला याच कारणाने डॉ. आर. सी. मूजुमदार कोणतेच राष्ट्रीय महत्त्व द्यायला तयार नाहीत.' (पृष्ठ ८)

(स्वातंत्र्यलढा आणि भारतीय मुस्लीम - मूळ लेखक सांतिमोय रे अनुवाद - अलिम वकील. लोकवाङ्मय गृह प्रकाशन - सप्टेंबर १९८५)

आपल्या देशातील विचारवंतांनी आपली प्रखर व विवेचक बुद्धीमत्ता, पैसा, पदव्या, प्रतिष्ठा व शासन-व्यवस्था संरक्षण, या कामी लावल्यामुळे; जातीयतेचा, विभाजनाचा आणि विषमतेला खतपाणी घालण्याचा जुनाट रोग, बराच होत नाही. उत्तम शैली, आकर्षक निवेदन सोयीचे आणि वेचक घटितांचे प्रभावी शब्दांकन, यांच्या त्यांच्या कौशल्यामुळे त्याचेच म्हणणे खरे वाटू लागते. त्यांना तसाच हुशार समर्थक शिष्यवर्गही लाभतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपल्या आयुष्यभरातील अनेक चळवळीत, मजूरमंत्री म्हणून शासनात, घटना समितीत आणि लढ्याच्या ऐन धुमाळीत अशा चतुर शब्दांच्या विषडंखांचा नेहमीच प्रत्यय आला होता.

आपल्या समाजरचनेत संस्कृती, शुद्धता, स्वच्छता, श्रेष्ठता आणि सनातनत्व यांचे विचित्र रसायन झाले आहे. तत्त्वश्रीमंती आणि तत्त्वोच्चारणातील सातत्य ह्या बाबतीत कुठेही कद्रूपणा झालेला दिसत नाही. अडचण येते ती समानतेवर आधारीत कृती करण्याच्या बाबत. चुपचाप केले, अंधारात केले, केलेल्या गोष्टींचे उच्च सुरात समर्थन केले किंवा गफलतींच्या विसंगत विस्कळीत व्यवहारांचे तत्त्वज्ञानीकरण केले की संस्कृतीसंपन्नता मिरविता येते. म्हणून त्यांनी एका भाषणात देशातील समस्त जागरूकांना इशारा दिला की, " राजकीय पातळीवर आपण समता पाळली, परंतु सामाजिक व आर्थिक पातळीवर विषमता दिसून येणार. आपण ही विसंगती शक्य तितक्या लवकर दूर करायला हवी. अन्यथा या परिषदेने महान परिश्रमाने उभारलेला हा राजकीय लोकशाहीचा इमला, जे लोक विषमतेच्या चरकात भरडले जात आहेत, ते उद्ध्वस्त केल्याशिवाय राहणार नाहीत." (बाबासाहेबांची भाषणे - खंड २).

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाला स्वबांधवांच्या कल्याणाची धार तर

होतीच, पण प्रसंगी काय योग्य काय अयोग्य ह्याचा निर्णय करण्याची विवेकशक्तीही होती. ज्या अवस्थेत त्यांनी ' पुणे करार ' मान्य केला, म. गांधीजींच्या - एका राष्ट्रनेत्याच्या मृत्यूला आपण कारणीभूत झालो, असा ठपका आणि अशीच इतिहासात नोंद होऊ नये, ही त्यामागची भावना होती. न पटणाऱ्या गोष्टीही कधी महापुरुषांना कराव्या लागतात आणि अयोग्य गोष्टींसाठीही, त्यातले वैयर्थ्य ठाऊक असूनही प्रतिष्ठाप्रश्न (Prestige issue) बनवून कशी सौदेगिरी करण्याची पाळी महापुरुषावर येते ह्याचे ठणठणीत उदाहरण म्हणून ' पुणे करारा 'चा उल्लेख करावा लागेल.

हिंदू समाजाच्या अंतर्रचनेचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बारकाईने अभ्यास केला होता. आध्यात्मिक सुखाची आणि त्याद्वारे सर्व स्वर्गप्राप्तीची हमी ह्या धर्मात दिली आहे. त्यासाठी '...शरण ये !' असा ठोस आदेश आज्ञार्थी परिभाषेतच दिला आहे. जो ज्या ठिकाणी आहे, त्याने त्याच जागी आपापले कर्म नीटपणे पार पाडले की त्याला, ' संसिद्धी ' मिळणारच असा निर्वाळा दिला आहे.

पहिल्या पिढीतील विचारवंत हे नास्तिक तर मुळीच नव्हते. जरा जास्त कुतूहल असणारे, विशेष शंका उपस्थित करणारे, तर्कशास्त्राची व्यवहार्य कसोटी कसोशीने लावून पाहणारे ते होते. यालाही ' पाखंडी ' किंवा ' ठोंबे मत ' म्हणून शंकेखोरांना दुर्लक्षित करणे कठीण नव्हते. पण या विचारवंतांनी आपली शंका, बहुजनसमाजाच्या मनात पेरली होती. ती चांगली फोफावली होती. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादात त्याने रूपांतरही झाले होते. काहींच्या बाबतीत ब्राह्मणद्वेष्टेपणाचाही नासका वास यायला लागला होता. महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहप्रसंगी साह्य करणाऱ्या उच्चवर्णीय सहकाऱ्याविषयी इतरांनी काढलेल्या प्रलापांना त्यांनी दिलेले उत्तर असो किंवा त्यांनी आपल्या लेखन-भाषण चळवळीतून सतत मांडलेली विचारसरणी असो, बाबासाहेबांच्या निर्मळ मनाचे सतत दर्शन घडते. ' मी ब्राह्मण्याचा द्वेष्टा आहे. ब्राह्मणांचा नाही ' हाच विचार ते पुरस्कारताना दिसतात.

आध्यात्मिक सुखाने जे व्हायचे ते होईल पण प्रत्यक्षातली - सद्यःअवस्थेतील दुर्व्यवस्था कशी बाजूला करता येईल? या प्रश्नांना बाबासाहेबांनी अग्रस्थान दिले आहे. याबाबतीत आगरकरांच्या मताचा आणि मनाचा त्यांच्याशी धागा जुळला असावा असे वाटते. कारण महाराष्ट्राच्या मातीतील विवेकवादाचे प्रखर पुरस्कर्ते गोपाळ गणेश आगरकर याच मुद्याला उचलून धरतात. ते म्हणतात ' मनुष्यतेचे ऐहिक सुखवर्धन या काळी सार्वत्रिक धर्माची ज्यांनी दीक्षा घेतली आहे त्यांनी कोणास न भिता, जे शुद्ध, प्रशस्त व कल्याणप्रद वाटत असेल तर ते दुसऱ्यास सांगावे व तदनुसार आचरण करावे हे उचित आहे.'

आगरकरांना जे ' ऐहिक सुखवर्धन ' अभिप्रेत आहे, त्याच ऐहिकतेच्या शोधासाठी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीव पाखडत होते. आणि हा शोध, याच भूतलावर इतर सर्व माणसांइतकाच, भक्कमपणे दलितांच्या वाट्याला यावा, ही त्यांची

तळमळ होती. घटनेच्या मागनि हक्क म्हणूनच हे प्राप्त करणे शक्य होते. घटना, तिचे पावित्र्य आणि तिचे रक्षण बाबासाहेब जे आंतरिक उमाळ्याने बोलत होते, मांडत होते, झटत होते, त्यांची पृष्ठभूमी अशी होती.

जातीची जी अनुल्लंघ्य मर्यादा समस्त भारतवासीयांना ग्रासून आहे, तिच्या निर्मूलनासाठी, आयुष्यभर वस्तुनिष्ठ चिंतन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. तार्किकता, बुद्धिमत्ता, युक्तीवाद, खंडनचातुर्य आणि स्वतंत्र विचारशोधन यांनी परिपूर्ण असा, 'अस्पृश्य पूर्वी कोण होते?' हे त्यांनी 'शूद्र पूर्वी कोण होते' ह्या अभिधानाने प्रतिपादित केले. 'जातिनिर्मूलन', 'गांधी व अस्पृश्यांचा उद्धार' आणि 'गांधींनी अस्पृश्यांकरिता काय केले?' या चार ग्रंथात, ह्या विषयांवरील मनन, चिंतनाचा प्रत्यय येतो. औद्योगिकीकरण वाढत गेले, खेडी-शहरे यांच्या सीमा बदलल्या आणि आर्थिक ताण, हक्क आणि मिळकत वाढत गेल्यावर जातीयता नाहीशी होईल, असा कम्युनिस्टांचा व मार्क्सवादी मंडळींचा लाडका सिद्धांत होता. धार्मिक तेढही मग उरणार नाही, असेही मत प्रकट केले जात होते. ह्या हिंदू-मुस्लिम प्रश्नावर आणि कितीतरी समस्यांवर बाबासाहेब परखड मतप्रदर्शन करीत होते. माझ्याच एका प्रास्ताविकात हे मी नोंदून ठेवले आहे.

" हिंदु - मुस्लीम ऐक्य प्रश्नावर कटु पण निर्भीड मत पहिल्यांदा नोंदविण्याचा मान द्रष्ट्यांचा जसा त्यांना आहे, त्याचप्रमाणे कम्युनिझमच्या आणि मार्क्सवादाच्या चढत्या-वाढत्या लोकप्रियतेच्या काळातही 'कार्ल मार्क्स 'च्या विचारसूत्राचे भारताच्या भूमीत पराभवाचे भाकितही त्यांनीच केले होते." (डॉ. आंबेडकर आणि धम्मक्रांती - वसंत मून (अनुवाद) प्रस्तावना - केशव मेश्राम - पृष्ठ ७ १९७८).

म्हणजे जातीचक्राचे विळखे असे घट्ट का आहेत? ते सुटत का नाहीत? ही उतरंड घरादारांचाही धड पत्ता न देऊ शकणाऱ्या भटक्या - विमुक्तांपासून तो आदिवासी जाती - जमातीपर्यंत कशी पसरत गेली आहे याचे विश्लेषण होतच आले आहे. होत राहणारही आहे. आणि 'जाती जायला तयार नाहीत' हा जळजळीत अनुभव आहे. वास्तवच आहे. ब्रिटीश काळापूर्वी तर कोणी याबद्दल कायदे-सक्ती-शिक्षा वगैरे केली पाहिजे अशी कल्पनाही करायला तयार नव्हते. भीतीची इतकी अनंत भुतावळ जागी केलेली होती की परंपरेच्या, धर्माच्या विरोधात काही बोलणे म्हणजे जन्माजन्मांचे नुकसान, घोर पातक आणि कुलक्षय होणार असेच मानले जात होते. याची मर्यादित का होईना, दखल व व्यवस्थापना केली इंग्रज राज्यकर्त्यांनी. त्यातली मस्स्वी मी लेखाच्या आरंभी स्पष्ट केलीच आहे. पण एक विशिष्ट सीमेपर्यंत काही गुण इंग्रज राज्यकर्त्यांना द्यायला हरकत नाही. म्हणूनच " ब्रिटीशपूर्व काळात भारतात अस्तित्वात असणाऱ्या कोणत्याही शासनाने अस्पृश्यतेच्या प्रश्नाबाबत हस्तक्षेप करून कायदेकानून केल्याचे उदाहरण नाही." (अस्पृश्यता आणि कायदा - हेमलता राईलकर. पृष्ठ १३, पहिली आवृत्ती १९७८) हे राईलकरांचे मत मर्यादित अर्थने मान्य करता येते.

मघाशी ज्या उतरंडीचा उल्लेख केला त्याबद्दल नव्या अभ्यासकांचे निष्कर्षही उदास करणारेच आहेत. ' भारतीय आदिवासी ' शीर्षकाच्या ग्रंथात, पृष्ठ नऊवर, डॉ. गुरूनाथ द. नाडगोंडे लिहितात -

" हिंदू समाजातील विविध जाती एकमेकींपासून काही अंतर ठेवूनच व्यवहार करतात. हीच गत विविध जाती-जमातीत किंवा एकाच आदिम जमातीतील विविध कुलात दिसून येते. "

आणखी एकच महत्वाच्या व्यक्तीचे लहानसे अवतरण देऊन मी लेखाच्या समारोपाकडे जाऊ इच्छितो. 'जन्मठेपीच्या शिक्षेपैकी चौदा वर्षाचा बंदिवास भोगल्यानंतर ब्रिटीश सरकारने वीर सावरकरांना बंदीगृहातून सोडून सन १९२४ व्या वर्षी, " राजकारणात कोणताही भाग घेता कामा नये " अशी अट घालून रत्नागिरीस स्थानबद्ध करून ठेवले." (जातिभेदोच्छेदक निबंध - (सावरकरांचे) - प्रकाशकाची प्रस्तावना) त्यातील सर्व लेखात सावरकरांचा युक्तिवाद आणि आशावाद दिसतो आहे. उपदेश, तळमळ, तळतळाटही बाबासाहेबांच्या कृतीविषयी जाणवतो आहे. याच पुस्तकातील, ' जन्मजात जातिभेद मोडावयाचा म्हणजे काय करावयाचे? ' या शीर्षकाच्या लेखाचा पूर्वार्ध, किर्लोस्कर मासिक फेब्रुवारी १९३५ च्या अंकातील लेखात स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात -

" जातिभेद हा एक चतुष्पाद प्राणी आहे. ज्या चार पायांवर तो मुख्यतः उभा आहे ते त्याचे चार पाय, म्हणजे व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी. हे त्याचे चार पाय हाणले की, हे धूड कोसळलेच म्हणून समजावे." (पृष्ठ - १५८)

ह्या सर्व गोष्टी बदलून आणि काही प्रमाणात विशेष कायदे करून, सुधारक, गांधीजी, श्री. म. माटे, डॉ. आंबेडकर आणि अनेकानेक विचारवंतांनी सतत प्रयत्न करूनही गेलेल्या पन्नास-साठ वर्षात ह्या देशात परिवर्तन घडले नाही हे दिसते आहे. उलट जातीयवादी विचारशक्ती, स्वयंश्रेष्ठ - स्वयंमन्य सेवकांचे पक्ष, पोशाख आणि राजकीय नावे - संज्ञा बदलल्या, पण मने अधिक संकुचित व अमानुष झाली आहेत, हेच विचित्र सर्वत्र देशात अनुभवावयास मिळते आहे.

संस्कृतीच्या, संस्काराच्या खुणा फारशा कोठे सापडतच नाही. दलितांना, पीडितांना, आदिवासींना, भटक्या-विमुक्तांना ज्यांची संख्या, या देशात सत्तर टक्क्यापेक्षा अधिक आहे, दडपण्याची व अन्याय करण्याची एकही संधी सर्वप्राप्त मक्तेदार समाज सोडत नाही.

काँग्रेस शासन सतत घोषणांचा आणि आश्वासनांचा पाऊस पाडत असे. प्रत्यक्षात जे करीत असे ते धनिक, श्रीमंत आणि वरिष्ठांच्या जास्त हितांचे असेल तेच. घटनेतील सवलती नकारात्मक करण्याचे कार्य; नोकरशाहीच्या नाकात वेसन घालण्याची, दांडगाई करणाऱ्याला शिक्षा न करण्याची, तक्रारदारांचीच धिंड काढणाऱ्या; अत्याचारी पोलीस यंत्रणेची हितरक्षणाची फार काळजी घेणाऱ्या करंट्या राज्ययंत्रणेने केले आहे.

कोट्यवधी रूपयांची मालमत्ता करणारे साटेलोटे साधणारे राजकारणी, अधिकारी, नोकरशाही आणि स्वार्थ साधणारे असंस्कृत सुशिक्षित यांनी, या देशाच्या सर्व महानतेला कुजक्या गोधडीची अवकळा आणली आहे. तरीही आश्वासनांची व घोषणांची खैरात करण्याची सवय जात नाही ती नाहीच. कारण घोषणा एकदा केली की मग दुसरे काही प्रत्यक्ष करण्याची आवश्यकताच नष्ट होते असे हे समीकरण आहे.

घटनापंडित, प्रखर राष्ट्रवादी आणि दूरदृष्टीच्या संयत कृतीवंताला, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नव्या सरकारने, आपले स्थान आणि पावले डगडगती असताना देखील, ' भारतरत्न ' हा किताब बहाल केला आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून एक ' नाणे ' चलनात आणण्याचे ठरविले आहे.

लोकशाही राज्यव्यवस्थेत गुणी आणि महान माणूस, हा जाती, धर्म, वंश यांच्याही पलीकडला असतो. ठरू शकतो. भले त्याचे सर्व कार्य राज्यकर्त्यांच्या किंवा त्यांच्याजवळ असणाऱ्यांच्या अपेक्षांची पूर्ती करणारे असो ना नसो.

समता, स्वातंत्र्य, बंधुता यांचा महान सांस्कृतिक वारशाचा, देशाच्या प्रदीर्घ इतिहासाचा, आपल्या त्यागबुद्धीचा, दयाबुद्धीचा आणि न्यायबुद्धीचा एकसारख्या उद्घोष करणारांनी इतके ध्यानात ठेवायला हवे की, आंबेडकरांची जन्मशताब्दी ही एक प्रतिकात्मक गोष्ट आहे. त्यांच्या आयुष्यात ज्या गोष्टींसाठी त्यांनी संघर्ष केला त्याच गोष्टी मुळी घडणारच नसतील, नुसत्या देखाव्यासाठी वापरल्या जाणार असतील, तर तो पुन्हा नवा द्रोह आणि विश्वासघातच ठरणार आहे.

समस्त देशात द्वेषाची जोरदार लाट उसळत असताना, गृहयुद्धसदृश वातावरण निर्माण होत असताना स्वतःला जिरवून आणि विसरून व्यापक लोकहितांचे आणि समूहहितांचे निर्णय घेणे आणि पडेल ती किंमत मोजून त्यांचे पालन प्रत्यक्षात येण्याचीच गरज आहे.

मला वाटते हीच आहे मने सांधण्याची, ज्यांना खरेच काही लाभत नाही त्यांची मने जिंकण्याची संधी. नाहीतर आम्ही करतच असतो.... करणारच असतो. सगळ्यांच्या सारखीच ' भारतरत्न ' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीही जन्मशताब्दी.



२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्वसमूहस्पर्शी विचारधन

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र जीवन हे एका मानवतावादी, अघोषित महात्म्याचे मनस्वी आयुष्यच आहे. त्यांच्या प्रत्येक कृती-उक्तीच्या किंवा स्वीकारा-नकाराच्या पाठीमागे त्यांची निश्चित विचारसरणी आढळते. आणि ती दूरदृष्टीची व व्यापकही असते.

बाबासाहेबांच्या विचारांचा पाया त्यांच्या कुटुंबजीवनातच शोधता येतो. फलटणीत वावरणाऱ्या पित्यांच्या कृतींनी त्यांना प्रभावित केले होते. स्वतः मांसाहार न करणारे, मद्यपान न करणारे रामजी सुभेदार, जातपंचायतीसाठी स्वतःची भांडीकुंडी तर देतच असत, पण त्यांना वाढण्याचे व ग्रामस्थांना पाजण्याचे कार्यही, कर्तव्यबुद्धीने पण सस्मित वदनाने करायचे. बाबासाहेबांना ह्या गोष्टींचे आयुष्यभर स्मरण राहिले. ती आचरणीयही वाटली.

आपले व्यक्तीमत्व घडवित असताना तहानभूक विसरणारे जिज्ञासू विद्यार्थी, एखादे ध्येय प्राप्त करेपर्यंत स्वतःच घालून घेतलेल्या निष्ठा व निर्बंध जपणारे आणि ज्ञानकोशकार श्री. व्यं. केतकर यांनी, ' ज्ञानकोशा 'साठी, ' अर्थशास्त्रावर काही लेखन करावे ', ही विनंती नाकारणारे; बाबासाहेब आंबेडकर, त्यांच्या वेगळेपणाने स्तिमित करून सोडतात. त्यामुळेच त्यांच्या लिखाणात, वाणीत आणि कर्तृत्वात एकसंधपणा आढळून येतो.

' मूकनायक ' हे वृत्तपत्र चालविताना ते सिडनहॅम कॉलेजच्या सरकारी सेवेत होते. म्हणून तांत्रिकदृष्ट्या पांडुरंग नंदराम भटकर संपादनकार्य करायचे. व्यवस्थापनाचे काम श्री. ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे होते. परदेशवारी करून आल्यावर, श्री. भटकर यांच्यानंतर घोलप यांनी, अनेक प्रकारचा घोळ केल्याचे, बाबासाहेबांच्या लक्षात आले होते. घोलपांच्या संपादनाने, ' मूकनायक ' निस्तेज झालाच होता, पण आर्थिकदृष्ट्याही पार विस्कटून गेला होता. बाबासाहेबांनी ते कर्ज व जबाबदारी स्वत्यास्वोट्याच्या रुजुवातीचा घोळ न घालता स्वीकारली. यातच सामूहिक कार्यामध्ये आपण दक्ष आणि नेक असलो तरी, स्नेही सहकाऱ्यांकडून गोंधळ आणि मनःस्ताप होणारच, ह्याचा अनुभवही त्यांनी घेतलेला होता.

भारतीय संस्कृतीत विषमतेच्या आणि जाततुच्छतेच्या ज्वाळाने भाजून निघाला नाही, असा दलित; आदिवासी किंवा विमुक्त भटक्या जाती-जमातीचा, एकही माणूस सापडणे शक्य नाही. किंवा वेगळ्या रीतीने हेच असेही सांगता येईल की, आपल्यापेक्षा

कुणी हलक्या जातीकुळाचा आहे, असे आढळल्यास्वेरीज, इथल्या सवर्णांच्या मनाला, कधी सुस्वशांती लाभतच नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चरित्रात याचा प्रत्यय दाहकपणाने येतोच. त्यांच्या ' बहिष्कृत भारत 'च्या दिनांक १२ जुलै, १९२९ च्या अग्रलेस्वात, हीच गोष्ट त्यांनी विषादपूर्वकतेने सांगितली आहे. समाज समतेच्या विरोधकांबद्दल, ते लिहितात -

" हिंदू समाज म्हणजे अनेक भेदांची व पोटभेदांची एक उतरंड आहे. आपल्या स्वालची पायरी कोणाची तरी आहे, व आपण वरच्या पायरीवरचे आहो, एवढ्याने प्रत्येक जात स्रूष असते. जातिभेदाचे समर्थन करणारे लोक जाती दुराभिमानी असल्यामुळे, ते समतेच्या भावनेला पारस्वे झालेले असतात." (बहिष्कृत भारतातील अग्रलेस्व - संपादन - रत्नाकर गणवीर)

ही व्यवस्था अशीच निराबाध राहावी, हाच उच्चवर्णियांचा हेतू होता व आहे. त्यामुळे शिक्षण, ज्ञान, आत्मविश्वास आणि लढाऊपणा यापासून दलित जितके दूर राहतील अशी व्यवस्था करणे आणि त्याचसाठी स्मृतिग्रंथांच्या वचनांचा, शास्त्रवचन आणि धर्माज्ञा असे म्हणत, सतत पाठपुरावा व घोष करणे; यातच वरिष्ठ वर्गाचे चातुर्य व अस्तित्व सामावलेले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जसजसे ह्या धर्मबेडीचा व समूहालाच शबल करणाऱ्या धर्मज्वराचा, विचार करू लागले, तेव्हा त्यांना दास्यत्वात ठेवणाऱ्या साखळीचा पक्का शोध लागला.

ग्रंथवाचन, शास्त्राभ्यास, व्यवहारचातुर्य, ज्ञान व शिक्षण यापासून दूर ठेवल्यामुळेच; एका समाजाला, ' दलित ' राहावे लागले. त्याने बंड किंवा संघर्ष करू नये म्हणून, ह्या दुरवस्थेला पूर्वजन्मीच्या पापांचे अथवा कर्मफलांच्या शापांचे भूत, त्यांच्या मानगुटीवर बसवले गेले. ' धर्म ' आणि ' धर्मवचन ' पाळण्यातच कल्याण आहे, असे बिंबवले गेले. स्वर्गाची दारे उघडणारा देव व नरकात फेकणारा सैतान; त्याचा निर्वाळा देणारा चित्रगुप्त आणि त्यात मध्यस्त करणारा, ब्राह्मणकुलोत्पन्न वेदशास्त्रसंपन्न असा पुरोहित अशी ही रचना होती. यात श्रमाशिवाय शोषणाची सोय असल्याने, ही व्यवस्था अनादी, अनंत व आदर्श आहे, असे सांगणेच स्वाभाविक ठरत होते. पोटाचा व जगण्याचा प्रश्न आला की चातुर्य येतेच ना?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, अनेक ग्रंथ व पुराणांच्या जोडीला पाश्चात्य देशातील विचारआचारांचा आणि त्यांच्या प्रभाव-परिणामांचा, वस्तुनिष्ठ अभ्यास केला होता. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ह्या शब्दांचा उच्चार करायलाच, फार मोठी लायकी लागते आणि त्याप्रमाणे आचरण करायला तर, स्वतःसहित अहंकाराचा लोप करायची ताकद असायला हवी, हे त्यांनी जाणून घेतले होते. यातूनच त्यांचा हिंदूधर्म त्यागण्याचा म्हणजे; विषमता न सोडता समतेच्या शब्दांचे बुडबुडे उडविणाऱ्या ग्रंथबद्ध स्रोटेपणाला सोडण्याचा निर्णय, पक्का

होत गेला. तो प्रत्यक्षातही आला. त्यांच्या वक्तव्यात चोख्यामेळ्याच्या व त्याच्या कुटुंबाच्या हलाखीबद्दल, अगतिकतेबद्दल कितीतरी वेळा, अंतर्मुख करणारा उल्लेख येत असे. उपलब्ध लेखक लेखनाबद्दलचा विषाद प्रकट होत असे. यातूनच दलित साहित्य आणि आंबेडकरी प्रेरणेची निर्मिती झाली आहे.

डॉ. आंबेडकरांच्या अर्थशास्त्रीय व समाजशास्त्रीय व्यासंगातूनच, जातियतेकडे बघण्याचा आणि तिच्या नाशासाठी झगडण्याचा, निश्चय दृढ होत गेला.

निसर्गात विषमतेची आणि असमानतेची अनेक उदाहरणे आढळतातच. उदा. सातपुडा पहाड आणि हिमालय, पूर्ण नदी आणि ब्रह्मपुत्रा, मुंगी आणि हत्ती किंवा छोटेसे गवतफूल आणि अमेझॉनच्या प्रवाहातील-डोहातील प्रचंड कमळ. ह्या निसर्गाच्या आकारा - प्रकारांच्या, रंगरुपांच्या विविधतेबद्दल व वैषम्याबद्दल, दुःखदायक असे काही नसते. पण सामाजिक जीवनामधली जन्मसिद्ध, धनसिद्ध आणि व्यक्तीसिद्ध विषमता, समान संधीला व जगण्यालाच अडथळा बनते. आपण अचूक आहोत असे मानणारा हा समाज जुन्या हिंदुस्थानात आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या भारतात, अजूनही वावरतो आहे. कित्येक शतकांसारखाच अद्यापही टिकून आहे. म्हणूनच तर प्रा. दि. के. बेडेकर यांनी " जातिसंस्थेवर उभारलेला व स्थिरपणे कित्येक शतके नांदलेला भारतीय समाज हे जन्मसिद्ध विषमतेचे सर्वात ठळक उदाहरण आहे. " (पृष्ठ १६१-१६२) असे स्पष्ट नोंदलेले आहे. इतकेच नव्हे तर ही विषमता असतानाच, येणारे युग, हे धनिकांच्याच सोयीचे असते. कारण धनातून राजकीय सत्ता म्हणजे आधीच गब्बर असलेल्या लोकांनाच विशेष लाभ होण्याचा परवाना मिळत जातो. म्हणूनच प्रा. बेडेकर पुढे लिहितात –

" धनसिद्ध विषमतेच्या युगात धनिक वर्गातील व्यक्तींना, त्यांच्या आप्तांना, वंशजांना आणि आश्रितांना समाजावर सर्वंकष नियंत्रण जारी ठेवणे सोपे असते. इतर सर्व समाजाला ह्या नियंत्रणाखाली मान देणे किंवा क्रांतिकारक उठाव करणे, हे दोनच मार्ग मोकळे असतात. " (समाजचिंतन - ऑगस्ट १९६९ - पृष्ठ १६५-१६६) प्रा. दि. के बेडेकर यांची, वरील विचारसरणी, अर्थातच कार्ल मार्क्स यांच्या विचारांच्या अनुषंगाने प्रकट झाली आहे. मार्क्सच्या नंतर विसाव्या शतकात, थॉस्टिर्न वेब्लेन यांनी, आपल्या १८९९ च्या ' थिअरी ऑफ लोअर क्लास ' या ग्रंथानंतर, ' थिअरी ऑफ बिझिनेस एन्टरप्राईस ' हा ग्रंथ, १९०४ ला लिहिला. त्यातील सिद्धांताची आणि उपलब्ध अर्थकरणाची मांडणी; श्री. जॉर्ज मेनार्ड केन्स यांनी, त्यांच्या १९३६ च्या ' जनरल थिअरी ' या ग्रंथात केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे, केन्स हे मार्गदर्शक होते. अनेक नवनव्या तत्त्वसूत्रांचा आणि जोसेफ ए. शुंपिटर यांच्या ' कॅपिटॅलिझम, सोशॅलिझम ॲन्ड डेमाक्रसी ' या ग्रंथाचा परामर्श, डॉ. आंबेडकरांनी केलेला असल्याने, त्यांची विचारसरणी ' भारतीय भूमीत दलितांच्या जीवनाला कलाटणी देण्याबाबत, साम्यवाद आणि मार्क्सवाद, अनुपयुक्त ठरणार आहेत. ' अशीच झाली होती. काळाने त्याची सत्यताही पटविली आहे.

सर्वप्राप्त आणि सर्वहारा वर्गातील संघर्षाचे भाकित, रशिया-चीन देशांच्या उदाहरणाने, भारताबाबत करणाऱ्या सर्व विद्वनांना आणि कम्युनिस्टांना, बाबासाहेबांच्या स्पष्टोक्तीने चपराकच दिली. स्वतंत्र भारतात जातीयतेच्या त्रासाने, सर्व बाबतीत छळल्या जाणाऱ्या दलित वर्गाने, मार्क्सवादावर आणि कम्युनिस्टांच्या फसव्या भुलाव्यावर, म्हणूनच कधीही विसंबून राहू नये, असे डॉ. बाबासाहेबांनी सोदाहरण सिद्ध केले. ही मांडणीही मानवमुक्तीच्या व्यापक भूमिकेतूनच केली होती.

सध्याच्या भारतातील विषमतेलाही, दुर्दैवाने मोहक आणि भ्रामक रंग आहेत. त्यामुळेच नाव कुठलेही आणि कशाचेही घ्या, सामान्यांचा बुद्धीभेद आणि गोंधळ करण्याकडेच, उपलब्ध अशा सर्व घटितांचा कल असतो. धर्म बोलण्यातला, धर्म आचरणातला, धर्म ग्रंथगत शब्दातला आणि धर्मानुभव वाटाला येणारा; यांच्यात त्यामुळेच तफावत पडत जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, आपल्या विविध ग्रंथांतून आणि लेखांतून, हे जाळे उलगडून दाखविले आहे. नंतरच्या पिढीचे बाबासाहेबच एकमेव तिखट प्रवक्ते होते.

लोकहितवादी आणि म. फुले यांनीही ह्याच विषयावर, तिखट पण मूलार्थस्पर्शी लेखनाचा पायंडा पाडलाच होता. राजरोस चालणाऱ्या स्वार्थबाजाराचे आणि शोषणांचे उदात्तीकरण करण्याचा, हा जुगार प्रतिष्ठा पावलेला आहे. मतलबाला तत्त्वज्ञानाचा सोनवर्ख आणि वजनदार शब्दांची झिलई चढवली की, काम फत्ते होते. एका वर्गाच्या कायम सोयीसवलतींचा हा गुंता, त्यामुळेच चक्रवाढव्याजाने वाढतच राहतो. आहे ते तसेच मुकाटपणे स्वीकारा. प्रतिकारांचा, बंडाचा पाखंडी शब्द उच्चाराल, तर नरकात पडाल आणि धर्मांतरासारखी कृती कराल, तर तो अक्षम्य दंडनीय घोर अपराधच होईल. डॉ. बाबासाहेबांनी हे सर्व निषिद्ध कर्म करून, आपले वेगळेपण व अलौकिकत्व सिद्ध केले.

त्यांच्या ह्याच कामगिरीचा प्रा. अरूण मोरेश्वर दोंदे यांनी खालील शब्दांत, निर्देश केला आहे.

"जो 'हरिजन...' 'हिंदू' म्हणून अनेक धार्मिक सवलतींना पारखा असतो, त्याच हरिजनाने मुस्लिम वा ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यास त्याला त्या सर्व सवलती प्राप्त होतात. हा व्यावहारिक दांभिकपणा धार्मिक उदात्ततेला पायदळी तुडविणारा आहे. बौद्धिक गुलामगिरी, विचारस्वातंत्र्याला तिलांजली, विद्याव्यासंगाची उपासमार आणि व्यवसाय निवडीतील निर्बंध या अनेक अनैसर्गिक बंधनांनी हिंदुधर्माने अस्पृश्यांची शतकानुशतके गळचेपी केली आहे, असे बाबासाहेबांचे स्वच्छ सांगणे होते." (आधुनिक भारतीय तत्त्वज्ञ - संपादन डॉ. हे. वि. इनामदार व डॉ. मो. स. गोसावी - पृष्ठ २९०)

डॉ. बाबासाहेबांच्या लढ्याला त्यांच्याआधीच्या जागृत स्वजातीय विचारवंतांचाही आधार होता. पण बाबासाहेबांच्या विचारांना सर्वांगीण अभ्यासाची आणि तर्कशुद्ध ठामपणाची तीव्रता होती ती क्वचितच होती. श्री. शिवराम जा.

होत गेला. तो प्रत्यक्षातही आला. त्यांच्या वक्तव्यात चोख्यामेळ्याच्या व त्याच्या कुटुंबाच्या हलाखीबद्दल, अगतिकतेबद्दल कितीतरी वेळा, अंतर्मुख करणारा उल्लेख येत असे. उपलब्ध लेखक लेखनाबद्दलचा विषाद प्रकट होत असे. यातूनच दलित साहित्य आणि आंबेडकरी प्रेरणेची निर्मिती झाली आहे.

डॉ. आंबेडकरांच्या अर्थशास्त्रीय व समाजशास्त्रीय व्यासंगातूनच, जातियतेकडे बघण्याचा आणि तिच्या नाशासाठी झगडण्याचा, निश्चय दृढ होत गेला.

निसर्गात विषमतेची आणि असमानतेची अनेक उदाहरणे आढळतातच. उदा. सातपुडा पहाड आणि हिमालय, पूर्ण नदी आणि ब्रह्मपुत्रा, मुंगी आणि हत्ती किंवा छोटेसे गवतफूल आणि अमेझॉनच्या प्रवाहातील-डोहातील प्रचंड कमळ. ह्या निसर्गाच्या आकारा - प्रकारांच्या, रंगरुपांच्या विविधतेबद्दल व वैषम्याबद्दल, दुःखदायक असे काही नसते. पण सामाजिक जीवनामधली जन्मसिद्ध, धनसिद्ध आणि व्यक्तीसिद्ध विषमता, समान संधीला व जगण्यालाच अडथळा बनते. आपण अचूक आहोत असे मानणारा हा समाज जुन्या हिंदुस्थानात आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या भारतात, अजूनही वावरतो आहे. कित्येक शतकांसारखाच अद्यापही टिकून आहे. म्हणूनच तर प्रा. दि. के. बेडेकर यांनी " जातिसंस्थेवर उभारलेला व स्थिरपणे कित्येक शतके नांदलेला भारतीय समाज हे जन्मसिद्ध विषमतेचे सर्वात ठळक उदाहरण आहे. " (पृष्ठ १६१-१६२) असे स्पष्ट नोंदलेले आहे. इतकेच नव्हे तर ही विषमता असतानाच, येणारे युग, हे धनिकांच्याच सोयीचे असते. कारण धनातून राजकीय सत्ता म्हणजे आधीच गब्बर असलेल्या लोकांनाच विशेष लाभ होण्याचा परवाना मिळत जातो. म्हणूनच प्रा. बेडेकर पुढे लिहितात –

" धनसिद्ध विषमतेच्या युगात धनिक वर्गातील व्यक्तींना, त्यांच्या आप्तांना, वंशजांना आणि आश्रितांना समाजावर सर्वंकष नियंत्रण जारी ठेवणे सोपे असते. इतर सर्व समाजाला ह्या नियंत्रणाखाली मान देणे किंवा क्रांतिकारक उठाव करणे, हे दोनच मार्ग मोकळे असतात. " (समाजचिंतन - ऑगस्ट १९६९ - पृष्ठ १६५-१६६) प्रा. दि. के बेडेकर यांची, वरील विचारसरणी, अर्थातच कार्ल मार्क्स यांच्या विचारांच्या अनुषंगाने प्रकट झाली आहे. मार्क्सच्या नंतर विसाव्या शतकात, थॉर्स्टिर्न वेब्लेन यांनी, आपल्या १८९९ च्या ' थिअरी ऑफ लोअर क्लास ' या ग्रंथानंतर, ' थिअरी ऑफ बिझिनेस एन्टरप्राईस ' हा ग्रंथ, १९०४ ला लिहिला. त्यातील सिद्धांताची आणि उपलब्ध अर्थकरणाची मांडणी; श्री. जॉर्ज मेनार्ड केन्स यांनी, त्यांच्या १९३६ च्या ' जनरल थिअरी ' या ग्रंथात केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे, केन्स हे मार्गदर्शक होते. अनेक नवनव्या तत्त्वसूत्रांचा आणि जोसेफ ए. शुंपिटर यांच्या ' कॅपिटॅलिझम, सोशॉलिझम ॲन्ड डेमाक्रसी ' या ग्रंथाचा परामर्श, डॉ. आंबेडकरांनी केलेला असल्याने, त्यांची विचारसरणी ' भारतीय भूमीत दलितांच्या जीवनाला कलाटणी देण्याबाबत, साम्यवाद आणि मार्क्सवाद, अनुपयुक्त ठरणार आहेत. ' अशीच झाली होती. काळाने त्याची सत्यताही पटविली आहे.

सर्वप्राप्त आणि सर्वहारा वर्गातील संघर्षाचे भाकित, रशिया-चीन देशांच्या उदाहरणाने, भारताबाबत करणाऱ्या सर्व विद्वनांना आणि कम्युनिस्टांना, बाबासाहेबांच्या स्पष्टोक्तीने चपराकच दिली. स्वतंत्र भारतात जातीयतेच्या त्रासाने, सर्व बाबतीत छळल्या जाणाऱ्या दलित वर्गाने, मार्क्सवादावर आणि कम्युनिस्टांच्या फसव्या भुलाव्यावर, म्हणूनच कधीही विसंबून राहू नये, असे डॉ. बाबासाहेबांनी सोदाहरण सिद्ध केले. ही मांडणीही मानवमुक्तीच्या व्यापक भूमिकेतूनच केली होती.

सध्याच्या भारतातील विषमतेलाही, दुर्दैवाने मोहक आणि भ्रामक रंग आहेत. त्यामुळेच नाव कुठलेही आणि कशाचेही घ्या, सामान्यांचा बुद्धीभेद आणि गोंधळ करण्याकडेच, उपलब्ध अशा सर्व घटितांचा कल असतो. धर्म बोलण्यातला, धर्म आचरणातला, धर्म ग्रंथगत शब्दातला आणि धर्मानुभव वाटाला येणारा; यांच्यात त्यामुळेच तफावत पडत जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, आपल्या विविध ग्रंथांतून आणि लेखांतून, हे जाळे उलगडून दाखविले आहे. नंतरच्या पिढीचे बाबासाहेबच एकमेव तिखट प्रवक्ते होते.

लोकहितवादी आणि म. फुले यांनीही ह्याच विषयावर, तिखट पण मूलार्थस्पर्शी लेखनाचा पायंडा पाडलाच होता. राजरोस चालणाऱ्या स्वार्थबाजाराचे आणि शोषणांचे उदात्तीकरण करण्याचा, हा जुगार प्रतिष्ठा पावलेला आहे. मतलबाला तत्त्वज्ञानाचा सोनवर्ख आणि वजनदार शब्दांची झिलई चढवली की, काम फत्ते होते. एका वर्गाच्या कायम सोयीसवलतींचा हा गुंता, त्यामुळेच चक्रवाढव्याजाने वाढतच राहतो. आहे ते तसेच मुकाटपणे स्वीकारा. प्रतिकारांचा, बंडाचा पाखंडी शब्द उच्चाराल, तर नरकात पडाल आणि धर्मांतरासारखी कृती कराल, तर तो अक्षम्य दंडनीय घोर अपराधच होईल. डॉ. बाबासाहेबांनी हे सर्व निषिद्ध कर्म करून, आपले वेगळेपण व अलौकिकत्व सिद्ध केले.

त्यांच्या ह्याच कामगिरीचा प्रा. अरूण मोरेश्वर दोंदे यांनी खालील शब्दांत, निर्देश केला आहे.

"जो 'हरिजन...' 'हिंदू' म्हणून अनेक धार्मिक सवलतींना पारखा असतो, त्याच हरिजनाने मुस्लिम वा ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यास त्याला त्या सर्व सवलती प्राप्त होतात. हा व्यावहारिक दांभिकपणा धार्मिक उदात्ततेला पायदळी तुडविणारा आहे. बौद्धिक गुलामगिरी, विचारस्वातंत्र्याला तिलांजली, विद्याव्यासंगाची उपासमार आणि व्यवसाय निवडीतील निर्बंध या अनेक अनैसर्गिक बंधनांनी हिंदुधर्माने अस्पृश्यांची शतकानुशतके गळचेपी केली आहे, असे बाबासाहेबांचे स्वच्छ सांगणे होते." (आधुनिक भारतीय तत्त्वज्ञ - संपादन डॉ. हे. वि. इनामदार व डॉ. मो. स. गोसावी - पृष्ठ २९०)

डॉ. बाबासाहेबांच्या लढ्याला त्यांच्याआधीच्या जागृत स्वजातीय विचारवंतांचाही आधार होता. पण बाबासाहेबांच्या विचारांना सर्वांगीण अभ्यासाची आणि तर्कशुद्ध ठामपणाची तीव्रता होती ती क्वचितच होती. श्री. शिवराम जा.

कांबळे यांनी 'मराठा दीनबंधु' ह्या वृत्तपत्रात, १५ आक्टोबर, १९०२ ला लिहिलेल्या पत्रात, ढोंगी ब्राह्मणांना पृच्छा केली आहे. "आजदिवसपर्यंत तुम्ही विद्याप्रसाराचे पुण्य आपल्या पदरी घेतले आहे काय? कोणते तरी गावी धर्मार्थ शिक्षणगृह अथवा अनाथगृह महारांच्या मुलांसाठी स्थापन केले आहे काय? उलट जागजागी ब्राह्मणांकरिता अन्नछत्रे, देवस्थाने वगैरे घालून ठेवलीत. स्वतःची सोय मात्र चांगली करून घेतलीत." नऊ दशकानंतरही यातले सत्य अनुत्तरितच राहिल्याचे दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हे अर्थशास्त्र आणि न्याय व कायदा यांचे मर्मज्ञ असल्यामुळे, व्यावहारिक जीवनात; प्रत्येक व्यक्तीला कोणकोणत्या अंतर्विरोधांना तोंड द्यावेच लागते, हे त्यांना निश्चितपणे ज्ञात होते. धर्म आणि व्यक्ती यात संघर्ष उद्भवला की, व्यक्तीचा पराभव, हा अवघ्यांनीच गृहीत धरलेला असतो. पण व्यवहारात धर्माचेच एक दृश्य रूप नीती हे असते. नीतीची आणि नैतिकतेची अनेक रंजक व गंभीर पातळ्यांवरही, चर्चा करता येते. पण जेव्हा जेव्हा अर्थशक्तीचा संदर्भ येतो, तेव्हा बाकीच्या गोष्टींचा विचारही गौण ठरतो. 'द्रव्येण सर्वे: वशः', 'अर्थस्य पुरुषो दासः', 'सर्वे गुणः काञ्चनं आश्रयन्ते' वगैरेंसारखी अतिप्रसिद्ध, सहज आठवणारी अनेक वचनेही, उपरोक्त गोष्टीलाच दुजोरा देतात. म्हणजे जेव्हा नीती व अर्थशास्त्र यात संघर्ष उभा ठाकतो, तेव्हा विजय अर्थशास्त्राचा होतो. या नीती-नैतिकतेशी संबंध आहे आपल्या विवाहसंस्थेचासुद्धा.

व्यावहारिक जीवनात आज विवाह हा एक सर्वस्वीकृत, समाजमान्य महत्त्वाचा संस्कारविधी आहे. पारंपरिक रीतीने देवाब्राह्मणांसमोर यज्ञ व शास्त्रवचनांची मदत घेऊन, पार पडलेल्या व लग्न होऊन, नव्या घरी आलेल्या मुलीला 'हुंडा' प्रथेमुळे जाळताना नीतीच जळते. स्वार्थाचा, व्यवहाराचा, अर्थकरणाचा राजरोसपणे विजय झालेला दिसतोच आहे. हा देखील विचित्र विरोधच होय.

स्त्री, त्याग, मातृत्व, स्वर्गतुल्यता इत्यादी गोष्टी सर्वच धर्मात आणि व्यवहारात आढळतात. हिंदु वचनात तर, 'स्त्री' निराश्रया शोभूच शकत नाही. कुठल्याही कुळाशिलाची बाई असली तरी, ते रत्न आहे, असे मानून तिची प्राप्ती व स्वीकृती करावी; अशी व अशा तऱ्हेची अनेक कितीतरी वचने दाखविता येतील. पण समग्र व्यवहार हा पुरुषप्रधान संस्कृतीचा आहे. सगळ्यांचा गोळाबेरीज अर्थ इतकाच निघतो की, स्त्री ही पराश्रीत, अबला आणि अतिदुर्बल आहे. पिता, पत्नी आणि पुत्र, हेच तिच्या हिताचे खरे रक्षणकर्ते आहेत. मग तिला ते कळत असो वा पसंत नसो. तिने अकारण 'स्त्री' बुद्धी चालवू नये आणि प्रलयपर्वाला आमंत्रण देऊ नये.

ह्या विचारसरणीतूनच, स्त्री म्हणजे भोगदासी, पोरे पिकविण्याची नुसती जमीन. तिची अक्कल केवळ चुलीपुरतीच. परंपरेचा आणि जुलुमांचा एवढा प्रचंड पगडा, स्त्रीमनावर बिंबवला गेला आहे की, त्यांची विचारशक्तीच खुडून काढली आहे. आजच्या काळात जगभर, स्त्रीजागृती, स्त्रीमुक्तीचे, जे अनेक लढे उभारले जात

आहेत; त्यावेळी बाबासाहेब आंबेडकरांनी दलित स्त्रीयांना जो पुकारा केला आहे, त्याचे महत्व प्रकर्षाने पटते.

कारण पुरुषांच्या जादा शारीरशक्तीचे, बळाचे आणि पौरुषाचे प्रदर्शन, स्त्रीयांचा उपभोग घेऊन मिरविण्यात धन्यता मानण्याचा, एक जमाना होता. लग्नाच्या बायकोशिवाय बाहेर ज्याचे काही 'स्वटले' नाही, असा पुरुष, पुरुषच नव्हे, अशी एक विचित्र रीती होती. त्याबद्दल समाज संतुष्ट आणि समाधानही असतो.

राजकारणात वावरणाऱ्या बहुसंख्य वीरांची लग्ने, प्रामुख्याने राजकीय हेतुंच्या साध्यपूर्तीतूनच होत असत. आणि ह्या अशा बहुपत्नीत्वाच्या चालीला, समाजमान्यता व शिष्टमान्यता होती. अर्थात याला धर्ममान्यता तर असणे, अपरिहार्यच होते. त्यातूनच मग; रखेली, अंगवस्त्रे, देवदासी, मुरळी, नाटकशाळा याला एकदम उधाण आले होते. ह्या अनेकसंबंधी प्रकरणामुळेच, बहुसंख्य राजेरजवाडे, सरदार-दरकदार, पाटील-देशमुख पटवारी-कुलकर्णी, वगैरेंच्या जीवनात; व्यवहारार्थ-दत्तकपुत्रांची व्यवस्था करावी लागली. वंध्यत्व आणि निपुत्रिकत्व अशा, आत्यंतिक भोगाचाच एक भाग म्हटला तर अतिशयोक्त ठरणार नाही. दत्तकाची गरज यातूनच आली का?

ह्या वैभवप्रदर्शनाला आणखी एक रंग होता. आर्थिकदृष्ट्या गांजलेल्या, अज्ञानाने पीडलेल्या, जातीव्यवस्थेने धुतकारलेल्या आणि धर्मानेच पथभ्रष्ट केलेल्या सामान्यजनातून गणिकांचा, वेश्यांचा, तमासगिरांचा वर्ग पोसला गेला. त्यांना साहित्य-काव्य-नाटकाच्या सांस्कृतिकतेत स्थानही दिले गेले.

डॉ. बाबासाहेबांना, स्त्रीयांच्या स्वाभाविक नटण्यामुरडण्याची जाणीव होती. म्हणून ते म्हणतात, "....दागिना घालावयाचा झाला तर तो सोन्याचा घालावा.... नाहीतर घालू नये..... ज्ञान व विद्या या गोष्टी काही पुरुषांसाठीच नाहीत. त्या स्त्रियांनाही आवश्यक आहेत. (भी. रा. आंबेडकर - चरित्र - खंड ३, चां. भ. खैरमोडे)

इतकेच नव्हे तर, हिंदु स्त्रियांच्या अवनतीचा विचार करीत असताना, त्यांनी मनूच्या विपरित करणीकडे लक्ष वेधले आहे. "बौद्ध धर्म नष्ट करण्याचा एक मार्ग म्हणजे बौद्ध धर्मापासून आर्य कुटुंबे दूर ठेवणे आणि ती ब्राह्मणी वर्चस्वाच्या पंजास्याली कायमची ठेवणे, त्याचप्रमाणे कुटुंबातील आधारस्तंभ म्हणजे स्त्री, तिची स्थिती कुटुंबातच गुलामाच्या स्थितीपेक्षाही हीन करणे, हा उपाय मनूने योजला. हिंदुस्थानातील स्त्रियांच्या मोठेपणाचा ऱ्हास आणि स्त्रियांची अनवती, याबद्दलची सारी जबाबदारी मनूच्या माथ्यावर लादली पाहिजे. ती बुद्धावर लादता येणार नाही." ('हिंदु स्त्रियांची उन्नती आणि अवनती' - डॉ. बी. आर. आंबेडकर, अनुवाद तुलसी पगारे - सुगत प्रकाशन, १२ एप्रिल, १९७४ - पृष्ठ ३५)

बाबासाहेब दलितत्त्व प्राप्त झालेल्या प्रत्येक घटकाचा आणि व्यक्तींचा, किती व्यापक आणि सर्वसमावेशक दृष्टीने विचार करतात, याचे हे ठळक उदाहरण, म्हणून सांगता येईल. वरील ठिकाणी, स्त्रीपुरुषांचे सहजीवन म्हणजे विवाहबंधनाचो फलश्रुती.

पण पुरुषाने गावगन्ना भटकायचे, शिंदाळकी करायची आणि स्त्रीयांना मात्र; मातृत्व, त्याग, मर्यादा, महानता अशा घासल्या गेलेल्या शब्दांची, झूल घालायची हेच विसंगत होते. हा प्रत्यक्षाप्रमाणे वैचारिक व्यभिचारच होता म्हणायचा. आधुनिक विचारवंतही याच दृष्टीने आपली मते नोंदवितात. त्यातीलच एक मत श्री. मानवेंद्रनाथ रॉय यांचे आहे. पुण्यातील एक विचारवंत कार्यकर्त्या, श्रीमती कमल पाध्ये, यांनी ते विचार भाषांतरित केले आहेत. त्या म्हणतात -

" व्यभिचार हा नैतिक गुन्हा मानण्याला काही अर्थ असेल तर तर्कदृष्ट्या, एक पुरुष एकाचवेळी एकापेक्षा अधिक स्त्रियांशी लग्न करू शकत नाही. एकनिष्ठतेची शपथ ही पवित्र आहे ह्या कल्पनेला नैतिक अधिष्ठान म्हणून, व्यभिचार निषिद्ध ठरविला गेला आहे. आणि व्यभिचाराला नैतिक आधाराघर केलेला निषेध म्हणजे, ओघानेच घटस्फोटाचे समर्थन. मग हिंदू नीतिवाद्यांना त्यावद्दल कितीही तिटकारा वाटो." (भारतीय स्त्रीधर्माचा आदर्श : एम. एन. रॉय यांची दैनंदिनी - अनु. सौ. कमल पाध्ये. प्राज्ञ पाठशाळा मंडळ प्रकाशन - १९६७ - पृ. २४)

आजच्या स्त्री जाणिवांच्या वैश्विक विचारसरणीच्या पातळीवर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'स्त्री आणि तिचे स्थान' याविषयीचे चिंतन किती मूलात्म आणि दूरविचारस्पर्शी होते, हे जाणवावे, म्हणून अन्य मुद्यांच्या मानाने, हा मुद्दा विशेष विस्तारपूर्वक चर्चिण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय समाज, संस्कृती, त्यामधील धर्माधर्मांबावतची अतार्किक विचारसरणी आणि त्यातून एकंदरच समाजजीवनात निर्माण झालेली किल्मिषे; यांचा विचार नेहमीच अस्वस्थ करीत असे. समाजवादी समाजरचनेत काही दोषही स्वाभाविकपणेच संभवतात, याची त्यांना पूर्ण कल्पना होती. त्यातील ठळक म्हणजे, उद्दिष्टे आणि ध्येयधोरणे निश्चित आस्तून, त्यापद्धतीने वाटचाल करण्याचा प्रयत्न करणे. यातून मग मूल्यनिश्चितीची प्रक्रिया शिथिल व सदोष बनत जाते. व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच व्हायला सुरूवात होते. कुणालाही उत्तेजन म्हणून काही करण्यादेण्यानेही, पक्षपाताचाही आरोप उद्भवू शकतो. नोकरशाहीच बलवान आणि शोषक बनायला लागते, अशा विविध तऱ्हेच्या विसंगतीची प्रक्रिया सुरू होते.

भारतीय लोकशाही प्रणालीमध्ये विविध धर्म, पंथ, प्रादेशिक विस्तार, रीतीभाती, संस्कारांच्या पुरातनतेचा अक्षम्य पगडा, त्याबाबतचे तीव्र रागलोभ आणि अट्टाहासी मनःप्रवृत्ती यांच्यातून मध्यममार्ग शोधीत शोधीत त्यांना घटना बांधत जावी लागली. त्यामुळेच सरनाम्यातील आश्वासन व्यापक आणि सर्वसमावेशक अशा तऱ्हेने, त्यांना शब्दबद्ध करणे अगत्याने वाटले. " त्यातील सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक, राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांची स्वाधीनता, दर्जा व संधी यांची समता प्राप्त करून देण्याकरिता आणि त्यासर्वांमध्ये व्यक्तीची

प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता सुनिश्चित करणारी बंधुता संवर्धित करण्याकरिता गांभीर्यपूर्वक संकल्प करून आज २६.११.१९४९ रोजी अंगीकृत, अधिनियमित व आत्मसमर्पित करीत आहोत." अशी शब्दावली उपयोजण्याचे हेच प्रयोजन आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्वस्पर्शी विचारधनाचा संपूर्ण आढावा किंवा परिचय, हा एक स्वतंत्र ग्रंथविषय होऊ शकतो, हे नव्याने सांगायला हवे असे नाही.

परंतु, त्यांच्या आयुष्याच्या घडणीत त्यांच्या कुटुंबातील विवक्षित संस्काराचा आणि पैतृक ऋणाचा किती वाटा आहे, हे स्पष्ट केले आहे.

एखादी सामाजिक जबाबदारी पेलतांना ज्या अनेक अडचणी व आपत्तींमध्ये गुरफटावे लागते, त्यात वाट्याला येणाऱ्या फजितवाड्यातही, सोशीकता किती आवश्यक असते, हेसुद्धा त्यांच्या जीवनारंभापासून, चरित्रांतर्गत अनेक घटनांची साक्ष काढीत स्पष्टपणे कळून येते.

समाजजीवनातील विषमतेच्या विषवल्लीने आणि तिच्या प्रभावाने, कुटुंबाला कण्यासारख्या पेलणारा घटक जो स्त्री, ज्याबद्दल 'जिच्या हातीं पाळण्याची दोरी । ती जगताते उद्धारी ॥' असे प्रत्यक्षात बोलले जाते. पण प्रत्यक्षात तिची जी किंमत, येथल्या व्यवहारी मर्दानुगामी संस्कृतीत आहे, त्याबद्दलच्या विचारांचा अगत्याने परामर्श घेतला आहे. आणि हे करीत असताना, अत्याधुनिक मुक्तीचळवळींच्या आजच्या उपाय-विचारांशी, त्यांचे किती प्रमाणात जुळते, याचीही स्वास, त्रुटित पण निश्चित मांडणी केली आहे.

समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि उपलब्ध ग्रंथसिद्धांताच्या छाननीतून त्यांच्या सर्वसमूहस्पर्शित्वाचा एक विशेष पैलू उपलब्ध होतो. हे करताना त्यांचे जे इंग्रजी लेखन आहे, त्यातील कित्येक विचारात-शब्दांत; हे प्रत्यक्षाप्रत्यक्ष आढळते. सर्वहारा-सर्वप्राप्त वर्गाच्या अपरिहार्य अटळ संघर्षाबद्दल आणि त्यानंतरच्या आर्थिक समानतेबद्दल, कार्ल मार्क्स आदी सर्व विचारवंतांना; भारतीय भूमीतला जातीवाद कसा अपुरा ठरवतो, ते बघणेही आवश्यक होते.

शिक्षणविषयक एकाधिकार, त्यातून आलेली धोरणे आणि त्यातील उणिवांनी भारतीय मनोरचनेचा केलेला संकोच स्पष्ट करतानाही बाबासाहेबांनी आपला विचार केवळ दलित वर्गापुरताच न ठेवता, व्यापक केलेला आहे आणि तेच तर, त्यांच्या विचारांचे स्वास मोठेपण आहे.

मूल्ये हीदेखील शाश्वत नसतात. नसावीत. ज्यांचा एखादा धर्म किंवा वर्ण, फारच चढ्याखड्या सुरात पाठपुरावा करीत असेल, तर त्यातले इंगित थंडपणे समजून घेणे मोलाचे असते. कारण, 'गर्जेल तो पडत नाही' आणि 'बोलतो तो करत नाही' हीच तर, व्यवहाराची फार मोठी शोकांतिका असते.

भारताच्या प्रज्ञाचक्षूला विसाव्या शतकात सापडलेल्या शोधभूमीवरील सैद्धांतिक चमत्कार म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. ते महात्मा कबीर, महात्मा फुले,

आणि महात्मा गौतम बुद्ध यांचे विचारानुयायी होते. कारण तेच स्वतः फार मोठ्या मनाचे आणि वेगळ्या श्रेणीचे होते.

मानवी आयुष्यात जयंत्यामयंत्यांना जन्मशताब्दी-स्मृतीशताब्दी यांना इतर वेळी काय मूल्य असेल ते असो, पण मानवी मूल्यांची प्रतिष्ठा मापणारा मानदंड म्हणून, कोण्या व्यक्तीकडे निःसंशय बोट दाखविता येईल ते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडेच होय. म्हणून अन्य रत्नांपेक्षा त्यांचे तेज अनोखे आणि निःस्तुल आहे.



३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाहीनिष्ठा

आपल्या भारताच्या लोकशाहीने आता चाळिशी पार केली आहे. होणाऱ्या निवडणुका, घटनात्मक तरतुदी आणि त्याप्रमाणे अस्तित्वात येणारी, प्रत्येक ठिकाणांची सरकारे, याचा अनुभव आपण सगळे घेतच आहोत. हे वैशिष्ट्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या घटनेमुळेच, आपण अनुभवीत आहोत.

अलीकडे वायव्येकडे आणि पूर्वेकडील राज्यांमध्ये म्हणजे काश्मीर-पंजाब आणि आसाम, प. बंगाल इत्यादी ठिकाणी सातत्याने होणाऱ्या, हिंसाचार व विविध तऱ्हेच्या उद्रेकांमुळे, रोजच्यारोज वर्तमानपत्रे रकानेच्या रकाने, बातम्या ओतत असतात. ज्या ज्या ठिकाणी स्नेहाचा, प्रेमाचा, मैत्री व सद्भावाचा हात, आपल्या देशाने पुढे केला; त्या त्या ठिकाणी विश्वासघात आणि फसवणूकच, प्रामुख्याने आपल्या वाट्याला आली आहे.

पाकिस्तान, चीन, बांगलादेश, श्रीलंका या सगळ्याच ठिकाणी; असाच विपरित अनुभव आपण घेतला आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांमध्ये, जे आणि जसे चालले आहे, त्याची पाळेमुळे खोलपर्यंत पसरलेली आहेत.

निधर्मी किंवा धर्मातीत लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या आपल्या देशात; प्रत्येक जात, जमात अधिकाधिक हळवी, असहिष्णु आणि धर्मांध होत चालल्याचा, प्रत्यय येतो आहे. बहुसंख्यांक वर्ग प्रामुख्याने हिंसक आक्रमक बनत असल्याने अल्पसंख्यांक भयग्रस्त आणि वैफल्यग्रस्त होत आहेत. लोकशाही व्यवस्थेवरच मुळी विश्वास नसणारा आणि विशिष्ट लोकांच्या सत्तेची आकांक्षा बाळगणारा, ' स्वयंसेवक संघ ', राजकारणात केंद्रस्थानी येण्याची, बौद्धिक चाल खेळताना दिसतो आहे. सत्तेपर्यंत जाण्यासाठी कुणाहीसोबत आणि कशाहीसोबत वाटचाल करण्याची स्वार्थी प्रवृत्ती आणि ध्येयशून्यता, त्यांचीही बांधिलकी स्वीकारणारे, शिक्षित पण मनाने गुंडझुंड प्रवृत्तींचे सिद्ध होताना दिसताहेत.

छोटे-छोटे प्रश्न, मोठ्या भिंगातून दाखवून, धर्माचा विकृत बागुलबोवा करणारे, संधी म्हणून अराजकसदृश स्थिती निर्माण करताहेत. माणसे गोड बोलतात, पण आत धर्माचे गरळ असते. माणसे तत्त्वांचे गोंडस प्रतिपादन करतात, मनांत वर्णविशिष्ठ स्वार्थ फसफसत असतो. सहकार्याचा आव आणतात. पण लोकांनाच भयग्रस्त आणि अस्वस्थ करण्याचा खेळ चाललेला असतो. याचेच प्रत्यंतर, स्वातंत्र्याच्या ह्या पाचव्या दशकात, प्रामुख्याने येत आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्वाचा आणि दूरगामी वैचारिकतेचा, अशा वेळीच, प्रामुख्याने आठव होतो. जातीय सलोख्या आणि धर्माचरणात ज्या ज्या वेळी असंतुलन निर्माण होते, त्यावेळी डॉ. बाबासाहेबांच्या वेळोवेळी केलेल्या चळवळींची, भाषणांची, सत्याग्रहांची आणि पुणे करारासारख्या; महत्वाच्या बावींची आठवण होते.

डॉ. बाबासाहेब, लोकशाही हे प्राणप्रिय मानवी मूल्य मानत होते. 'व्यक्तीचे कार्य व माहात्म्य याचा आदर जरूर व्हावा' असे त्यांना वाटे, पण तरी अशा कोण्याही 'व्यक्तीच्या पायावर, आपले व्यक्तिस्वातंत्र्य वाहावला, त्यांनी भक्कमपणे नकार दिला आहे.

अमेरिकेच्या स्वातंत्र्यावर आणि इतिहासावर ज्यांची अक्षरमुद्रा उमटलेली आहे, त्या श्री. बुकर टी. वॉशिंग्टन, यांचे एक अत्यंत महत्वाचे वाक्य असे आहे -

"Let no man pull you so low, as to make you hate him."

'दुसऱ्या कोणीही तुमच्या द्वेषाला कारणीभूत होईपर्यंत, त्या माणसाचा अधिक्षेप करू नका.' देश फक्त माझा! 'माझे वागणे-बोलणे म्हणजेच राष्ट्रीय, बाकीचे इथले दुय्यम नागरिक, अराष्ट्रीय, असे सांगणारे, धूर्त नेतृत्व आणि त्यांचे म्हणणे, विचारही करण्याचा त्रास न घेता, स्वीकारणारे अनुयायी; हेच देशातले, मोठे जिवावरले दुखणे आहे. अशा वरवरल्या बेगडात अडकणारे आणि वाहेल त्या मार्गाने, समृद्धीच्या चोरवाटा कावीज करणाऱ्या, शिक्षित पण असंस्कृत-असहिष्णु तरुणांची वाढ होत जाणे; ही आजची शोकांतिका आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या, राजकारणाची आणि भाषणलेखनांची म्हणूनच, शांतपणाने दखल घेण्याची, कधी नव्हे ती गरज, आता निर्माण झाली आहे.

डॉ. बाबासाहेबांनी आयुष्यभर, हातात आणि कुठेच काही नसणाऱ्या सर्वहारा वर्गाची, शोषित-दलितांची, अस्पृश्य बहिष्कृतांचीच बाजू सातत्याने घेतली आहे. 'मूकनायक', 'बहिष्कृत भारतातून जळजळीत लेखन केले आहे. चवदार तळ्याच्या सत्याग्रहात, पाणी घेण्याचा हक्क प्रस्थापित करताना, धर्ममार्तंडांच्या अतार्किक प्रलापांचा खरपूस समाचार घेतला आहे.

मंदिरप्रवेशाने आणि पूजेअर्चेने कधी ऐहिक सुखाचे दरवाजे चमत्कारासारखे उघडत नाहीत, हे त्यांना ठाऊक होते. पण तरी एकधर्मीय म्हणून; समानता व समनियमांच्या आधारे मंदिरप्रवेश मिळालाच पाहिजे, अशाही संघर्षाची बाबासाहेबांनी सुरूवात केली होती.

'माणुसकी आणि समानतेच्या हक्कांसाठी जातीयतेविरुद्ध, आयुष्यभर सैद्धान्तिक आणि कृतीपूर्ण लढे, बाबासाहेब आंबेडकरांनी लढविले. येथील सनातनी माणसांच्या मनाची, योग्य तऱ्हेने बदल करण्या-स्वीकारण्याची तयारी नाहीच, याची

जेव्हा बाबासाहेबांना स्वात्री झाली, तेव्हाच त्यांनी बुद्ध धर्म; डोळसपणे व दूरदृष्टीने स्वीकारला. आपल्या लक्षावधी बांधवांनाही तो दिला.

आपल्या लोकशाही रचनेमध्ये, धर्मस्वीकृतीचे आणि धर्म निभावण्याचे स्वातंत्र्य, घटनेतच नोंदलेले आहे. पुणे येथील ' डिस्ट्रीक लॉ लायब्ररी हॉल 'मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बावीस-बारा-एकोणिसशे बावन्न साली, व्याख्यान दिले होते. त्यात त्यांनी लोकशाहीच्या सर्व उपलब्ध व्याख्यांचा परामर्श घेऊन, स्वतःची व्याख्या; सुस्पष्टपणे सांगितली आहे. त्यात ते निर्देशित करतात -

– " लोकांच्या राजकीय व सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल, रक्ताचा एकही थेंब न गाळता घडवून आणणे, म्हणजे लोकशाहीय होय."

ह्या त्यांच्या भूमिकेला, रास्तपणे उतरण्यात आपण किती यशस्वी होतो आहोत, याचे आत्मशोधन प्रत्येक नागरिकाने आणि घोषणापत्रकांची राळ उडवणाऱ्या, प्रत्येक राजकीय पक्षानेही केले पाहिजे.

ह्याच जाहीर व्याख्यानात बाबासाहेबांनी लोकशाही प्रभावी ठरवणारी चतुःसूत्रीही सांगितली होती. ते म्हणतात -

(एक) समाजात श्रेष्ठ-कनिष्ठ असे भेद नसावेत.

(दोन) विरोधी राजकीय पक्ष लोकशाहीची संजीवनी होय.

(तीन) कायदा आणि राज्यकारभार यांच्यासाठी सर्व समसमान धरले जावेत.

(चार) संसदीय नीतीमत्ता व सारासार विचारांचे काटेकोरपणे पालन व्हावे.

या चार प्रमुख सूत्रांना, बाबासाहेबांनी अन्य उदाहरणांचा आणि स्पष्टीकरणांचा, जो आधार दिला आहे; तो त्यांच्या लोकशाहीवादी मनाचा सुस्पष्ट पुरावाच आहे.

विशेषतः दुसऱ्या सूत्रात विरोधी पक्षाबद्दल ते म्हणतात, ' राज्यकर्ते व विरोधक हे लोकशाहीच्या राजवाड्याचे दोन खांब होत. ' पहिल्या सूत्राबद्दलच्या विवरणात ते लिहितात - ' आतापर्यंत परंपरागत एकाच वंशात जी राजकीय सत्ता चालत आली होती, ती बंद करणे, आणि लोकमताने त्या सत्तेवर, उत्तम व्यक्तीला नेऊन बसवणे ' हेच लोकशाहीत व्हायला हवे.

हे सूत्र अमेरिकेत आणि अन्य देशात अपवादासह कसे पाळले जाते, याचेही विवरण त्यांनी केलेले होते. पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी किंवा चौधरी चरणसिंग, देवीलाल इत्यादींची, जी लोकशाहीव्यवस्था, म्हणजे आपली पिढीजात कौटुंबिक सोय, ही जी धारणा आहे; त्यावरून हा ' उतारा ' समजून घेणे महत्त्वाचे आहे.

आपल्याकडे लोकशाहीला कोणकोणते धोके आहेत, असू शकतात, याबद्दलच्या अनुभवांचे जागरूक बोल, बाबासाहेब सांगतात. सोदाहरण दिलेले हे भाष्य आजही लागू पडते. ते म्हणतात -

"विरोधी पक्षाचा सभासद, बोलण्याची परवानगी मागू लागला, की त्याला सत्तारूढ पक्षाने हैराण करावे, त्याने मांडलेली लोकहितांची बिले अगर ठराव यांना झटकून टाकणे, वगैरे लोकशाहीला विघातक असे; अनेक प्रकार, सर्वश्री खेर, मोरारजी देसाई, मुनशी, मावळंणकर वगैरे बहुसंख्य पक्षातील, सत्ताधाऱ्यांच्या कारकीर्दीत, मला पहावयास मिळाले. अशा स्थितीत अल्पसंख्य पक्ष, बहुसंख्यांकांचा द्वेष करू लागतात, हे ओघानेच येते. अशा अवस्थेत देशात परस्परातील द्वेषभावना वाढत राहिली, तर लोकशाहीला ती भस्म करणारच." (डॉ. बाबासाहेब आंबेडकर. खंड ११ - चां. भ. खैरमोडे. पृष्ठ चोवीस)

यातही लोकशाही 'भस्म' होण्यास काय काय कारणे घडू शकतात याचा त्यांनी अनुभवाधारीत वस्तुस्थिती कथन करणारा, निर्देश केला आहे.

आपल्या प्रचंड देशात अस्तित्वात आलेली लोकशाही कशी भक्कम होईल, हाच एक ध्यास, बाबासाहेब आंबेडकरांना होता. म्हणून तर घटनामंदिरात देवाऐवजी जर प्रबळ राक्षस शिरला आहे असे दिसले तर घटना जाळायलाही त्यांची परवानगी होती. काहीच हरकत नव्हती. या देशात निर्माण केलेली व्यवस्था, नियम, कायदेकानून ह्यांचा जर लोककल्याणार्थ; स्वातंत्र्य, समता, बंधुता प्रदान करण्याबाबत उपयोग होणार नसेल, तर ती झुगारण्याचीही त्यांच्या मनाची तयारी होती. ह्याबाबतीत ते अत्यंत परखड आणि रोखठोक भाष्यकार होते. आपण आज बोलतो तोच उपरोध व तिरकसपणाही त्यांच्या शब्दात आहे.

त्यांच्या राज्यसभेतील भाषणात आपल्या देशाच्या व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या, आंतरराष्ट्रीय धोरणांबद्दलचा जो इशारा आहे, तो या दृष्टीने बोलका आहे. त्याच ठिकाणी काश्मीर प्रश्नाच्या, भिजत घोंगड्याचा, त्यांनी दिलेला दणका, किती खरा होता, याचा अजून आपण अनुभव घेत आहोत. बाबासाहेबांचे २६ ऑगस्ट, १९५४ चे भाषण - Parliamentary Debates - Rajya-Sabha - Vol. vii, August - Sept. 1954 Page 437.438 वर, अशा शब्दात आले आहे.

"The key note of our foreign policy is to solve the problems of other countries, and now to solve the problems of other countries and not to solve the problems of our own. We have here the problem of Kashmir... But I suppose, some day, we may wake up and find that the ghost is here."

(श्री. चां. भ. खैरमोडे यांच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर, खंड-११, प्रकरण पाच पृष्ठ ९९-१००)

आता काश्मीर आणि पंजाब प्रश्नांचे भूत आपल्या देशाच्या नकाशाला कशी आणि केवढी डोकेदुखी होऊन बसले आहे हे नव्याने सांगण्याची गरजच आता नाही.

नव्या निवडणुकीनंतर देशाची अंतर्गत व्यवस्था अधिक उग्र स्वरूप धारण

करताना दिसते आहे. आधीच्या सत्ताधारी पक्षाच्या चुका आणि अदूरदृष्टी तर कारणीभूत आहेच, पण सध्याच्या सरकारातील, परस्परांना शह देण्याची इच्छा बाळगणाऱ्या, संकुचित राष्ट्रवादाचे गोडवे गाणाऱ्यांच्या मनातील, दडलेले मनसुबेही आहेतच.

त्यामुळेच सगळीकडे आत्यंतिक टोकाची भूमिका व टोकाचेच उपदेशमार्ग सुचविले जातात. रशियाने-साम्यवादी सत्तेने, बळाने काबीज केलेल्या अनेक देशांबद्दल, बाबासाहेब संसदेतही पोटतिडिकेने बोलले होते. कॉ. भूपेश गुप्ता, अनेक अडथळे आणत असतानाही, 'पहिल्या महायुद्धानंतर रशियाने काय काय गिळंकृत केले?' ते दाखवत होते. 'चीन बरोबरचा, 'पंचशील करार' एक दिवस महाग पडणार;' हेदेखील ते सोदाहरण सांगत होते. आपल्या राजकीय जीवनात नालस्ती आणि सैन्याच्या मानहानीचा कटु अनुभव घेऊन, आपण त्यांची किंमत मोजली आहे. आज रशियाही ज्या विभाजन-उठावाला तोंड देतो आहे, अशावेळी बाबासाहेबांच्या राज्यशास्त्राच्या भक्कम अभ्यासाचा आणि अलौकिक द्रष्टेपणाचा प्रत्यय, आपणास येतो आहे. मार्क्सवाद आणि मार्क्सवादी लोकांबद्दल म्हणूनच डॉ. आंबेडकर विशेष जागरूक होते.

'परिवर्तन कसे व्यापक असावे?' याबद्दल स्पूपच लिहिले-बोलले जाते. मोकळ्या मनाच्या मार्क्सवादी विचारवंतांनाही या गोष्टीचा अंदाज होता, असे लिखित पुरावेही सादर करता येतात.

- " एका टोकाला साहसी हिंसाचारी मार्ग व दुसऱ्या टोकाला संतांच्या अहिंसेचा मार्ग असे दोन मार्ग, मार्क्सच्या काळी व आजही उपदेशिले जाताना दिसतात. थोड्या व्यक्तीपुरतेच परिवर्तनाचे कार्य सीमित ठेवायचे असेल तर दोन्ही विचार अमलात आणणे शक्य असते." (मार्क्सचा समाज परिवर्तनाचा दृष्टिकोन - दि. के. बेडेकर - सोविएत रशियाची पन्नास वर्षे. अंक डिसें. ६७, जाने. फेब्रु. मार्च. १९६८, पृष्ठ १५)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रामुख्याने जरी दलितांच्या हक्कांसाठी लढे उभारले होते, तरी त्यांच्या मनात, व्यापक मानवी प्रतिष्ठेचा आणि सर्वस्पर्शी स्वच्छ लोकशाहीचाच विचार, कायम खेळत होता. तो त्यांचा श्वासच होता, असेच म्हणावे लागेल.

त्या दलितांना आजही भारतीय लोकशाही ही सवर्णांची, धनिकांची आणि दांडगोबांची बटीक आहे, असाच अनुभव येत असेल तर येथे, 'राज्य कोणाचे आहे ? पेशव्यांचे-इंग्रजांचे की लोकशाही नावाचे ?' असेच विचारावेसे वाटल्यास, ते अप्रस्तुत ठरेल, असे मला वाटत नाही.

दुय्यमपणाची, उपकार केल्याची, गुलामांशी वागावे तशी मनोवृत्ती, आत्ताशा झपाट्याने वाढताना दिसते आहे. अमेरिकेत 'श्वेत आणि निग्रो' लढ्याचा इतिहास विश्वविख्यातही आहे आणि उदाहरणरूपसुद्धा आहेत. मार्टिन ल्यूथर किंगपासून अनेक निग्रो कृतीशील क्रांतिकारकांचे बलिदान आणि काय दीपस्तंभाप्रमाणे पुढे आहेच. एक निग्रो विचारवंत, श्री. स्टर्लिंग ट्यूकर यांनी, विभाजन व 'स्वतंत्र' अस्तित्वाबद्दल

मांडलेले विचार, म्हणूनच मला येथे ग्रंथित करावेसे वाटतात. ते लिहितात -

"Our weariness is real. We are weary of the Long, Lonely struggle of trying to make it against odds of trying to Shove, Cajole, Wheedle, persuade and threaten our way in where we are not Welcome ".

('For Blacks only' - 'the Dangers of uses of Separatism' - Sterling Tucker - Page - 101, Eurasia publishing house pvt. New Delhi - 55, First Indian Reprint - 1972)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या विचाराने भारलेल्या, सुजाण दलितांच्या व विचास्वंतांच्या विचारांची, गांभीर्याने दखल घेण्याची निकड, आज निर्माण झाली आहे.

धर्माचेच नाव घेत माणसांची दिशाभूल करणारे, संस्कृतीचा उद्घोष करीत हिंसेला चिथावणी देणारे, धर्माचा गजर करीत स्वार्थाचे गाजर खाणारे आणि गरीब शेतकऱ्यांचे प्रतिनिधी असल्याचा कांगावा करीत, कुटुंब-कबिल्याचे व जातीचे हित जपणारे, चतुर आज मोठ्या प्रमाणात वाढत असताना, बाबासाहेबांच्या विचारांचा आणि त्यांच्या लोकशाहीनिष्ठेचा, मूलार्थ समजून घेणे, अत्यंत अगत्याचे आणि अग्रक्रमाचे आहे. त्यावरच देशाचे आणि लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे.



४. लोकशाहीच्या भवितव्यासाठी

" अर्वाचीन जातिभेदामुळे हिंदुस्थानचे पाऊल पुढे पडत नाही. या धोरणामुळे समाजाचे लहान-लहान तुकडे पडून ते आपल्या कक्षेत कुजू लागले आहेत. " स्वामी विवेकानंदांच्या उपरोक्त वचनाची प्रचिती आज अत्यंत तीव्रपणाने येते आहे.

भारत देशाला प्रदीर्घ इतिहास आहे. विशाल भूप्रदेश त्याला लाभला आहे. तत्त्वज्ञानाचा गौरवशाली वारसा आहे. अनेकविध स्थित्यंतराची अनंत चिन्हे आहेत. विविध भाषांचा अर्थपूर्ण नादमेळ आहे. धर्मोपदेशकांची व संतमहंतांची येथे कधी वाणच नव्हती. पण तरी राष्ट्रभावनेच्या अभावाने ही भूमी एकसंध होण्यास खूप अडचणी सतत येत असतात. हा नित्याचाच अनुभव आहे.

धर्ममते आणि धर्माचरण ह्यात व्यावहारिक पातळीवर पुष्कळदा विरोध निर्माण होत असतो. आचरणात येणाऱ्या रुढीपद्धती कालमानाने निर्जीव व्हायला लागतात. त्यांच्यातील जटिल कठोरपणा अधिकाधिक वाढण्या-वाढवण्याची प्रक्रियाही येथेच सुरू होते. अशा रीतीने पवित्र ग्रंथांचा नामोल्लेख करीत विवक्षित वर्ग आपले श्रेष्ठत्व अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करतो. परंपरा व पूर्वेतिहासाच्या रेट्यामुळे त्याचा काही काळ स्वीकारही केला जातो. पण यामध्ये सतत करून दिल्या जाणाऱ्या न्यूनत्वाचा अकरणात्मक जाणिवेमुळे अंतरंगात असमाधानाचेही बीज पडायला लागते. त्या त्या वेळी धर्माच्या पुरस्कारात येणारा नवा पंथोपपंथ थोड्याशा बदलामुळेही नवा आणि वेगळा व हवाहवासा वाटू लागतो.

परिवर्तन आणि कालसुसंगतता ह्याच स्वाभाविक गोष्टी आहेत. याचा विसर पडायला लागला की, वर्तन अधिक बेताल होऊ लागते. आतापर्यंत हातामध्ये असलेली सत्ता, मत्ता, श्रेष्ठता आणि अहंकार जोपासण्यासाठी, नवनवीन भ्रामक संकल्पनांचे जाळे फेकले जाते. त्यावर चातुर्यपूर्ण व वरवर विनतोड वाटणारी भाष्ये लिहिली जातात. युक्तिवादाच्या अनंत सापळ्यांचा वापर केला जातो. कधी मग असेही सांगितले जाते की; 'हाताची पाचही बोटे कधी सारखी असतात का?' ही जर एकसारखी नाहीत, तर आपल्याला दिसणाऱ्या माणसांच्या श्रेष्ठ-कनिष्ठ रचनेत काय चूक आहे ?' याच तऱ्हेचे अर्थान्वेषण सूत्रामध्येही मग केले जाते.

पुराणग्रंथामधील आपल्या कृषीसंस्कृतीप्रधान देशाची खेड्याची-गाववस्तीची व्याख्या अशी केली आहे -

' तथाशूद्रजन प्राया सुसमृद्धकृषीवला ।
क्षेत्रोपभोगभूमध्ये वसतिग्रामसंज्ञिता ॥ '

श्री. त्रिं. ना. आत्रे यांच्या गांव-गाडा ग्रंथात ही व्याख्या निर्देशित केली आहे. 'जिच्या सभोवती कीर्दसार-वहिताला योग्य जमीन आहे व जिच्यामध्ये मातब्बर शेतकरी व पुष्कळसे मजूर आहेत अशा वस्तीला गाव म्हणतात. वैदिक काळापासूनची जी खेडी तशीच त्याच प्रकारची आजही आढळतात. त्यांच्या स्थितीशीलतेमुळे व वैचारिक अज्ञानाच्या जाणीवपूर्ण रुजवण्याचे हे सर्व पूर्वकर्माचे किंवा पूर्वजन्मातील पाप-पुण्याचेच भोग होत, असे म्हणत स्थितीशील आयुष्य कंठिले जाते.

देवदैवाच्या या पगड्यामुळे नष्टचर्यास खरे कारणीभूत असलेले सुरक्षित राहतात. विविध तऱ्हांनी अन्यजनांचे शोषण करून अधिक सबळ व गब्बर बनत जातात. ऋग्वेदात अगदीं सुरुवातीलाच काही सूक्तांतून चार वर्णांचा उल्लेख आहे. (१ : ११३-१६) काही वेळा शूद्रांचा संपूर्ण अनुल्लेख आहे. (८ : ३५-१६-१८) पुरुषसूक्तातील चौवर्णनिर्मितीचा दैवी सिद्धांत (१०-९०-१२)

' ब्राह्मणोऽस्य मुखमासीत बाहू राजन्यः कृता ।
ऊरुतदस्य यद वैश्यः पद्भ्याम् शूद्रो अजायत ॥ '

हा तर प्रसिद्ध व सर्वश्रुतच आहे.

वर्णशुद्धतेच्या हव्यासापायी वर्णाचेच जातीत रूपांतर झाले. त्यातीलही सर्वश्रेष्ठतेच्या भावनेच्या पगड्यामुळे जातीतून तीन-साडेतीन हजारांपेक्षा अधिक पोटजातींना खतपाणी मिळाले.

दोन जातींमध्ये सामाजिक अंतर टिकविण्याकरीता प्रवेशबंद पद्धतीचा ठोस उपाय वापरला गेला. समाजपुरुष असे अनेक वळ व गळू घेऊनच वर्षानुवर्षे जगत वागत आला. यातूनच कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातींच्या बाबतीत सामाजिक व नागरी नगण्यता निर्माण झाली. ह्या दूषितपणाला म. फुले यांनी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तपासून गतिमान करण्याचे विचार मांडले आहेत. पण विचार आणि समाजोन्नती करण्याचा मक्ता आपल्यालाच लाभला असे मानणाऱ्या ' निबंधमाला 'कार विष्णू कृ. चिपळूणकरांनी म. फुले यांच्या ' सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट ' या पुस्तकांवर, निबंधमालेच्या चव्वेचाळीसाव्या अंकात जी आगपाखड केली आहे, ती संकुचित व चिडखोरवृत्तीचा इरसाल सनातनी नमुना आहे. (निबंधमाला - शं. न. जोशी. नवी आवृत्ती - सन १९१७ पृष्ठे : ४५७ ते ४७३) इतकेच नव्हे तर, ' लोकहितवादी ' यांच्यावर निबंधमालेच्या ६४ ते ७१ ह्या आठ अंकात आणि ७३ ते ७६ ह्या चार अंकात मिळून, एकशेअडोतीस पानांचा मजकूर, त्यांनी विचारज्वराच्या पोटतिडीकीने लिहिला आहे. त्यातही ' नीतिशतक ' ग्रंथातील -

' यदा किंचिइज्ञोहं द्विप इन मदांधः समभवं
तदा सर्वज्ञोस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः । '

" जेव्हा मी अल्पज्ञ होतो, तेव्हा हत्तीसारखा मदांध होतो. आणि मी सर्वज्ञ आहे असा माझ्या मनाला गर्व झाला होता.' हा श्लोक उद्धृत करून आपली सर्व तुच्छताबुद्धी त्यांनी प्रक्षेपित केली आहे.

विचारवंतांच्या आणि शिक्षितांच्या मनातील जातीविषयीच्या आकसाचा, धर्ममार्तंडांच्या भंपकपणाचा, राजकीय पुढाऱ्यांच्या सौदेबाजीचा आणि समाजधुरीण व शासक यांच्या दुटप्पीपणाचा प्रत्यय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आला होता. व्यक्तिगत उपलब्धी आणि संधीचाच प्रश्न असता तर बाबासाहेब इतर आय. एस. एस. अधिकाऱ्यांसारखेच सन्मान, सुस्थिती व संपन्नतेचा सुरक्षित अनुभव घेऊ शकले असते. पण त्यांना समस्त दलित वर्गाचे नष्टचर्य हक्काने दूर करायचे होते. सतत मुजरे-जोहार करणाऱ्यांच्या मणक्यात पोलादाचे मानसिक बळ ओतायचे होते. कल्याणकारी राज्याची लोकशाही टिकविण्यासाठी घटनेची चौकट सर्वसमावेशक तरी वेगळी घडवायची होती. ह्या सर्व अडचणीतूनच त्यांच्या राजकीय व्यक्तिमत्वाला धार प्राप्त झाली होती.

आदर्शाचा उद्घोष असल्याने अडचणींचा प्रत्यक्षात निचरा होतच नाही. देवस्वरूप प्रतिमांचे महाकाव्याचे कथानायक जीवन गाळात - गावकुसात रूतलेल्यांना मानसिकही आधार देऊ शकत नाही. स्पर्शाचा जेथे विटाळ होतो, शब्दोच्चार केल्याने जीभ कापण्याचे मनसुबे एखादा मनू फर्मावतो, दासकर्मासेरीज अन्य कामे पूर्णतः बंद केली जातात. राजवट मुसलमानांची असो, पेशव्यांची असो, इंग्रजांची असो की लोकशाहीच्या घोषणांची असो; दलितांच्या दैन्यदारिद्र्याला दवा मिळालाच नाही. माणसांच्या अमानुष वर्तनाने, अस्पृश्य, मानवी गटाकडून तटाबाहेर ठेवले गेले. शिक्षणाचा अभाव, ज्ञानाचा अभाव, संधींची अनुपलब्धता, दारिद्र्य, आर्थिक मागासलेपणा, ह्या विषाणुंनी; शतकानुशतके हा समाज, पिळवटून फेकण्यात आला होता. मानवतेच्या आणि दानदयेच्या आरोळ्या ठोकणाऱ्यांना, मानवी मनातील मूक किंकाळ्या कधी कळल्याच नाहीत.

धर्मनि ग्रंथवाचन, मोक्षाधिकार, मंदिरप्रवेश, पूजेचा हक्क, प्रत्यक्षात दलितांना अमलात आणूच दिले नाहीत. ह्याला स्वधर्मच नव्हे, तर धर्म तरी का म्हणावे? ज्यांना सर्व काही सहजगम्य आहे, ते म्हणतात म्हणून ? यातून धर्माची - विद्यमान धर्ममतांची, पाप-पुण्यांची, कर्म-अकर्माची भीती ओसरत गेली. अशाही रीतीने अदखल विनाशच आहे; मग जाणीवपूर्वक का घटितांना सामोरे जाऊ नये ? अशा अटीतटीच्या विचारांची पेरणी होत गेली. याच प्रक्रियेतून बाबासाहेबांचे, ' हिन्दु म्हणून मरणार नाही ! ' हे निर्धार वचन उद्भवले. ह्यातूनच भारतातील मातीत मळलेल्या माणसाला महान वाटेल, असा धर्ममार्ग शोधण्याचा निश्चय बळावत गेला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अनुभूती प्रत्यक्षाला प्रमाण मानणारी होती. तर उपलब्ध तत्त्वप्रणाली आदर्शाचे शब्दजाल फेकणारी होती. आदर्श मोहक वाटतात, पण नगण्यांना ते वास्तवस्पर्श करूच देत नाहीत.

म्हणजे एकोणिसाव्या शतकात स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाच्या कल्पनांचा, शिक्षित उच्चवर्णियांकडून जेव्हा पुनरुच्चार झाला; तेव्हा जाती कल्पना नाकारण्यात आली. त्यामागची शक्ती राष्ट्रीय भावनेची वाढ करणे आणि फुटीरपण व बेबनाव टाळण्याचा प्रेरणस्त्रोत होती.

पण शिक्षित होणारा महाराष्ट्र संपूर्ण सुसंस्कृत व दूरदर्शीपणाने वागण्यात कमी पडला. राजकीय सुधारणांना प्रथम स्थान असावे की सामाजिक सुधारणांना अग्रक्रम मिळावा ? असा एक गोंधळ निर्माण करणारा वाद उद्‌भवला. राष्ट्रसभा व सार्वजनिक सभा दोन सुधारणांचा समन्वय साधू पाहात होत्या. पण लो. टिळकांनी सभामंडप जाळण्याची धमकी दिली. ह्या अत्याग्रही भूमिकेमुळे राजकीय कार्यक्रम महत्त्वाचे मानले जाऊ लागले. सामाजिक सुधारणांचा विचार मागे पडला. इंग्रजी राज्यसत्तेच्या साहाय्याचा किंवा त्यांनी केलेल्या सुधारणांचा उच्चारही करणे दोषार्ह मानले जाऊ लागले. लो. टिळकांची ही टोकाची भूमिका सामाजिक सुधारणांना विरोध करणाऱ्यांना उपकारकच ठरली. कर्मवीर शिंदे यांनी त्यांच्या आठवणीत नोंदले आहे की, लो. टिळकांचा अस्पृश्यतेला विरोध जरी असला तरी जाहीर पत्रकावर सही करण्यास त्यांनी नकार दिला होता.

लेखाच्या प्रारंभी उद्‌धृत केलेल्या वचनातील जातिव्यवस्था व अस्पृश्यतेबाबत लो. टिळकांची भूमिका सडेतोडपणाची नव्हतीच. रानडे, गोखले, आगरकर सामाजिक सुधारणांबाबत उदारमतवादी होते.

" जातिनिर्मूलन किंवा अस्पृश्यता निवारण अशा मूलभूत प्रश्नांकडे लक्ष देण्याऐवजी, हे सुधारक स्त्रीशिक्षण, केशवपन, बालविवाह, भ्रामक समजुती अशा उच्चवर्णियांमधील प्रश्नांनाच अधिक महत्व देत होते." ही वस्तुस्थिती समाजांकडून अन्याय होणाऱ्यांच्या लक्षात आली होती. (जातिव्यवस्थेच्या निर्मूलनाकरिता समाजसुधारकांचे कार्य - पृष्ठ १४५ - भारतीय खेडी व जाती)

लो. टिळकांच्याकडून नेतृत्व म. गांधीजींकडे आले खरे, पण त्याबद्दल मनपरिवर्तन, ' हरिजन ' हे नवे नामांकन आणि स्वतः अधुनमधून त्यांनी व्यक्तिशः केलेले सफाई वगैरेबद्दलचे प्रयोग यावरच महात्माजींनी अधिक भर दिला. किंबहुना असेही म्हणता येईल की, इंग्रजांना घालवून स्वयंशासनाचे अधिकार प्राप्त करणे ह्या एकमेव भावनेनेच सर्व चळवळ गतिमान बनवली-बनली होती. त्यामुळे गांधीजींच्या आगमनानेही ह्या समाजशापाला उतारा मिळालाच नाही. म्हणूनच तर ' काँग्रेस आणि गांधीजी यांनी अस्पृश्यांसाठी काय केले ? ' या ग्रंथाचा प्रपंच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना करावा लागला. सवर्णांच्या हृदयपरिवर्तनातून ह्या प्रश्नाची सोडवणूक

करता येईल, हा भ्रम गांधीजींच्या मनात अखेरपर्यंत होता. " पाश्चिमात्य रीतीप्रमाणे अस्पृश्यांनी बळजबरीने आपले हक्क हिसकावून घ्यावेत असे मी कधीही म्हणणार नाही." असे गांधीजी ठामपणे सांगत. या सर्व कारणांमुळे कृतीच्या किंवा कृती करण्याच्याबाबत म. गांधी अपयशी ठरले होते. अस्पृश्यता निवारण्याचा उपाय व मार्ग आपणालाच अवगत झाला आहे. आपणच राजकीय व सामाजिकदृष्ट्या सर्वच भारतीयांचे नेते आहोत, असे म. गांधींचे प्रतिपादन होते. यातूनच डॉ. आंबेडकर व म. गांधी यांच्यात वैचारिक संघर्ष निर्माण झाला. डॉ. भालचंद्र फडके यांनी त्यांच्या ' डॉ. बाबासाहेब आंबेडकर ' या ग्रंथात प्रकरण क्रमांक ' अकरा 'मध्ये पृष्ठ १३४ ते पृष्ठ १६९ येथे केलेली चर्चा विशेष बोलकी आणि उद्‌बोधक आहे.

दलितांचे किंवा कुणाचेही हक्क, हृदयपरिवर्तन मागनि दिले जातील ही समजूत किती फोल आहे; हे व्यवहाराच्या व्यस्त गणिताने, स्पष्ट केले आहे. कायदे व निर्बंधविषयक तरतुदी असून, या ना त्या मार्गाने अस्पृश्यता पाळली जाते. वरिष्ठ वर्णांनी व जातींनी बहिष्कृतांवर अन्याय केला आहे हे पक्के ठाऊक असूनही त्यातून सुचविलेल्या उपायांविषयी झुंडशाहीच्या चळवळी उभ्या केल्या जातात. राखीव जागाविषयक प्रबंध असूनही, सवर्ण नोकरशाहीच्या पोटशूळामुळे, दफ्तरदिरंगाई व अडवणुकीमुळे प्रत्यक्षीकरणात किती तफावत पडली आहे, हे स्पष्ट आहे. आणि इतके सगळे ठळक भडक चित्र असूनही, त्याला किती अनंत फाटे फोडले जातात, ह्यासाठी अलीकडच्या घटना व उठावांनी दाखवून दिले आहे.

सवर्णांची मने कुणाला तरी हलके, दुय्यम, गुलाम मानण्यानेच तुष्टावतात असा याचा सरळ अर्थ आहे. शासनही घोषणा ज्या गाज्यावाज्याने करते, त्यांचा फज्जा उडत असताना, त्यांना अकरणात्मक किंवा विरोधी रूपस्वरूप दिले जात असताना कसे निःष्क्रीय राहते. कोणतीही कारवाई ठामपणाने कसे करीत नाही, याची कितीतरी उदाहरणे देता येतील.

आर्थिकदृष्ट्या मजबूत असणारांचा, सर्व योजनांचे तूप मतलबी स्वार्थीपणाने आपल्या स्वतःच्या वरिष्ठ जाती-जमातींच्या फायद्यासाठी ओढण्यात वाकबगार असलेल्यांचा कोणत्याही परिवर्तनावर विश्वास नसतो. खासदार, आमदार, न्यायाधीश, सैन्याधिकारी, मुलकी अधिकारी यांच्या टोळक्यांनी मोठाल्या शहरातल्या मोक्याच्या जागी आपले पिढीजात कौटुंबिक बस्तान व संस्थान उभे केले आहेत त्याची चर्चा व पत्रव्यवहार रोजच्यारोज प्रत्येक राज्यांच्या सर्व वर्तमानपत्रातून जगजाहीर होतच असतो. आणि तरीही वर्तमानपत्रे भांडवलदारांच्या मालकीची व त्यांचे हितसंबंध जोपासणारीच असतात. त्यातले संपादकादी सर्व लोक सोयीस्कर बौद्धिक मजुरीच पार पाडत असतात. अशा विचित्र परिस्थितीत भारतीय लोकशाहीचा आणि घटनेतील आश्वासनाच्या पूर्तीचा पाठपुरावा करणे कसे जटिल आहे हे प्रकर्षने जाणवते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणूनच म्हणतात, " घटना मिळाली, स्वातंत्र्य

मिळाले म्हणजे सर्व काही संपले असे नव्हे. लोकशाहीचा वृक्ष कोणत्याही मातीत वाढत नाही. त्यासाठी आवश्यक ती मूल्यविषयक जाणीव जोपासली पाहिजे. ह्या मूल्यजाणिवेचे सततचे अवमूल्यन हीच खरी वाळवी आहे.

आपल्या अवगुणांना व दोषांनाही गौरवाच्या भाषेत सादर करणे. तसे करणे म्हणजेच देशभक्ती, राष्ट्रवाद, प्रखरपणा असे एक मतलबी समीकरण सध्या प्रतिष्ठित होत आहे. अशा प्रतिपादनातून आकसपूर्ण अपुऱ्या विचारांची आणि व्यापक समाजविन्मुष प्रवृत्तींची वाढ झाली नाही तरच आश्चर्य मानावे लागेल. काही यश मिळवू पाहणारे राजकीय पक्ष आणि त्यांचे दैवतीकरण होणारे नेते, लोकशाहीच्या सर्वसंमत स्वाभाविक विकसनाला अटकाव करताना आढळतात. त्यांची मानवी स्वातंत्र्याविषयीची मूल्यात्मक जाणीव स्वतःच्या मताचे अनुसरण करणाऱ्या व्यक्ती-गटापुरती संकुचित झालेली असते. दलितांच्या वर्गविग्रही भूमिकेकडे हे लोक जसे रागाने पाहतात, तसेच वर्णविग्रह आणि आर्थिक विषमता यांच्या दुःस्वपरिणामाविषयी खुल्या दिलाने बोलणाऱ्यांकडेही बघतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचा व जातीयतेचा प्रश्न इहवादी वस्तुनिष्ठ दृष्टिकोणाने सोडविण्यासाठी दक्ष होते. भूतदया, हृदपरिवर्तन, सामंजस्य ह्या घटकांचे अपयश हे जाणून होते, त्यामुळे त्यांचे विचार, त्यांचे लढे त्यांनी मांडलेल्या व्यापक सामूहिक आकांक्षांचे प्रतिनिधित्व त्यामुळे अनेकांना खुपले. तत्त्वस्वीकृतीत तडजोड न पत्करण्याची त्यांची अलौकिक धारणा त्यांच्या समकालिनांच्या आकलनापलीकडेच होती. त्यामुळे गांधीजी व राष्ट्रसभेने दलितांसाठी काय केले ह्याला राजाजी-राजगोपालाचारी गुळमुळीत उत्तर देतात. तर राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद 'हिंदू कोड बिला'ला कसून विरोध करायला सरसावतात असे चित्र दिसते. येथील परंपरा ही अचूकच आणि हाच आपला प्राण मानणाऱ्या मतलबी लोकांनी, स्वत्या अर्थाने कुठल्याही दूरदृष्टीच्या पुरोगामी विचारवंताला मोकळेपणाने कधी स्वीकारलेच नाही, ते या प्रवृत्तीमुळेच होय.

भारतीय समाजातील परिवर्तनाचे विचार स्वीकृत करण्याच्या या विचारयात्रेला आणखीही एक महत्वाची बाजू आहे असे मला वाटते. ती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक व दूरगामी विचारांच्या परिपाकातून भारतीय राज्यघटना प्रभावी व वेगळी झाली. याचाच अर्थ असा की, घटनात्मक मार्गाने त्यांनी निर्माण केलेल्या राजवाटेमुळे सोयी-सवलती उपलब्ध झाल्यात. त्यांचा लाभ दलितवर्ग व्यापक अर्थाने घेतो आहे. ह्यामध्ये अनुसूचित जाती-जमाती, भटक्या-विमुक्तांपासून तो विविध घटकांचा समावेश आहे.

ह्या उतरंडीत विविध जाती-पोटजाती म्हणजे महार, मांग, चांभार, ढोर, मेहतर, कोल्हाटी, पद्मशाली, राजगोंड, टकारी, वेडू-वाघरी असे असंख्य लोक समाविष्ट आहेत. पण ह्या सर्वांनी डॉ. आंबेडकरांचे एकमुखी नेतृत्व कधी मानलेच नव्हते.

काहींनी हे अजाणतेपणाने केले असेल, पण काहींनी जाणतेपणाने, अन्य व्यक्तींच्या प्रेरणा दबावाने, ही गोष्ट लक्षात येईल इतक्या ठळकपणाने केली आहे. हे कडवट असले तरी वस्तुस्थिती आहे.

यातूनच काहींनी 'हरिजन' हे म. गांधीजींनी दिलेले नाव मिरविले. काहींनी हिंदू समाजांतर्गत असलेल्या दुय्यमत्वाचे आणि लाचारीचेच बिरुद मिरविले. सवलती बहुसंख्यांकांनी चतुराईने घेतल्या. पण बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला नवा अस्मिता-विचार आणि त्यांनी दिलेला धम्म-बुद्धधर्म शिताफीने टाळला. सत्ताधारी पक्षाला व पुढारीपणाचा मोठा ताठा असलेल्यांना, हे असेच घडावयाला हवे होते.

दलित समाज जितका दुभंग राहील तितका तो हाकवण्यायोग्य आणि दुबळा राहील हे सूत्र त्यांनी हेरले होते. पुन्हा हे नवीन सूत्र नव्हतेच. इंग्रजी राज्यकर्त्यांच्या 'फोडा-झोडा-तोडा' राज्यनीतीचीच ती देणगी होती. कारण राजकारणाच्या खेळात दुसऱ्याच्या कशाशीही खेळणे नेहमीच क्षम्य असते.

अभावग्रस्त समाजातील लोक आणि उच्चस्तरियांनी नाकारलेले लोक तर थोडाशा दयेच्या नाटकाला भुलतात, नको असलेल्या गोष्टी दानाचा आव आणून दिल्या तरी स्तिमित होतात. शब्दांचे, पाप-पुण्य, पूर्वजन्म कर्माचे, नशीबभोगाचे फासे फेकले तरी तो पुरता पाघळून जातो. इतका की, कुऱ्हाडीचा दांडा बनण्याचीही त्याला तमा वाटत नाही. एकमेकांना ओरबाडून-बुचाडून तो आपली पुराणनिष्ठा प्रकट करतो. त्यामुळे सतत विकासाची परिभाषा वापरत दुभंगलेपण वाढविण्याचा खेळ खेळला जातो. अलीकडच्या काळातील फुले-अण्णाभाऊ साठे वगैरे महामंडळाच्या निर्मितीचेही फलित असेच काहीसे घडल्याचे मला वाटते.

त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर दलित समाज झपाट्याने घुसळला जाऊ लागला. नेमक्या नेतृत्वाच्या आणि पक्व धोरणांच्या अभावी अधिकाधिक विभाजित होऊ लागलेला दिसतो. न्यायसंस्था, कायदा आणि शासनाचे उपाय अपुरे पडत असल्याने ही पडझड गंभीर समस्या उभी करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कितीतरी विचारवंतांना ही त्रुटी जाणवते आहे. त्यातीलच एक विचार असा -

"या देशातील न्यायदान-प्रक्रिया त्यांच्या सीमेपर्यंत अजून पोहोचली नाही. कायदा आणि सुव्यवस्था यांचा तेथे थांगपत्ता लागत नाही. दारिद्र्य तर अमाप आहे. स्वरोस्वर ऑर्थर टोस्लर या लेखकाने वर्णन केल्याप्रमाणे या समाजात थरास्थाली थर इतकेत, की शेवटचा थर कधी हातालाच लागत नाही." (डॉ. मा. प. मंगुडकर, श्री. रामनाथ चव्हाण यांच्या 'जाती आणि जमाती' या पुस्तकाच्या प्रस्तावनेतून) या अभावग्रस्त दलित समाजाचा कितीही परिचय करून घेतला तरी काहीतरी राहूनच जाते.

विभाजन हाच जणू इथल्या माणसांचा धर्म आहे. आणि उपेक्षित-बहिष्कृतांचा तर तो स्वभावच आहे, असे त्यांच्यातील मरणातोरणाचा आहार-विहाराच्या आणि

रितीरिवाजांच्या बाबतीत प्रकर्षाने म्हणावेसे वाटते. म्हणूनच, " अशा विभागलेल्या कुठल्याही माणसांचे किंबहुना त्यांच्या काही जाती-जमातीचे जनजीवन कशा तऱ्हेने आहे, याची अल्पशी ओळख करून देण्याचा प्रयत्न या निमित्ताने मी केलेला आहे. " असे 'जाती-जमातीच्या निमित्ताने' या आपल्या मनोगतात लेखक श्री. रामनाथ नामदेव चव्हाण म्हणतात. त्यातही हीच बोच त्यांना सूचित करायची आहे.

भारतीय समाजरचना प्राचीन आणि पुरातन आहे. त्यामुळेच तिच्या समस्या आणि प्रश्नही गुंतागुंतीचे आणि अनेकविध आहेत. त्यांची उकल कोणत्याही एका किंवा एकसारख्या उपायाने त्यामुळेच होणे कठीण झाले आहे. एकीकडे अमूर्त तत्त्वज्ञान तर दुसऱ्या टोकाला विरोधपूर्ण समाजरंग यांची सतत रस्सीखेच चाललेली असते. ऐहिक आयुष्याचा परिपूर्ण होम करून मनोजीवन उत्कर्ष साधण्याची संकल्पना हास्यास्पद ठरते आहे. जुन्या मोक्षविचारातील सांत्वन आत्ताच्या अवनत आयुष्याला आकार देण्यास असमर्थ ठरले आहे. आजच्या परिस्थितीशी सुसंगत अशा विचार आविचाराची समूहस्पर्शी एकात्मबांधणी करण्यानेच शतकांच्या दुखण्यावर लेप देता येईल.

सामाजिक उन्नती सगळ्यांची सगळ्यांसोबत झाली, तरच सहजीवन आणि समाजोत्कर्ष, यांना अर्थ लाभू शकेल. प्रत्येकाच्या चांगल्या जगण्यासाठी संबंधित घटकांचे कल्याणही असण्याचा हक्क मानण्यात, प्रत्येकाचे हीत आहे. ज्यांना जे जाणिवपूर्वक नाकारले, ग्रंथात गुंडाळले. अज्ञानमेघाने अंधारले, दारिद्र्य दानवाने निकामी केले. शिक्षणाच्या संधीपासून सटकवले, गावकुसाबाहेरच्या गाळात गच्च रुतवले, अनेक प्रकारांनी, ज्या दलितांचे; प्रत्यक्षाप्रत्यक्ष अनंत अपराध केले, त्यातून उतराई होण्याचा एकच राजमार्ग आहे, तो म्हणजे घटनेतील मूलभूत अधिकारांच्या सनदेचा मानसन्मान करणे, तिच्यातील तरतुदींची कृतीद्वारा अनुभवता येतील, अशी परिपूर्ती करणे. अशावेळी म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या द्रष्टेपणाचा प्रत्यय येतो.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जन्मशताब्दी साजरी करत असताना आणि म. फुले यांच्या स्मृतीशताब्दीला स्पर्श करताना, गरज असेल ती, अंतर्मुख होण्याची. आत्मपरीक्षणाची. मानवी मूल्यांच्या शाश्वत आराधनेपुढे; वर्णीय, वर्गीय, जातीय आणि पंथ-प्रादेशिक अहंकारांवर, उदक सोडण्याची. डॉ. भांडारकर म्हणाले होते, दलितांना अज्ञानात ठेवणे म्हणजे मानवी अस्तित्वाचा तेवढा भाग दुर्बल-निकामी करणे होय. आपण बलवान बनण्यासाठी बहिष्कृतांना सक्षम करण्याची निकड आहे.

अर्वाचीन सर्वच भेदांना भविष्यकाळ क्षमा करणार नाही, एवढे सगळ्यांनीच ध्यानात ठेवण्याची; आता गरज निर्माण झाली आहे.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची परिवर्तन संकल्पना

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाचे वेगळेपण त्यांच्या समकालीन अन्य राजकीय नेत्यांच्या मानाने सहजपणाने जाणवते. त्यांच्या उपलब्ध लेखनाचा जितक्या जागरूकतेने अभ्यास करावा तितके ते प्रकर्षाने स्पष्ट होते.

भारताच्या गुलामगिरीच्या आणि स्वातंत्र्याकांक्षी धुरिणांचा तो संघर्ष होता. सैद्धांतिक संघर्षाला जनसमूहाच्या विराट कृतीचे पाठबळ लाभत होते. राजकीय स्वातंत्र्य हेच प्रमुख लक्ष्य ठरल्याने अन्य बाबी दुर्लक्षित होत होत्या. इतक्या की तीच ज्यांची प्रमुख मागणी आहे, त्यांच्या विचाराला कार्याला आणि त्यासाठी होणाऱ्या चळवळीला अनुल्लेखाने मारण्यापर्यंत मजल गेली होती. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्वातंत्र्याच्या मागणीस विनाअट पाठिंबा न देणारे एकदम संकुचित व देशद्रोही वगैरे ठरविण्यापर्यंत तारे तुटत होते.

लोकमान्य टिळक राजकीय विचारांच्या संदर्भात जेवढे उत्सुक आणि आग्रही होते तितकेच सामाजिक विचारांबाबत उदासीन आणि पुष्कळदा दुराग्रही आणि प्रतिगामीही होते. ज्या हिंदी असंतोषाचे ते जनक होते, दुर्दैवाने तो वर्गीय आणि वर्णीय असंतोष होता. 'तेल्यातांबोळ्यांचे पुढारी' अशी बिरुदावली त्यांना लावली जात असे, पण अथणीच्या जाहीर सभेत, 'तेली-तांबोळी शेतकरी विधानसभेत जाऊन काय नांगर हाकणार आहेत?' अशा आशयाचे उद्‌गार, त्यांनीच काढले होते. टिळकांच्या प्रसिद्ध उद्‌गारावर बाबासाहेबांनी 'टाईम्स' मध्ये १६ जाने. १९१९ ला, एक पत्र टोपण नावाने लिहिले होते. त्यात ते म्हणाले होते 'स्वराज्य हा जसा ब्राह्मणांचा जन्मसिद्ध हक्क आहे, तसाच तो महारांचाही आहे, ही गोष्ट कोणीही मान्य करील. यास्तव पुढारलेल्या वर्गांनी दलितांना शिक्षण देऊन त्यांच्या मनाची आणि सामाजिक दर्जाची उंची वाढवणे हे त्यांचे आद्य कर्तव्य आहे. असे जर घडले नाही तर खरा स्वराज्याचा दिवस बराच दूर राहणार!'

या सगळ्या चर्चेकडे, तिच्या गाभ्याकडे आणि मूळ विवाद्य मुद्यांकडे पाहिले, तर भारतात उभे झालेल्या बहुसंख्य चळवळींना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्या परिवर्तनाची अपेक्षा करीत होते, त्या दिशेला नेण्यात; अन्य नेत्यांना तितके अगत्य वाटत नव्हते. अग्रक्रम आणि कालनिबद्धतेचे ठोकताळे वेगळाले असल्याकारणाने, राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांच्यापासून तो पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंपर्यंत, आधीच्या काळात टिळक, म. गांधी, वल्लभभाई पटेल यांच्यापासून तो विठ्ठल रामजी शिंदे -

लाला लजपतरायांपर्यंत विविध मान्यवरांशी बाबासाहेबांचे सातत्याने वैचारिक खटके उडत होते. म्हणूनच ध्येयशून्य आणि मूल्याधिष्ठित बाबींच्या संदर्भात, कोणतीही तडजोड न करणाऱ्या, डॉ. आंबेडकरांच्या परिवर्तनाचे सूत्र समजून घेणे अगत्याचे ठरावे.

पुराणमताभिमानी मनोरचना, देवाधर्मांचा आत्यंतिक धाक, समाजाच्या बहिष्कारांचे विचित्र दडपण, चालीरीतींचा आणि रूढीकर्मांचा अजब धोशा, परंपरांचा अहंगड, वेदासंतांचे आणि शब्दवचनांचे जोखड, दारिद्र्य, अज्ञान व जातीपातींचे रसायन यांनी पुरत्या ग्रासलेल्या, येथल्या समाजाला, परिवर्तनांचे वैश्विक वास्तव, समजावून देऊन आपलेसे करणे, हीच मोठी जिकिरीची गोष्ट होती.

धर्म म्हणून जे काही समजले-पाळले जाते, त्यामागील विरोध-विसंगती बुचकळ्यात पाडणारी असते. देव सर्वत्र - जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी आहे, असे म्हणत म्हणतच, विशिष्ट तीर्थक्षेत्री महापुण्य-महायात्रा पार पाडणे, 'देव भावाचा भुकेला' म्हणत, त्याला मोदक-फळांपासून तो कोंबड्या-बकऱ्यापर्यंतचा बळी देणे, तो करूणाकर आहे, सर्वांभूती समान आहे, म्हणत, वर्णजातींचा पुरस्कार करणे. तो कुणाचीही दाद घेतो व न्याय देतो, असे मानत, पुरोहित-ब्राह्मण-पुजारी किंवा गुरव-देवऋष्याला मध्यस्त घालणे, निर्गुण निराकार म्हणतच, सगुणमूर्तीची पूजाअर्चा करणे, 'दाचेवीण-शब्देवीण त्याला सर्व कळते' असे सांगत ढोलझांजांचा आणि भजनगोंधळाचा धडाका उडवून देणे, अशा कितीतरी गोष्टींचा सहज निर्देश करता येईल.

एक गोष्ट स्पष्ट आहे. ऐंद्रिय आणि पारमार्थिक सुखाच्या शोधातच, मानवी समाजाचा विकास झालेला आहे. ह्या लौकिक व अलौकिकात्वाच्या सांधेजोडीत आणि प्राप्तीत द्वैत निर्माण झाले की, गोंधळ वाढविणाऱ्या विचारपीठांची आणि संप्रदायांची गर्दी होऊ लागते. आधीच गोंधळणाऱ्या माणसांचा अधिकच गोंधळ उडायला आरंभ होतो.

वरील घटकांची जाणीव असलेले तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिहितात - "वैदिक मार्ग हा एक अर्थाने भोगवादी व प्रवृत्तीवादी होता, तर श्रमणमार्ग हा आत्यंतिक तपश्चर्येचा निवृत्तीपर मार्ग होता. वरील अनेक संप्रदायांमध्ये परलोक व परमेश्वर न मानणारे काही भौतिकवादी संप्रदाय होते, काही संप्रदाय केवळ नियतीवादी होते, त्यांचे मत असे होते की, माणसाचे कर्तृत्व हा भ्रम आहे....."

भगवान बुद्धाने या वैचारिक आणि व्यावहारिक अराजकतेतून निश्चित मार्ग काढला व दाखविला. त्यास 'मध्यममार्ग' किंवा 'मध्यमा प्रतिपद' असे म्हटले आहे. राज्यांच्या आणि गणांच्या निरंतर चालू असलेल्या विग्रहांमुळे वा संग्रामांमुळे समाज, विशेषतः बहुजन समाज अशांत व विपद्ग्रस्त होता. (बुद्धीलीलासंग्रह - धर्मानंद कोसंबी, तिसरी आवृत्ती,मे १९८९ - प्रस्तावना पृष्ठ १३)

धर्मांतराच्या मार्गाने दलित जीवनात परिवर्तनाची आकांक्षा उदित करणाऱ्या बाबासाहेबांनी, बुद्धधर्म स्वीकार किती डोळसपणे केला होता, हे आता इतक्या वर्षानंतर त्यांचे तेव्हाचे विरोधकही, मोकळेपणाने कबूल करतात, ते यामुळेच होय.

आपल्या देशातील जातीव्यवस्थेबद्दल जितके आणि जितक्या प्रमाणात लिहावे, ते कमीच पडेल. या समग्र अमानुषांची प्रखर झळ, बाबासाहेबांनी सोसली होती. अपमान, वंचना आणि फसवणुकीचे असंख्य अनुभव महात्मा म्हटले जाणाऱ्या गांधीजींकडूनही, त्यांनी घेतलेच होते. त्यामुळे जातीप्रथेच्या निर्मूलन कार्याला, त्यांनी पहिले मानांकन दिले होते.

हिंदु धर्माच्या चौकटीत राहून त्यांनी आर्जव, युक्तिवाद, टीका, घणाघात, असहकार, सत्याग्रह इत्यादी सर्व प्रकारांनी, आपले मनोगत अनेकदा जाहीर केले होते. विविध विषयांना मूलगामी, प्रासंगिक आणि संशोधनात्मक ग्रंथाच्या माध्यमातून, आपला निषेध अक्षरनिबद्धही केला होता. पण सर्व वास्तव प्रश्नांना आणि जाती प्रथेतून पोसल्या गेलेल्या उपेक्षा, अवहेलना, अमानुषत्व आदी दुर्गुणांना केवळ अध्यात्माचे, स्वर्ग-नरकाचे, पाप-पुण्याचे, पूर्वकर्म, पुनर्जन्माचे किंवा कर्म-आत्मा विषयक, पोकळ विषयांच्या भाकड गुऱ्हाळांचे गाजर दाखविणारांना, डॉ. आंबेडकरांची परिवर्तनाची भावना, बिनमहत्त्वाची वाटली. या कृत्रिम भेदांना बुद्धविचारातच मूठमाती मिळेल, याची त्यांना खात्री पटली होती. बुद्धांच्या जीवनसुसंगत प्रणालीचे विश्लेषण करताना एक अभ्यासक प्रा. दि. मा. खैरकर लिहितात -

" बुद्धाच्या शिकवणुकीकडे लक्ष दिले असता त्यांनी जीवनातील भौतिक व आध्यात्मिक असे कृत्रिम भेद नष्ट केलेत हेच आढळून येते. जडवाद किंवा अध्यात्मवाद हे भेद माणसाच्या जीवनाकडे पाहण्याच्या द्विधा मनोवृत्तीतून निर्माण झाले आहेत. जीवनाच्या कोणत्याही अंगाची भौतिकता येथे संपते व आध्यात्मिकता येथून सुरू होते असे आपणास म्हणता येणार नाही. "

(बुद्धदर्शन - प्रा. दि. मा. खैरकर - प्रकरण ३, द्वि. आवृत्ती - पृष्ठ ३४)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय समाजरचनेत जातीयतेला दिलेला धर्माधार, रुढींचे पाठबळ, ग्रंथांचा टेकू आणि जन्माने सवर्ण असलेल्यांची व्यावहारिक मतलबी हातचलाखी, यांची विलक्षण चीड होती. त्यांच्यासोबतच श्री. म. माटे, वि. दा. सावरकर, विठ्ठल रामजी शिंदे आणि म. गांधी हे अन्य नेते, विचारवंत आणि अदलित समाजातील कार्यकर्ते अस्पृश्यता निवारणाचे कार्य करीत होते. आता खूप प्रदीर्घ कालाच्या अंतराने ग्रंथ, इतिहास आणि माणसे, वृत्तपत्रे, कागदपत्र आणि अहवाल यांच्या तपशीलवार नोंदीही उपलब्ध आहेत. श्री. म. माटे यांनी पुणे विभागात व शहरात महारामांगांच्या आणि अन्य अवर्णांच्या मुलांना व माणसांना शिक्षण आणि अक्षर ओळख करून देण्याचे काम, परिश्रमपूर्वक केले. इतके की, पुण्याने व पुणेकरांनी त्यांची ' महार माटे ' अशी संभावना केली. अनेक असभ्य आरोपही त्यांच्यावर केले

गेले. पण ज्ञानग्रहणासाठी अत्यंत उत्सुक असणाऱ्या, विविध शंका विचारून भंडावून सोडणाऱ्या 'महार जमातीला' प्रा. माटेही डावेपणाने पाहात. त्यांनी चालविलेल्या शाळांची, 'जातवार उपलब्ध संख्या' यांचे बोलके उदाहरण आहे. प्रत्यक्ष हरिजन-दलितांना, माट्यांच्याही फक्त ओसरीपर्यंत प्रवेश असे आणि तेथेही 'प्याला' बाहेरचा, बाहेरच ठेवलेला असे. आणि तिसरे असे, गांधीजींच्या प्रभावामुळे श्री. म. माटे यांचे कार्य मागे पडायला लागले आणि त्यांच्या सूचनेबरहुकूम काम केल्यास हे चालू ठेवता येईल, अशी परिस्थिती निर्माण झाली, तेव्हा प्रा. माटे यांनी, हा वसा चक्क सोडूनही दिला होता.

स्वा. सावरकरांची अटींवर सुटका झाल्यावर सावरकर अस्पृश्यता निवारण, समता आणि पतितपावन मंदिर कार्यात पडले. त्यांचे निबंध व कार्य युक्तिवादपूर्ण व महत्वाचेही आहे. पण प्रत्यक्ष पुण्यात सावरकर मतपरिवर्तन लोकांचे व त्यांना प्रिय असणाऱ्या व्यक्तींचेही करू शकले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणत असत, 'दलित समाजास वाईट, असभ्य व अमानुष वागणूक देणे हा दंडनीय गुन्हा मानला पाहिजे. तशा प्रकारचा कायदा भारतीय लोकसभेने संमत केला असला तरी, त्याची कार्यवाही कडक रीतीने झाली पाहिजे.' पण त्यांच्या अनुयायांच्या दुटप्पी वर्तनाला त्यांच्याकडे उत्तर नव्हते. आणि धर्मांतरानंतर, सावरकरांनी केलेली आगपाखडही विचारोद्रेकातून आली नसून, भावक्षोभातूनच आली आहे, याचा प्रत्यय आणून देणारी आहे.

या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना हवा असलेला बदल, उपकार, प्रायश्चित, पश्चात्ताप किंवा चॅरिटी अशा तऱ्हेचा नको होता तर तो मानवी हक्कांच्या मूलभूत जाणीवेच्या भूमिकेतूनच हवा होता.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या लेखनात लो. बाळ गंगाधर टिळक यांच्या राजकीय सुधारणांबाबतची अत्यंत प्रगत मते आणि सामाजिक सुधारणेला विशेषतः दलित-अस्पृश्यांबाबतची प्रतिगामी मते यांचा स्पष्ट पडताळा होता. पण त्यांनी चालविलेल्या 'डिप्रेस्ड क्लास मिशन'च्या प्रतिनिधींची नेमणूक करताना, नेमली जाणारी माणसे दलितांमधून न घेता आपण सांगू ती किंवा सदस्य सांगतील ती घ्यावीत, अशाही काही गोष्टी कर्मवीर वि. रा. शिंदे यांनी केल्या होत्या. पण बाबासाहेब आंबेडकरांच्या जागरूकतेने नि सावध व गतिमान हालचालींमुळे शिंदे यांचे नेतृत्व मागे पडले.

म. गांधीजी तर, राऊंड टेबल कॉन्फरन्सलाच दलितांचे नेते म्हणून, त्यांच्या हक्कांसाठी भांडणारे, सख्खे, सचोटीने, चलाख आणि विद्वान नेते, डॉ. आंबेडकर यांना ब्रिटीश सरकारने पाचारण केल्यापासूनच अस्वस्थ होते. बाबासाहेबांच्या मनातले सगळे बेत त्यांनी प्रदीर्घ भेटीत ऐकले होते. पण मुस्लीम लीगच्या मागण्या मागणाऱ्या बॅ. जिनांना गांधी भेटल्याचे गांधीजींनी बाबासाहेबांना सांगितलेच नव्हते. देशाच्या फाळणीचे

सूत्र जिनांकडे कबूल करणारे गांधीजी, अस्पृश्यांच्या न्याय मागण्यांकडे, बॅ. जिनांनी विरोध करावा, अशी सौदेबाजी करीत होते. आणि त्यानंतर पुढे त्यांना उपोषणाचा, मृत्यूंचा धाक दाखवून, देशवासीयांच्या सहानुभूतीचा बाबासाहेबांवर दबाव आणि विरोध उभा करून, पुणे कराराची प्रसिद्ध खेळी, खेळण्यसाठी झुंजावे लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्व अन्य नेत्यांच्या मानाने कसे मूल्यगर्भ आणि दूरगामी होते, इतकेच नव्हे तर ते किती रक्तामासाइतके खरे होते, याचा प्रत्यय या ठिकाणी येतो. ज्याला परिवर्तनाच्या भूमीवर काम करावे लागते, त्याला स्वकियांना सांभाळीत आणि हितकर्त्यांचा आव आणीत मतलबी किंवा कार्यनाशच करणाऱ्या उपलब्ध अन्य जणांशी संघर्ष कसा अटळपणे करावाच लागतो, हेच यावरून सुस्पष्ट होते.

बाबासाहेबांना मूल्याधिष्ठीत पण मूलगामी बदलांची अपेक्षा होती. त्यासाठी कित्येक प्रलोभने, हव्यास आणि दडपणे त्यांनी झुगारली होती. अमेरिकेत शिक्षण घेत असताना, प्रा. एडविन सॅलिग्मन, हे बाबासाहेबांचे गुरू व मार्गदर्शक प्राध्यापक होते. 'भारतातील जातीसंस्था, तिची उत्पत्ती आणि वाढ' हा प्रबंधग्रंथ त्या काळी अत्यंत गाजला होता. 'इतके मूलभूत आणि मौलिक चिंतन दुसऱ्या कोणीही केल्याचे आपल्या माहितीत नाही' असे प्रा. गोल्डनवेझर यांचे मुक्त व जाहीर शिफारसपत्रही आंबेडकरांना लाभले होते. त्यामुळे असा धडाडीचा तरूण, भारताच्या राजकीय लढ्याला आणि राष्ट्रीय सभेला लाभला, तर किती चांगले होईल असा विचार अमेरिकानिवासी पंजाब केसरी लाला लजपतराय यांच्या मनात आला होता. प्रा. सॅमिग्मन लजपतरायांचे दोस्त होते. त्यांनी त्यांच्यामार्फत बाबासाहेबांना तसा निरोपही दिला होता. व्यापक राष्ट्रीय नेते बनण्याची सुसंधी मांडली होती. पण बडोदे सरकारला दिलेला शब्द प्रमाण मानणाऱ्या बाबासाहेबांनी नम्रपणे नकार दिला होता.

बाबासाहेबांना जेष्ठांबद्दल, गुरुजनांबद्दल आणि कर्तृत्वशाली पुरुषांबद्दल नेहमीच आदर वाटे. फक्त अशा व्यक्तींनी आपल्या मानास्थानाचे महत्व, स्वतःच जपण्याची ते अपेक्षा धरीत.

म. गांधीजींच्या अस्पृश्योद्धार आणि हरीजन चळवळींबद्दल त्यांचा लगेचच भ्रम फिटला होता. त्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाबद्दल बाबासाहेबांना असमाधान वाटे आणि भंगीकामाचे म. गांधी यांनी जे उदात्तीकरण केले होते, त्याबद्दल चीड येई. त्यांच्या संदेशाची कितीतरी वेळा बाबासाहेबांनी 'बहिष्कृत भारत' आणि 'जनता' या वृत्तपत्रांतून महात्माजींची हजेरीही घेतली होती. खेडे म्हणजे शोषण, अज्ञान, दारिद्र्य, विषमता, वर्णसत्ता आणि सनातनी वृत्तीप्रवृत्तींचा जिताजागता अपरिवर्तनीय नमुनाच. त्यामुळे यंत्राला विरोध, विज्ञानाला विरोध, परिवर्तनाला विरोध, चरख्याचे अवास्तव स्तोम, या म. गांधीजींच्या विचारांबद्दल आंबेडकरांनी अत्यंत जहाल व तिखट शब्दात लेखन करण्याचे प्रयोजनही हेच होते. कारण आहे तीच चौकट कायम

ठेवून बदल होईल, असे सांगणे म्हणजे त्यांना शुद्ध ढोंग वाटे. लबाडीच वाटे. त्याला पर्यायी, बाबासाहेबांनी सांगितलेले उपाय व सुचविलेले मार्ग, हेच पुढे 'आंबेडकर-वाद' म्हणून ओळखले जाऊ लागले.

बाबासाहेब आग्रहाने म्हणायचे, 'राजकारणात भक्ती आणि विभूतीपूजा हा अधोगतीचा आणि नव्या हुकूमशाहीचा मार्ग आहे.' इतकेच नव्हे तर बुद्ध धर्मस्वीकारानंतर, त्यांनी बुद्ध भिक्षु आणि संघाकडून जे अपेक्षिले ते त्यांच्या स्वीकृत ध्येयप्रणालीशी सुसंगत असेच होते. 'भिक्षुकशाही म्हणजे माणुसकीचा निकृष्ट नमुना' असे म्हणणाऱ्या बाबासाहेबांचे 'बौद्ध भिक्षु समाजसेवकच असावेत' असे आग्रही प्रतिपादन होते. आजच्या भिक्षुकांचे आचरण त्यांनी क्षणभरही आणि कणभरही स्वपवून घेतले नसते. त्यामुळे गांधीयुग हे तमोयुग (Dark Age) आहे असे ते सांगत. या संदर्भात प्रसिद्ध चरित्रकार डॉ. धनंजय कीर यांचे सार्थ विधान येथे उद्धृत करावेसे वाटते. ते लिहितात - "गांधीवाद म्हणजे जुन्या भारताची मागणी, आंबेडकरवाद म्हणजे नवभारताची मागणी, असे म्हणणे वावगे नाही!" ('विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर' - धनंजय कीर - पृष्ठ ५९)

डॉ. बाबासाहेबांना क्रांती हवी होती. परिवर्तन हवे होते, ते लोकशाहीची बूज राखणाऱ्या मार्गांनी. त्यामुळे कोणत्याही वेळी त्यांच्या सुसंस्कृत मनाचे भान जागते असे. लो. टिळकांचे चिरंजीव श्रीधरपंत, त्यांच्या अत्यंत पुरोगामी विचारांनी आणि कृतींनी प्रसिद्ध होते. टिळकांच्या वाड्यात, पुणे येथे बाबासाहेब आंबेडकर, देवराव नाईक, रामभाऊ टिळक, दत्तोपंत ठेंगडी आणि श्रीधरपंत टिळक इत्यादींनी एक 'समता संघ' स्थापन केला होता. त्यात राजकीय बाबतीत अलोट धैर्य दाखविणाऱ्या लो. टिळकांची त्यांनी प्रशंसाही केली होती. सामाजिक सुधारणांच्या बाबतीतल्या अंगचोरपणाबद्दल खंतही नोंदवली होती. बाबासाहेबांचे वक्तव्याचे पहिलेच वाक्य असे होते - 'टिळकांच्या वाड्यात उभे राहून मला त्यांची निंदा करावयाची नाही.' १५ एप्रिल, १९२८ ची ही घटना आहे. परिवर्तनाचा गाडा त्यास जे आणि जितके प्रामाणिक कार्यकर्ते तयार असतील, त्यांच्या सर्वांच्या सहकायनिच पुढे नेता येणे शक्य होईल, याची जाणीव बाबासाहेबांना होती.

क्रांती म्हणजे 'फक्त राजकीय स्थित्यंतर' असे बाबासाहेब मानत नव्हते. राजकीय बदल होऊनही जर लोकांच्या स्थितीत बदल होऊन, ती उत्कर्षाप्रत जात जात गतीशील होत नसेल, तर ते खरे परिवर्तनच नव्हे, अशी त्यांची धारणा होती. विशेषतः लोकसंमत घटनास्वीकृत राजकीय संकेतांबद्दल ते विलक्षण जागरूक आणि आग्रही असत. त्यामुळे पुष्कळदा बाबासाहेब विरोधकांना घमेंडी आणि चिडखोर वाटत. पण वस्तुस्थिती तशी नव्हती. हा शिष्टसंमत संकेत मोडणाऱ्या कोणाचाही ते मुलाहिजा ठेवीत नसत. म्हणूनच सार्वजनिक निवडणुकीत लोकमतांच्या कौलाने पराभूत झालेले मोरारजी देसाई यांना, जेव्हा दिल्लीने मुंबई राज्याचे मुख्यमंत्री नियुक्त केले,

तेव्हा बाबासाहेब आंबेडकरांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांना आणि काँग्रेसपक्षाला टीकेच्या धारेवर धरले होते.

त्या काळात नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल किंवा म. गांधी, ह्या व्यक्ती प्रश्न किंवा जाब स्वपवून घेणाऱ्या नव्हत्या. एस्वादीच अपवादात्मक व्यक्ती त्यांना प्रतिसवाल करण्याची क्षमता ठेवीत होती. बाबासाहेब आंबेडकरांनी म. गांधी, जिना, नेहरू, राजेंद्रप्रसाद यांना तर अनेक वेळा प्रश्नचिमट्यात पकडून गोरेमोरे केले होते, इतकेच नव्हे तर महाराष्ट्राच्या श्री. खेर यांच्याबद्दल गैरउद्‌गार काढून, त्यांचा अपमान करणाऱ्या पोलादी पुरुष वल्लभभाई पटेलांना त्यांचे तोंड ××× ने फोडण्याची जाहीर सभेत घोषणा करणारे बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राजकारणातले एकमेव नेते होते. ज्येष्ठांकडून सतत अपमान सोसून निर्जीव कळसूत्री बाहुल्यांची स्वतःला अवकळा आणणाऱ्यांना म्हणूनच बाबासाहेबांच्या व्यापक आणि समावेशक विचारदृष्टीचा आणि परिवर्तन सृष्टीचा, आवाका समजू शकत नाही.

म. गांधीजींच्या मागनि समाजात परिवर्तनाचा प्रकाश कधी येणारच नाही, इतकेच नव्हे तर दलितांच्या आयुष्यात, 'हरिजन' वगैरे नामांतराने कालत्रयीही बदल होणे नाही, याबद्दल आंबेडकरांची खात्री होती. कारण म. गांधींना अस्पृश्य, अस्पृश्य म्हणूनच हिंदु समाजात, शोषितांच्या रूपातच राहण्यात स्वारस्य आहे, हे बाबासाहेबांना १९३१ सालीच कळून चुकले होते. त्यावेळी अल्पसंख्यांकांच्या बैठकीपुढे बोलताना, महात्मा गांधी म्हणाले होते - "I do not mind untouchables, if they so disire, living converted to Islam or Chirstianity." डॉ. बाबासाहेबांनी महात्म्याच्या कृतीउक्तीतले ढोंग ओळखूनच, येवल्याच्या धर्मपरिषदेतील सर्वज्ञात प्रतिज्ञा केली होती.

'रानडे, गांधी व जिना' या ग्रंथाच्या प्रास्ताविकात म्हणूनच ते ठणकावून सांगतात -

"I am no worshipper of idols. I believe in breaking them. I insist that I hate Mr. Gandhi and Mr. Jinnah. I dislike them, I do not hate them, It is because, I love India more. That is the true faith of nationalist."

असे सांगणाऱ्या बाबासाहेबांना ज्यांच्यासाठी आपण जिवाचे रान करून एकट्याने अवघ्या तथाकथित बड्याबड्यांशी भांडतो ती आपली माणसेही कशी आहेत ? हे देखील पूर्णतः ठाऊक होते. त्यांनी विलायतेहून लिहिलेल्या पत्रांतील एक पत्र ३ डिसें. १९३२ च्या 'जनता' पत्रकात प्रसिद्ध झाले आहे. मूळ १४ नोव्हें. १९३२ चे हे पत्र एकोणीस दिवसांनी प्रसिद्ध झाले होते. त्यात त्यांनी हीच गोष्ट स्पष्ट केली आहे. ते लिहितात - "अस्पृश्योन्नतीच्या कार्याकरिता आवश्यक असलेल्या कळकळीची व आस्थेची माणसे पाहिजे असल्यास, ती आपण अस्पृश्यसमाजातूनच शोधून काढली पाहिजेत. अस्पृश्योद्धाराच्या निमित्ताने आपला स्वतःचा स्वार्थ साधणारी

व स्वतःचा तळिराम गार करणारी हरामखोर माणसे, अस्पृश्य समाजात मुळीच नाहीत, असे माझे म्हणणे नाही."

आपल्या देशाच्या परंपरेचा विचार केला, तर ग्रंथ आणि धर्मप्रामाण्यवादी विचारच, नव्या वळणावळशाने मांडला तर कौतुक केले जाते. इहवादातील अनेकानेक छोट्यामोठ्या गोष्टींबद्दल चकार शब्दही न काढता, अध्यात्म, कर्म, आत्मा ह्या गोष्टींवर, सहस्त्रावधी ग्रंथ जरी खरडले; तरी त्याबद्दल वाहवा होते. पण आमच्या रुढी, अंधश्रद्धा आणि खुळचट समजुतींच्या अज्ञानलळितांबद्दल खरास्खुरा आत्मशोध घ्यायचा म्हटले की, ग्रंथमतांची डोकी फिरतात. लोकहितवादी, म. फुले, राजर्षी शाहू, आगरकर, डॉ. आंबेडकर यांच्या स्पष्टोक्तीबद्दलही असेच घडलेले दिसते.

हिंदु धर्माचे मनामनावर सहस्त्र वर्षे भक्कम साम्राज्य असलेली मने, त्यामुळेच झंकारत नाहीत. थोडीफार झंकारलीच तर दुर्दैवाने बद्द वाजतात. 'हिंदू समाज' याची व्याख्या करणेही मोठे अवघड कर्म आहे. महाभारत पुराणांपासून तो सावरकर-टिळकांपर्यंत अनेकांनी मनःपूत व्याख्या केली आहे. पण ती अपूर्ण तरी आहे किंवा अतिव्याप्त तरी आहे. पण 'ग्रंथ आणि पुराणांवरील विश्वास' ही प्रमुख अट आहे. लो. टिळकांनी, "प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु" हे तत्व स्वीकारून पारंपर्यागत व श्रुतिस्मृतिपुराणप्रतिपादित विधिसंस्कार किंवा आचार पाळणारा तो हिंदू होय." असे म्हटले आहे. त्यावर खूप उलटसुलट चर्चाही झडल्या होत्या. पण आजच्या 'जाती'च्या मानवी कलंकाचा समर्थनीय खुलासा, कुणीही करू शकत नाही, असे आढळते. पण तरीही, 'जाती' पाळणारा हिंदुधर्म अन्याय व मरणपात्र आहे, असेही कोणी म्हणत नाही. भारतीय संस्कृतिकोशकार लिहितात -

"आजचा हिंदुसमाज वर्णबद्ध नसून जातिबद्ध आहे. ब्राह्मण वर्ण नसून एक जात बनली आहे. अन्य वर्णही लोप पावले आहेत. त्या वर्णातल्या जाती कायम राहिल्या आहेत. सध्याच्या काळात तर जातिवाद अधिकच तीव्र झाला आहे." (भारतीय संस्कृतीकोश - खंड १० वा. संपादन - पं. महादेवशास्त्री जोशी - तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर - पृष्ठ ३५१)

जेथे काय वाटेल ते केले तरी, जात पुसली जात नाही, कितीही बुद्धीमान आणि दिसायला कितीही देखणा उच्चपदवीविभूषित कोणीही असू द्या, जर त्याच्याजवळ वरच्या जातीची धर्ममान्य ढाल नसेल तर तो माणूस, अस्पर्श आणि अवर्णच राहणार, अशा समाजात, 'धर्म' ह्याच मोठ्या अडथळ्याला सुरुंग ठासून उडविले पाहिजे; असे बाबासाहेबांनी त्यामुळेच निश्चित केले होते.

बदलत्या कालमानानुसार भारतातील लोकशाही राज्यप्रणाली आणि लोकांचे जीवनमान सुधारायला हवे होते. परस्परसामंजस्यांचे समृद्ध सहजीवन फुलायला हवे होते. पण असे घडत नाही, याचे कारण म्हणजे 'धर्म' शब्दाचा कालबाह्य झालेला अर्थ, आयुष्यावर कुरघोडी करीत आहे.

लोकशाहीत विविध प्रणालीचे तत्त्वज्ञान, झेंडे व अपेक्षा बाळगणारे विविध पक्ष असणारच. एक सत्तास्थानावर असताना, दुसरे विरोधकांच्या स्थानावर असणार. पण एक काँग्रेस पक्ष सोडला तर त्याच्या कितीतरी दोषांसह आणि अंतर्विरोधांसह, तोच पक्ष धर्मपिक्षा माणूस, सगळ्यांपेक्षा राष्ट्र आणि घटना मोठी असे जाहिर आश्वासन देतो आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा १९२७ चा प्रसिद्ध चवदार तळ्याचा महाडचा सत्याग्रह चालू असताना, काँग्रेसचे धार्मिक ऐक्यविषयक अधिवेशन भरले होते. श्री. श्रीनिवास अय्यंगार हे अध्यक्ष होते. त्यांनी असा ठराव केला होता की, " हिंदुस्थानातील कोणत्याही जातीने आपल्या धर्मसमजुती दुसऱ्या धर्ममतवाल्यावर लादू नयेत. प्रत्येक जातीने सार्वजनिक शांततेभंग न करता, आपल्या समजुतीप्रमाणे वागण्यास हरकत नसावी."

जेव्हा जे लोक सारखे अमके नेते, पक्ष किंवा सरकार ' विशिष्ट लोकांचे फार लाड करतात किंवा त्यांना गोंजारण्याचे धोरण ठेवतात ' असे म्हणणाऱ्या लोकांना आपल्या जातीयवादी, लोकशाहीविरोधी, घटना नाकारणाऱ्या संकुचित समजुती टाकता आल्या नाहीत, असा निष्कर्ष खेदाने काढावा लागतो. आणि ' धर्म ' घटनेपेक्षा मोठा असा उद्घोष करीत, विशिष्ट प्रदेशात यात्रा-रथयात्रांचा घोडा उधळणारे अडाणी व्यापारीवाणी लोक अराजकाचे बी पेरतात असे दिसते आहे. लोकांपेक्षा, राष्ट्राच्या सहजीवनापेक्षा धर्म कधीही मोठा नाही.

त्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांचे परिवर्तनोन्मुख विचार आणि व्यापक बैठक पुनश्च आठवणीत आणणे अगत्याचे होऊन बसते. त्यामुळे - " डॉ. बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान, चातुर्वर्ण्य, जातिव्यवस्था, रुढीपरंपरा, अंधश्रद्धा इ. नी ग्रस्त असलेल्या या देशाला सहजासहजी पेलण्यासारखे नव्हते. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या प्रस्थापित झालेल्यांच्या विशेषाधिकारांना आव्हान देऊन दलित, शोषित, पीडितांचे सर्वांगीण उत्थान घडवून आणणारे बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान हे खऱ्या अर्थाने क्रांती घडविणारे तत्त्वज्ञान आहे." (विचारयुगाचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर - संपादन, प्रा. गंगाधर पानतावणे, 'डॉ. आंबेडकरांचे अर्थकारण' - प्रा. मधुकर डोंगरे, पृष्ठ ४९) हा अभिप्राय अन्वर्थक आणि अचूक वाटतो. कारण ' सर्वच उत्तम चालले आहे ' असे मानणाऱ्या विशिष्ट वर्गातील-स्तरांतील लोकांना बाबासाहेबांच्या परिवर्तनाची आच कळणेही जवळजवळ अशक्य कोटीचे आहे यात शंका नाही.

सनदशीर आणि घटनामान्य मार्गांनी परिवर्तन व्हावे असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मनस्वी आग्रह असे. त्यामुळे राज्यांनी आणि विधी मंडळांनी केलेल्या कायद्यांच्या कृतीत अर्थ लावताना न्यायसंस्था घटनेच्या मर्यादांची जाणीव ठेवून वागणारच. न्यायसंस्था निर्भयपणे कार्यरत होण्यासाठी तिला स्वातंत्र्यही प्रदान केले पाहिजे आणि तिच्या निर्णयांच्या बाजूने किंवा विरोधी, सन्मानपूर्वक स्वीकारही केला

पाहिजे. प्रतिकूल निर्णयावर व्यक्तीने, व्यक्तीसमूहाने, राज्य किंवा केंद्रसरकारने आदळआपट केली तर न्यायसंस्थेची प्रतिष्ठा राहणारच नाही. देशातील संमिश्र विचारधारांच्या पार्श्वभूमीवर सतर्क राहून न्यायसंस्थांनी घटनेचा अर्थ जीवनांगाला लावून दाखविला पाहिजे.

बाबासाहेबांना हवे असलेल्या परिवर्तनात एकूणच अराजकाला कुठेही स्थान नाही हे आता स्पष्ट झाले असेलच. व्यक्ती मोठी असली, अगदी महात्मा, पंतप्रधान, गृहमंत्री किंवा राष्ट्रपती यासारखे एखादे सन्मान्य आणि लोकमान्य पद विभूषित करीत असली तरी तिने मूल्यात्मक शोधाच्या भावनेने व सातत्याने वर्तन ठेवावे. प्रत्येक वेळी 'प्राप्त परिस्थितीत तसे वागण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता' असे नोंदण्याची पाळी, त्यांनी चरित्रकारावर आणू नये. नाहीतर खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे या उक्तीसारखे बोलण्यातले परिवर्तन वेगळे आणि प्रत्यक्षातले कोलांट्या उड्या मारणे वेगळे, असे विपरित घडेल.

हीच गोष्ट आधुनिक विचारवंतांनाही ग्राह्य आणि नोंदण्याजोगी वाटते. म्हणून डॉ. भालचंद्र फडके उमाळ्याने लिहितात -

" समाजपरिवर्तनाची सर्वच पक्ष भाषा बोलतात. विशेषतः सत्तारूढ पक्षाला वाटत राहते की, कायद्याने हे परिवर्तन वेगाने आणता येईल. ज्या देशात दारिद्र्य, अवहेलना, रोगराई, अज्ञान इत्यादी भोगण्याचे अमाप स्वातंत्र्य अभावग्रस्त समाजाला लाभलेले आहे त्या तळागाळाच्या समाजाला हा देश आपला आहे असे वाटले पाहिजे. घटनेने दिलेले मूलभूत हक्क प्रत्येक माणसाला निर्भयपणे भोगता आले पाहिजेत. " (डॉ. बाबासाहेब आंबेडकर - प्रा. भालचंद्र फडके. श्रीविद्या ऑक्टो. १९८५, पृष्ठ २३५).

बाबासाहेबांच्या परिवर्तनाची आच नेहरू, राजाजी, बॅ. जयकर यांच्यासारख्या नेत्यांनी ओळखली होती. पुणे कराराच्या वेळी उपोषण करणाऱ्या म. गांधींना पंडित जवाहरलाल नेहरू यांनी तुरुंगातून आणि बाहेरून पाठविलेल्या तारा आता उपलब्ध आहेत. नेहरूंचे एकेक वाक्यसुद्धा महात्म्याच्या दांभिक व दुटप्पी भूमिकेची चिरफाड करणारे अहे. बाबासाहेबांनी त्या त्या वेळी आपल्या लढ्याच्या न्याय्य बाजूने उभे राहणाऱ्या माणसांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. लोकशाहीचे सतत चिंतन आणि आराधन करणाऱ्या बाबासाहेबांच्या काही मानपत्रांचाही त्यांच्या भूमिकेच्या स्पष्टीकरणार्थ विचार होणे महत्त्वाचे आहे.

बाबासाहेबांच्या पीडित मानवांच्या आणि दलित बांधवांच्या उत्थानासाठी झुंजणाऱ्या बाबासाहेबांना अनेकांच्या क्रोधाला सामोरे जावे लागले. धार्मिक, सामाजिक, राजकीय आणि व्यक्तिगत आयुष्यातही प्रस्थर विरोधाशीच सातत्याने मुकाबला करावा लागला. ज्यांनी आपल्या कृतीकर्तृत्वाने आणि वाणी-लेखणीने परतंत्र हिंदुस्थान देशाला आणि स्वतंत्र भारताला भारून मंत्रमुग्ध करून टाकले, त्या म. गांधी, लोकमान्य

टिळक, स्वा. सावरकर, राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद, पं. नेहरू अणि सरदार वल्लभभाई पटेल, यांच्यासारख्यांशीही विरोधी पाविऱ्यातच कधी सर्वकाळ, कधी काही काळ उभे राहावे लागले होते. पण प्रखर तीव्र टीकेच्या तिखट बौद्धिक संघर्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र आणि चारित्र्य उजळून निघत होते.

त्यांचे नेतृत्व तळागाळाच्या जनतेने शिरोधार्थ मानल्यावर विरोधक भांबावून गेले. चवदार तळे, काळाराम सत्याग्रह, पुणे करार, कायदेमंत्री, घटनाकार, कुशल राजकारणी आणि दूरगामी विचारांचे अभ्यासू अर्थसमाजतज्ज्ञ या नात्यांनी भारताच्या राजकीय इतिहासात डॉ. आंबेडकर एक अपरिहार्य उल्लेखनीय व्यक्ती होऊन सन्मानास पावले. त्यांच्या धर्मांतराच्या झेपेने तर विश्वाला त्यांचे वेगळेपण स्वीकारावे लागले. यातूनच त्यांना अनेक ठिकाणाहून शेकड्यांनी मानपत्रे मिळालीत. इतकी की त्यावरच एखाद्या संशोधकाला शोधकार्यासाठीच कंबर कसावी लागेल. त्यातील काही मानपत्रातील मजकूरही त्यांच्या परिवर्तनाकांक्षी मनोभूमीचा छडा लावण्यास साह्यकारी ठरावा.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या 'अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक संघा'ने १९३२ साली त्यांना दिलेल्या मानपत्रात असे म्हटले आहे की -

" राष्ट्रभक्त भीमराव, आपण अस्पृश्योद्धाराची जी कामगिरी धैर्याने करीत आहात, तीच राष्ट्राच्या अभ्युदयाला प्रामुख्याने साहाय्यभूत होणार आहे. अस्पृश्यता ही हिंदी समाजघटनेला जडलेली दारुण व्याधी आहे व तिचे निर्मूलन झाल्याखेरीज हिंदी समाज सामर्थ्यवान होणे शक्य नाही. अस्पृश्य समाजातच आपल्यासारख्या कर्तृत्ववान धुरीण उदयाला आला, त्यामुळे अस्पृश्योद्धाराचे कार्य कल्पनेपेक्षाही जलद व सुसाध्य होईल असा आम्हाला भरंवसा वाटत आहे." (पुणे २१.५.३२)

ज्या महाडच्या चवदार तळ्यावर १९ मार्च, १९२७ रोजी त्यांना समतेसाठी पाण्यात रक्त मिसळावे लागले होते, त्या संघर्षाच्या पातळीवर बरोबर तेरा वर्षांनी तेव्हाचे प्रसिडेंट विष्णू नरहरी खोडके यांनी महाड म्युनिसिपालिटीमार्फत दिलेल्या मानपत्रात, ' अस्पृश्य-स्वातंत्र्यदिन ' साजरा करण्यासाठी आलेल्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना, ' आदर आणि आपुलकीच्या ' शब्दात असे संबोधिले आहे -

" आपण आपल्या असामान्य कर्तृत्वाने अस्पृश्य जनतेच्या आचारविचारात अभूतपूर्व क्रांती घडवून आणलीत, इतकेच नव्हे तर स्पृश्य हिंदू समाजालाही अंतर्मुख करून विचारप्रवण बनविलेत, ते आपण केवळ दोन दशकांच्या अल्पावधीत घडवून आणलेत. ही गोष्ट जितकी आश्चर्यकारक तितकीच आनंदप्रद आणि आशादायक आहे. अतिदलित व अस्पृश्य समाजात आपल्यासारखा अद्वितीय नेता निर्माण झाला आहे, हे अस्पृश्य जनतेचेच नव्हे तर अखिल हिंदी जनतेचे परमभाग्य होय." (महाड, तारीख १९४०)

सुरतच्या एस. एम. एच. मंडळाने दिलेल्या गुजराती मानपत्रात असे म्हटले आहे - " अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत एकट्याने झुंजून दलितांच्या हक्कांचे आणि

मागासवर्गियांच्या हितसंबंधांचे यशस्वी रीतीने रक्षण करणारे आपण आहात."

वरील मानपत्रास्वाली पहिली सही गोविंदभाई स्वोडाभाई कोळी यांची आहे तर तेरावी सही स्वोडाभाई हम्माभाई भोजगातोर यांची असून त्यास्वाली, सुरत ता. १६.१.१९४३ अशी नोंद आहे.

आणि आणस्वी एक नोंद करण्यासारस्वे विशेष मानपत्र नागपूर महानगरपालिकेच्या महापौरांच्या व सदस्यांच्या मार्फत दिले गेले आहे. त्यांच्या आयुष्यातील महत्वाच्या घटनाप्रसंगाचा ह्या मानपत्रात धावता आढावा घेतला आहे. त्यातील एक उल्लेस्व अत्यंत मार्मिक आहे, तो असा -

" बाबासाहेब, आपले सारे जीवन बहुजनहिताय व बहुजनसुस्वायच स्वर्च झाले आहे. पददलितांच्या उन्नतीशिवाय राष्ट्र उन्नत होणार नाही. या आपल्या मताविषयी दुमत होऊ शकणार नाही." (नागपूर - १५.१०.१९५६)

धर्मांतराच्या क्रांतीकारक घटनेनंतर बाबासाहेब आंबेडकरांना दिलेले हे मानपत्र आहे. त्याआधी नगरपालिका असताना नागपूर शहराने त्यांना एक मानपत्र दिलेलेच होते. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, महाड, (रायगड) यांच्या १९६१-६२ ते १९८६-१९८७ या रौप्यमहोत्सव स्मरणिका आणि नियतकालिका विशेषांकातून पृष्ठ ८८ ते ९९)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध ग्रंथात त्यांच्या व्यासंगाची आणि समस्येच्या मुळालाच हात घालण्याच्या चिकित्सक अशा रोखठोकपणाची नेहमीच प्रतीती येते.

त्यावेळचा हिंदुस्थान हा काळोस्वाचा प्रवासी होता. अस्पृश्यांच्या आणि दलितांच्या दृष्टीने तर तो गुहांधःकारच होता. सगळे घटक नुसते प्रतिकूलच नव्हते तर कट्टर सनातनी, परिवर्तनास बाधक आणि अमानुष असे होते. धर्माच्या, रुढी रीतींच्या कराल दडपणांनी समाजपुरुष पिचून निघाला होता. वर्ण्यव्यवस्थेचे आणि जाती-पोटजातीचे विष त्याच्या नसानसात भिनले होते. राजकीय गुलामगिरीच्या उच्चाटनासाठी सगळेच सवर्ण नेतृत्व इतके गुंतून पडले होते की अस्पृश्यतेच्या रोगाकडे फार लक्ष देणे त्यांना कालापव्यय वाटत होता.

काही जागरूक माणसे अस्पृश्यतेच्या कलंकाबद्दल बोलत होती फार, पण प्रत्यक्ष कृती मात्र इतकी संथ व शैथिल्यपूर्ण होती, की त्यातून उपायाऐवजी अपायच जास्त घडावा. मानवी स्वभावाचे जे दोष असतात, त्यातील दुटप्पीपणा आणि तोंडदेस्वलेपणा यांच्या जोडीला, दुसरा बाबासाहेबांसारस्वा कालचा पोरगा (हे शब्द म. गांधीजींचे) डोईजड होऊन, कुरघोडी करणार आणि श्रेष्ठ ठरणार म्हणजे काय ? हा भागही होताच.

देश, राष्ट्र, माणूस, समाजहित या सगळ्यापेक्षा धार्मिक विचारांची भांग

सामान्यजनांना आणि ग्रंथप्रामाण्यवादी अज्ञजणांना लवकरे चढते, अशी येथली हवाच दूषित होती. अशा विचित्र कसोटीच्या आणि अटीतटीच्या प्रसंगी, सहस्त्रावधी वर्षांची आणीबाणी आणि जंतुवत जीवन ज्यांनी अनुभवले, त्या झुंजार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, सर्वांगीण पण परिवर्तनाच्या हक्कांची जी लढाऊ चळवळ या देशात उभारली, त्यांच्या वर्णनाला 'अनन्वय' अलंकारच, 'या सम हा' योग्य ठरावा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचेच एक चरित्रकार श्री. धनंजय कीर यांनी एका वाक्यात या क्रांतीपुरुषाचे अनोस्वेपण सांगितले आहे, ते म्हणतात -

हा पुरुष "धुळीत जन्माला येऊन जगातील धुरंधर पुरुषांच्या मालिकेत जाऊन बसला." (विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर - पृष्ठ ८२)

नव्या निकोप भारताचा नवा इतिहास जेव्हा तयार केला जाईल, तेव्हा दोन महापुरुषांनी, दोन शतकांचे आपापल्या नावावर खाते जमा केलेच आहे. एकाचे नाव आहे जोतीराव फुले तर दुसऱ्याचे नाव आहे भीमराव आंबेडकर. ज्यांना प्रत्यक्ष क्रांतदर्शी परिवर्तनानेच लवून प्रणाम करावा.

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : स्वतंत्र विचारचिंतक

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वशाली जीवनाचा विचार करीत असतांना, भारतातील उपलब्ध यच्चयावत सामुग्रीकडेच, चिकित्सक भूमिकेतून पाहणे अगत्याचे असते, कारण परंपरनेने दिलेल्या कित्येक शब्दांचा उलगडाच होत नाही. आणि झालाच तर हे शब्द, इतक्या निरर्थकपणे शतकानुशतके का वापरात राहिले ? याचाच विस्मय वाटतो. संस्कृती, सहिष्णुता, मानवता, धर्म, इतिहास, महात्मा, लोकमान्य, समाजधारणा आणि तत्त्वज्ञान, या अवघ्याच शब्दांकडे, उपलब्ध घटितांच्या आधारे, म्हणूनच डोळसपणे पाहण्याची आवश्यकता आहे.

राष्ट्र किंवा देश अथवा मातृभूमी याचा अर्थ केवळ भौगोलिक सीमारेषा किंवा उपलब्धी असा कधीही नसतो. देश म्हणजे डोंगर-दऱ्या-सागर नव्हे. देश म्हणजे राजेराजवाड्यांच्या पराक्रमांची, कटकारस्थानांची अथवा आवकजावकीची निरर्थक जंत्री नव्हे, संतमंहतांची, अवलिया तत्त्वज्ञांची असंख्य नामावली, म्हणजेही राष्ट्र नव्हे, आणि "माझी मातृभूमी कुठे आहे ?" असा प्रश्न विचारण्याची पाळी आणणाऱ्या परिस्थितीचा पोशिंदा, म्हणजे तर नव्हेच नव्हे. माणसांच्या विकसनाला जेथे परिपूर्ण वाव आहे, सुखदुःखाचे समान वाटप आहे, ज्ञान-सन्मानसंधींची समानता आहे. समावेशक विचार आहे, नतमस्तक करणारा आचार आहे आणि वस्तुस्थितीचाच सुयोग्य शब्दप्रचार आहे, अशा अनुकरण करावेसे वाटणाऱ्या, सांस्कृतिक विचारसरणीनेच, देशाचे स्थान ठरत असते.

आपल्या देशातील दलितांच्या दुःस्थितीचा आणि जातीयतेचा आसूड, ज्या विचारवंतांने प्रत्यक्ष भोगाला, त्यातीलच एक डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. उपलब्ध धर्मप्रमाणलीत मानवतेची आणि समान मूल्यांची जागरूकतेने मांडणी व मागणी करणारे, अनेक कर्मयोगी आहेत. भगवान गौतमबुद्ध, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, चौस्वामेळा, नामदेव, रामानंद, चैतन्य, कबीर, रविदास, नरश्री मेहता नानक, म. फुले आणि आगरकर, अशा काही नावांची; अत्यादरपूर्वक नोंद करावी लागते. पण इंग्रजांच्या आधी, इंग्रजांच्या नंतर आणि स्वातंत्र्यानंतरही, जात-धर्म पुरस्कारित गोष्टींचा विचार केला; तर चित्र फार उदास करणारेच आहे, असे म्हणावे लागते.

फ्रेंच राज्यक्रांतीनंतर नव्या विचारांचे वारे जोराने वाहू लागले. इ. स. १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीने प्रस्थापित मूल्यांचा पुनर्विचार करण्याची प्रक्रिया, मूळ धरू लागली. रशियाच्या लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या लेनिन यांनी, अमेरिकेतील निग्रोंची अमानुष अवस्था पाहिली आणि त्यांनी - " Shame on Americans for the

plight of the negroes ! " असे उद्‌गार काढले होते. जेथे जेथे गुलामगिरी आहे, तेथे मानवताच होरपळते आहे, असे म्हणावे लागले. जातीप्रथेतही ही होरपळ आहेच.

जुन्या इतिहासांची साक्ष काढली, तर कोणत्या ना कोणत्या कारणाने का होईना, पण गुलामांची प्रथा होती. माणसांची विक्री होत असे. अनेक नगरराज्यात, ग्रामराज्यात शिक्केधारी गुलाम होते. अमेरिकेसारख्या संपन्न देशात निग्रोंनाही फार वाईट वागवले जाते. निग्रो थिएटर, निग्रो साहित्य आणि निग्रो संस्कृती त्यामुळेच सतत संघर्षरत असलेले दिसतात. क्वचित्‌वेळी भारतातील जातीप्रथेचे समर्थन करणारे, अनेक पश्चिमात्य देशांचा आणि विशेषतः अमेरिकेतील निग्रो प्रश्नांचा हमखास उल्लेख करतात. त्याचे कारणही ह्या अमानुषपणातच आहे.

मनुस्मृती, शूलपाणी स्मृती आणि देवस्मृती यांच्यातील समाजनियमांचा विचार केला, तर बाबासाहेबांनी आपल्या जन्मधर्माला नकार देतांना; देव, पुरोहित आणि शास्त्रवचन यांनाही का नाकारले ? याची तीव्रता पटू शकते. कारण पाश्चात्य देशातील गुलामगिरीला, त्यांनी कधीही धर्माचा आधार दिला नव्हता. पण हिंदूंनी मात्र अस्पृश्यतेला भक्कम अदृश्य पोलादी धर्माधार दिला आहे. कारण ' हिंदुंची समाजशास्त्रे व धर्मशास्त्रे एक आहेत. ' हे बाबासाहेबांनी नीट उमगून घेतले होते. स्वतंत्र भारताची घटना बंधताना, त्यांच्या मनात सर्व उपलब्ध विपर्यस्त परिस्थितीचा आणि व्यापक अनुभव अभ्यासाचा संदर्भ म्हणूनच सतत जागता होता.

धर्मपुरस्कृत आणि धर्मरक्षित जातीव्यवस्थेमुळे इथल्या तळागाळातील लोकांचे आणि दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्तांचे आयुष्यच मातीमोल केले गेले होते. शिक्षणापासून त्यांना वंचित ठेवले होते. आर्थिकदृष्ट्या नगण्य केले होते. घरादारांना नागवले होते. अभिमान-अस्मितेला लुबाडले होते आणि दया - बुद्धीच्या, वाटले तर फेकल्या जाणाऱ्या शिळ्यावाळक्या उष्ट्या तुकड्यावर, सतत झुलवले होते. म्हणून बाबासाहेबांना अशा काही नसलेल्या अवस्थेतही, जिद्द आणि जगण्याची मनस्वी जिगर असणारे, ' शूद्र पूर्वी कोण होते ? ' हा प्रश्न ग्रंथ रूपाने मांडावासा वाटला.

पूर्वीच्या ब्रिटिश राजवटीत मध्यवर्ती जिल्ह्यांच्या महसूल व शेतसाऱ्याचा अहवाल सादर करणाऱ्या नागपूरच्या श्री. रेजिनाल्ड एच. क्रॅडाक नामक अधिकाऱ्याची नोंद उपलब्ध आहे. ती १८९९ ची नोंद आहे. नागपूरच्या दलितवर्गापैकी 'महारां' बद्दल तो म्हणतो.

"He at present lacks of education and a sence of self-respect, but these will come and the day may not be for distant when Mahar will be found among the rank of native Magistrate." (दलितांचे प्रबोधन. डॉ. गंगाधर पानतावणे. डिसें. १९७८. पृष्ठ - २८) ह्या जुन्या नोंदीची दखल घेऊन, ' नागपूर मुक्कामीच धर्मपरिवर्तन १४ ऑक्टोबर १९५६ साली का झाले ? ह्या अनेकांना पडणाऱ्या प्रश्नाला उत्तर देता येते.

भारतासारख्या सातत्याने राजसत्तेला आणि धर्मसत्तेला प्रणाम करणाऱ्या देशात लोकशाहीचा आणि सार्वभौम घटनेचा प्रयोग राबवणे, ही सोपी गोष्ट नव्हती. विशेषतः जाती-पोटजातींच्या बुजबुजाटाने, इथल्या प्रत्येक माणसाचे मनच आजारले आहे. पंगू बनले होते.

रशियाच्या राज्यक्रांतीनंतरच्या लाटेत, पुढे भारतातही कम्युनिस्ट पक्ष व समाजवादी पक्ष, चेवाने लोकजागृतीचे आणि जनमत चेतवण्याचे कार्य, जोमाने करू लागले होते. पण ज्या कोणा विचारवंताने प्रचलित वर्णाश्रमव्यवस्था, जातीयता आणि धार्मिकता यांच्याबद्दल मूलगामी भूमिका घेतली, की त्याचे अस्तित्त्व धोक्यात येणारीच परिस्थिती, येथे अनादीकालापासून आहे.

अस्पृश्यतेच्या प्रश्नाला लो. टिळकांनी कधी फारसे महत्त्वच दिले नव्हते. म. गांधीजींनी मर्यादित अर्थाने व्यक्तिगत पातळीवर लक्ष घातले होते. राजकीयदृष्ट्या ही खेळी त्यांना अडचणीची असल्याने उपासाचा मार्ग पुढे त्यांनी स्वीकारला. राऊंड टेबल कान्फरन्सचा पराभव, त्यांनी पुणे करार करवून, राजकीय लाभ उठवून, विजयाचे वर्तुळ पुरे केले.

वस्तुतः हा प्रश्न फार गंभीर आहे आणि निकराचाही आहे, याची प्रत्यक्ष कृती महात्मा जोतीराव फुले यांनी केली होती. रानडे, भांडारकर, बाबासाहेब बोले, वि. रा. शिंदे वगैरेंना, त्याची निकड कळली होती. पण नंतर ही दृष्टी पूर्ण बदलून, राजकीय स्वातंत्र्याप्राप्तीच्या दृष्टीनेच सर्व हवा निर्माण करण्यात आली. कारण मूलभूत आणि सखोल परिवर्तन दृष्टी, स्वतः भाजलेल्या बाबासाहेब आंबेडकरांशिवाय पुढल्या नेत्यांकडे नव्हती.

कम्युनिस्ट पक्षाने १९३२ ला मार्क्सवादी तत्त्वप्रणालीप्रमाणे समता निर्मिण्याची भूमिका घेतली होती. बाबासोहब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेली मानवसुसंबद्ध समता आणि मार्क्सची आर्थिक समानता, यांच्यात सांधेजोड झाली असती; तर मोठेचे परिवर्तन घडले असते, पण मार्क्सवादी म्हणविणाऱ्या कम्यनिस्टांनी ही संधी करंटेपणाने गमावली. विषमतेने वाकलेल्या या देशात, त्यामुळेच कधी साम्यवादाला यश आले नाही. प्रत्यक्ष पक्षकार्यकर्ते असणाऱ्या विचारवंत श्री. दि. के. बेडेकर यांनी, चळवळींचे आणि आत्मपरीक्षण करतानाही, ही गोष्ट; स्पष्टपणे मांडली आहे. महाराष्ट्रातील समाजवादी विचारांचा परमार्श घेताना ते लिहितात.

" कम्युनिस्ट पक्ष व समाजवादी पक्ष अस्पृश्य जातींच्या या प्रश्नाबाबत जुन्यांचा वारसा बदलू शकले नाहीत. १९३२ च्या सुमारास मार्क्सवादी समतेच्या आवाहनात डॉ. आंबेडकरांना काही आश्वासन वाटले, त्यांनी आपल्या पक्षाला, 'स्वतंत्र मजूर पक्ष' असे नाव दिले, व काही काळ समाजवादी कामगार संघटनांबरोबर सहकार्यही केले. पण नंतर ते दूर जात चालले. शेवटी धर्मांतराच्या मागनि ही जातीय गुलमगिरी सुटेल, निदान कमी होईल, असे वाटून त्यांनी धर्मांतराचे पाऊल टाकले. " (समाजचिंतन ऑगस्ट १९६९ पृष्ठ १४९ - दि. के. बेडेकर)

आपल्या देशांत दीर्घकाल सत्ता उपभोगणाऱ्या, काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात, विविध लोकोपयोगी आणि परिवर्तनानुगामी कार्यक्रम जाहीर करण्यात येतात. स्वास्थाची हमी मिळते. मानवी व वस्तुमय साधनसामुग्रीच्या समान संधीचे आश्वासन दिलेले असते. प्रगतीतील न्यायनिवाडा देण्याचे व 'स्वास हक्काचे संरक्षण' केले जाईल. असेही म्हटले जाते आणि विषमतेचे व शोषणाचे उच्चाटन करण्याचीही भूमिका दिसते. १९५५ ची आवडी काँग्रेस, १९५७ ची मान्यता आणि १९६४ चे भुवनेश्वर अधिवेशन; यातल्या कार्यक्रमांकडे लक्ष वेधता येईल.

राजकारणातील आश्वासने आणि प्रत्यक्ष व्यवहारातील कृती यातल्या तफावतींची राज्यशास्त्र व अर्थशास्त्राचे अभ्यासक असलेल्या बाबासाहेबांना पूर्ण जाणीव होती. शिक्षण व अभ्यासासाठी, त्यांनी इंग्लंड अमेरिकेत वास्तव्यही केले होते. कायद्यांचे तज्ञ असल्यामुळे, कायदेकानूंचे जीवनात काय होते ? किंवा धनदांडग्यांकडून त्यांची हास्यास्पद स्थिती कशी होते ? याचीही त्यांना पूर्ण कल्पना होती. 'कायद्यांचे आत्यंतिक वर्चस्व म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. तसेच निवडीचे आत्यंतिक स्वातंत्र्य म्हणजेही स्वातंत्र्य नव्हे.' ह्या निदोच्या वचनाप्रमाणे, डॉ. आंबेडकरांना त्यातल्या त्यात लवचिक पण प्रभावी घटना, म्हणूनच घडवावी लागली.

इतर कुणीही, म्हणजे धर्मनि, वचनाने संतमहात्म्यांनी किंवा आदर्शवाद्यांनी सांगण्यापेक्षा, दलितांना अंतःकरणापासून आपली भूमिका व बोल उमगावेत, अशी त्यांची धारणा होती. म्हणूनच वेगळा शब्द, वेगळे पाणवठे, वेगळे समता मंदिर, वेगळ्या धर्मशाळा स्वीकारण्यापेक्षा, विषमता हाच ज्याचा व्यवहारआत्मा,' त्या 'हिंदूधर्माचा त्याग करा आणि समताधिष्ठित अहिंसावादी पण तर्काधार असणारा बौद्धधर्म स्वीकारा,' असे त्यांचे आवाहन होते. पण कायद्याने मिळणारे राखीव जागांचे फायदे, अनेकांनी घासून लाटले, पण सन्मानाची हाक, त्यांनी न ऐकता हिंदुधर्मांतर्गत हरिजनत्वाचा शिक्का, पाठीवर मारून घेतला.

अमेरिकेत श्वेत सत्तेला लोक प्रमाण करतात हे निग्रोंना कळले होते. तसेच भारतातल्या लोकशाहीत प्रामुख्याने सवर्णांना आणि संधीप्राप्त मालमत्तेदारांना, बुद्धिवंतांना आणि स्वयंकथित संस्कृतीमतांनाच मानसन्मान प्राप्त होतो आहे; हेच आत्ताचे खरे चित्र आहे. लोकशाहीत असे काही व्हावे, हे विचित्र आहे, पण तरी ते सत्य आहे. पण टाकून दिलेल्या किंवा फेकलेल्या कंठ्यावरही, लोक फार खुष असतात, हे नाकारायचे म्हणजे प्रत्यक्षाकडेच डोळेझाक करायची, असे म्हणावे लागेल.

डॉ. बाबासाहेबांच्या चवदार तळ्याच्या लढ्याची आणि 'बहिष्कृत भारत' मधील अग्रलेखांची तत्कालीन जागतिक वातावरणाच्याही बाबतीत, विचारसरणी समजून घेता येते. १९२९ चा महामंदीचा कालखंड. त्या काळात समाजवादाचे आणि समाजवादावर आधारलेल्या लोकशाहीचे महत्त्व, समजून घ्यायला हवे आहे.

समाजवादाचे स्वागत आठ-नऊ महत्त्वाच्या गोष्टींसाठी करावयाचे असते. स्वार्थ आणि नफेखोरीच्या मतलबी काळात, मानवता मरायला टेकलेली असते, ती

पोसली जावी आणि तगावी-जगावी म्हणून सर्वत्र दिसणाऱ्या पिळवणुकीचे उच्चाटन समाजवादी उपायांनीच करणे सुलभ असते. बोकाळलेल्या विषमतेच्या ऱ्हासाची किंवा कमी होण्याची शक्यता, याच विचारसरणीमुळे साधता येते. माणसांच्या जगण्याला अर्थ लाभतो, तो त्याच्या श्रमामुळे आणि या श्रमाला, प्रतिष्ठामूल्य लाभल्याशिवाय, माणसाला प्रतिष्ठितच होता येणार नाही. त्यागाचे स्वार्थासाठी गोडवे गाऊन, त्याचेच लोभस तत्त्वज्ञान न बनविता, त्यागभावनेला महत्त्वाचे स्थान, समाजवादी रचनेत देता येते. भपकेबाजपणाला आणि उधळपट्टीला आळा घालणे म्हणजे समाजवादी व्यवस्था. माणसाला जगताना स्थैर्य आणि सुरक्षिततेचा लाभ मिळवून देणे आणि स्वतःसह सगळ्यांचा जीवनस्तर उंचावणे, हे समाजवादाचे उद्दिष्ट असते.

'बहुजनहिताय बहुजनसुखाय' म्हणता म्हणता व्यक्ती जीवनातील गुणदोषांचा मेळ घालणे, हीच कसरत असते. सार्वजनिक हितांचे आणि व्यक्तिगत हितांचे काय ? 'यातल्या भेदरेषा ठरविणे अवघड असते. अनेक धर्म, जाती, पोटजाती, प्रांत, चालीरीती आणि वर्गीय व वर्णीय आग्रह असणाऱ्या, भारतातील समाजासाठी व लोकांसाठी राज्यघटना उभी करणे किती अवघड आहे, हे यावरून स्पष्ट व्हावे. आधुनिक विचारवंतांच्याही लक्षात ही कोंडी आलेली आहे.

" समाजवादात सार्वजनिक उद्दिष्टे अथवा ध्येये अगोदर ठरतात, ती गाठता यावीत अशाप्रकारे मूल्यनिश्चितीचे कार्य जाणूनबुजून पार पाडले जाते. पण समाजवादाची ध्येये गाठण्यासाठी धोपट मार्ग अवलंबून देखिल व्यक्तीस्वातंत्र्य संकुचित केल्याखेरिज ध्येयपूर्ती होत नाही. ..... व्यक्तीस्वातंत्र्य अनेकांना अतिप्रिय आहे. ते अबाधित ठेवून समाजवाद पूर्वार्थाने साकार करण्याची किमया अजून तरी साधलेली नाही." (भांडवलशाही आणि समाजवाद प्रा. प्र. गो. ठोंबरे. फेंब्रु. ७३ पृष्ठ - ६८)

अर्थात काही विचारवंत याचा व्यत्यास आणि प्रतिवाद करीत, नवीन तऱ्हेच्या समाजवादी प्रयोगाचा आग्रह धरतात. ज्यांना कधीच काही मनासारखे लाभले नाही, त्या दलितांना केंद्रबिंदू मानून आंबेडकर वाद मांडला जातो. त्यात वरकरणी विसंगत असेही काही नाही. कारण शासन कोणाचेही व कोणतेही असले तरी, व्यक्ती आपल्या व्यक्तिगत स्वातंत्र्याला, आत्यंतिक महत्त्व देणार असेल तर; त्याचा लाभ मिळण्याची प्रक्रियाच गाळात बसकन मांडून बंद पडण्याची शक्यता असते, किंवा ज्यांना बरेच काही मिळाले आहे, त्यांच्याच ताटाभांड्यात नवेही पडणारच असते. म्हणजे झोळीवाल्यांच्या झोळ्यांना बूडच नसल्याचे स्पष्ट करणारी अनवस्था ओढवणार.

नागपूरचे एक विचारवंत श्री. ताराचंद्र खांडेकर, त्यामुळेच म्हणतात, " परिवर्तनशीलतेचा आस हा नेहमी व्यक्ती या केंद्रबिंदूभोवती फिरणारा असला पाहिजे. ज्या ज्या गोष्टी व्यक्ती व समाज यांच्या दुःखासाठी वा नाशासाठी पुढे येतील, त्यांचा अव्हेर करणे, त्यांना नेस्तनाबूद करणे हे प्रत्येक येणाऱ्या पिढीचे कालसापेक्ष असे उत्तरदायित्व आहे. " (आंबेडकार तत्त्वज्ञान प्रचीती आणि आविष्कार - ताराचंद्र खांडेकर, प्रभा प्रकाशन, १९८१, पृष्ठ - २०)

दा. क्र. ३४८ २६८८१ २/११/९८

आपल्या जीवनातील असल्या अंतर्विरोधांना तोंड देणे एखादा तोडगा शोधताना किती कठीण आहे, हे अशा वेळेस प्रकर्षाने जाणवून जाते.

भारतीय समाजरचना आणि धर्मरचना ह्या एमेकांमध्ये पूर्ण गुरफटलेल्या दोन बाजू आहेत. जीवनातील स्त्रीपुरुषासारखे हे नाते आहे. सोडणेही अवघड आहे आणि राबवणे तर त्याहून कठीण आहे.

स्त्रीयांना विशेष पद्धतीने घराच्या चौकटीत डांबून टाकण्याचे काम आपल्या विचारात चोखपणे पार पाडलेले दिसते. स्वतःची मते मांडणारी, विविध चळवळीत भाग घेणारी, एक महत्त्वाचा घटक म्हणून आत्मविश्वासाचे पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात वावरणारी, स्त्री हे सर्व स्त्रीविषयक चळवळींचे, एक उद्दिष्ट आहे. पण आपल्या देशात व समाजात सगळ्यात जास्त संकोच स्त्रीयांचा होतो. म्हणूनच आता आता तर, स्त्री ही दलितांपेक्षाही दलित, आणि दलितांच्या घरातील स्त्री, तर पराकोटीची दलित; अशी विचारधारा, रूढ होताना दिसते आहे, त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित स्त्रीयांना; स्वच्छतेबद्दल, कपड्यालत्त्यांबद्दल, दागदागिन्यांबद्दल, मुलाबाळांच्या संस्कारांच्या दृष्टीने आणि व्यसनी नवऱ्याच्या देखभालीबद्दल मनःपूर्वकतेने मौलिक उपदेश केलेला आहे.

स्त्री तिच्या बंधनाबाहेर, चौकटीबाहेर घराबाहेर पडणे म्हणून महत्त्वाचे आहे. आधुनिक विचारधाराही याच सूत्राचा पाठपुरावा करतात. स्वातंत्र्य आणि हक्क यांच्या कल्पनांबद्दल म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, नेहमीच कालसुसंगत आणि औचित्यपूर्ण वाटतात. आजच्या विचारांशी होणारी ही जुळण पाहिली, की त्यांच्या बुद्धीचे व 'स्वतंत्र' तेचे आश्चर्य वाटते.

"स्त्रिया घराबाहेर पडल्या त्याचवेळी वैयक्तिक स्वातंत्र्य व हक्क ह्यांच्या कल्पना विकसित झाल्या. नवीन नैतिकता अस्तित्त्वात येऊन लागली. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाच्या सुरूवातीला पुरुषांच्या एकतर्फी हक्कांना कायद्याने काही प्रमाणात अंकुश आला." (स्त्रीमुक्ती केव्हा व कशी ? ऑगस्ट १९८४. सुशीला गोखले पटेल - पृष्ठ - ४३) बाबासाहेबांचे विचारसाम्य आणि म्हणून चळवळीच्या कार्यक्रमांबद्दलचे त्यांचे मनोगत, याद्दष्टीने पडताळून पाहिल्यास त्यातले मोल ठळकपणे कळते.

राष्ट्रीय काँग्रेसच्या ध्येय-धोरणांबद्दल म्हणूनच फुले-आंबेडकर हे कृतीशील विचारवंत अत्यंत असमाधानी असल्याचे दिसते. म. फुले तर काँग्रेसला 'शेठजी भटजींची काँग्रेस' असेच म्हणायचे आणि बाबासाहेब सुद्धा हिंदू कोड बिलाबद्दल किंवा व्यापक धोरणांबद्दल, पंडित जवाहरलाल नेहरूंचे काँग्रेस सरकार, बोटचेपे म्हणून पडखाऊपणे वागते आहे, असे आढळ्याने, त्यापासून वेगळे निघाले होते.

त्यांचे धोरण नेहमी राष्ट्रातील नगण्य व्यक्तींना विशेषाधिकार प्राप्त व्हावेत, अशा तऱ्हेचे होते. त्याकाळातील अनेकांची धारणा अशी होती. एम. एन. रॉय, हे

त्यापैकी एक होत. त्यांच्या एका दैनंदिनीत त्यांनाही स्पष्टपणे असेच ठणकावले आहे. ते लिहितात -

" कुठल्याही चळवळीचा राजकीय कार्यक्रम हा तिच्या सामाजिक दृष्टिकोनातून निश्चित केला पाहिजे. राजकीय पुढारी हे फक्त समाजवादाच्या विरूद्ध आहेत असे नव्हे, तर हे हिंदू समाजाच्या लोकसत्ताक पुनर्रचनेच्याही ते विरूद्ध आहेत. "

(भारतीय स्त्रीधर्माचा आदर्श-प्राज्ञ पाठशाळा - १९६७, अनु. कमल पाध्ये, पृष्ठ. ६२)

आपल्या देशातील तत्त्वविचारातील परिवर्तनाचाही या स्वतंत्र दृष्टीने विचार करता येईल. भारतीय धर्माच्या घडीला जुन्या काळात भगवान बुद्धीने, मधल्या काळात, चार्वाकाने आणि आधुनिक युगात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आव्हान उभे केलेले दिसते.

हिंदू समाजाच्या शुद्धीकरणाचे तसे अनेक प्रयत्न झाले. गेल्या शतकात एकेश्वरी समजा, प्रार्थना समाज, ब्राह्मोसमजा, आर्यसमजा, सत्यशोधक धर्म वगैरे. पण तरी येथली पारंपरिक विचारधारा घट्टपणे मूळ धरूनच असल्याचे दिसते.

भ. गौतमबुद्धाचे अवतारात आणि नऊव्या अवतारात, नामकरण करून, त्यांच्या वेगळेपणाला दुय्यम ठरविण्याचा खेळ ब्राह्मणग्रंथांनी केला. तरी बरे, हिंदू अवतारात असून कोठल्याही हिंदूची बौद्धमंदिरे किंवा रामकृष्णशंकराच्या जोडीला, बुद्धप्रतिमा ठेवल्या नाहीत. मग ही वैचारिक दडशाहीच असल्याचे स्पष्ट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर मुक्कामी पूर्वप्रतिज्ञेप्रमाणे हिंदुधर्माचा त्याग केला. त्यांनी बुद्धधर्म स्वीकाराची प्रत्यक्ष कृती जेव्हा केली, तेव्हा सबंध देशभर आणि प्रामुख्याने महाराष्ट्रात, अतिशय जहाल प्रतिक्रिया वृत्तपत्रातून आल्या होत्या. परंपराभिमानी सनातनी विद्वान आणि पोटार्थी संपादकांची, टाळकीच कामातून गेल्याचा स्पष्ट पुरावा देणारे, हे लेखन होते. स्पष्टोक्ताची आणि वस्तुनिष्ठ मूल्यमापनाचा आव आणत, अनेकांनी शापवाणी आणि तळतळाट केला होता. त्यातच ' चार्वाकासारख्यांनी हिंदु धर्माच्या तटाला व सुरक्षिततेला खिंडार पाडण्याची, केविलवाणी अयशस्वी धडपड केली होती. पण मूळच्या महान वस्तुची तो हानी करू शकला नाही. मग डॉ. आंबेडकरांचे हे वागणे तर - ' अशा आशयाचे स्थूपसे काही, विशेषांकातून आणि पुरवणीतून प्रसिद्ध झाले होते.

बाबासाहेबांचा सनातन्यांच्या मते गुन्हा हाच होता की त्यांनी महान चूक केली होती. आपल्या समाजाची समकालीन अनव्यस्थेतून आणि गुलामी मनोवृत्तीतून सुटका व्हावी. तो ऐहिकाच्या उपभोगाचाही समान असा वाटेकरून बनावा. त्यामुळे बाबासाहेब हाच आधुनिक चार्वाक ठरविण्याचा त्यांनी चंग बांधला होता.

वर्णाश्रम धर्म अबाधित राहण्यात दर्शनकारांना आणि स्मृतिकारांना स्वारस्य होते. कारण ही व्यवस्था बदलली, तर स्वास्थ धोक्यात आले असते. म्हणून धर्म तत्त्वज्ञानापासून तो त्याकाळातील काव्यनाटकांच्या आविष्कारातही त्यांची ही भीती

प्रकट झालेली आढळते. आणि जणू काही भौतिक समृद्धी अवर्णानाही लाभली तर त्यामुळे अध्यात्म आटोपनूच जाणार ह्या चुकीच्या गृहितकातून त्यांनी चर्वाकाला पाखंडी आणि भोगवादी ठरवले होते. चार्वाकाच्या 'लोकायत' तत्त्वज्ञानाबद्दल, म्हणूनच भाष्यकारांनी जेवढा अपसमज करून देता येईल, तेवढा करून दिला आहे. पण आता ज्ञानाच्या पातळीवर चार्वाकाचे लोकायतदर्शन किती भक्कम पुराव्यावर ठामपणे उभारले आहे, हे कळायची सोय झाली आहे. म्हणूनच एक आधुनिक अभ्यासक प्रा. आठवले लिहितात -

"ज्ञानाच्या इतिहासात, तर्कशास्त्राच्या विकासात चार्वाकीय प्रमाण विद्येची महती जाणली पाहिजे. वेद प्रमाण, आपावाक्य प्रमाण, तीर्थंकर प्रमाण, असले भ्रामक तत्त्वज्ञान धुडकावून लावून, त्यांनी प्रस्वर बुद्धिनिष्ठा प्रतिपादिली..... ह्यूमपासून रसेलपर्यंतचा आधुनिक पाश्चिमात्य विचार चार्वाकांच्या पुढे गेलेला नाही, कदाचित आणखी पुढे जाणेचे शक्य नसेल. मात्र आजचे प्रगत तर्कशास्त्र अगदी बरोबर चार्वाकांची भूमिका घेऊनच खडे आहे."

(चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान-प्राज्ञपाठशाळा १९५८, - सदाशिव आठवले, पृष्ठ ५३-५४)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उपरोक्त सामूहिक कृतीचा, नवा अन्वयार्थ जेव्हा शतकानंतर थंड डोक्याने, जर कुणी समाजपरिवर्तनाचे आंदोलन रेखित करेल, तेव्हाच वरील शापोक्तीतील, विखारांवर उतारा मिळेल. कारण ह्या नव्या शतकात चार्वाकही गंभीरपणे आणि वेगळ्या मूल्यागर्भतेने प्रतिनिवेदिला जातो आहे.

नव्या धर्मस्वीकाराने एका भयग्रस्त समाजाची संपूर्ण मानसिकताच बदलून गेली आहे. आपण हीन आहोत, दलित आहोत, दुबळे लाचार आहोत, हे नकारसूत्र जळून गेले आणि 'आपण वेगळे आहोत, स्वयंप्रज्ञ आहोत.' असा आत्मविश्वास मनामनात उदित झाला. बाबासाहेबांच्या स्वतंत्र, दूरगामी अशा प्रज्ञाशक्तीचा प्रत्यक्षाविष्कार म्हणजे धर्मांतराची कृती होय. पुढल्या पिढीच्या लिखाणात आणि साहित्यात, याचेच सादपडसाद उमटलेले दिसतात. म्हणूनच -

"न्यूनगंडता हा दलितांचा स्थायीभाव होता" अनंत ठेविले तैसेचि राहण्यात जीवनाची कृतार्थता मानणारे, परंतु या न्यूनगंडावरही विजय मिळविण्याचे अजोड काम डॉ, बाबासाहेब आंबेडकरांनीच केले."

(उच्छ्वास : युगंधराचे १९८२ प्रस्तावना व संपादन - ज. वि. पवार. प्रस्तावना पृष्ठ १५ असे पँथर संस्थापक ज. वि. पवार नेमकेपणाने नोंदताना आढळतात,

डॉ. बाबासाहेबांचे बहुसंख्य लेखन हे इंग्रजीतूनच झाले आहे. पण त्यांच्या 'बहिष्कृत भारत' मध्ये त्यांच्यातील लढाऊ बाण्याचा, स्वतंत्र मर्दानी पत्रकारही आढळतो. 'राखीव जागा' असा नुसता शब्द उच्चारला की, विनास्पर्धा सुखनैव मलिदा खाणाऱ्या, तथाकथित विचारवंतांची सर्वत्र कोल्हेकुई सुरू होते. सतत समानतेचा आणि मूलगामी तत्त्वांचा, निःस्पृहपणे पुरस्कार करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर,

त्यांचा 'आप घरी बाटा बाप घरीही बाटा' अशा तिर्कस शीर्षकाच्या अग्रलेखात लिहितात-

"दोन माणसे सारखे सुदृढ असतील तर एकाला मलिदा तर दुसऱ्याला कोंडा देणे केव्हाच रास्त होणार नाही. पण एक रोगी व दुसरा निरोगी असला तर निरोग्याला कोंडा व रोग्याला मलिदा हीच व्यवस्था प्रशस्त ठरेल." (बहिष्कृत भारत - शुक्रवार दि. १५ जुलै, १९२७) आणि ह्याच अंकात, त्यांनी उपलब्ध शिक्षणविषयक अधिकृत आकडे, सादर केले आहेत. हे १९२६ चे आकडे आहेत. कोण्या जाती धर्म वर्णाच्या वाट्याला काय प्रमाण पडते किंवा आहे, हे समजून घेण्याच्या दृष्टीने व उच्चवर्णियांना हाताशी धरून शिक्षणविषयक धोरण राबवणाऱ्या इंग्रजी राज्यकर्त्यांच्या वृत्तीचाही परिचय होण्याच्या दृष्टीने हे आकडे फार बोलके आहेत.

	ब्राह्मण व तत्सम	मुसलमान	मराठा व तत्सम	अस्पृश्य
प्राथमिक शिक्षण	११९	९२	३८	१८
माध्यमिक शिक्षण दुय्यम	३०००	५००	१४०	१४
उच्चशिक्षण	१०००	५२	१४	०

प्राथमिक शिक्षणाकडून उच्चशिक्षणाकडे आणि अलीकडे तंत्रशिक्षणांकडे जाताना होणारी गळती (Drop out) किती वस्तुनिष्ठतेने दिली आहे हे पाहण्यासारखे आहे. मला तर नव्या सरकारला (ते राहिले तर नाहीतरी पुढे यणाऱ्या) एक जाहीर आवाहन करावेसे वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीचे आणि म. फुले यांच्या स्मृतीशताब्दीचे वर्ष साजरे करताना पासष्ट वर्षांनी, म्हणजे १९९१ साली वरील कोष्टकाप्रमाणे आकडे अवश्य प्रसिद्ध करावेत. ते प्रत्यक्षातले आणि वास्तवावर आधारलेले मात्र असावेत. म्हणजे लोकशाहीत जळवेचे शोषणकर्म करणारी विशिष्ट मक्तेदारांची नोकरशाही किती बनेल व खोटारडी आहे हे स्पष्टपणे कळून तरी येईल. अर्थात असे काम करायला व छाननी करून, धैर्याने आकडे समाने आणायला बाबासाहेबांसारखा समूहचिंती हितसाधक पत्रकारंच असयाला हवा. मालकाच्या धोरणाबरहुकूम लेखणी चालवणाऱ्या मतलबी माणसांचे हें काम नव्हेच.

भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार करतानाही त्यांनी छोट्या राज्यांची तरफदारी केली होती. प्रादेशिक गरिमा न दुखावता तो नको तितका जागृत न होऊ देता, कसे मार्ग काढणे शक्य आहे, याचेही त्यांनी मार्गदर्शन केले आहे. इतकेच नव्हे तर, 'प्रादेशिक भाषा राज्याची दफ्तरी भाषा होऊ नये. हा प्रयोग कुणी करणार नाही, याचीही तरतूद करण्याचा इशारा त्यांनी दिला होता.

घटनेतील ११५ व्या कलमात राष्ट्रभाषेचे विवरण व धोरण आले आहे. 'कर्तव्यबुद्धीने हिंदीलाच राष्ट्रभाषेचा मान दिला पाहिजे.' असे त्यांचे निवेदन आहे, दुसरे एक विचारवंत सरदार के. एम. पणिक्कर यांनी हिंदीमुळे व तिच्या दर्जामुळे,

'उत्तरप्रदेश इतर राज्याहून प्रबळ ठरेल.' असा प्रतिवादही मांडला होता. बाबासोहबांची भूमिका मोकळी होती. पणिक्करांच्या भीतीची त्यांनाही कल्पना होती. याचीच परिणती आता दक्षिणी राज्यांनी हिंदीचा रागराग करण्यात आणि अस्मितेच्या नावाखाली अंतर्मुख करणाऱ्या घोषणा करण्यात, आणि धोरणे आखण्यात झाल्याचे आपण सध्या अनुभवतोच आहोत. आपल्यावर काही लादले जाते, त्यात काही हेतू आणि अनोखा मतलब आहे असा समज झाला की, प्रतिक्रियांची तीव्र लाट फुटणे हा जनस्वभावच असतो.

इतकेच नव्हे तर सगळा राज्यकारभार, केवळ दिल्ली शहरातून न करता, मध्यवर्ती असणाऱ्या हैद्राबादला उपराजधानी मानून, तेथूनही कागदपत्रे हलवावीत, असे स्वतंत्र, धाडशी पण सुयोग्य बदलही बाबासाहेबांनी सुचविलेले दिसतात. कारण प्रत्येक वेळी जर 'दिल्ली बहुत दूर है !' असेच होत गेले, तर असंतोष बळावून फुटीरतेकडे मन लालचावण्याची शक्यता असते.

ज्या ज्या वेळेला ज्या ज्या घटना घडल्या, त्याबाबत निश्चितपणे मतनोंदणी करण्याचे वेगळेपण, डॉ. आंबेडकरांच्या स्वभावाचा भागच होता. ब्रॅ. जिना असोत, म. गांधी असतो, काँग्रेसची ध्येयधोरणे आणि वाटचाल असो, यावर आपले चिंतनभाष्य स्वतंत्र पद्धतीने करण्याचीच, बाबासाहेबांची प्रवृत्ती होती. रुपयाच्या जागतिक स्थानाचा प्रश्न आला की, 'प्रोब्लेम ऑफ रूपी' चा जन्म होतो. तिबेट, लडाख, नेपाळ, सिलोन, पूर्व पाकिस्तान (आजचा बांगला देश), ब्रह्मदेश, रशिया, अमेरिका, चीन इत्यादी अनेक देशांबद्दल, त्यांच्या धोरणांबद्दल, सीमारेषांबद्दल आक्रमकतेबद्दल, जुनाट जातींच्या (नागा, गारो, संताळ वगैरे) अवस्था आणि प्रश्नांबद्दल, जागरूकतेने पण तर्कशुद्ध रीतीने राज्यशास्त्र, इतिहास, धर्म आणि समाजशास्त्राच्या, अर्थकारणाच्या प्रभावांबद्दल, डॉ, बाबासाहेब आंबेडकरांनी, अत्यंत मूलभूत समस्यांची, मांडणी केली आहे. त्यांचे कित्येक शब्द व ठोकताळे, त्यांच्या दूरदृष्टीच्या, राजकीय परिपक्वतेची ग्वाही देतात.

म्हणूनच जेव्हा केव्हा, एखादा गंभीर पण जुनाच पेच उभा राहतो, देशाच्या राष्ट्रत्वाची, धर्माच्या नेमकीपणाची, तत्त्वज्ञानातील प्रत्यक्षानुभवांची, व्यवहारातील विसंगतींची, इतिहासातील पायफसणीची, संस्कृतीच्या पिछेहाटीची आणि मानवतेच्या हतबल होण्याची कसोटी लागते; त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यातील चिंतनशील स्वतंत्रविचार साह्याला धावून येतो. घटनेच्या जपणुकीचे आणि देशाच्या मोठेपणाचे भान असणारांनी बाबासाहेबांचे हे स्वतंत्र विचार स्फुल्लिंग जोपासले पाहिजेत. कारण भयाच्या अंधारयुगात अशी जळती जळजळती ठिणगीच मोलाची असते.



७. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मचिंतनाविषयी

ह्या नव्या वर्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनेकविध विचारांचे व्यापक प्रामाणात मंथन सुरू झाले आहे. मला स्वतःला हे सुचिन्ह वाटते. कारण आपल्या समाजात जयंती, पुण्यतिथी, शताब्दी यासारख्या गोष्टींची, उत्सवी घाई जेवढ्या प्रमाणात केली जाते, तितकीच अंतर्मुख आचरण करण्याबाबत कुचराईही घडते.

सतत अद्वैताचा, जीवाशिवाच्या आणि नर नारायणाच्या ऐक्याचा पुकारा करणारा समाज, प्रत्यक्षात मात्र द्वैती आणि दुटप्पी रीतीने जगतो. त्यामुळे प्रत्यक्षजीवनाला विलक्षण गती असली, तरी धर्मजीवन साकळलेलेच राहते. लोकमानसांवर नव्या विचारातले शब्द तेवढे आदळतात, त्यांचा आघात मात्र होतच नाही.

धर्मसंस्कृतीच्या रक्षणाची भाषा, म्हणूनच नव्या विचारांच्या परिवर्तनाच्या विरोधाची भाषा बनते. अशा अवस्थेत डॉ. आंबेडकरांसारखी विचारी व्यक्ती धर्मांतराला सिद्ध झाली, ह्या घटनेतला नेमका अर्थ समजून न घेता, गदारोळ उठणे; हेच या ठिकाणी सुसंगत मानावे लागेल.

पंचवीस वर्षांच्या विचारमंथनानंतर आणि सातत्यपूर्ण प्रयत्नवादी संघर्षानंतर, बाबासाहेबांनी हिंदू धर्माचा त्याग केला होता. त्यांच्या ह्या कृतीने, धर्म, संस्कृती आणि समाजाचे सर्वस्तरांना स्पर्श करणारे, असे सांस्कृतिक जीवन; यांचाच पुनर्विचार करण्याची गरज निर्माण झाली होती. मानवी जीवनाला पूर्णत्व देणाऱ्या धर्म आणि संस्कृती या घटकांकडून असणाऱ्या, किमान अपेक्षांचाही दारुण मनोभंग होण्याचा, हा परिपाक होता. सुखाची शाश्वती ही केवळ मनाची आणि मनापुरतीच मर्यादित गोष्ट नसते, तर ती शारीरिक अनुभवावस्थाही असते. ह्या अनुभवाला आत्मसन्मानाची सामाजिक जोड मिळावी लागते. याचीच चढत्यावाढत्या श्रेणीने, हिंदू विचारा-आचारांत गंभीर उणीव आढळल्याने, धर्मांतर ही अपरिहार्य बाब बनली.

आमच्या देशातील विद्वानांनी सोयीचे आणि चतुराईचे शब्द, ग्रंथाग्रंथात शिंपडून माणसांचा बट्ट्याबोळ केला आहे. डॉ. इरावती कर्वे यांच्या, 'मराठी लोकांची संस्कृती' या ग्रंथाच्या उदाहरणाने हे स्पष्ट करता येईल. ह्या ग्रंथाची दुसरी आवृत्ती १९६२ साली आली. पहिल्या आवृत्तीनंतर अकरा वर्षांचा काळ लोटला होता. समाजमूल्यांच्या बाबतीत, इरावती कर्वे यांनी, जे निष्कर्ष नोंदवले होते, ते ढापणी लागलेले होते. प्रत्यक्ष धर्मांतर झाल्यावर, संपूर्ण समाजजीवन ढवळून निघाल्यावर त्यांनी, हयातीतही ब्र काढला नव्हता. कारण त्यांची पारंपरिक ब्राह्मणी पुस्तकी मनोवृत्ती. 'सिंहगर्जने'च्या

१९७८ च्या दिवाळी अंकात (समावेश माझ्याच, 'बहुमुखी' यात, पृष्ठ १०१ ते १०८) यावर मी विस्ताराने लिहिलेले आहेच.

या लेखाचा उद्देश खंडणमंडणपद्धतीचा नसून धर्म आणि धर्मांतराच्या प्रवर्तनाला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सरसावलेत, त्यांची सामाजिकता ध्यानात घेण्याचा व मांडण्याचा प्रयत्न करणे हा आहे.

धर्म ही मानवी मनाच्या विकसनाला आवश्यक अशी, मानवनिर्मित समूहकृतींतून विकसित होणारी गोष्ट आहे. असे असूनही एखादा समाज, काही विशिष्ट तऱ्हेच्या चकव्यात किंवा भोवऱ्यातच, अडकलेला असल्याचे का दिसत असावे? अशा कोणत्या घटकांमुळे, हा वर्तनाचा भ्रमभोवरा निर्माण होतो?

ह्याचा शोध धर्माच्या दृश्य प्रत्यक्षानुकरणाद्वारे घेता येईल. मानवाचे एकदुसऱ्यांशी चाललेले व्यवहार, परस्पर प्रेम, साहचर्य, सहिष्णुता, प्रार्थना, पूजा गीत-संगीत-नृत्य इत्यादी घटकांतून, धर्मभाव व्यक्त होत असतो.

यातूनच काही विवक्षित गोष्टींचा जन्म होतो. प्रार्थना म्हणतानाचे वातावरण, ते निःशब्द असावे, की वाद्यघोषात सुमंगल व्हावे? ते ठरते. त्यांचे युक्तायुक्तत्व नक्की होत जाते. आणि मग तसे नसणाऱ्या घटकाला, त्याज्य किंवा विरोधी मानले जाऊन, तोच मुद्दा, वादविवादाला कारणीभूत ठरतो. ह्या किंवा अशा प्रकारच्या कर्मकांडामुळे, धर्माची प्रवाहिता बाधित होत जाते. हे जमणारे ते शास्त्रमान्य आणि बाकीचे दुय्यम, अशी उच्चनीचता जन्मास येते. प्रत्येक अडचणीच्या घटकाला धर्माचे व शास्त्राचे, नाव पुढे करण्यात येऊ लागते. जेव्हा प्रत्येक योग्य प्रश्नाला तर्कशुद्ध उत्तर नाकारले जाऊ लागले, तेथेच तो घटक, आपल्यासाठी आपला नव्हे, असे नकारसूत्र घट्ट होत गेले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपल्यासाठी व आपल्या समाजबांधवांसाठी,जो धर्म हवा होता, त्याबद्दलच्या अपेक्षा विद्यमान हिंदु धर्माकडून, पूर्ण होत नाहीत आणि कधीही होणार नाहीत; हे त्यांना कळून चुकले होते. धर्म म्हणजे नुसते शब्दांचे जाळे नसते. नुसता तत्त्वज्ञानाचा खेळ नसतो. तर कर्मकांडांच्या अनंत झिरप्यातून, त्याला मान्यता देणाऱ्यांच्या श्वासारक्तातच तो एकरूप झालेला असतो. मानवी मनाचा पिढ्यानुपिढ्या व्यापलेला गाभा म्हणजे धर्म. सर्वच, 'धर्म चांगले असतात' असे म्हणणारे; धर्मगतीकडे दुर्लक्ष करतात, असेच म्हणावे लागेल. कारण प्रत्येकच धर्मात, त्यांच्या तत्त्वांत आणि अनुयायात आत्मसंरक्षणाची, एवढी तीव्र इच्छा असते की, कधीही युद्धोन्मुख, रक्तपिपासू आणि हिंसेसाठी ते तत्पर दिसतात. धर्मसूत्रांचा हाच व्यावहारिक अर्थ, त्यांनी सोयीसाठी हिरीरीने स्वीकारलेला असतो.

धर्मशास्त्राच्या वस्तुनिष्ठ अभ्यास हेच ज्यांचे ब्रीद आहे, त्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'अस्मिता महाराष्ट्राची' या संकलनग्रंथातील लेखात, हेच परखडपणे सांगितले आहे. ते स्पष्टपणे लिहितात की, - 'धर्मसंस्थाच्या गाभ्यामध्ये बुद्धिवादाचा प्रकाश टाकून एकमेकाहून भिन्न असलेल्या, स्पर्धाशील असलेल्या, आणि

प्रसंगी युद्धमान होणाऱ्या विविध धर्मनिष्ठ समाज-संस्थांमध्ये, म्हणजेच हिंदूसमाज, ख्रिश्चन समाज व मुसलमान समाज इत्यादी समाजसंस्थांमध्ये परिवर्तन केल्याशिवाय,मानवी समाजामधील अनिष्ट विग्रह संपणार नाही व मानवी समतेकडे जगाचा प्रवास होणार नाही, हे राजाराम मोहन रॉय यांच्या ध्यानात आले."

त्या काळात परिवर्तनाचे प्रयत्न, प्रामुख्याने हिंदुधर्मविचारां-आचारांच्या बाबतीत झाले. एकेश्वरी पंथ, ब्राह्मोसमाज, प्रार्थना समाज, सार्वजनिक सत्यधर्म, आर्यसमाज किंवा आरंभीची ' परमहंस सभा ' या प्रयत्नांचा याच दृष्टीने विचार करता येईल. पण परिवर्तन म्हणजे परंपरेशी शत्रुत्व, हेच गृहितक सनातन्यांनी स्वीकारल्यामुळे, मत आणि मन परिवर्तन दुरापास्त आणि दुस्तर बनत गेले. म. गांधीजीही ह्या चक्रापत्तीतून सुटू शकले नाहीत. ' दलितत्त्व किंवा , जातीभेद हा हिंदू समाजावरील कलंक आहे ', असेही ते म्हणत. आणि ' लोकांचे मनपरिवर्तन केल्यानेच जाती दूर होतील ' असेही तेंच सांगत. इतकेच नव्हे तर ' हिंदु धर्मरचना अलौकिक आहे म्हणूनच ती टिकून आहे ' असाही प्रतिवाद, ते सतत करताना आढळतात. लोकशाहीतील ' समान 'तेच्या तत्त्वाला हे विसंगत आहे हे पटत असूनही, त्याबद्दल बोलायला आणि कृती करायला, बाबासाहेब आंबेडकरांशिवाय, कोणीही ठामपणे आणि निश्चयाने धजावला नाही. कारण जातिभेदांच्या अपमानांचे आणि मानहानीचे व नुकसानीचे प्रत्यक्ष अनुभव, फक्त बाबासाहेब आंबेडकर यांनाच होते. म. गांधी, श्री. म. माटे, स्वातंत्र्यवीर सावरकर किंवा आधीचे, विठ्ठल रामजी-महर्षी शिंदे यांनाही ते नव्हते.

' धर्म ही अफूची गोळी आहे ' असे म्हणणाऱ्या साम्यवादी विचारांकडे व विचारवंताकडे दुर्लक्ष केल्याने, आपला अहंकार सुखावत असेलही कदाचित. पण धर्माचे कार्य आणि मानवी संस्कृती यांच्या नात्यांचा खरा-खुरा इतिहास, लिहिला जाणे खरोखरच गरजेचे आहे. कोणत्याही संबंधाचा स्पर्श न होऊ देता, कुठलेही दडपण न येऊ देता, कोण्याही झुंडीची, पुंडांची, गुंडांची आणि लोकांना चिथविणाऱ्या मतलबी घटकांची पर्वा न करता, हे लेखन व्हायला हवे आहे. परंपरेचा आणि धर्माचा इतिहास, फारसा रोमांचक आणि सुखद असा नाही. त्यामुळेच, हे ' धर्मचिंतन ' अवश्य घडायला पाहिजे.

" भारताच्याच नव्हे तर सर्व जगाच्या इतिहासात आपण ज्याला मानव संस्कृतीचा काळ म्हणतो, त्या गेल्या पाच हजार वर्षात, धर्मनि केलेले कार्य फारसे स्पृहणीय नाही." (धर्मचिंतन - दि. के. बेडेकर, पृष्ठ ६०-६१) हे विधान, कितीही कडवट आणि झोंबरे वाटले, तरीं ते सत्य आहे. मध्ययुगीन श्रद्धा घेऊन, विज्ञानयुगाची चढण चढू पाहणाऱ्या समाजाला, असा खरा असलेलाही विचार, पटवून देणे, हाच नवा चमत्कारयोग म्हणावा लागेल. इतकी अवस्था निराशाजनक आहे.

दलितांना आणि पूर्वास्पृश्यांना जी वागणूक या देशात सातत्याने दिली गेली त्या पार्श्वभूमीवर बाबासाहेबांची धर्मांतराची कृती, पडताळून पाहायला हवी आहे.

आपल्या धर्मसंस्थांचे सध्याचे जे कार्य चालले आहे. त्याकडेही नेमकेपणाने पाहिले पाहिजे. कारण तो तो धर्म आपलाच, असे म्हणविणारे आणि त्या त्या धर्मरक्षकांची फळी किंवा तट उभारून; शुद्धाशुद्धतेच्या आणि संस्कृती रक्षणाच्या गोष्टी करणारे, जो दडपणाचा खेळ करतात, तो भयावह आहे. वेगवेगळ्या पक्षाचे नाव घेत; अजूनही दलितांना, बुद्धांना जी वागणूक येथे दिली जाते, ती अमानुष आहे. दुसऱ्या टोकाला सहानुभूतीचे गाजर बांधले जाते. राजकीय हिशेबांनी पत्ते पिसले जातात. सरकारी फक्त सरकारीच, खाजगी मुळीच नव्हेत, नोकऱ्यात प्रत्यक्षात सवर्ण अधिकाऱ्यांनी मिळू-मिळूच न दिलेल्या नोकऱ्यांच्या टक्केवारीबद्दल सामंतवादी-जमीनदार, सवर्ण उत्तरेत, जो द्वेषाग्नी उफाळलेला आहे, तो बोलका आणि पुरेसा आहे. प्रत्येक धर्म पाळणारी माणसे, ह्यापुढे आक्रमण आणि झुंडीचेच राजकारण करतील, असेच वातावरण देशभर निर्माण होत आहे. लोकशाहीवादी म्हणविणाऱ्या देशाच्या अस्तित्वाला हे हानिकारक आहे यात शंका नाही. घटनेचे महत्त्व व माहात्म्य यावेळी तरी पटावे.

डॉ. बाबासाहेबांनी केलेली घटनेतील तरतूद आणि धर्मांतराची कृती, नव्याने तपासून पाहायला हरकत नसावी. आपल्या घटनेच्या पंचवीसाच्या आणि सव्वीसाव्या कलमात धर्मस्वातंत्र्याचा मूलभूत हक्क प्रदान केला गेला आहे. ह्यामध्ये आपल्या धर्माबद्दल श्रद्धा बाळगणे, धर्माचार पाळणे आणि आपल्याला पटणाऱ्या धर्ममतांचा लोकशाही पद्धतीने प्रसार करणे, हे हक्कही अनुस्यूत आहेत.

ह्याचाच अर्थ स्पष्ट असा, व्यक्तीला सक्तीच्या धर्मांतरापासून संरक्षण मिळावे किंवा त्याला जर स्वेच्छेने नवी धर्ममते व धर्म स्वीकारायचा असेल, तर त्यास जो कोणी प्रतिबंध करील, त्यापासून त्याचे रक्षण व्हावे. त्यास पटलेली मते आचरणात आणण्यास, त्याला अभय मिळावे, अशी ह्या तरतुदींची फोड करता येईल.

देशाचे नाव, 'भारत' झाल्यानंतरही ज्यांना हा केवळ 'हिंदुस्थानच' आहे आणि राहावा, असे वाटते, ते हिंदुखेरीज अन्य सगळ्यांचा राग राग करतात आणि बाबासाहेबांच्या प्रणालीने बुद्धधर्मस्वीकार केलेल्यांना शत्रूवत लेखतात. कारण त्यांनी लाचारी, अंधःश्रद्धा, विषमता सोडून, स्वाभिमानाचा नवा रस्ता चोखाळलेला आहे. त्यांचा दोष एवढाच की, ते महात्माजीप्रणीत 'हरिजन' उरले नाहीत. पायरीवर तिष्ठणारे उरले नाहीत. मेलेली ढोरे ओढणारे, उष्ट्यांसाठी पिढ्यानपिढ्या बर्बाद करणारेच न राहता, हक्कांची न्याय्य भाषा बोलू लागले आहेत.

धर्मांतर पेट्रो डॉलरने झाले नाही. कारण की, तो मिळवण्यासाठी सवर्ण कुटुंबातल्या पोरापोरींच्या फौजा परदेशात लाखाने स्थायिक होत आहेत. ऐहिक वैभवाचे अतीव आकर्षण; इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि आखाती देशात डॉक्टर्स, इंजिनिअर्स तंत्रज्ञ आणि कुशल कारागिर यांचे ताफे वाढताहेत. आपल्या कृतीला तत्त्वांचा मुलामा देताहेत. मग जनावरांहून वाईट ज्यांना वागवले गेले, त्यांनी नर्कात सडण्यापेक्षा मनःपूत धर्म स्वीकारला, हे त्यांनी उचितच तर केले. मध्ययुगाची वैभवस्वप्ने

पाहणाऱ्यांना, अश्मयुगीन मनांच्या व्यक्तींना म्हणूनच 'परधर्म भयावहः' वाटतो. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतरावर प्रचंड वादळ उठले होते, हे याच कारणपरंपरेमुळे.

धर्म ही गोष्ट मानवाच्या सांस्कृतिक, स्वाभाविक विकासक्रमातील महत्वाची अशी अमूर्त उपलब्धी आहे. धर्मभावनेचे सामर्थ्य प्रचंड असते. समूहमनाचे केंद्र आपल्या ताब्यात घेण्याची आणि ठेवण्याची धर्माची ताकद असते. नवनव्या पिढीला तो परंपरेच्या गाळीव पाण्याने, आकृष्ट करीत असल्याने, धर्मप्रभाव नेहमी चढतावाढताच राहिलेला आढळतो. आणि 'काट्याने काटा' काढावा तसेच धर्मांतराच्या घटनेत दोषार्ह असलेल्या धर्माच्या त्यागाने, जी पोकळी निर्माण होते, ती लगेच भरून काढण्यासाठी, स्वीकृत नवधर्माची योजना करावी लागते.

जगाच्या सध्याच्या अनेक घटनांमधूनही धर्माची हीच शक्ती, आविष्कृत होते. रशियन राज्यक्रांतीनंतर निर्माण केल्या गेलेल्या साम्यवादी रशियात धर्म गौण आणि दुय्यम ठरवला होता. चीनच्या प्रचंड विस्तारातही, धर्माला मागची जागा दिली गेली आहे. पण आताच्या 'पेरेस्त्राईका' चळवळींमुळे आणि बदललेल्या संमीलित देशांच्या कृतींमुळे, रशियात सक्तीने दडपलेला धर्म कसा उफाळून पुनर्प्रस्थापित झाला? ते अत्यंत बोलके आहे. तिबेटच्या बौद्ध-दलाई लामाच्या प्रदेशात, आणखी किती काळ चीनची अखंड प्रभुसत्ता आव्हानातीत राहील? याचे उत्तर भविष्यकाळच देऊ शकेल. म्हणूनच बाबासाहेबांसारख्या दूरदृष्टीच्या नेत्याने आपल्या अनुयायांना, धर्मशून्य साम्यवादी विचारांची बाधा होऊ दिली नाही. आणि त्यांच्या मनाला भावणारा, सर्व अपेक्षांची पूर्ती करणारा भारतीय भूमीतला अनात्मवादी, तर्कसुसंगत आणि ऐहिक भावपूर्ती करणारा बुद्धधर्म स्वीकारवला व त्याबद्दलची भूमिकाही, त्यांच्या ग्रंथात विशद केली. 'भ. बुद्ध आणि त्यांचा धर्म' या ग्रंथाच्या परिचयात ते म्हणतात -

'भगवान बुद्धांनी परिव्रज्या का ग्रहण केली ?' या प्रश्नाचे पारंपरिक स्पष्टीकरण मान्य करणे अशक्य आहे. दुसरा प्रश्न चार आर्य-सत्यांनी निर्माण केला आहे. बुद्धाच्या मूळ शिकवणीत त्यांचा अंतर्भाव होतो काय?.... ही चार आर्यसत्ये, बुद्धाच्या आचार तत्त्वांना निराशावादी ठरवतात..... तिसरा प्रश्न आत्मा, कर्म आणि पुर्नजन्म, या तत्त्वांबद्दलचा आहे. जर आत्मा नाही तर कर्म कसे असू शकेल ? जर आत्मा नाही, तर पुनर्जन्म कसा असू शकेल?... ही विसंगती उकलण्याची आवश्यकता आहे. चौथा प्रश्न भिख्खूसंबंधींचा आहे. भिख्खू जर समाजसेवक असला, तर बौद्धधर्मास तो आशाजनक होऊ शकेल. ह्या प्रश्नाचा निर्णय तात्त्विक सुसंगतीच्या हितापेक्षा, बौद्धधर्माच्या भवितव्याच्या हितांच्या दृष्टीने केला पाहिजे."

डॉ. आंबेडकरांचा धर्मनिर्णय त्यांना पडणाऱ्या प्रश्नांच्या व जिज्ञासेच्या संदर्भात लक्षात घेणे, म्हणूनच अगत्याचे आहे.

बुद्धधम्माचा स्वीकार त्यांनी सूडबुद्धीने किंवा धडा शिकविण्याच्या भूमिकेने

अथवा देशाच्या सहज विकसनात, काही विक्षेप यावेत अशा दृष्टीने केलेला नाही. दोन दशकांपेक्षा अधिक काळ याविषयांकडे, ते मूल्यात्मक नजरेतून पाहात होते. मुंबई मुक्कामी सुरू केलेल्या महाविद्यालयाला सिद्धार्थ कॉलेज, त्यासाठी प्राप्त केलेल्या इमारतींना 'बुद्धभवन' आणि 'आनंदभवन' ह्या संज्ञा देताना, किंवा पुढे औरंगाबादेला, 'नागसेव वन', 'मिलिंद महाविद्यालय' अशी नावे देताना त्यांच्या मनात, निश्चित काहीतरी चालले होतेच, याचे प्रत्यंतर मिळते.

समाजोपयोगी कामांच्या व्यापातही बाबासाहेब यांच्या मनात बुद्धधर्माच्या संकल्पना आणि संज्ञा, कशा मुरत होत्या; त्याचा अंदाज या शीर्षकांचा डोळस विचार केल्यास पटेल.

त्यामुळेच भिख्खूंबद्दल त्यांच्या खास अपेक्षा होत्या. नुसते पूर्वधर्मामध्ये, जमतील तेवढी संस्कृत मंत्रे पुटपुटणाऱ्या भटजी-उपाध्यायांच्या शब्दांची निरर्थक पुनरुक्ती होत होती, त्याऐवजी पाली-प्राकृत त्याही सद्यःकाली, तितक्याच दुर्बोध आहेत, त्यांना प्रणाम करण्यात काही सुजाण परिवर्तन आहे, असे बाबासाहेबांना कधीच वाटत नव्हते. म्हणूनच भिख्खू व्यक्तिगत जीवनात पूर्णपुरुष नसला तरी समाजसेवक असावा, अशीच त्यांची मनोमन इच्छा होती.

पण निसर्गाचा फटका हा कित्येक इप्तिसांना उलटसुलट करतो. धर्मपरिवर्तनाच्या घटनेने महाराष्ट्र ढवळून निघाला होता. अनेक तल्लख बुद्धीचे पण दलितांच्या या नव्या धर्मजीवनाचे छुपे विरोधक, सैल जिभांनी अनेकानेक प्रतिक्रिया सातत्याने प्रकट करीत होते. परंपरेच्या आणि धर्माच्या रक्षणाचा गंभीर प्रश्न, त्यांच्या प्रतिक्रियांनी सुटणार होता. पैसेवाल्यांच्याच मालकीच्या असणाऱ्या पांढरपेशा वृत्तपत्रांनी, त्यांना पुरेपूर प्रसिद्धी दिली होती. महाराष्ट्रभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित धर्मांतरित समाज विरुद्ध उर्वरित सर्वस्तरीय महाराष्ट्र आणि देश-विदेश, असे एक विचित्र त्याकाळात अस्तित्वात आले होते.

आणि ऑक्टोबर ते डिसेंबर म्हणजे १४ ऑक्टोबर ते ६ डिसेंबर १९५६ या अडीच-तीन महिन्यांत सगळे बेत विस्कटून गेलेत. काळाचे बावन्न पत्ते इतक्या वेगाने पिसले गेले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणाचीच कटु वार्ता पसरली. धर्मांतराच्या महान दिवसापासून, फक्त बावन्न दिवसांनी बाबासाहेब गेलेत. खूप दिवसांचे त्यांचे स्वप्न धर्मांतराने पूर्ण झाले होते. पण नवा धर्म का ? कशासाठी ? त्याने काय काय घडेल ? जन्मदलित, धर्मपीडित आणि शोषित समाजाच्या मनोरचनेत कसा विशेष बदल घडेल ? याचे वास्तव दर्शविणारा द्रष्टा निघून गेला. त्यांच्यानंतर त्यांचे भान असणारा, एकही नेता दलित समाजाला लाभला नाही. तात्कालिक लाभाच्या आणि ऐहिक सुखसाधनांच्या प्राप्तीचे, झटपट तडजोडवादी धोरण, बहुतेकांनी पत्करले. सत्ताधारी पक्षाच्या नाकर्तेपणाला आणि शब्दशूरपणाला दुर्लक्षून, त्यांच्याशीच जमवून लोटांगण घालण्याची वृत्ती बळावली. त्यानंतरच्या संतप्त पिढीने तसाच प्रकार केला.

आणि पँथर म्हणविणारांनाही दुफळीचाच इतिहास भांबावलेल्या सामान्यजनांपुढे ठेवला. काहींनी आपल्या व आपल्या कुटुंबियांच्या, विनाश्रम-विनासायास जगण्याचा अर्थप्राप्तीचा सोपा मार्गही शोधून काढला.

ज्यांच्याकडून समाजाला मार्गदर्शन होण्याची अपेक्षा करायची, असे नेतृत्वच, कधी लटके, अदूरदर्शी आणि मर्यादित शक्तीचे निघाल्याने, सध्याच्या दलित समाजाची अवस्था चिंतनीय आहे.

बुद्धश्रद्धा स्वीकारलेला हा प्रगतीपथावरील समाज हिंदू नाही, द्रविड नाही, पुरता आत्मवादी किंवा अनात्मवादीही नाही. 'धर्म का ? कशासाठी ?' ह्या सनातन प्रश्नांची नेमकी उत्तरे देण्याची स्वरी क्षमता ह्या समूहमनाला प्राप्तच झाली नाही. जेथे प्राथमिक गरजा आणि प्रारंभिक प्रश्नच नीट सुटले नाहीत, तेथे ह्या प्रश्नांची उत्तरे शोधणे कठीणच आहे. डॉ. आंबेडकरांच्या उक्तीने आणि क्रांतिकारक कृतीने बुद्धजीवनसूत्र उमगले. पण बाबांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञापालनात अनेक अडथळे आले. बुद्धधर्माचरण त्यामुळेच कठीण झाले. असे चित्र सर्वत्र पाहायला मिळते आहे. आणि अभावग्रस्त समाज नवनवे घोटाळे करून, हास्यास्पद कसा ठरेल; याचे पद्धतशीर प्रयत्नही जोमाने वाढताहेतच.

समाजाच्या वर्तनाचे निदान करताना संयतशील प्रज्ञापुरुषाची गरज असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तित्वामध्येच ही शक्ती व धमक होती. कोण्याही विषयाकडे ते कधी वरवर पाहात नसत. कोणतीही कृती असंमजस नसे. कोणताही निर्णय तडजोडीच्या वृत्तीचा नसे. कोणताही लढा वरवरचा नसायचा. अनेकानेक विविध विषयांतील विद्यापुरुषांचा त्यांचा व्यासंग आणि चिंतनसहवास होता. इ. स. १९१७ साली प्रसिद्ध झालेल्या, श्री. बर्नाड रसेल यांच्या 'प्रिन्सिपल्स ऑफ सोशल रिकन्स्ट्रक्शन' या ग्रंथाविषयी त्यांनी केलेले भाष्यही, त्यांच्या मनाच्या विचारपद्धतीची साक्ष देते. समाजाची पुनर्रचना करण्याच्या तत्त्वांचा, बाबासाहेबांना सतत ध्यास होता. ह्या कार्याविषयी ज्या ज्या व्यक्तीला रूची आहे, त्यांच्या विचारांचा मागोवा डॉ. आंबेडकर आवर्जून घेत असत. व्यक्ती आणि समाज यांचे संबंध, दलित माणसाला हिंदू समाजाकडून धार्मिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक अशा विविध सांस्कृतिक पातळ्यांवर जी दुजाभावाची अपमानुष वागणूक मिळत आहे, त्यामुळेच त्यांना समाजाच्या पुनर्रचनेची गरज वाटे. ही रचना योग्य समज-निर्णयानेच सिद्ध होईल, असाही त्यांचा विश्वास होता. म्हणूनच रसेलच्या ग्रंथाविषयी ते लिहितात -

"Social reconstruction depends upon the right understanding of the relations of individual to society - a problem which has eluded the grasp of many socialogist." (Dr. Ambedkar : Writings and Speeches - Vol.I Page 492 Maharashtra Govt. Pub.)

धर्म आणि संस्कृती विकसनाच्या प्रकाशरेखा, मानवी मनाचा गाभारा उजळून

काढतात हे बाबासाहेबांना पटले होते. त्यामुळे ब्राह्मणी विद्यांनी आणि निर्बंधांनी शूद्रातिशूद्रांना निकामी केले, व सर्व रचनाच, त्यांना त्यांच्या दुःस्थितीची मूलकारणे कधीकधीच कळू नयेत अशी केल्याचेही त्यांना समजून चुकले होते. समाजाच्या विकसनार्थ सांगितलेल्या स्मृतिग्रंथांतील अशा विषारी आणि दूषित श्लोकशब्दांचा, म्हणूनच त्यांना संताप यायचा. आणि मनूने लिहिलेली 'स्मृति' त्यांना जाळून टाकण्याच्या पात्रतेची वाटली होती. आता नव्या कालौघात तर तो ग्रंथ फारच कालबाह्य आणि इतिहासजमा झाल्याचे कोणाच्याही ध्यानात येईल.

मेरठच्या पंडित तुलसीराम स्वामी यांनी संशोधून संपादित केलेल्या, हिन्दी भाष्य असलेल्या १९१२ च्या तिसऱ्या आवृत्तीचा, मला येथे निर्देश करावासा वाटतो. तुलसीराम स्वामी हे आर्यसमाजी असल्यामुळे, त्यांनी मनूच्या मूळ श्लोकांचे आणि त्यात मिसळलेल्या प्रक्षिप्त श्लोकांचेही चांगले विवरण केले आहे. मनूचा बचाव करता करता, त्यांनी आपले मत नोंदविले आहे. वेदप्रामाण्य स्वीकारून तर्ककठोर प्रणाली मांडणे, हे आर्यसमाजाचे एक वैशिष्ट्यच असते. चौथ्या अध्यायातील क्रमांक ८० चा श्लोक असा आहे -

"न शूद्राय मतिं दद्यान्नोच्छिटं न हविष्कृतम
न चास्योपदिशेद्धर्मं न चास्य वतमादिशेत् ॥ ८० ॥"

"शूद्र को बुद्धि और उच्छिष्ट और हविष्कृत अर्थात होमशेष का भाग न दे। और उसको धर्म उपदेश न करे और व्रत भी न बतावे।" असे अर्थस्पष्टीकरण केल्यानंतर समीक्षा करताना पंडित तुलसीराम आपले मत नोंदविताना लिहितात -

"इसलिये ये ८०।८ श्लोक किसी शूद्र-द्वेषी के मिलाये प्रतीत होते है।" पुढे ते म्हणतात -

"उक्त १॥ श्लोक सब पुस्तकोमे नही है। इससे भी प्रक्षिप्तता संशय होता है।"

(मनुस्मृति भाषानुवाद - चतुर्थाध्याय पृष्ठ १४१ - १४२)

ह्या किंवा अशा कितीही बौद्धिक क्लृप्त्या वापरल्या तरी, शूद्रांना अनेक हक्क आणि स्वाभाविक गोष्टी मिळता नये, असे सांगणारा धर्म, त्याचे धर्मग्रंथ आणि तो महान मानणारा समाज, सोडण्याचे अगत्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना का वाटले, हे सुस्पष्ट व्हावे.

'हिंदुस्थान' या दैनिकाच्या १० जून १९२७ च्या अंकात मुंबईत दहा हजार रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या एका देवळात 'सर्व हिंदूंना मुक्त प्रवेश आहे' असे जाहीर करण्यात आले होते. या देवळाचे नाव 'प्रतिवादी भयंकर मठ' असे होते. पण प्रत्यक्ष डॉ. आंबेडकरांनी जाहिरातीप्रमाणे, मठाधिपतीची भेट घेतली, तेव्हाच गोंधळ झाला होता. ह्या घटनेवरच त्यांच्या 'बहिष्कृत भारत' १ जुलै, १९२७ च्या अंकात,

'दूर राहात असाल तर अस्पृश्यतेचे नाव सांगू नका' असे स्फुट लिहिले आहे. हिंदू महासभेने अस्पृश्य हिंदू धर्मातून फुटू नयेत म्हणून, 'स्वतंत्र देवळांची' कल्पना मांडली होती. श्रीमंत भागोजी कीर यांनी, अशी योजना प्रत्यक्ष अंमलातही आणली होती. पण यामुळे मने, मते आणि समाज सांधण्याऐवजी पृथकपणाच वाढणार हे स्पष्ट होते. म्हणून रत्नागिरीचे 'महार-चांभारांचे' म्हणून बांधलेल्या देवळांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले होते. हा सामाजिक अभिसरणाचा मार्ग नसून, तो जातीपोषणाचाच प्रकार आहे, असे स्पष्ट मत त्यांनी नोंदविले होते. त्यांचे मत 'बहिष्कृत भारत' वृत्तपत्राच्या, १२ एप्रिल, १९२९ च्या अग्रलेखात आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिंदु म्हणून जन्माला आलेले असल्याने, हिंदूना मिळणारे सर्व अधिकार दलितांनाही मिळालेच पाहिजेत असा त्यांचा हक्कविषयक तर्कशुद्ध आग्रह होता.

त्यांच्या महत्वाच्या सत्याग्रहांचा आणि चळवळींचा धार्मिक क्षेत्राबाबतच्या, एकत्र आढावा जरी घेतला, तरी त्यांच्या मनाची तळमळ, प्रकर्षाने कळण्यास मदत होते.

अमरावती या विदर्भातील गाजलेल्या शहरातील अंबादेवी मंदिराचा सत्याग्रह १९२६ साली सर्वार्थाने वादळी ठरला. सनातनी समाज आणि नुसत्या शब्दशूर समाजसुधारकांचा कोरड्या सहानुभूतीने प्रचंड वादळ उठले होते. जेव्हा जेव्हा प्रत्यक्ष कृतीचा संबंध येत गेला, त्या त्या वेळी समाजातील ग्रंथप्रामाण्य आणि दलितद्वेष उफाळून आल्याचा बाबासाहेबांचा अनुभव होता.

इ. स. १९२९ चा पुण्याचा 'पर्वती मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह 'ही झंझावती ठरला. शाहिराने वर्णन केल्याप्रमाणे, पुणे हे 'शहरामध्ये शहर नमुना पुणे खुशवक्त बाई' असे शहर असल्याने, सगळ्यात कडवट आणि कठोर विरोध आंबेडकरांना याच शहरातून झाला. तो सगळ्यांनाच परिचित व ज्ञात आहे.

बाबासाहेबांनी आपल्या लढ्याचे वस्तुनिष्ठ चित्रण केले आहे. बाबासाहेब लिहितात,

"अस्पृश्य लोक माणुकीसाठी भांडत आहेत. माणुसकी गेल्याने माणसाचे सर्वच काही जाते." ह्या माणुसकीच्या महत्तेसाठी त्यांचा संघर्ष होता. पुण्याबद्दल बाबासाहेबांनी अनुभवाचे बोल असे काढले आहेत -

"पुणे म्हणजे एक बदमाशांचा अड्डा व लबाडांची पेठ आहे." (बहिष्कृत भारत - १५ नोव्हेंबर १९२९) ह्या उद्‌गारांच्या तात्कालिकतेच्या पलिकडे जाऊन त्यांच्या मनाची वेदना समजून घ्यायला हवी.

अलाहाबादच्या सनातन धर्म परिषदेत आपली भूमिका मांडताना, पंडित मदनमोहन मालवीय म्हणाले होते, 'देवदर्शनाच्या अस्पृश्यांचा हक्कास आम्ही संमती

देऊ शकतो, पण देवपूजेचा अधिकार मात्र दलितांना देण्यास आमचा कडवा विरोध आहे.'

इतकेच नव्हे, तर तेव्हाच्या कायदे कौन्सिलमध्ये, बी. रंगाय्यर यांनी जे बिल मांडले, तेसुद्धा अन्याय करणारे आणि सदोष असल्याने, मंदिर प्रवेशाबाबत बाबासाहेबांनी त्याचीही त्वेषाने चिरफाड करणारे लेखन केले होते.

डॉ. आंबेडकरांचे 'बहिष्कृत भारत', 'जनता' इत्यादी वृत्तपत्रातील लेखन आणि संघर्ष सत्याग्रहांच्या लढ्याचा इतिहास पहिला तर, त्यांनी धर्मांतर ही अस्त्रेरची शक्ती मानली होती. अवास्तव वल्गना करणे आणि अशक्य गोष्टींचे प्रलोभन दाखविणे; हा त्यांच्या व्यक्तिमत्वाशी विसंगत भाग होता. म्हणून आपल्या कृतीबद्दल ते अत्यंत जागरूक होते. त्यांच्या त्याबद्दलच्या काही लेखनात हे सुस्पष्ट होते.

(१) 'शक्यतोवर हिंदू धर्मात राहावयाचे.' ('बहिष्कृत भारत' १९.७.१९२७)

(२) 'आम्ही धर्मांतर करण्यास आज तरी तयारी नाही' ('बहिष्कृत भारत - हिंदू धर्माला नोटीस - १५.३.१९२९)

(३) 'धर्मांतर हा मौजेचा विषय नव्हे' (मुक्ति कोण पथे - जनता, जून १९२६)

त्यांच्या कितीतरी लेखनातून त्यांचे धर्मविषयक चिंतन असे सातत्याने प्रकट झाले आहेत.

दलितांच्या परवडीला कारणीभूत असलेले आपले वर्तन आणि मन शुद्ध स्वच्छ न करता, फक्त शुद्धिविधी आणि संघटनांचे जाहीर कौतुकाचे देव्हारे माजविणाऱ्यांबद्दल, बाबासाहेबांना चीड येई. त्यावेळच्या भाला, रणगर्जना, केसरी वगैरे वृत्तपत्रांतून त्यांच्यावर कठोर टीका येत असे. आपल्या टीकाकारांना त्यांनी उत्तरेही दिलेली आहेत. पण धर्माच्या नावाखाली, लोकांना-अज्ञानी व हक्क मागणाऱ्या लोकांविरुद्ध चिथावणे, ही त्यांना 'सद्भावना चिरडणारी' अशी सुशिक्षित गुंड प्रवृत्ती वाटे. या सगळ्या गोष्टी संभावितांचे मानसिक पितळ व हिणकसपण, स्पष्ट करणाऱ्या होत्या. त्यामुळे शुद्धि संघटनेच्या चळवळी ह्या 'दुखणे पायाला पट्टी कपाळाला' असे त्यांना वाटत असे. आणि ह्याच फार मोलाच्या आणि महत्वाच्या वाटणारांचे हे कृत्य, बाबासाहेबांना तर 'संभावित लफंगेगिरी' असे वाटे.

दलितांच्या गुलामगिरीबद्दल आयुष्यभर झगडणाऱ्या बाबासाहेबांना धर्मविचारांचे मोल, त्यामुळेच मला विशेष वाटते. याबद्दल थोड्या वेगळ्या संदर्भात विश्लेषण करणाऱ्या श्री. वामन निंबाळकर यांनी म्हटले आहे,

"सामाजिक गुलामगिरीतून मुक्त झालेला माणूस नंतर जीवनाच्या सर्व पातळ्यांवर स्वतंत्र होण्यासाठी क्रियाशील आणि बलशाली होईल, असा त्यांचा रास्त मूलगामी विचार होता. पृष्ठ ४९. (आंबेडकरी विचारांची दिशा - प्रकाशन

१४ ऑक्टो. १९९० - वामन निंबाळकर) हा मूल्यभाव आणि मुक्तिसंदेश देणारा महामानव यादृष्टीनेच बाबासाहेबांनी केलेले धर्मचिंतन लक्षात घेतले पाहिजे.

धर्मांच्या रुढींना, रीतीरिवाजांना आणि कर्मकांडांना नव्या कालोचित रसायनांच्या तेजाबात बुडविल्याखेरीज त्यांना झळाळी येतच नाही, हे सूर्यसत्य आहे. आणि आपल्याकडे तर परिवर्तनाचा कितीही वास्तववादी असा लहानसा विचार जरी मांडला, तरी तो पाखंडी किंवा विरोधी म्हणून नको ते प्रलाप काढण्याची, प्रवृत्ती झालेली आहे. दुर्दैवाने यालाच धर्मरक्षण असे म्हटले जाते.

त्यामुळे तर्काचा, बुद्धिप्रामाण्याचा, न्यायाचा आणि विवेकवादाचा कोणताही निष्कर्ष किंवा निकष अनाठायी आणि कुचकामी ठरतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्माधिकार प्राप्त करण्याची आरंभीची चळवळ, ही नेमस्त मार्गाची, अहिंसक सत्याग्रहांची आणि आवाहक रीतींची होती. संस्कृतीपूर्ण आयुष्य जगण्यासाठी समूहात वावरणाऱ्या प्रत्येक मनुष्याला संस्कृतीचा मूलाधार असणारे धर्मजीवन, अत्यंत आवश्यक आहे, अशी त्यांची धारणा होती.

कारण, समाजाला ' समाज ' म्हणून जे विचारार्ह मूल्य प्राप्त होते, ते जीवनात स्वीकारलेल्या आदर्शांमुळे. त्यांच्या जपणुकीतच आपली व आपल्या स्वाभिमानाची जोपासना होऊ शकते, याचा तो प्रत्यय घेऊ शकतो. इतिहास हा मानवी आयुष्याच्या भल्याबुऱ्यांचा निखळ साक्षीदार असतो. पण यापासून आपण घ्यावयाचा बोध असतो, तो मात्र दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरणार असतो. केवळ त्या वेळी, त्या काळी, त्या परिस्थितीवर जगणाऱ्या एका पिढीलाच नव्हे, तर पुढतपुढल्या काळातील सर्व पिढ्यांचा, तोच नवा इतिहास ठरू शकतो.

भारतीय समाजाचे इतिहासप्रेम विचित्रच आहे. ते मानसिक आणि भावनात्मक गुंतागुंतीचे जाळे बनलेले आहे. त्यामुळे एका विशिष्ट वर्गाला मान्य असलेलेच सूत्र सगळ्यांनीच फक्त सर्वकाळ विनाप्रश्न स्वीकारले पाहिजे, ह्या भूमिकेत त्याचा अहंगंड पोसला जातो. ह्याच प्रवृत्तीमुळे इतिहासविषयात भारतीय मन प्रदीर्घ काळच नव्हे, तर कायमचे अडकून राहते. जरा कुठे खुट वाजले, काही बिनसले की, ' आमच्या घराण्याची रीती नाही ', 'तो आमचा कुळाचार नाही', ' हे बापजाद्यांपासून चालत आले ते चूक कसे असेल ? ' आमची परंपरा, पूर्वज, दैवते, शतकांचे सत्य, प्रमाणग्रंथ, ऋषीमुनी चूक असतीलच कसे ? ' ' हा नवा आगाऊपणाचा विचार, नास्तिकवादी म्हणून दंड्राई आहे ' असाच धोशा लावला जातो. त्यामुळे ' इतिहासात आत्यंतिक अडकणारांचे भविष्यही सांकळते. ' ही उक्ती त्यांना समजणेच अशक्य ठरते.

समर्थ रामदासांसारख्या व्यवहारनिपुण आणि ब्राह्मण्याभिमानी कवींनी, अशा परिवर्तनाच्या आगीत तेल ओतण्याचे काम केलेले दिसते. जेव्हा त्यांच्या ओव्यांचा ओघ -

' देवद्रोही जितुके कुत्ते । मारून घालावे परते ॥ ' असा वळतो तेव्हा धर्मरक्षण

म्हणजे नवविचारविरोध, धर्मरक्षण म्हणजे 'देव' न मानणारांचे, मग ते स्वकीय, स्वधर्मीय असोत की अन्यधर्मीय, स्वच्चीकरण हेच अत्याग्रही अविचारी कृत्य फळफळायला लागते. बाबासाहेब 'सुशिक्षित गुंड प्रवृत्ती' म्हणतात, ती प्रत्येक नव्या दशकात, नव्याच रूपावेशात अविष्कृत होताना दिसते.

आपल्या आयुष्यभराच्या धर्मचिंतनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, उपलबध धर्म पुनर्रचित करून, आपणासह आपल्या बांधवांना, आपलासा करता यावा, याचाच जिव्हाळ्याने प्रयत्न केला होता. त्यांचे लेखन, तर्कवाद आणि भाष्यें याच गोष्टींची साक्ष देतात. म्हणूनच त्यांच्या पत्रकारितेचा विचार करीत असताना डॉ. गंगाधर पानतावणे यांनी एक अचूक निदान केले आहे. ते म्हणतात -

"बुद्धिप्रामाण्यवादी आंबेडकर सामाजिक पुनर्घटनेचे भाष्यकार होते. याचा प्रत्यय त्यांच्या समाज,धर्म, इतिहास व संस्कृतीविषयक सर्वच लेखांतून येतो." (पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर - डॉ. गंगाधर पानतावणे - अभिजीत प्रकाशन १९८७ - पृष्ठ १४३).

डॉ. आंबेडकरांच्या धार्मिक परिवर्तन विचाराने जरी अनेक वादळे निर्माण केलीत. 'धर्मांतराने काय मिळणार ?' (केसरी १८ ऑक्टो. १९३५) किंवा 'धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर !' (समग्र सावरकर वाङ्मय खंड - ३, पृष्ठ ५७४) असे जरी तिरकस किंवा जहाल सवाल निर्माण केले गेलेत, तरी सनदशीर मागनिच मानवी हक्क प्रस्थापित करणारे, त्यांचे चिंतनशील पाऊल म्हणजे त्यांनी केलेला, बुद्धधर्माचा स्वीकार; हे स्पष्ट व्हायला खळखळ होऊ नये असे वाटते.

८. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांनी दिलेली धर्मविषयक जाणीव

पारंपरिक पद्धतीने भारताच्या उपलब्ध व ग्रंथबद्ध इतिहासाबद्दल, स्तूपच लिहिता येईल. उत्कृष्ट नीतीवचने, वेचक सुभाषिते, चमकदार वाक्ये आणि पूजनीय ग्रंथ यांच्यावरही पुष्कळ आयुष्य घालविणे सहज शक्य होईल. प्रातःस्मरणीय देवदेवता, वंदनीय व्यक्ती, महाकवींची अमरवाणी, डोंगर-नद्या-निसर्ग किंवा त्यासारखीच असंख्य गूढरम्य माणसे, यांच्याबद्दलही हजारो हजारो पाने लिहिता येतील. पण असे लिहिल्याने, लिहविल्याने तेच सातत्याने स्तपल्यामुळेच, ह्या राष्ट्राचे अपरिमित नुकसान झाले आहे.

धडधाकट दिसणाऱ्या शरीरात रोगाचे वास्तव्य असावे, तसे आपल्या देशात वर्णव्यवस्थेचे आणि तिने पोसलेल्या जातीप्रथेचे अस्तित्व, चिरस्थायी झाले आहे. ह्या व्यवस्थेचा फटका आणि फणकारा ज्याने अनुभवला, त्या डॉ. आंबेडकरांनी त्याआधी म. फुले यांनी आणि त्याआधी लोकहितवादी आदी अनेक विचारवंतांनी आपले आयुष्य स्वर्चून, संघर्ष उभारला होता. पण बहुसंख्यांकांच्या तर्कदुष्ट स्वार्थी झोंडगिरीमुळे, असे कित्येक प्रयत्न व विचारवंत इतिहासजमा झालेत. बौद्धिक फिरवाफिरवीचा हा चकवा, डॉ. बाळ गांगल, ग. वा. बेहरे यांच्यापर्यंत निराबाधपणे वाहतोच आहे. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविधविषयस्पर्शी विचारांचा मागोवा घेत त्यांना स्पर्श करीत, पुन्हा एकदा धर्मप्रवास करणे अगत्याचे मला वाटते.

मानवाच्या अगोदर निसर्गचक्र आकारास आले. आपल्या अस्तित्वाला ते आधारभूत आहे, याची सुजाण जाणीव त्यातूनच निर्माण झाली. विविध निसर्गशक्तींच्या ठिकाणी दैवतीकरणाची प्रवृत्ती उद्भवली. ज्याअर्थी समग्र सृष्टीची प्राणधारणा निसर्गशक्तींमुळे घडते, त्याअर्थी तिची एक नियंती अलौकिक शक्ती असलीच पाहिजे; असा ठाम विश्वास आला. ह्या शक्तीला तपोबलाने, आत्मार्पणाने प्रसन्न करून आपलेसे करावे किंवा त्यांना यातुधान, बळी वगैरे देऊन या किंवा अशासारख्या अन्य मार्गाने, त्यांचा उपशम-दमन करावे व वशीकरणाची उपाययोजना करावी; अशा प्राथमिक व प्रारंभिक संकल्पनेतून एक वेगळे नाते प्रस्थापित केले गेले. या शक्तीशोधनाच्या प्रयत्नातूनच मूर्तीकरण आणि अमूर्तीकरणाची प्रक्रिया घडत गेली व 'प्रतीकवाद' निर्माण झाला. कृषीसंस्कृती आणि सामूहिक जीवनाच्या उभारणीकार्यात, अशा रीतीने 'धर्म' नुसताच स्थानापन्न झाला नाही, तर तो भक्कमही बनला.

सामाजिक विभाजनाची प्रक्रियाही येथूनच सुरू झाली असावी. धर्मप्रेषितांना सुबत्तेत वाटा मिळाला की, स्तुतीस्तोत्रे रचिली जातात आणि तेच जर घडले नाही,

तर हावरट, स्वार्थी, कंजूष म्हणून हेटाळणी करीत, शिव्याशाप दिले जातात. कृषीसंस्कृतीने आपल्या जीवनातील श्रमविभागणी गुंतागुंतीची केली. त्यातूनच नैतिक व्यवस्थेची गरज उद्भवली. पुण्यकल्पना-निषिद्ध पापकल्पना अशी विभागणीही यातूनच आकारास आली.

समाजमनावर धर्माची जी पकड आहे, त्यातच धर्माचे समाजशास्त्रही सामावलेले आहे. एमिल ड्यूरकेम, मॅक्स बेबर वगैरे विचारवंतांनी ही गोष्ट नेमकेपणाने हेरलेली दिसते. " धर्मसंघाच्या विकासाबरोबरच, धर्माच्या प्रत्यक्ष जनसमूहावरील प्रभावाला पुरोहितशाही आणि सामान्यजन यांच्यातील संबंध निर्णायक महत्त्वाचे ठरतात. धर्मसंघाचे विशिष्ट असे गुण संघटनेत जसजसे येऊ लागतात, तसे पुरोहिताचे स्थान सामर्थ्यशाली बनते. त्याचबरोबर सामान्यजनांच्या गरजासुद्धा लक्षात घेतल्या पाहिजेत, याची जाणीव पुरोहितवर्गाला होऊ लागते. याचे कारण म्हणजे, समुदायातील सदस्यांची संख्या वाढवणे आणि टिकविणे आवश्यक असते."

(मॅक्सवेबरची धर्ममीमांसा - प्रास्ताविक - अनु. नरेश परळीकर पृष्ठ २३)

समाजाच्या अर्थपूर्ण अस्तित्वातच धार्मिक आचरण, हा एक महत्त्वाचा भाग असतो. वेगवेगळी धर्ममते, निरनिराळे धार्मिक आचारविचार, त्यांच्या भिन्न भिन्न आणि कधी कधी परस्परच्छेदक कृतीउक्ती, यांच्या संघर्षमिलनातूनच, समाजजीवन प्रभावित होत असते. पण आत्मतुष्टीचा रंग एकदा चढला की, ' विभिन्नत्व म्हणजे मारक शत्रुत्व ' अशी घातकी विचारसरणी पक्की होत जाते. यामुळे अन्यसमाजाचे जीवन निराधार, निराश्रित, गावकुसाबाहेर फेकून दिलेले व दयनीय बनविले जाते. आरंभकाळात नागांचा, द्रविडांचा, जैनांचा, बुद्धांचा असाच विध्वंस केला गेला. या भयानकाचा इतिहास विकृत केला गेला, लपवला गेला आणि मारला गेला. यातूनच बाबासाहेबांच्या विचारग्रंथाला एक दिशा लाभली.

जगभरच्या धर्मांचा विचार केला तरी त्यात नव्याला विरोधाची प्रक्रिया आढळते. हिंदू, झरतुष्ट्र, माओ, कन्फ्युशियस, जैन, बुद्ध, हिब्रू, ख्रिस्ती, इस्लाम, शिन्तो, शिख, मोरोनी या विविध धर्मांचे आणि धर्मप्रसारकांचे विचारभेद, समाजजीवनाचा प्रवासच आरेखित करतात. पण आमच्या देशात जातीभेदांमुळे आणखीनच गोंधळ झालेला दिसतो.

धर्ममहात्म्याचे, अपरिहार्यतेचे आणि स्तुतीचे शब्द जपून ठेवण्याकडे, प्रसारित व प्रक्षेपित करण्याकडे अवघ्या पुरोहितांचा मुखंडांचा कल दिसतो. पण बाकीच्यांवर मात्र कडवी नजर आढळते. पुन्हा अशा तऱ्हेचे लेखन किंवा मते विस्मृतलेल्या अवस्थेतून वेचावी लागतात. म्हणूनच एक विचारवंत श्री. एस. ई. फ्रॉस्ट यांनी - "Their Literature was scattered, most of it being handed down from father to Son, Priest to worshiper, by word of Mouth." (The sacred writings of the woulds Great Religions - by S. E. Frost (Jr.) Introduction - Page 1, New home Liberary.

Reprint. 1947) अशी वस्तुनिष्ठ नोंद आपल्या उपरोक्त ग्रंथात केली आहे.

एका भूमीवर दलितांना - अस्पृश्यांना, इतके नगण्य करून, सगळ्या गोष्टींपासून वंचित केले की; डॉ. बाबासाहेबांना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हिंदू कोड बिलाची ब्राह्मण्यग्रस्त थोरांनीच विल्हेवाट लावल्यानंतर, नऊ वर्षांनी, धर्मांतराचे पाऊल उचलावे लागले. पीडलेल्या समाजाच्या मानसिक मुक्तीचा आणि मोकळ्या स्वच्छ वाऱ्याचा तोच मार्ग त्यांना तर्कशुद्ध व बुद्धीगम्य वाटला. तर दुसऱ्या अमेरिकेच्या भूमीवर, निग्रोंना ज्या छळातून आणि घेट्टोच्या घाणीतून जगावे लागते, ज्यासाठी मार्टिन ल्यूथर किंग, माल्कम एक्स, अँजेला डेव्हिस इत्यादिकांना हौतात्म्य पत्करावे लागते. मानवी कलंकाचे हे दोन वर्ग त्यामुळेच नवे साहित्य, नवे शब्द, नवा इतिहास, नवी प्रमाणे आणि नवे सौंदर्यशास्त्र, निग्रहाने आणि कर्तृत्वाने घडवू पाहात आहेत. माणसांकडून आणि धर्मव्यवस्थेकडून पीडला जाणारा हा समाज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यामुळेच कोण्याही चित्रगुप्ताला किंवा न्यायनिर्णयाला (Day of Judgement) स्वीकारणे शक्य नव्हते.

जुन्या कालबाह्य घटनाघटितांच्या चक्रात, येथला बहुसंख्य जगत होता. धर्माकडून जगवल्या-गुंगवल्या जात होत्या. भयाच्या-पातकांच्या दडपणाखाली, पुरोहितांना दानदक्षिणा देऊन, वशीकरणाचे लटके समाधान मिळवीत होता. कर्मकांड, पुनर्जन्माच्या थोतांडात लटकत होता. आत्मा-अज्ञातांच्या गारुडात गरगरत होता. त्याला विद्यमान धर्मव्यवस्था, प्रश्नांच्या पिंजऱ्यात कधी उभी करावीशी वाटलीच नाही. ज्यांना जेव्हा वाटली, त्या पाखंडांना, नर्काचा रौरव गिळून गेला असेही बिंबवले गेले. हे काहीच सोडायला तयार नसलेले, लोकच सोडून देणे, एवढेच बाबासाहेबांच्या हाती होते आणि ते त्यांनी हिमतीने आणि दूरदर्शीपणाने केले.

धर्म आणि धर्माचे टरफल कोणते? याचा विवेक जेव्हा संपुष्टात येतो, तेव्हा मनुष्य अधिकाधिक कडवा बनतो. होणाऱ्या प्रत्येक गोष्टीला तो देव व दैवकर्तृक समजायला लागतो. विश्वाच्या बदलणाऱ्या वाऱ्याचे पडसाद मग त्याल ऐकू येत नाहीत. नवे शोध, नवे विज्ञान, नवे औद्योगिकरण, नवे समाजशास्त्र तो समजेनासा होतो. सोयीच्या परिघात तो सोयीची-सवयीची परिभाषा शोधतो आणि वापरतो. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णापासून तो स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांपर्यंत तो 'सोयीचे' तेवढे उद्धृत करू लागतो. झुंडीची मान्यता मिळवून राष्ट्रनेताही बनतो. सध्या भारत अशा नष्टचर्यातूनच चालला आहे. 'The Hindu view of Life" मध्ये डॉ. राधाकृष्णन परखडपणे लिहितात - " आमची आम्हाला भीती वाटते म्हणून धर्माच्या कवचाला आम्ही स्वसंरक्षणार्थ कवटाळून धरीत आहोत. "

विद्यमान धर्माचे कवचही बाबासाहेबांना कळले होते आणि त्यांच्या चिंतक प्रवृत्तीला व शोधक अभ्यासू मनाला, 'धर्म 'ही आकळला होता. कधी काहीच न मिळणारा आपला समाज व आपली माणसे, सततच नाना मार्गांनी, नाना उपायांनी

उपलब्धीपासून दूरच ठेवली जातील. त्यांना प्रगती, यांत्रिकीकरण, शिक्षण, नोकऱ्या, तंत्रविज्ञान यात कधी संधी-सहभाग मिळणारच नाही, हे ते कळून चुकले होते. देशाच्या घटनाबांधणीत त्यांनी मूलभूत हक्कांचे जे कलम घातले, व आपणच आपल्याशी काय कबूल करतो आहोत, हे ठामपणे लिखित रूपात मांडले. त्याची कारणे, त्यांनी सातत्याने अनुभवलेल्या गांधीजींच्या गोलमेज परिषद आणि पुणे-करारापासूनच्या फसगतीत व नवी पुरोगामी धोरणे, दलितांच्या संदर्भात राबवताना, काँग्रेसच्या घुमजाव धोरणप्रवृत्तीतूनच पक्के ठरत गेले. त्यांचे ग्रंथही याची साक्ष देतातच.

प्रसिद्ध उद्योगपती हेन्री फोर्ड याने त्रेपन्न वर्षांपूर्वी म्हटले आहे," पृथ्वीच्या पाठीवर गुलाम पाहावयाचा असेल तर यंत्रसाहाय्याशिवाय काम करीत असलेल्या मागासलेल्या देशातील मनुष्य होय."

(Illustrated Weekly - 'Times of India' - 14 Nov. 1937)

आता ज्या देशातील सगळाच माणूस, इतका 'गुलाम' असेल, त्यातील अवर्ण दलितांची अवस्था काय असेल? याचा विचारच केलेला बरा. 'चोखामेळा' या तेराव्या शतकातील कवीच्या अभंगातील -

" जोहार मायबाप जोहार । तुमच्या महाराचा मी महार ! "

या उक्तीतील पीडा आणि मर्म, अशा फोर्डच्या फडर्या वचनानेच विशेष उमजावयाला लागते.

वस्तुतः धर्म ही संकल्पना मूलतः कधीच स्थिर अशी नाही. वेगवेगळ्या अवस्थांतरातून हा शब्द उद्भूत झाला आहे. आद्य मानवास कारणे अज्ञात असणाऱ्या निसर्गदत्त आपत्तीचे शमन करण्यासाठी करावयाचे दैवी आचरण व यातुधान - जादूटोणा, कधी 'धर्म' संज्ञेखाली मिरवितो तर कधी पूजा-अर्चा, यज्ञ, श्रद्धाविधी, अर्घ्यदान स्त्रोते अशा उक्रांत अवस्थेलाही हा शब्द लागतो. पुढे वैश्विक प्रचंड सर्वव्यापी अज्ञात शक्ती जी ब्रह्मांड आणि मानवनिर्मिती आहे, अशा आत्मा-परमात्मा-भावास व त्याविषयींच्या ज्ञानशोधास, 'धर्म' हे अभिधान उपयोजिले जाऊ लागले.

डॉ. बाबासाहेबांनी स्वीकारलेला बुद्धधर्म अन्य 'धर्म' संकल्पनांहून पूर्ण भिन्न आहे. " तो तर्कशुद्ध शक्याशक्यतेवर अधिष्ठित आहे. विद्येची सुष्टता आणि अविद्येची दुष्टता बौद्धधर्मासेरीज इतर कोणत्याही धर्मात इतक्या ठामपणे सांगितलेली नाही. जीवनातील दुःखाची परंपरा कामाश्रव-भावाश्रव व अविद्याश्रव (आश्रव = मल) यातून निर्माण झाली आहे. कोणत्याही बाह्य साधन-शुचितेशिवाय केवळ आत्मशुद्धीने निर्वाणप्राप्ती होते. सर्व प्रकारे स्वतंत्र, स्वावलंबी, आत्मोद्धाराबरोबरच मानव जातीच्या उद्धारास सिद्ध अशी कोणतीही व्यक्ती स्वयं बुद्धापेक्षाही सर्वश्रेष्ठ आहे, असे तथागतांनी सांगितले."

(" भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म " - प्राक्कथन पृष्ठ १५ न्या. आर. आर. भोळे) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - सातवी आवृत्ती १९८८

मानवी जीवनात प्रत्यक्षातल्या ऐहिक सुखानुभवालाही महत्वाचे स्थान असते हे कोणीही नाकारणार नाही. दलितांच्या समग्रच आयुष्यांना पिढ्यान पिढ्यांची अवकळा आलेली होती. म्हणजेच आणलेली होती. ज्ञान, मान, शिक्षण, शस्त्र, वस्त्र, पात्र, शास्त्र आणि निश्चिंतता यापासून त्यांना वंचितच ठेवलेले होते. अशा स्मृतीकाराला आणि व्यवहारनियमांना ज्यांना जाच होतो, त्यांनी जाळायला नको होते तर काय करावयाला हवे होते ? या अधिक्षेपातच इंग्रजी राजवटीचा आरंभ झाला होता.

गळ्यात गाडगे, कमरेला बोराटी आणि आपल्या सावलीच्या अस्तित्त्वाचेही भय बाळगीत जगणाऱ्या दलितांना, 'ब्रामणी राज्य जोरदार' वाटणे शक्यच नव्हते. त्यांच्या स्वामित्वाबद्दल किंवा मृत्युघंटेबद्दलही सोयरसुतक वाटण्याचे प्रयोजनच नव्हते. बंधुभावाच्या शोधात असलेल्या दलितांना नेहमीच दुजाभाव वाट्यास आला. समतेचा चिद्घोष करणारांनी विषमतेचे विषच दलितांना भरभरून अव्याहतपणे दिले. स्वातंत्र्यात श्वास घेऊ पाहणाऱ्या मानवांच्या स्वाभाविकतेला गुलामगिरीची व दास्यत्वाचीच देगणी दिली. अशा तऱ्हेने सतत इंद्रियसंवेदनांकडून वारंवार वंचित होणाऱ्या डॉ. बाबासाहेबांच्या प्रज्ञेच्या कसोटीला, त्यांच्यासाठी आणि त्यांच्या कृतीउक्तींकडे सर्वस्व पणाला लावून पाहणाऱ्या समाजासाठी तर्कसुसंगत धर्माचीच आवश्यकता होती. आणि ती बुद्धिधर्माच्या शिक्कामोर्तबाने साकार झाली.

डॉ. बाबासाहेबांच्या व त्यांच्या अनुयायांच्या वाट्याला आलेला आचरणीय धर्म त्यांना बंडखोर बनविण्यास कारणीभूत ठरला होता. खरा विचारवंत बंडखोर अशा आक्रमक व अपात्र ईश्वरापासून म्हणूनच दूर जातो, रूसोच्या 'सामाजिक करारनामा' (Social contract) खऱ्या अर्थाने बाबासाहेबांनी त्यातला गूढवाद (mysticism), त्यातील प्रश्नोत्तरमाला (catechism) वगळून वेगळ्या व नव्या अन्वर्थकतेने मांडला.

हिंदू धर्माच्या त्यागाचा विचार, येवल्याच्या धर्मपरिषदेत जेव्हा बाबासाहेबांनी मांडला होता, तेव्हा त्या उद्गारांनी; तशी गंभीर दखल घेतली गेली नव्हती. प्रत्यक्ष धर्मांतर घडल्यानंतरही त्याची फार खोलात जाऊन शासक, पांढरपेशे आणि सर्वप्राप्त समाज चिकित्सा करतो आहे, असेही आढळत नाही. याचे काय मूल्य चुकवावे लागेल ? विभेदीकरणाचे कोणते आणि किती तिढे आणि वेढे विळखे आपल्या वाट्याला येतील ? याची काळजी भविष्यकाळानेच तेवढी करायची. खूप लोकांना वाटते, धर्मांतर झाले. नवबुद्ध समाज आकारास आला. डॉ. बाबासोहबांचे दोन महिन्यातच महापरिनिर्वाण झाले. आता नियमन नियंत्रणाअभावी हा समाज फुटून फाटून होत्याचा नव्हता होईल. पूर्ववत लाचार, बापुडवाडा आणि वरिष्ठावलंबी किंवा 'आश्रयी' अवस्थेला येईल, तर त्यांचे हे वाटणे चूक आहे. 'बंडखोरीचे, तत्त्वज्ञान' 'The Rebel' या ग्रंथात सांगणाऱ्या आल्बेर कामू याने म्हटलेच आहे.

नियमन ही बंडखोरीची विरूद्ध बाजू नव्हे, बंडखोरी हीच स्वयमेव नियमन

आहे आणि तिला त्याची गरज असते, ती त्याचा बचाव करते आणि संबंध इतिहासातून व त्याच्या चिरंतन क्षुब्धतेतून ती नियमनांची पुनर्निर्मिती करते." (भाषांतर . श्री. भि. वि. मराठे पृष्ठ ३०७, म. राज्य साहित्य संस्कृती मंडळ प्रकाशन, प्रथमावृत्ती. १९७७)

धर्मस्वीकार किंवा धर्मत्याग याबद्दल आपल्या देशात काही लोकांची मनोधारणा विशिष्ट सारणीचीच बनविलेली दिसते, ' धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर तर किंवा राष्ट्रद्रोह ' वगैरे सारख्या बालीश अविचारी घोषणा यामुळेच दिलेल्या आढळतात. एका धर्माची माणसे एकत्र राहती तर इतिहासातल्या सगळ्या लढाया खोट्याच ठरवाव्या लागतील. पाकिस्तान, बांगलादेश, इराक, इराण किंवा ख्रिस्ती राष्ट्रातील अनेक युद्धे व संघर्ष विसरूनच जावे लागतील. हिंदू म्हणत सवर्णांनी दलितांना शेकडो वर्षे दिलेली वागणूक विचारातूनच काढून टाकावी लागेल.

म्हणजे धर्म आणि राष्ट्र ह्या दोन स्वयंभू कल्पना असून आपापल्या कक्षेत त्यांचे योग्यायोग्य किंवा सूक्ष्मठळक प्रभाव व परिणाम घडतच असतात, असेच नोंदावे लागेल. या दृष्टीने १९७३ साली कऱ्हाड येथे झालेल्या यशवंतराव चव्हाण व्याख्यान मालेतील प्रा. गं. बा. सरदार यांचे उद्‌गार उद्‌धृत करावेसे वाटतात.

" धर्माचा व राष्ट्रनिष्ठेचा काही संबंध नाही. पाचपन्नास स्वार्थी व माथेफिरू लोकांसाठी सगळ्या समाजाला राष्ट्रद्रोही समजणे योग्य नाही. आधुनिक काळात धर्म हे राष्ट्राचे अधिष्ठान होऊ शकत नाही, असे म. गांधी व नेहरू म्हणत असत. आपल्यापैकी पुष्कळांना ते पटले नाही. पण पाकिस्तानने आपल्याला दाखवून दिले आहे की, एकाच धर्माचे लोकही एकमेकांवर अनन्वित अत्याचार करून शकतात."

राष्ट्र आणि देश यांच्या आशाआकांक्षाशी नाळ जुळायला लोकांच्या समान हितरक्षणाची समाजव्यवस्था असणे अत्यावश्यक असते, असे असले की मग, ' इंग्रज एक वेळ इंग्लंडचा त्याग करतील पण आपला मानबिंदू शेक्सपियर ते कदापीही सोडणार नाहीत. ' अशी किंवा यासारखी भाषा सतार्किक व सच्ची वाटते. इथे तर कालिदास भास, भारवी, व्यास, वाल्मिकी, बाणभट्ट यासारख्यांच्या कलाकृतीचे शीर्षकनामही लोकांना वाचण्याची मुभा नाही. व्यक्तिगत उत्कर्ष साधण्यासाठी मुक्त वातावरण व समावेशक संस्कारिता आवश्यक असते. ह्या संस्काराचा आणि रीतरिवाजांचा धाक किंवा आदेश आज्ञार्थक नसणे आवश्यक असते. त्यात सुसंबद्धता व सर्वसमावेशकता असायाला हवी. एकाला एक आणि दुसऱ्या-तिसऱ्याला निराळेच असे व्यवहारधोरण असेल तर ते परके, दूरस्थ आणि लादलेलेच वाटणार. वर्णाश्रम व्यवस्थेत अशाच परकेपणाची आणि करड्या आज्ञांची व्यूहरचना केली गेली आहे. यालाच म फुले यांनी ' ब्राह्मणांचे कसब ' म्हटले आहे. आम्ही सांगतो ते, ' करा आणि मुकाटपणे ऐका ! ' अशा आशयाची व्यवस्था मानवाला मूर्ख नगण्य किंवा गुलाम मानणारीच असते.

मानवी समाजाच्या उमलण्याला व धारणेला सहज साह्यकारी ठरतील, अशा तात्त्विक, नैतिक, आणि सामाजिक मूल्यांचा शोध घेण्याची प्रक्रिया जगभर सुरूच आहे. अगदी समाजवादी, साम्यवादी, भांडवलशाहीवादी आणि लोकशाहीवादी देशातही या शोधाचे अनेकविधी चढउतार मिळतात.

जगातील अतिशय गाजलेल्या स्टॅलिनच्या रशियातही लेनिनच्यानंतर हाच शोध चालू होता. चीनमध्ये माओ-त्से-तुंग नंतर याचीच रक्तरंजित उदाहरणे जगापुढे आली आहेत आणि पेरेस्त्राईकानंतरच्या रशियाच्या विभाजन विघटनात किंवा जर्मनीच्या एकिकरणातही अशाच मूल्यांच्या सततशोध असलेला दिसतो. आणि त्या त्या माणसांना त्यांच्या रंगाढंगाने वागण्या-बोलण्याची, सहज आविष्कृतीची संधी आणि स्वातंत्र्य मिळायलाच हवे असते. उपलब्ध हिंदू व्यवस्था आणि तिचे छाकटे आणि क्रूर पुरस्कर्ते यांच्या ग्रंथप्रामाण्यवादी रचनेत अस्पृश्यांच्या नगण्यत्वाचे हलाहल भरलेले असल्याने बाबासाहेब, "मी हिंदू म्हणून मरणार नाही !" असे निश्चयाने बोलते झाले होते.

वैमनस्य, द्वेष यांच्या पलीकडे जाऊन जी समाजव्यवस्था मानवी ऐहिक स्वातंत्र्याची व मनाची मशागत करते, तिलाच मूल्यात्मक परिमाण लाभते. नव्या विचारवंतांचाही असाच कौल आहे.

"This is only possible in a social system where the unity of the interests of individual and society has trumphed. In bourgeois society these conditions for the free development of every person do not and cannot exist because of class and other social antagonisms."

(Humanism - it's Philosophical, ethical and sociological Aspects - M. Petrosyan, chapter V, Page 249 - 1972)

ह्या दृष्टीनेच जुन्या मूलगामी शोधकांचाही निर्वाळा घेता येईल. कारण की प्रत्येक धर्मात माणूस आणि त्याचे स्थान आणि विश्वरचना अशी एक स्थूल धारणा असते. पण; सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न होतो का ? 'सत्य' म्हणून स्वीकारलेले गृहीतक तरी बरोबर असते काय? ज्या मार्गाचा व ज्याने अवलंब केला तो तरी अचूक असणार का ? 'सत्य' म्हणून एखाद्या भासाचा तर पाठलाग केला नाही ना ? सत्याची जागा एखाद्या संपूर्ण मानसिक पातळीवरल्या निर्द्रव, अनुपयुक्त पण गोंधळवणाऱ्या घटकाने तर घेतली नाही ना ? शोधकाचा वर्णिय, वर्गीय आणि उच्चस्तरिय स्वार्थ तर येथे शब्दच्छलांचे विपरितकार्य करीत नाही ना ?' असे किंवा अशांसारखे प्रश्न अवघ्यांकडून वेळोवेळी विचारले जायला हवे असतात. मग 'आर्यसत्य' ईश्वर अस्तित्त्वाविषयीचे असो की 'आत्मा' स्वर्गादी गोष्टींबद्दल असो. अशी व्यवस्था हिंदू धर्मशास्त्रात सगळांसाठी उपलब्ध नव्हतीच. तर्काधार नाकारण्याची उलट भक्कम बांधणी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारलेल्या तथागताच्या धम्मात यथोचित

बांधणी व स्थान मिळते.

" ज्याप्रमाणे सध्याच्या काळी सर्व शास्त्रे प्रगतीसाठी झटणारी, अधिकाधिक सत्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करणारी, परंतु संपूर्ण सत्यापर्यंत कधीच न पोचणारी अशी बनली आहेत, त्याचप्रमाणे आधुनिक धर्म हीदेखील प्रगतीपथावर धावणारी चीज होऊन बसेल. ' (The work, wealth and happiness of Mankind - H. G. Wells, Page. 732)

धर्मप्रवास हा मुळातच वेडावाकडा आणि दमछाक करणारा असा असतो. धर्माचा घटविलेला मूलार्थ आणि अनेकाच्या आचरणीय रूढीप्रथांनी उपलब्ध राहिलेले सद्यःस्थितीतील स्वरूप यांच्यातील तफावत शोधतानादेखिल मेटाकुटीला येण्याची शक्यता असते, पुन्हा एका विचारवंताने लावलेला व सांगितलेला अन्वयार्थ आणि दुसऱ्या शोधकाने अत्याग्रहाने मांडलेली नवी उपपत्ती यांचीही सांधेजोड करता करता मोठी फसगत होऊन शकते.

तत्त्वतः हे गुहागर्भात वास्तव करणारे धर्मतत्त्व आकळण्यास अवघड हे जरी मान्य केले तरी परिचित काळातील समकालीन थोरामोठ्यांचा प्रमाणांसाठी उपयोग करणे स्वीकार्य ठरायला हरकत नसावी, 'उपासमार की नियोजन अर्थात् हिंदी लोकसंख्येचा प्रश्न' अशा दुहेरी शीर्षकाचा एक शोधग्रंथ सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर यांनी सन १९३९ साली प्रसिद्ध केला. सौ. चंद्रकला हाटे आणि कु. कृष्णाबाई कोल्हटकर ह्या दोन विदुषीद्वयांनी हा अभ्यास केला आहे. यातील पृष्ठ १२९ वर नियोजनाच्या कितीतरी अंगोपांगांचा त्यांनी खोलात जाऊन विचार केलाला आढळतो. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, शारीरिकदृष्ट्या अपंग-महारोगी वगैरे, पाणी व्यवस्था, घरे, औषधोपचार, आहार आणि प्रसूतीगृहे वगैरे बहुसंख्य बाबींची उपयुक्तात व साधकबाधक विचार उभय लेखिकांनी केला आहे. हा ग्रंथ गेल्या वर्षी तिसऱ्यांदा वाचताना माझ्या मनात उद्भवलेला एक प्रश्न मांडावासा वाटतो. तो असा मुळात हिंदी समाज हे अठरापगड जातीधर्माचे कडबोळे आहे. त्यातील जन्ममरण रोटीबेटी व्यवहार अनेक सूचना निर्बंधात पूर्ण जखडून तो मृतप्राय बनविला गेला आहे. ह्या समाजातील सर्वात मोठा दोष चातुर्वर्ण्यव्यवस्था आणि त्यामुळे जाती पोटजातीत सुटा सुटा निकृष्टपणे जगणारा बापडा माणूस हे सूत्र, ह्या नियोजन विचार करणाऱ्या विदुषींना सुचलेच कसे नाही ? त्यावेळच्या म्हणजे पन्नास वर्षापूर्वीच्या समग्र व्यवस्थेत, विद्यापीठे, अभ्यासक आणि विचारवंतांना हा प्रश्नच महत्त्वाचा वाटत नव्हता ? की प्रथापरंपराच अशी पडली होती की राजकीय सुधारणांच्या मागणीच्या आत्यंतिक आग्रहामुळे समाज-पुरुषाला मृतवत करणारी ही प्रश्नक्षते विचारातच घेण्याचाही विसर पडला होता ?

या प्रकट प्रश्नांचे दुसरे महत्त्वाचे कारण असे की; अर्थशास्त्र , राज्यशास्त्र, समाजशास्त्र आणि तत्कालीन वास्तवाशी सरळ भिडणारी ही समस्या होती. म. फुले, आगरकर, आंबेडकर शाहू महाराज, भांडारकर, लोकहितवादी, बाबासाहेब बोले,

भांडारकर, रानडे, गोखले, विवेकानंद, म. गांधी इत्यादी कितीतरी नामवंत समाजसेवकांनी या प्रश्नाचे महत्त्व प्रत्येक वेळी विशद केले होते. बाबासाहेब तर, 'जातिनिर्मूलनाचा प्रश्न, पाकिस्तानवरील विचार, रुपयांचा प्रश्न, रानडे, गांधीजी आणि जिना, अल्पसंख्यांकांचा प्रश्न, अस्पृश्य, शूद्र पूर्वी कोण होते? अशा त्यांच्या अनेक ग्रंथात आणि बुद्ध आणि त्याचा धर्म' ह्या अंतिम ग्रंथातही प्रामुख्याने, ह्या दलितत्त्वाचा आणि जातींचा उल्लेख करतातच. त्यामुळे आपल्या विद्यापीठीय आणि विचारवंत नव्या पिढीला लो. टिळकांच्या हटवादी प्रवृत्तीने कसे मंतरून टाकले होते याचाच निर्वाळा मिळतो.

लो. टिळकांच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील कामगिरीला आणि नेतृत्वाला मान्य करूनही त्यांच्या मनाच्या कोतेपणाबद्दल पुन्हा एकदा स्पष्ट लिहिल्याशिवाय हे स्पष्ट होणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वृत्तपत्रांची जाहिरात पैसे घेऊनही, केवळ अस्पृश्य म्हणून छापायला, लो. टिळक आणि 'केसरी' ने नकार दिला होता. विठ्ठल रामजी शिंदे, श्री. सदाशिवराव गोगटे, ह. र. भागवत यांच्या आठवणीही याद्दष्टीने फार फार बोलक्या आहेत. 'लोकमान्य' ह्या टिळकचरित्राचे लेखक, संशोधक श्री. न. र. फाटक यांच्या 'सामाजिक सुधारणा' ह्या प्रकरण बावीसवरील समारोप मी या ठिकाणी मुद्दाम देतो आहे. "टिळक तटस्थ राहते तर वरील समर्थन योग्य ठरले असते. पण ते सामाजिक प्रश्न निघाला की त्याला आपल्या प्रतिकूल टीकेने हटकून अपशकून करीत होते. हे पाहिले की ते सामाजिक सुधारणेचे बाह्य व्यवहारात तरी शत्रू होते असाच निष्कर्ष काढावा लागेल." ('लोकमान्य' - न. र. फाटक, पृष्ठ - ४८४ मौज प्रकाशन - ऑगस्ट १९७२ पहिली आवृत्ती)

लो. टिळकांच्यावरील नव्या कादंबरीतही त्यांच्या मतांबद्दल समर्थनपर पण अशीच सूचना आहे. (दुर्दम्य - गंगाधर गाडगीळ, सुपर्ण प्रकाशन पुणे, तिसरी आवृत्ती १ एप्रिल, १९९० पृष्ठ ५११-५१२) या अशा कालगतीकडे पाहिले की, 'राजा कालस्य कारणम्!' ह्या उक्तीची सत्यता पटते.

डॉ. बाबासाहेब हे दलित समाजातील असूनही ते प्रज्ञावंत आणि स्वतंत्र बाण्याचे होते, त्यामुळेच अनेकांच्या रोषाला ते कारणीभूत झाले होते. काँग्रेसेने वश केलेले 'हरिजन' ते बनले नाहीत. तडजोडीचे आणि आत्मरक्षणाचे राजकारणही त्यांनी कधी केले नव्हते. घटनेप्रमाणे दलितांनाही मताधिकार प्राप्त झाला. पण सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात काय घडले ? जे घडते आहे त्याची यात्रा, रथ आणि आयोगचक्र सगळे धडधडीत पाहताहेतच.

'जातीयता मानत नाही.' हे म्हणणे ठीक आहे पण जातीयता आणि विषमता धर्मवचनाधारित आणि लोकव्यवहारात आहे, ह्या वस्तुस्थितीबद्दल काय केले जाते ? धनवृद्धीची सगळ्यांनाच चिंता आहे. तथागत म्हणतात, 'धनवृद्धी ही क्षुल्लक गोष्ट आहे. प्रज्ञावृद्धी ही श्रेष्ठ होय,' (भगवान बुद्ध आणि त्याचा धर्म पृष्ठ. ४४२) हे

धन आणि मान कधी दलितांच्या वाट्याला आला नाही. सवर्णांनी येऊ दिला नाही. मराठवाडा विद्यापीठाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे,' यासाठी झालेल्या चळवळीत मराठवाड्यात दलितांची घरेदारे, गाववस्त्या ज्या अमानुष त्वेषाने पेटवल्या गेल्या ते पाहून, तेव्हाही एक विचार मनात आला होता. ह्या बाबासोहबांच्या विचारप्रेरणेने धर्मप्रवास करताना पुन्हा तो अस्वस्थ करतो आहे.

स्वातंत्र्यानंतर देशाची फाळणी झाली, कारण ती अटळच होती, त्यातून एका नथुराम गोडसेने म. गांधीजींचा गोळ्या घालून खून केला. महात्माजींच्या बाबतीत हे कृत्य जर एखाद्या दलितांकडून घडले असते, तर अख्खा देश दलितदहननिर्मूलनासाठी एकजुटीने आणि क्रोधद्वेषाच्या रेट्याने उभा राहिला असता. याबद्दल शंकाही वाटत नाही.

भारतातील धर्माची तत्त्वे मोहक आहेत, पण त्याचे फलित शून्य आहे. सगळीकडे अराजक सदृश, गृहयुद्धाकडे झुकणारी आणि अराजकाचा पाठपुरावा करणारी सध्या स्थिती दिसते आहे. कारण ज्यांचा संविधान घटनेवरच विश्वास नाही, असे लोक राजकीय सत्तास्वेळात सहभागी होताहेत. उद्दिष्टांना उशीर लागला की, स्वेळातून पाठ फिरवताहेत.

डॉ. बाबासाहेबांच्या पक्व आणि गंभीर व्यक्तीमत्त्वाने बुद्धधर्माचा स्वीकार केला. आपल्या बांधवांनाही त्याता संमीलित केले. कधीच काही; या देशाने, इथल्या धर्मने, व्यवस्थेने, सवर्णांनी व सर्व पांढरपेशांनी मिळू लाभू दिलेच नव्हते. म्हणून सन्मानाने व डोळस स्वेच्छेने स्वीकारलेला बुद्धधर्म त्यांच्या मनात समाधानाचा अंकुर रूजवण्यास समर्थ आहे. या एका गोष्टीनेही ते तृप्त आहेत. कारण, ' तृष्णेमुळे लोभ वाढतो. लोभमागे व्यक्ती लागली की काम आणि लालसांचा उद्गम होतो. त्यामुळे त्यांच्या प्राप्तीचीच मनाला दृढ ओढ लागते. यातूनच ती आपली व्हावी अशा मालकीतत्त्वाची निर्मिती होते. असे झाले की हाव वाढते आणि अधिक स्वामित्वाची मनोभूमिका घडते. ह्यातूनच प्राप्त मालमत्तेवर पहारा बसविण्याची आणि अपहरण कर्त्यांपासून संरक्षण करण्याची गरज भासते. यातूनच असत्य, निंदा, संघर्ष आणि रक्तपाताचे अतूट चक्रं उद्भवते. हीलाच ' प्रतीत्यसमुत्पादसास्वळी ' असे भगवंतांनी म्हटले आहे. (कुरूदेशात कम्मासदम्म नगरीत शिष्य स्थविर आनंद यास तथागतांनी केलेला उपदेश. बुद्ध आणि त्यांच धम्म. पृ. ४४० सिद्धार्थ प्रकाशन, संपादन. तळवटकर, चिटणीस, रेगे, सातवी आवृत्ती १९८८) ज्या ज्या वेळेस विचारांवर मळभ येईल नवे काही सांगवेसे वाटेल, तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने आणि सत्यान्वेषणाच्या धीटपणाने असा केलेला धर्मप्रवास साध्य साधनांची आणि लक्ष्याची चूक होऊ देणार नाही. ह्या प्रवासास येणाराने मनाची सर्व दारे मात्र, सताड मोकळी ठेऊन निघायला हवे आहे.



१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संमोहक व्यक्तिमत्त्व

कोण्याही तऱ्हेची राजसत्ता, संपत्ती होत्याचे नव्हते करण्याची शक्ती, उच्चवर्णीय अहंकाराचा स्वाभाविक वारसा किंवा महान पूर्वज अथवा अलौकिक वंशज असा काहीही लाभ नसताना पीडितांच्या मनावर सतत प्रेमाने राज्य गाजविणारे बाबासाहेब आंबेडकर हे एकमेव आहेत.

कुठलाही आदेश निघत नाही, कोणीही फर्मान काढून सक्ती करीत नाही, स्नाण्यापिण्याची प्रवास राहण्याची कोणीही व्यवस्था करीत नाही, आणि मुंबईत आल्यावर कित्येकांची नाके मुरडतात, तरीही १४ एप्रिल आणि ६ डिसेंबराला जनसमुद्र दादर समुद्रकिनाऱ्यावर श्रद्धेने जमतो ही किमया बाबासाहेबांच्या संमोहक व्यक्तिमत्वाचीच होय.

डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांचे व्यक्तिमत्त्व विविधांगी आणि संपन्न आहे. वर्णव्यवस्थेच्या जातीव्यवस्थेच्या चटक्यांनी ते पोळून निघाले आहे. ग्रंथप्रामाण्य व ब्राह्मणश्रेष्ठत्व यांच्या फटकाऱ्यांनी ते विव्हळ झाले आहे. ज्ञानाने अग्रणी, विद्येने संपन्न राजकारणाने, सर्वव्यापी, पत्रकारितेने लढवय्ये आणि समाजसुधारणांच्या बाबतीत; मानवी व्यथावेदनांचा विसर न पडू देणाऱ्या, बाबासाहेबांच्या चरित्राचीही अल्प माहिती असणे अत्यावश्यक आहे.

१४ एप्रिल, १८९१ रोजी महू येथे रामजी सकपाळांच्या घरात त्यांचा जन्म झाला. जातीय पायावर लष्कराची रचना झाल्याने महार-चांभारांना पेन्शनीत जाणे भाग पडले. त्यामुळे रामजी सकपाळांनी दोन वर्षे सेवा पुरी करून दापोलीस आले. दापोलीजवळ असलेल्या आंबावडे गावचे म्हणून आंबावडेकर असे त्यांचे अडनाव होते. पण आंबेडकर नावाच्या एका प्रेमळ व मायाळू मास्तरांनी त्यांचे नाव आंबेडकर असे बदलले. लहानपणीचे नाव भिवा. पुढे भिवराव व नंतर ते भीमराव असे झाले. वडील कडक शिस्तीचे. कबीरपंथी. प्रार्थना-पूजा करणारे. मद्य व मांसाहारापासून मुक्त झालेले. अभंग-आर्या म्हणणारे. मुलाच्या वाचन-अभ्यासाची काळजी घेणारे. पोटाला चिमटा काढून पुस्तके विकत घेऊन देणारे. अशा संस्कारांनीच भीमरावांचे मन विद्याप्रेमी व ग्रंथवेडे घडल्यास नवल नाही.

संस्कृतच्या शिक्षकांनी अस्पृश्याला संस्कृत शिकवायाला नकार दिला. म्हणून त्यांनी नाईलाजाने व दुःखाने पर्शियन घेतले होते. १९०७ साली भीमराव मॅट्रिक झाले. केळुस्कर मास्तरांनी श्रीमंत सयाजीराव महाराजांकडे कॉलेजशिक्षणासाठी मदत मागितली.

गायकवाडांनी प्रश्न विचारून दरमहा रु. २५ ची स्कॉलरशिप दिली. ३ जाने. १९०८ ला ते मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात दाखल झाले.

बी. ए. झाल्यावर ते पुढे शिक्षणाच्या तरतुदीसाठी बडोद्याला आले. त्यावेळच्या प्रघाताप्रमाणे वयाच्या चौदाव्या वर्षी भिकू वलंगकराच्या रामीबाईबरोबर, ती नऊ वर्षांची, लग्न झाले होते. बडोद्याला असतानाच त्यांचे वडील वारले. सयाजीराव गायकवाडांनी त्यांना अमेरिकेला उच्च शिक्षणास पाठविले. त्यांनी निर्धाराने व जिद्दीने अभ्यास सुरू केला. सोळा-सतरा तास अखंड वाचन. यातच लाला लजपतराय यांच्याशी भेट व स्नेह झाला. १९१७ ला 'भारतातील जाती' हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला.

लंडनला त्यांना एम्. एस्सीला सरळ बसण्याची परवानगी मिळाली. काही काळ पत्रव्यवहार तडजोडी करून ते बडोदे सरकारच्या सेवेत आले. तेथे राहायला घर मिळेना. जहांगीर धनजीभाई हॉटेलवाला या पार्शी मित्राकडे राहू लागले. त्यांच्या हातास्वालचे अधिकारी-शिपाई त्यांना तुच्छतेने वागवत. एक दिवस लाठ्याकाठ्या घेऊन चिथावलेले पार्शीच जहांगीरच्या घरावर चालून आले. बडोद्याचे राजे गायकवाडही बडोद्यात त्यांची राहण्याची व्यवस्था करू शकले नाहीत.

पुन्हा मुंबईला आले, बाबासाहेबांचे नातलग एक-एक कालवश होत होते. मुंबईच्या सिडनहॅम कॉलेजात प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. दोन वर्षे नोकरी करून पुढील शिक्षणासाठी ते लंडनला रवाना झाले. जेथे तेथे आडव्या येणाऱ्या व ज्ञानाची कदर न करणाऱ्या, जातीव्यवस्थेविरूद्धचा भीमसेनानी यांतूनच घडला. आयुष्यभर ते जात व तिला ढाला पुरविणाऱ्या सनातन अमानुष धर्मधारणाशी कडवा लढा देत राहिले. यामधूनच 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो. अर्थात ते माझ्या हातात नव्हते. परंतु हिंदू म्हणून मरणार नाही.' ही दृढ भूमिका आकारास आली.

१९२० नंतर म्हणजे लो. टिळक यांच्या मृत्युनंतर खऱ्या अर्थाने म. गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारताच्या राजकारणात पदार्पण झाले. भूदासांचा व गुलामांचा दर्जा असलेल्या अस्पृश्यांना ज्यांच्या बाबतीत शिवाशिवीचा विटाळही मानला जातो त्यांना, हिंदू समाजाचा अविभाज्य भाग मानणे बाबासाहेबांना अमान्य होते, गांधीजीसोबतच्या संघर्षाला येथेच तोंड लागले. 'दलितांना हिंदू आपले मानतात ते त्यांचे हक्क लाटण्यासाठी व वर्चस्व टिकविण्यासाठी, मुसलमान त्यांचे वेगळे अस्तित्व नाकारतात. कारण त्यांना प्रतिस्पर्धी आल्यामुळे आपले हक्क कमी होतील, हे भय आहे. आणि सरकार त्यांच्यासाठी काहीच न करता, आपले अस्तित्व टिकविण्यासाठी, खोटी प्रतिमा उभी करून घोषणा देण्यासाठी; त्यांचा उपयोग करते. म्हणजेच दलितांना कोणीच मित्र नाही,' हे बाबासाहेबांनी स्पष्टपणे सांगितले.

त्यांचे हे विश्लेषण गांधीजींना रूतले. त्यांच्या वयाच्या महात्मेपदाचा व राजकीय मोठेपणाचा धाक दाखवून, ते बाबासाहेबांना कःपदार्थ मानत होते, पण राउंड टेबल कॉन्फरस, आणि पुणे करारने गांधीजींना माघार घेऊन, त्यांचे नेतृत्व मान्य करावे

लागले. "ज्या देशात ..... कुत्र्या-मांजरांना जेवढ्या सवलती मिळतात तेवढ्या सवलतीही आम्हाला गुण्यागोविंदाने मिळत नाहीत; त्या भूमीला 'माझी जन्मभूमी' आणि त्या धर्माला माझा धर्म म्हणण्यास मीच काय, पण ज्याला माणुसकीची जाणीव आहे नि ज्याला स्वाभिमानाची चाड आहे असा कोणताच अस्पृश्य तयार होणार नाही."

गांधींजींनी ८ ऑक्टो. १९३१ ला संतापून आकांडतांडव केले आणि 'लंडन टाइम्स' ने अग्रलेख लिहून, तेथल्या वास्तव्यात संसदपटू, पत्रकार, विचारवंत व ब्रिटन सम्राटांना इतक्या प्रभावीपणे पटवून दिले की भारतात व भारताबाहेर गांधीजींविरोधी व बाबासाहेबांना अनुकूल वातावरण निर्माण झाले.

यामुळे काँग्रेसपक्ष व गांधीजींचे अनुयायी बिथरले आणि त्यांनी बाबासाहेबांना देशद्रोही ठरवून काही दलित नेत्यांना एम. सी. राजा, पा. ना. राजभोज, पुढे काजरोळकर, जगजीवनराम, वगैरेंना बाबासाहेबांचे विरोधक म्हणून उभे केले. पुणे करारातून निष्पत्ती इतकीच झाली की, स्वतंत्र मतदारसंघाऐवजी, संयुक्त मतदारसंघ स्वीकारला गेला. म्हणजे बहुसंख्य स्पृश्य मान्य करतील, तो काँग्रेसाश्रयी अस्पृश्य उमेदवार निवडला जाण्याची शक्यता निर्माण झाली. डॉ. य. दि. फडके यांनी ह्याला 'स्पृश्यवर्गाच्या सावलीतले झाड' अशी अन्वर्थक व योग्य संज्ञा वापरली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गांधीजींनी दलितांवर केलेल्या, या महान अन्यायाबद्दल व फसवणुकीबद्दल, "महात्मे आले नि गेले पण अस्पृश्य हे अस्पृश्यच राहिले." अशी तिखट पण सच्ची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. जागृत विचारवंतांची ही वेदना अत्यंत बोलकीही आहे,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही ह्या देशातील शोषितांची अस्मिता आहे. अस्पृश्यांना मानवी व राजकीय हक्क मिळावेत म्हणून त्यांनी अविरत प्रयत्न केले. त्यांच्या पत्रकारितेमागेही ही प्रेरणा कार्यरत आहे. लोकसंपर्क हीच लोकजागृतीची नाही आहे हे त्यांनी ओळखले होते. त्यांचे गुरू म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीला 'दीनबंधू', 'दीनमित्र' ही वृत्तपत्रे साह्यकारी ठरली होती. पण अल्पजीवी ठरली होती. शाहू महाराजांनी दिलेल्या अर्थसाह्यातून 'मूकनायक' हे पाहिले पाक्षिक ३१ जाने. १९२० रोजी प्रसिद्ध झाले. त्यानंतर 'बहिष्कृत भारत' ही बाबासाहेब यांची पुढीच झेप होती, त्यांच्या तर्कशुद्ध रसरशीत व आर्जवी वाणीने आता मरगळलेली हतबल दलित मने जागृत होत होती. पण वृत्तपत्रांच्या इतिहासात 'मूकनायक'ला स्थान नव्हते.

'अस्पृश्योन्नती म्हणजे समाजक्रांती व ती साध्य करताना धर्मक्रांतीही करावी लागली तरी मी करीन;' असे 'बहिष्कृत सभेत' ते बोलत होते. मनुस्मृतीदहन आणि 'महाडचा सत्याग्रह' ही त्यांची क्रियाशील झेप होती. हिंदूसमाज व्यवस्थेविरूद्धच्या सामूहिक लाव्हाचा हा स्वळाळ होता. मंदिरप्रवेश, पर्वती देवालयप्रवेश, नाशिक काळाराम मंदिरप्रवेश; ह्या अनेक चळवळींचे महाडचा संग्राम हे पहिले अमिट अक्षर होते.

मानसिक गुलामगिरीविरूद्धचा हा उद्रेक होता. दोन वर्षे चाललेल्या 'बहिष्कृत भारत' मुखपत्राचे काम चोखपणे पार पाडले होते. मुंबई विधीमंडळात बाबासाहेबांचा प्रवेश झाला होता. शेतमजूर, स्त्रिया, असंघटित कामगार, अस्पृश्य, कामगार-मालक कलह, औद्योगिक वादंग, लोकसंख्या वाढ, पोलिसी मनोवृत्ती व अत्याचार इत्यादी गोष्टी बाबासाहेबांच्या विचारांचे व वक्तव्यांचे मुख्य लक्ष्य असे.

सर्वांगीण वैचारिक प्रबोधनाला आवाहन करणारे व्यक्तित्व असेच बाबासाहेबांचे वर्णन करावे लागेल. 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' हे त्याचे जीवनाचे संदेश सूत्र होते. त्यासाठी त्यांनी रात्रशाळा, शिक्षण वर्ग, शाळा व महाविद्यालये काढली. सिद्धार्थ आणि मिलिंद महाविद्यालये, ह्या त्यांच्याच वास्तुप्रतिमा होत. व्यक्तिगत सुखदुःखाकडे व लाभालोभाकडे न बघता त्यांची वैचारिक लढाई सतत चाललेली होती. येवले येथील १३ ऑक्टो. १९३५ च्या धर्मपरिषदेत त्यांनी (१) हिंदू देवदेवतांची पूजा न करणे, (२) हिंदूंचे सण साजरे न करणे, (३) हिंदू धर्ममंदिरात प्रवेश न करणे, असा तिसरा ठराव त्रिकलमी करून धर्मांतराची घोषणा केली होती. ३१ मे, १९३६ ला अखिल मुंबई इलाखा महार परिषदेत लोकांच्या अनेकानेक प्रतिक्रियांवर येवल्याचीच घोषणा पुनरूक्त करीत म्हटले होते, "माणूस धर्माकरता नाही तर धर्म माणसाकरता आहे. माणुसकी प्राप्त करून घ्यायची असेल तर धर्मांतर करा!"

देव, धर्म, शास्त्रे, शास्त्री, नेते, त्यांची मनोवृत्ती व काँग्रेस याबाबत डॉ. आंबेडकर अनुभवाने उद्विग्न, उदास बनले होते, धर्मांतरच योग्य हाच त्यांना त्यावर उपाय वाटत होता. तोच त्यांनी नागपूरच्या धर्मचक्रपरिवर्तनाने प्रत्यक्षात आणला.

धर्मांतराचा निश्चय केल्यानंतर त्यांनी आपल्या ज्ञातिबांधवांचे व देशाचेच नव्हे तर पूर्वधर्मीय हिंदूबांधवांचेही हित लक्षात घेतले. समानता, शांतता, सहजीवन, सहिष्णुता व बौद्धिक तार्किकता यांना प्रमुख स्थान देणाऱ्या गौतम बुद्धाच्या बौद्ध धर्माचा त्यांनी स्वीकार केला. तो कर्मकांड मार्ग नसून आचरणमार्ग (धम्म) आहे असे त्यांनी स्पष्ट केले.

जगातल्या कोणत्याही बॅरिस्टराने एवढी प्रदीर्घ नोटीस देऊन कृती केली नव्हती. येवले येथील १९३५ ला केलेली जाहीर घोषणा नागपूर मुक्कामी १४ ऑक्टो. १९५६ ला प्रत्यक्षात आणली. देशाच्या स्वातंत्र्याचे दशक भरत असताना आणि प्रजासत्ताक स्वतःच सिद्ध केलेल्या अद्वितीय 'घटने'नुसार राज्ययंत्रणा पाच-सहा वर्षे कार्यप्रवण असताना हे करण्याची त्यांना पाळी आली हाच येथल्या लोकशाहीचा महान पराजय होता. इथल्या सनातन्यांचा व गतानुगतिक स्वार्थी चतुराचा अंतिम विजय होता. ज्याने हिंदू धर्म सोडण्याचे निश्चित केले होते त्याने दिलेले 'हिंदू कोड बिला'साठीची लढत अवर्णनीय होती. पंडित नेहरू व सरदार पटेल यांना २५ एप्रिल, १९४८ चे लखनौमधील भाषण खटकलेच होते. ज्यात ते म्हणाले होते. "यदि दलित वर्ग संगठित हो जाए तो नेहरु पटेल जैसी सरकार बना सकते है।" हिंदू कोड बिलातील स्त्री, तिचे

वारसाचे हक्क, पोटगी, घटस्फोट, उत्तराधिकार वगैरेबद्दलचे विचार राजेंद्रप्रसादांनाही झोंबले. समस्त कट्टर हिंदूंच्या पुरुषप्रधान मनाची ती चीड होती. नेहरू काही करू शकले नाही व डॉ. बाबासाहेबांना १९५१ साली कायदेमंत्रीपदाचे त्यागपत्र द्यावे लागले. काँग्रेसच्या ह्या नकारात्मक पद्धतीने बाबासाहेब दुखावले होतेच; पण देवासारखे उभे राहणारे नेहरू भित्रेपणाने पलायनवादी झाले. याची बोच अधिक होती. त्यातच १९५२ व १९५४ च्या निवडणुकीत त्यांना पराभूत करण्यात काँग्रेसच्या व सरकारातील उच्चपदस्थानी अधिक रस घेतल्याने त्यांना 'बुद्धधर्म स्वीकार' हाच एक पर्याय उरला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनाचा व्याप मोठा आहे. विचार भारतातील सामन्यांच्या प्रगतीचे स्वप्न डोळ्यांपुढे ठेवून केलेले असले तरी सर्वसमावेशक व प्रखर आहेत. त्यांचा 'ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार व आर्थिक गुंतवणूक' हा एम. ए. चा प्रबंध 'जातिसंस्थेचा इतिहास' हे गांधीजींना दिलेले तिखट उत्तर किंवा बुद्ध धर्म व त्याच्या संबंधात लिहिलेली तीन-चार पुस्तके या सगळ्यांत त्यांच्या प्रचंड वाचनाची, विद्वतेची व व्यासंगाची कल्पना येते.

'रानडे, गांधी आणि जीना' यांचे बाबासाहेबांनी केलेले विश्लेषण, पाकिस्तान आणि फाळणीविषयक विचार, भाषावार राज्यरचना, हिंदू स्त्रीचे उन्नयन आणि अवमूल्यन, शूद्र पूर्वी कोण होते ?', 'काँग्रेस आणि गांधींनी दलितांसाठी केले तर काय ?' 'रसेलच्या समाजपुनर्निर्माण विचारांबद्दल', 'बुद्ध आणि कार्ल मार्क्स' इत्यादी त्यांच्या ग्रंथातून त्यांचा ज्ञानार्जनाचा पल्ला किती विशाल होता आणि ते किती मूलभूत पद्धतीने विचारगाभ्याला स्पर्श करीत याचे प्रत्यंतर येते.


ज्ञान हा मानवी जीवनाचा पाया आहे अशी त्यांची धारणा होती. दारिद्र्याच्या उदात्तीकरणाला त्यांचा विरोध होता. संत-महंतांना खाऊन त्यांचे खत करणारी ही माती 'मजेशीर' आहे, याचे त्यांना भान होते. म्हणून दलितोद्धार हे त्यांनी आपले जीवतकार्य ठरवले. बहुसंख्य दलितेतर सवर्ण व दलित यांच्या बाबतीतला त्यांच्या उच्चवर्णियांचा अनुभव चांगला नव्हता. मूळ प्रश्न पाणी घालून पातळ करणे व घोळत-चिघळत ठेवणे त्यांना मान्य नव्हते.

त्यांचे आदर्श भगवान गौतम बुद्ध, म. कबीर व म. फुले यांच्या कृतीउक्तींचा व वचनांचा त्यांनी वस्तुनिष्ठ अन्वायार्थ लावला होता. इथली मोठी, ज्ञानी, गुणी माणसेही मातीमोल ठरत असल्याचा क्लेशदायक अनुभव त्यांनीच सामाजिक, राजकीय, वैचारिक, धार्मिक व सांस्कृतिक लढ्यात घेतला होता.

इंग्रजांचे शासन अनुभवताना चर्चिललाही त्यांनी ठणकवायला कमी केले नाही. स्वकियांच्या नाकर्तेपणामुळे म. गांधी, नेहरू, पटेल, राजेंद्रप्रसाद यांनाही ते विसरू शकले नाहीत. ह्या विराट देशात आचारविचारभिन्नता, अवतारी पुरुषांची किंवा तारकजन्माची वाट पाहण्याची इथली प्रवृत्ती, अनंत अंधश्रद्धा, आभाळभर अज्ञान,

गाडाभर अहंगंड व ढीगभर न्यूनगंड, परंपरेचा पगडा, भाषिक अत्याग्रह, नागरिक गुणविकासाला न मिळणारी समान संधी, आपल्या हक्काबद्दलची अनास्था, मर्यादित संधी व सर्वस्वाही सवर्ण नोकरशाही, यांनी शोषला जाणारा सामान्य माणूस, इथल्या प्रजातंत्रात स्वत्या अर्थाने स्वातंत्र्य; प्रज्ञाशील व गतीमान कसा बनणार ? याच प्रश्नब्रह्माशी ते आयुष्यभर लढा देत राहिले.

त्यांच्या निर्वाणाला तीन दशके झालीत. जन्मशताब्दीच्या उत्सवात शासनापासून तो समान्यांपर्यंत अवघे हिरीरीने भाग घेत आहेत. ग्रंथाचा आणि गौरवअंकाचा धडाका उडणार आहे. पण तरी डॉ. आंबेडकर जितके कळले त्याहून न कळलेलेच अधिक राहतील. जेव्हा जेव्हा माणुसकीवर आच येईल, लोकशाहीच्या गळ्याला नख लागेल. लोक धर्मांधतेने बेभान होतील, त्या त्या वेळी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वातील संमोहन संजीवनी बनून मानवतेला दिलासा देत राहील, यात काहीही शंका नाही.


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
संदर्भ शाखा

१०. म. फुले आणि डॉ. आंबेडकर : अनोखे गुरुशिष्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भगवान गौतमबुद्ध, महात्मा कबीर, म. फुले आणि पीडित समाज या चार गोष्टी पूजनीय वाटत होत्या, भगवंतानी दिलेल्या धम्मात सामान्य जनांनाही पटणारी ऐहिक तत्त्वशुद्धता त्यांना प्रतीत झाली. सच्या समाजसुधारक जाती-धर्मापलीकडे जाऊन अस्सेरच्या श्वासापर्यंत, सर्वस्व पणाला लावून, कोणतीही तडजोड न करता कसा संघर्ष चालवितो, याचे मूर्तिमंत उदाहरण आंबेडकरांना म. फुले यांच्या चरित्रात, चारित्र्यात व विचारात मिळाले.

म. कबीर त्यांना अनुभवसिद्ध बोलीच्या सोप्या शब्दांनी आणि मोकळ्या वागण्यांनी जटिल वाटणाऱ्या धार्मिक ताणतणावांवर कसा उतारा शोधू शकतो, यासाठी मार्गदर्शक वाटत.

शेकडो वर्षे सवर्णांच्या, धर्माच्या, ग्रंथांच्या, निर्बंधांच्या पुरोहितांच्या आणि महान म्हणविणाऱ्या छाकट्या लोकांच्या फसवाफसवीने त्रस्त होऊनही, आपले स्वयंभू अस्तित्व शोधणाऱ्या आपल्या शोषित बांधवांच्या प्रेमाबद्दल आणि सहकार्याबद्दल स्त्री असल्याने बाबासाहेबांनी प्रचंड लढे उभारले होते.

कुठल्याही दोन स्वयंप्रज्ञ व्यक्तींची स्वच्या अर्थाने तुलना करण्यात काही औचित्य नसते. त्यांच्या कार्यामध्ये दिसणारे साम्य, त्यांनी निर्माण केलेली विचारशक्ती त्यांनी उभ्या केलेल्या संस्था-संघटना, त्यांची कार्ये व मर्यादा आणि ह्या व्यक्तींना लाभलेल्या अनुयायी वर्ग, एकसारख्या वाटत असला तरी तो भिन्नही असतो. त्या दोन व्यक्ती त्यांच्या काळाच्या संदर्भातच महात्मतेला पोचलेल्या असतात. किंवा काळाच्या तुलनेनेच कालातीतही सिद्ध होतात.

म. जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या व्यक्तींचेही कार्य भिन्न भिन्न काळात आकारले आहे. पण त्यांच्यामध्ये आढळणारी वैचारिक सुसूत्रता व प्रतिकूल-अनुकूल एकात्मता विलक्षण आहे. त्यामुळे त्यांचा तुलनात्मक अभ्यास सर्व सामाजिक कार्याच्या गतिप्रगतीचा आढावा असतो. भारतीय समाजजीवनातील धार्मिक चढउतारांचा तो आलेख असतो. त्यांच्या राजकीय आशाआकांक्षांचा तो मानदंड असतो. त्यांच्या कृतिशील पुरुषत्वाचा तो पुरावा असतो. आणि सबंध समाजाच्याच सांस्कृतिक शोधांची ती नांदी ठरू शकते.

म. फुले हे अव्वल इंग्रजीच्या काळातले सुधारक होते. इंग्रजी राज्य आल्यामुळे

येथल्या विशिष्ट वर्णियांची व वर्गियांची संकुचित स्वार्थी सत्ता संपुष्टात येणार, माणसांचे नष्टचर्य संपणार, अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे लोकहितवादींप्रमाणेच ते इंग्रजी सत्तेचे स्वागतकर्ते झाले. समाजाची पुनर्रचना होण्याचा आता शुभारंभ होईल, असे त्यांना वाटले. पण कोणत्याही सत्ताधाऱ्यांप्रमाणे त्या देशातील सबळांचा, बुद्धिमंतांचा व त्यांच्या गुणावगुणांचा, कल पाहून बदलण्याचा किंवा धोरणे आखण्याचाच प्रघात येथे इंग्रजांनीही स्वीकारला होता. 'प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे' असे फुले यांचे मत होते. 'कनिष्ठ वर्गातील शिक्षकच नेमावेत' असा त्यांच्या आग्रह होता. हंटर कमिशनला सूचना करताना, साक्ष देताना याची नोंद सापडते. परंतु इंग्रजांना शिक्षणाचा प्रसार वरिष्ठ थरात करायचा होता. पाश्चात्य विद्यांचा व त्यांच्या संस्कृतीचा 'डोस' त्यांना दिला, की त्यांचे काम होणार होते. मा. स्टु. एलफिन्स्टनच्या उद्‌गारात याची ग्वाही पटते. कारण 'अस्पृश्यांच्या मुलांना शिक्षण देऊन तयार केले तर त्यांना सरकारी कारभारात पदाधिकारी म्हणून नेमावे लागेल. त्यामुळे हिंदू लोक चिडून जातील. यामुळे सरकारला राज्यकारभार करणे अशक्य होईल. ह्या धोरणामुळे, म. फुले यांच्या शिफारसींचा, प्रत्यक्षात उपयोग झालाच नव्हता.

तत्कालीन सामाजिक स्थितीचा प्रत्यक्षानुभव म. फुले यांनी घेतला होता. पित्यापासून पोरवय पुरते न संपलेल्या बायकोस घेऊन, त्यांना वेगळे निघावे लागले होते. मित्राच्या लग्नात अपमान व मारझोड सहन करावी लागली. पुढे तर अनेकांशी धर्मविषयात मतभेद निर्माण झाल्याने, कर्मठ पुणेकर विरुद्ध फुले पतिपत्नी असे दृश्य काय झाले. मारेकरीही घातले गेले आणि त्यांच्यातून ते निभावलेही. पण ईश्वराचे अस्तित्व फुल्यांनी कधीही नाकारले नाही. वेद, उपनिषदे, स्मृती, पुराणे यांच्या प्रामाण्याला, त्यांनी कित्येक प्रश्न विचारले. त्यातील स्वीकृत सिद्धांतांना ठणकावून आव्हान दिले. पण 'निर्मिक' त्यांनी मान्य केला. सर्वसमावेशक 'सार्वजनिक सत्यधर्म' त्यांनी प्रतिपादन केला. कारण कोण्याही मध्यस्थाशिवाय परमेश्वर भेटायला हरकत नाही असे त्यांचे प्रांजल मत होते.

'सर्वसाक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्थी ॥' असे ते नमूद करतात. धर्मसंशोधन व रूढ विचारांचे परिष्करण आणि नवा अन्वयार्थ लावण्याचे धारिष्ट्य, ह्यातच फुले यांचे द्रष्टेपण सामावलेले आहे. छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा, यातील शिवाजीचे राज्य व पेशव्यांचे राज्य, या भिन्न गोष्टी आहेत. रामदास हे लोकप्रीतीसाठी त्यांनी गुरू मानले होते. प्रत्यक्षात नाहीच; पोटासाठी सर्व सोंगे आणून पूजाअर्चा करणाऱ्या, 'ब्राह्मणाचे कसब' त्यांनी वेशीवर लटकावले, 'शेतकऱ्याचा आसूड' फटकारला, 'गुलामगिरी' परखडपणे वर्णिली, 'अखंड' व 'सत्सार' मधून जो 'इशारा' त्यांनी दिला; त्यात त्यांच्या व्यापक दृष्टीचा व कणखर व्यक्तिमत्त्वाचा गाभा प्रकट झाला आहे.

'स्त्री' व तिची स्थिती, हा फुले यांच्या चिंतनाचा, चळवळींचा व कृतीचा महत्त्वाचा विषय आहे. स्त्रीशिक्षण, बालविवाह, पुनर्विवाह, विधवाश्रम, बालकाश्रम,

बालजरठविवाह, बहुपलिकत्व, पुत्रजन्माची कुलोद्धारक अभिलाषा, या त्यांच्या कार्याच्या महत्त्वाच्या दिशा म्हणाव्या लागतील.

शूद्रातिशूद्रांच्या मुलींसाठी शाळा सुरू करणारा पहिला भारतीय, असे म. फुले यांचे वर्णन करावे लागेल. स्त्रीशिक्षण, हा भारताच्या अवनतीवरला तोडगा मानणारा विचारवंत आणि त्यांच्या हक्कांबद्दल व स्त्रियांच्या स्वातंत्र्याबद्दल, आवेगपूर्ण कृती करणारा महापुरुष, असे त्यांना संबोधावे लागेल. शेतकरी कामगार व दलित-ब्राह्मणेतर यांच्या दुःखावर, दारिद्र्यावर व त्याला कारण होणाऱ्या स्थितींवर आणि बांडगुळांवर आघात करणारा पहिला सर्जक कुशल माळी, असे त्यांचे सार्थ वर्णन करावे लागेल.

हा देश जनसामान्यांचा, त्यांच्यात मूलगामी बदल झाल्यास व ते संस्कृतिसबल झाल्यासच, ह्या देशाला मूल्य प्राप्त होणार, अशी त्यांची धारणा होती. वयाच्या वीस-एकविसाव्या वर्षी त्यांनी सार्वजनिक जीवनांत प्रवेश केला. आणि चाळीस वर्षे या एकाच ध्येयाने ते एकाकी लढत राहिले. त्या त्या काळातील तथाकथित ज्ञान्यांशी व विचारवंतांशी निडरपणे झुंजत राहिले.

'महार-मांग-चांभार' हे या देशात फार असून ते अगदी नीचावस्थेत आहेत. हे पाहून ईश्वराच्या प्रेरणेने माझ्या मनात अशी प्रेरणा उत्पन्न झाली की अशांना सुशिक्षित करण्याविषयी काहीतरी उपाय योजावा.' मेजर कँडीच्या अध्यक्षतेखाली झालेल्या, सत्कारभाषणात त्यांचे मनोगत सुस्पष्टपणे सांगितले आहे.

मनुष्य हा केंद्रबिंदू मानून, त्याच्या व्यवसायात मानवधर्म असतो, असा कर्मवादाचा नवा अन्वयार्थ महात्मा फुले यांनी प्रसृत केला होता. विवाहसंस्था, तिचे महत्त्व व माहात्म्य आणि तिची वैगुण्ये, यावर त्यांनी प्रदीर्घ चिंतन केलेले होते. मानवाविषयी आस्था ठेवणारे त्यांच्या पद्धतीचे एक अनोखे आस्तिक, असे त्यांना म्हणावे लागेल. धार्मिक, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक व लेखनविषयक, अशा सर्व सांस्कृतिक चळवळींशी, फुल्यांचा अतूट असा संबंध होता. आपापल्या मतांचा प्रसार करण्यासाठी-जनसंवादासाठी, नियतकालिकाचे महत्त्व, त्यांनाही पटले होते. 'सत्सार' च्या अंकातही, याचे प्रत्यंतर येते.

इ. स. १८४८ ते १८९० या कालखंडातच नव्हे, तर पुढे येणाऱ्या अवघ्या भविष्यालाच जागृत करण्याचे, गतिमान करण्याचे, महत्कार्य त्यांनी केले. त्या काळातील दीनदुबळ्या जनसामान्यांचा प्रातिनिधिक आवाज म्हणजे फुल्यांचे आयुष्य. सुजाण मनुष्य भोवतालाची गरज समजावून घेऊन, मगच आपले कार्यक्षेत्र निवडतो. म. फुले यांनी निवडलेले क्षेत्र नुसते फुललेच नाही; तर महाराष्ट्राच्या परंपरावादी, कर्मठ व प्रतिगामी मातीत पेरण्यासाठी त्यांनीच नव्या विचारांचे चांगले बियाणे उपलब्ध करून दिले.

विवेकवादाचे व चिकित्सक वास्तवाचे जे नवे युग, पुढे निर्माण झालेले आढळते; त्याला कारण ठरलेल्या विचारवंतांच्या नामावलीत म. फुले आणि त्यांचे व्यापक

कर्तृत्व, केवळ अलौकिक आणि अजोड आहे. असेच कृतज्ञतापूर्वक नोंदण्याखेरीज कुणालाच पुढे सरकणे शक्य होणार नाही.

म. फुले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वैचारिक गुरू मानले होते. रावबहादूर बोले यांच्याही कार्यापासून त्यांनी प्रेरणा घेतली होती. त्यामुळे म. फुले यांच्या चळवळीचे रहस्य आंबेडकरांनी ओळखले होते. समतेच्या चळवळीला तत्त्वांपेक्षा प्रत्यक्ष कृतीचा व तिच्या फलनिष्पत्तीचा आधार असावा, हा त्यांचा आग्रह होता. म्हणूनच स्वतः अर्थशास्त्र, समाजशास्त्र व राज्यशास्त्राचे व्यासंगी असूनही त्यांनी, कार्ल मार्क्सच्या विचारांना, भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात नाकारले होते. समतेच्या चळवळीला अग्रक्रम देताना तिला कालोचित स्वरूप त्यांनी दिले. शोषण करणाऱ्या, वर्ग, वर्ण, व्यवस्था व साम्राज्यसत्ता, ह्यांविषयी ते कडवे होते.

ज्ञान हा मानवी जीवनाचा पाया आहे, पण त्याचे परिष्करण करून घेतले पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. पण ज्ञानाबद्दलची पारंपरिक समजूत व पारंपरिकांनी सांगितलेले ज्ञान, त्यांना अनुपयुक्त वाटे. म्हणून धर्मतत्त्ववेष्टित नीतीतत्त्वांना त्यांचा विरोध होता. फुले आणि बाबासाहेब यांबाबत समआग्रही आहेत. दारिद्र्याचे उदात्तीकरण करणे व त्याला पावित्र्याची गोंडस गुलाली पुटे चढवणे, त्यांनी निग्रहाने व सातत्याने नाकारले. आपला समाज शिकल्याशिवाय तो उठून उभाच राहणार नाही, अशी त्यांची विचारसरणी होती. म. फुले यांच्याप्रमाणे त्यांनी कामगार-शेतकरी, पीडित असा तळागाळाचा वगैरे अकारण व्यापकतेचा डोलारा उभा केला नाही. कारण संत-महंतांना खाणारी ही भूमी आहे. दैवतीकरणाच्या नादाने निष्क्रियतेला जन्म देण्याची तिची प्रवृत्ती आहे, हे त्यांना त्यांच्या अभ्यासातून कळले होते. त्यामुळे ज्यांच्यावर निश्चित-पद्धतीशीर अन्याय झाला आहे, त्या दलितांच्या बाजूचे ते उभे राहिले. तेली-तांबोळीही शोषकांच्या प्रसादासाठी अन्याय करणारांच्याच बाजूने उभे राहतात. म्हणून दलितोद्धार हे जीवितकार्य त्यांनी निश्चित ठरवले होते. तेल्या-तांबोळ्यांच्या पुढारीपणापेक्षा 'द लितांचे बाबा' बनणे, त्यांना आगत्याचे वाटले. कारण त्यांचा अनुभव बहुसंख्य दलितेतर सवर्णांच्या बाबतीत फारसा चांगला नव्हताच. अनुभवातून-जळणेपणातून जे त्यांना मनोमन कळले होते; तेवढेच, ईप्सित त्यांनी निश्चित केले होते. तत्त्वांचा वा मानवतेचा, मूळ प्रश्न 'पचक' करणारा पायघोळ झगा, त्यामुळेच त्यांनी झुगारला. 'महात्म्यां'चे भूतकालीन अपयश म. फुले यांच्या बाबतीत, तर समकालीन म. गांधींच्या बाबतीत त्यांनी अनुभवले होते. त्यातूनच त्यांनी दलित समाजाला 'शिका, संघटित व्हा व चळवळी करा' असा कृतीमंत्र दिला.

वर्णवर्णरचना हे आदर्श गृहीतक धरून पुरुषसूक्ताचे पठण करणे व ते मानव्याला स्पर्श करणारे आहे, असे सांगणे, ही राजकीय हातचलाखी बाबाहेबांना वाटे. मानवता दडपणारी व इतरांना गुलाम ठेवण्यासाठीच शस्त्र, शास्त्र, ऋचा, स्मृती, मंत्र व कर्मकांडाचे पालन करणारी हिंदू संस्कृती, ही खऱ्या अर्थने सुसंस्कृतीच नव्हे, हेच त्यांनी सप्रमाण स्पष्ट केले आहे. वर्ण केव्हातरी गुणांवर अधिष्ठित असेलही, पण

जाती ह्या धर्मावर अधिष्ठित आहेत. यांची साखळी तोडल्यासेरीज, ह्या देशाला 'राष्ट्र' संज्ञा प्राप्त होणे नाही, असे त्यांचे स्पष्ट मत होते. 'जातिप्रेम हाच लोकशाहीवर, मूले कुठार ठरल्यासेरीज राहणार नाही', या त्यांच्या उक्तीचा प्रत्यय सध्या आपण अनुभवतच आहात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तथाकथित आदर्शांची मोडतोड स्वाभाविक मानली. ब्रह्म, आत्मा, मायावाद, विश्वोत्पत्ती, ईश्वरी अस्तित्व ह्या गोष्टींचा याच दृष्टीने त्यांनी विचार केला. 'हिंदू समाज हे विषमतेचे माहेरघर आहे,' हा निष्कर्ष यामुळेच त्यांनी निश्चितपणे काढला. त्याची पुनर्रचना करण्याचा खटाटोप, हा जळक्या भाकरीतून पीठ काढून मांडे बनविण्याचा अट्टाहास ठरेल, अशी त्यांची खात्री पटली. यातूनच, 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही', ही प्रतिज्ञा साकारली.

स्त्रीविषयक बाबासाहेबांचे विचार उदात्त आणि मननीय आहेत. दलित स्त्री ही हिंदुस्थानातील कारुण्याची व मूक सोशिकपणाची कमाल मर्यादा आहे, असे ते म्हणत असत. आपल्या पतीला श्रम करायला प्रवृत्त करा. त्याच्या व्यसनीपणावर अंकुश ठेवा. संततीच्या शिक्षणसवयीवर जागता पहारा ठेवा, असा त्यांचा संदेश आहे.

ज्या पददलित वर्गाच्या उन्नतीसाठी, त्यांनी आपले आयुष्य खर्चिलेच त्यांच्या मानसिक मशागतीचीही काळजी बाबासाहेबांनी घेतली. 'शूद्र पूर्वी कोण होते ?' या त्यांच्या ग्रंथामध्ये त्यांनी इतिहासाच्या अनेक अर्धज्ञात दालनांना नवा अर्थ व झळाळी दिली. 'भारतातील जातीसंस्था, व्युत्पत्ती आणि यंत्रणा' या ग्रंथातही त्यांची प्रतिभा दिसून येते. कायद्याने जातीव्यवस्था संपली, पण प्रत्यक्षात काय ? खेड्यापाड्यात, समाजाच्या प्रत्येक थरात, नोकरी, बढती, शिक्षणक्षेत्रात, जितका आत्यंतिक द्वेष करता येईल व ज्यांनी हजारो वर्षे शोषण केले, तेच सगळे शत्रू बनून, रक्त काढून घेतलेल्या लोकशाहीची, न्याय-समतेची, पद्धतशीर गठडी वळत आहेत. वर्गयुद्धाशिवाय किंवा आत्यंतिक रक्तपाताशिवाय सवर्ण मनातला हा विखार निघणेच अशक्य दिसते. आत्यंतिक आत्मविरोधी विधाने करण्यात कोणीही मागे नाही. 'जो हात कुत्र्याच्या स्पशनि विटाळत नाही तो हात आंबेडकरांसारख्या शुचिर्भूत विद्वानाच्या स्पशनि विटाळतो असे म्हणणारे बुद्धिभ्रंश झालेले होत,' असे सांगणारे सावरकर, 'धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर,' अशी भूमिका घेतात. हा इथल्या बुद्धिवादाचा व तार्किकतेचा दारुण पराभव आहे !

येथल्या दलित वर्गाच्या हक्कांसाठी आंबेडकरांनी अनेक लढे दिले. मंदिरप्रवेश, न्याय्य मागण्या, समान हक्क, रास्तीव जागा, उन्नतीचे बहुविध मार्ग, त्यांनी हाताळले. पण हा येथल्या बरड भूमीत शक्तीचा नाशच ठरल्याचा त्यांना अनुभव आला. रानडेयुग हे ज्ञानसंपन्न आणि तमोनाशक होते; तर गांधीयुग अर्धनग्नतेचे, दिखाव्याचे आणि तात्त्विक हेराफेरीचे आहे, असे त्यांनी सूचित केले ते यामुळेच.

परंतु लोकशाही समाजरचनेवर त्यांचा प्रगाढ विश्वास होता. उदार मतवादी

दृष्टिकोण, हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांनी ब्राह्मणांचा द्वेष केला नाही. ब्राह्मण्याचा द्वेष केला. फुल्यांमध्ये आणि बाबासाहेबांमध्ये हा फरक आढळतो. इतर अनेकांच्या सहकार्याला ते स्वागतशील होते. चवदार तळ्याच्या पाण्याच्या सत्याग्रहाच्या वेळेस, बाबासाहेबांनी आपल्या शंकेखोर कार्यकर्त्यांना दिलेले उत्तर, त्याचेच द्योतक आहे. सर्वांच्या सहकायनिच इथल्या अस्पृश्यतेला हादरे देणे शक्य आहे ह्या भावनेनेच ते वागले. धर्मांतर करतानाही भारतीय मनाच्या जडणीघडणीचा व देशहिताचा विचार त्यांनी मोलाचा मानला. त्यांच्या दूरदृष्टीमुळे सामाजिक संतुलन व सामंजस्य कायम टिकले. भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व सांगतानाही, त्यांनी स्थानिक मनोवृत्तीचे विकसनशास्त्र व सामूहिक विकाससूत्रच महत्त्वाचे मानले होते.

मनुष्यनिर्मित अस्पृश्यतेच्या विरोधात फुले आणि आंबेडकर, माणसांसारखे ठाम उभे राहिले हेच त्यांचे महामानवत्व आहे. सोयी-सवडीप्रमाणे किंवा अन्य काही करायला, सरकारने अटकाव केला म्हणून, अस्पृश्यतेवर काम करणाऱ्या वृत्तीचा, त्यामुळे त्यांना वारा लागला नाही.

ह्या दोघांची कार्यक्षेत्रे एकदुसऱ्याचाच विचार सुरूंगाच्या दारूसारखा सतत कार्यवाहीत आणण्यासारखी पूरक आहेत. प्रत्यक्ष संबंध न येताही दोन विचारवंत कसे एकरूप पावले होते, याचे प्रत्यंतर त्यांच्या कार्यप्रणालीतही आढळते. ते असे गुरुशिष्य आहेत की, क्रिया आणि वाचा एकत्र कशी वापरावी याचे लोकविलक्षण आणि अनोखे उदाहरण म्हणावे लागेल. म्हणूनच त्यांची तुलना होऊही शकते आणि नाहीही. प्रत्येकजण स्वतंत्रपणे मार्गदीपच आहेत.

महात्मा जोतीराव गोविंदराव फुले आणि डॉ. भीमराव रामजी ऊर्फ बाबासाहेब आंबेडकर या दोघांच्या तुलनात्मक अभ्यासाचे, आणखी एक सूत्र असे सांगता येईल की; 'माणूस आणि ध्येयप्रवणता' (Man and Mission) त्यांनी ओळखली होती. पचवली होती.

परकीय जोखडाखाली असलेल्या देशाचे स्वातंत्र्य बाबासाहेबांनी पाहिले आणि त्याचे अपयशही अनुभवले. विशाल भूप्रदेश, नाना धर्माचे लोक, सरंजामशाही समाजव्यवस्थेची सवय, अंधश्रद्धांचा पगडा, परंपराप्रियता, भाषिक आग्रह-दुराग्रह, विभाजित मानसिकता, समाजधारणेच्या पोषणाला कमी पडणारी अंगे, नागरिक गुणांच्या शिक्षणाची कमतरता, धंदा निवडण्याबाबतची मर्यादित संधी, लग्नबंधनांची भक्कम चौकट आणि हक्कांबद्दलची अनास्था आणि काही नसण्याचाच वृथा अभिमान, इत्यादी अगंस्य घटकांनी, शतकानुशतके ग्रासलेल्या इथल्या मातीत, मातीमोल ठरलेल्यांना, 'माणूसमोल' ठरवण्याचा लढा, हा विलक्षण होता.

माणुसकीचा व मानवी मूल्य स्वच्या अर्थाने प्रस्थापित करणारांचा, अत्याधुनिक आणि वस्तुनिष्ठ इतिहास जर लिहिला गेला, तर म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ह्या दोन मर्दांची नावे ठळकपणाने नमूद करावीच लागतील यात शंका नाही.



११. बाबासाहेब ! आपणास सांगू तरी कसे ?

बाबासाहेब !

आपणाला नुसते ' बाबा ' लिहायलाही हाताला अवघड वाटले. ' प्रिय बाबा !' असे म्हणायला कसेसे वाटले. आपण इंग्रजीतून प्रामुख्याने लेखन केलेत, हे मी जाणतो. पण असे विशेषणासह संबोधन वापरायला परकेपंगूपण खटकले. आता तर, चाळीस वर्षापूर्वी ज्या देशात, आपण जोजवून फुलविलेली, घटना प्रत्यक्षात आली, त्या देशाने; आपणास जवळजवळ तितकीच वर्षे सवयीने दूर ठेवल्यानंतर, आपणाला ' भारतरत्न ' हा किताब बहाल केला.

ह्या जुन्या हिंदुस्थानात, नव्हे भारतात, तुमच्या कोट्यवधी पुत्रपौत्रांपैकी, मी एक आहे. तुम्ही आमच्यात पेटविलेल्या धगीने आम्हाला शाळा कॉलेजचे दरवाजे मोकळे झालेत. उच्च तंत्रज्ञान, अणुविज्ञान, अवकाशऊर्जा, इंजिनियरिंग, मेडिकल किंवा अशा काही खास जागात योग्यता, नियमपात्रता असूनही शक्यतो खूप अडवाअडवी होते. तुम्हाला चवदार तळ्यावर, नाशिकच्या, अमरावतीच्या, पर्वतीच्या किंवा मुंबईच्या देवळात हक्क म्हणून जाण्यासाठी अटकाव केला होता ना, तसाच; हा प्रकार आहे. नावा-अडनावामुळे असली मुले बहुतेक जागी अकारण कट करून रखडवतात.

नाही म्हणायला झाडूवाले, हरकामी नोकर, सफाई कामगार, या अशातशा मामल्यात काही माणसे भरतात. बिगार काम ओढणारे कारकूनही उचलतात. आताशा ' लिपिक ' म्हणतात बर का ? बाकी काय काय युक्त्याप्रयुक्त्या शोधून काढतात, ते सांगत बसलो तर तुम्हालाच काय, आम्हा अनेकांना आळीपाळीने थकवा येईल. आपली जात कळून ज्यांच्या स्वर्गस्थ आकाशातला सूर्य ढळून पळून जात असे, ते बरेच लोक आता असे दास्खले, हितसंबंधी भावाबंदांकडून करवून घेतात. आपणास हे वाचून खरे वाटणार नाही, पण कोणतीही जात स्वीकारायला, नोकरी-डॉक्टरी-इंजिनियरीसाठी तरी; उतीम लोक, जात घेऊ लागले, हे कळून वाटेल का बरे? तुकारामांच्या अभंगवाणीचा हा उलटा प्रवास आहे. तेव्हा होते -

' आपणासारिखे करीती तात्काळ ' आता मात्र झाले - ' तयांच्यासारिखे होताती तात्काळ ' । .... अशी आहे समतेची गतीरीती.

समतेच्या महान मूल्यांसाठी आपण आयुष्यभर लढलात. आपण एकटे होतात,

सर्वार्थाने एकटे. पण तुमची झुंज मात्र निकराची होती. अनेकाच्या मानासाठी अर्थपूर्ण होती. आता अनेक क्षेत्रात कितीतरी टकरतात, डरकावतात. घुरघुरतात गुर्कावतात. पण बहुतेकांची लढाई, आपल्याच स्थानांसाठी स्वार्थपूर्ण आहे. समतेचा आग्रह धरणारे आम्ही छोट्याछोट्या महामंडळावर समाधानी होतो. आता आम्ही मागासवर्गीयांतील जाती-पोटजातीने नवे नवे गट केलेत. प्रांतांचे काय घेऊन बसलात, बाबा ! आम्ही जिल्हावार-तालुकावार विस्तार केला. बिशाद आहे वऱ्हाडाचा माणूस कोकणाच्या लाल मातीत स्वपण्याची? आमच्या शिक्षणसंस्था; वस्तुतः मूळच्या केव्हाच्या तरी तुमच्या, असे काही, स्वपायला टेकलेले म्हातारे बोलतात. ते जाऊ द्या. आम्ही प्रदेश जिल्हावार-बजायवार रास्वतो. नाहीतरी रास्वीव जागांचे सूत्र आपण शिकवून ठेवलेच होते ना ? तेव्हा तुम्ही एकटेच 'साहेब' होतात. आता इतके नावाचे साहेब झालेत राव की कॉम्प्युटर कॅसेटवरही मावत नाही त्यांचे सर्वांचे नाव. सगळ्यांचेच हात आता स्विशाकडे सरकतात. बाबा ! आपलेच काय आमच्या अणकुचिदार स्वाऊ तोंडामुळे बहुतेकजण चरकतात.

बाबा ! आम्ही स्वतंत्र आहोत. स्वतंत्र भारताचे पूर्ण स्वतंत्र नागरिक. तुम्ही धार्मिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक अशा स्वातंत्र्याचे मोल मागण्यासाठी धडपडत होतात. आम्ही आपापले मोल घेऊन, इतरांच्या जाऊ द्या आमच्याही मनातून धडाधड पडत आहोत. नगण्यांची गणना तुम्हाला लोकगणतीत करायची होती. आपण तिरस्कृत बहिष्कृतांना सुकृतपापांच्या पिळातून बाहेर काढीत होतात. गावाबाहेरच्या अंधारात भयभीत वाकलेल्या मुजरेकऱ्यांना तुम्ही न्याय लोकशाहीचा समाजवादी सूर्य दास्वंून भयमुक्त करण्यासाठीच आपल्या जिवाचे रान केलेत. आता गावागावात अंधार वाढला आहे. दिल्लीचा धाकदरारा नाही. गल्लीतले ग्रामसिंह देठापासून भुंकतात. घटनेची दरदिवशी विघटना होते आहे. दुरुस्तीची इतकी ठिगळे तिला आता लागली आहेत की; तिचे भर्जरी महानपण पार गढाळून गहाण पडले आहे. संसदेत, लोकसभा-राज्यसभेत तर कोणाचा डाव आणि कोणावर राज्य हेच कळत नाही. निवडून दिलेल्या मतदार लोकांना कोलून बटु-पटू हवा तो खेळ हवातसा खेळतात. आसनशुचितेचे सर्व नियम बासनात बांधून माणसे उसळतात. तत्त्वाऐवजी एकमेकांनाच घुसळतात. खो-खो, आट्यापट्या कबड्डी, लंगडी, संगीतखुर्ची असा अवघाचि सुखाचा संसार आता दिल्लीत चालत असतो.

बाबा ! आपण हक्कांची जाणीव दिलीत. आम्ही आता तर्पणाचे उदक सोडत असतो. आपण आणि आपले सर्वदूरचे साधेसुधे एकनिष्ठ सैनिक, रक्ताचे पाणी करून, मानवमूल्यांसाठी ठाम उभे ठाकला होतात. 'आलात तर तुमच्यासह नाहीतर एकटाच !' अशी आपली जिगर होती. आता आमच्या अवतीभोवतीच्या आपल्या माणसांचे काय सांगू ? कायदेमंत्री असताना केवळ आपल्या नावाचा उल्लेख, एका उद्योगपतीला करायचा होता. तुमची वाटेल ती अट आणि तुमच्या मुलाला डायरेक्टरच नव्हे, तर उद्योगात भागिदार करायला, त्याची तयारी होती. आपण म्हणाला होता,

' माझ्या मुलाने भीक मागितली तरी आपणाला लाज वाटणार नाही, पण असे होणार नाही. '

आता आपले लोक, फार स्वतंत्र विचाराचे झालेत. काही कुठे केव्हा मिळवा-करायचे झालेच तर आप्तस्वकियांचा दूरदृष्टीने विचार करतात. शाळा चालवायची तर स्वतः संस्थापक होतात. पली अर्थातच प्राचार्य-प्रमुखाध्यापक असते. मेहुणा किंवा धाकटा भाऊ सजिनदार, कार्यवाह अथवा संस्थाधीपाल म्हणून बसतो. जावई किंवा पुतण्या सल्लागार - स्वीय सचीव होतो. भाचे-मुले-मुली कार्यकारिणी, वाचनालय, स्वरेदीस्थान अशा स्थानी आजीवपदी आरुढ होतात. सहकाराचा असा नमुना, बाबा ! क्षमा करा, आपल्या कल्पनेतही आपण आणू शकला नसतात. आणि आपण असल्यापासूनच तर.... सुरू होताच ना ? ' प्राब्लेम ऑफ रूपी ', अवमूल्यनचा विचार. म्हणूनच मला वाटले प्रत्येकाने वाचला ' थॉटस ऑन....' ते स्वरेच ' पाकिस्तान ' होते की, नुसते ' स्थान ' होते? आणि ' ॲनिहिलेशन ऑफ कास्टस् ' होते की ' कॉस्ट ? '

बाबा ! होते काय हल्ली छपाई फार बिघडली आहे. बहुतेक स्विळे झिजले आहेत. टेंडर मागवून छपाई करण्याची, पुस्तके विकण्याची पद्धती, देशभरच्या परिषदा-पंचायत राज्यात सरसकट चालू आहे. आणि हे तंत्र, फार लोकप्रियही होतेच आहे. स्वातंत्र्यापासून आम्ही आता इतकी वाटचाल केली आहे की, डोळे तसे अधूच झाले आहेत. बाबा ! आपल्यावेळी चष्म्याच्या किंमती तशा माफकच होत्या. आता काय महाग आहेत ! आणि ' फ्रेम ' तर अशा झपाट्याने कात टाकून नवनव्या चढत्या-वाढत्या किंमतीच्या व फॅशनच्या येताहेत की, सगळेच ठरलेले चौकटीतले क्षर होऊ लागले आहे. म्हणून समजा, काही शब्द आणि काही अक्षरे, तुमच्या मूळ लेखग्रंथातली इकडेतिकडे गेली, सरकली तर काय हो झाले ? आणि बाबा ! तुमच्यासारख्या सूटबूट कोटातला पेनबिन लावलेला आमच्या; भाऊसाहेब, दादासाहेब वगैरे-ऐरे साहेबांचा फोटो, तुम्ही पहायला हवेच होतात. त्यांनी दिलेली ' पोझ ' आणि हसरा चेहरा, इतका तेजस्वी आणि राजबिंडा वाटतो की.... पण आता आपणाला तरी दुसरे काय जमणार होते ? पुस्तकातच सगळा पैसा आपण संपवून टाकत होतात म्हणे.

बाबा ! आपण लिहिलेली घटना, तिचा सरनामा, त्यातील व्यक्तीप्रतिष्ठा, ही अप्रतिम गोष्ट आहे, असे मला कळायला लागल्यापासूनच मी ऐकतो आहे. मग प्रत्येकवेळी घटना दुरुस्ती का हो करावी लागते ? की आपण केलेली मूळ घटना, अनेक शतके बांडगुळे बनून शोषण करणारांच्या, मुळावर तर येत नसेल ना ? तुम्ही ' हिंदु कोड बिल ' मोठ्या परिश्रमाने सिद्ध करून मांडले होतेत. पंतप्रधान नेहरुंनी त्याचे आरंभी कौतुकही केले होते. पण त्यांची मर्जी, पुढे बदलत गेली. सरंजामदार, जमीनदार आणि उच्चकुळीच्या अनेकांच्या मर्जीपुढे, नेहरु चाचा जाऊ शकले नाही. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल आणि राष्ट्रपती राजेंद्रप्रसादही, त्या बिलाच्या विरोधात होते. तसे त्यांचे बरोबरच होते ना ? शोषक-शोषित, श्रीमंत आणि आश्रित एका मापाने मोजले जाऊ लागले, स्त्री वाटेकरी कायद्याने ठरली, तर पुरुषप्रधान

संस्कृतीचे काय होणार ? धर्माच्या नावाच्या लबाडीचे कसे होणार ? त्याच्यावर हितरक्षण करतील म्हणून निवडून देणाऱ्या, बहुसंख्य मतदारांची वंचना नाही का होणार ? त्या बिलाला कोडाच्या रोग्यासारखेच मग कुजवले गेले. ते हे असेच झाले ना ?

बाबा ! म्हणूनच आपण ज्यांना गुरू मानता, ते म. फुले; काँग्रेसला 'शेटजीभटजींचा पक्ष' म्हणायचे का ? हरिजनोद्धाराच्या स्वप गोष्टी करणारे गांधीजी आपला का प्रचंड राग करीत होते? त्यांच्या नेतृत्वाची जी टिमकी त्यांनी ब्रिटीश सरकार व पार्लमेंटपुढे मिरवली होती, तिला तडाच जात होता. पुढे देशाच्या फाळणीला कारण होणाऱ्या मुस्लीम लीगचे नेते बॅ. जिना यांना सामील करून, त्यांनी दलितांच्या अस्पृश्यांच्या राखीव मतदारसंघाला विरोध केला. मुसलमानांसाठी तो मान्य केला. दलितांना-अस्पृश्यांना मिळण्याची शक्यता निर्माण झाली असता, महात्माजींनी प्राणान्तिक उपोषणाचे अस्त्रेचे अस्त्र त्यांनी उगारले. आणि बाबा ! पहिल्यांदाच तुम्ही अत्यंत दुःखी झालात. 'महात्मा' वगैरे बरेच शब्द हे बहुतेकवेळा अजागळासारखी विशेषणेच असतात, याची आपली गांधीजीच्या वागण्याने खात्रीच झाली. यालाच इथे श्रेष्ठ परंपरा म्हटले जाते बर का ?

आणि बाबा ! आपणाला 'देशद्रोही, इंग्रजांनी विकत घेतलेले, अदूरदर्शी, स्वार्थी, संकुचित,' अशा दूषणांच्या चिंध्याही पत्करावया लागल्या. बाबा ! आपण परिनिर्वाणास जाऊन पस्तीस वर्षे झालीत. त्यावेळी मी विशीमिशीचाही नव्हतो. तरी आपल्या तेव्हाच्या अवहेलनेच्या ज्वाळा मी समजू शकतो. पण येथली श्रेष्ठ आणि उज्वल परंपराच अशी आहे ना. ज्यांच्या बुडाखाली अंधार त्यांनीच कांगावा करायचा. ज्यांनी शोषणादी अन्य मार्गांनी काळा पैसा कमवायचा त्यांनीच; ट्रस्ट, धर्मशाळा, बक्षिसे, दान व अन्नछत्रे उघडायची. देशभक्त म्हणून मिरवायचे. त्यामुळेच, लोकहितवादी, म. फुले, राजर्षी शाहू यांच्यावरही असेच आरोप नेहमी होत गेले. आणि प्रतिगामी मनोवृत्तींच्या मालाकारांचा आणि अशाच मतलब्यांचा यात नेहमी मोठाच सहभाग होता. पण बाबा ! 'बहिष्कृत भारत' आणि 'मूकनायक' यातून, तुमच्या लढाऊ पत्रकारितेपुढे मी नम्र आहे. तुमच्या भाषेचा गावरानपण झोंबरा ठसकाही माझ्या नेहमी स्मरणात आहे. अशाच एका वाक्प्रचाराची आठवण देतो. 'चोराच्या उलट्या बोंबा' हाच तर इथला सांस्कृतिक न्याय आहे ना ? जनावरांची दैवते करणारे, गायपूजा-वृषभपूजा करणारे, सर्व विरुपातील अवतारातही दैवतरूप शोधणारे, सहिष्णुता, दया, मानवता, त्याग, एकाच देवाची लेकरे' असे बोलांचे ढोल बडवणारे 'पाणी बाटवले.... हाण, मंदिरात घुसू म्हणतात.... मार, शिकू पाहतात.. बडव, धर्म बदलतात.. ठेच. तर्कशुद्ध बोलतात.. उडवा. घटनेतला कायदा सांगतात.. तुडवा. आरक्षण भाषा करतात.. पेटवा' असेच वागत आले आहेत. बाबा ! या महान संस्कृतीत वेश्येहातून मंगळसूत्र बांधवतात आणि त्या व्यवस्थेचे समर्थनच नाही; तर विस्तार कसा होईल, याचीच सर्ववेळ काळजी घेतात. त्या परंपरावांद्यांकडून दुसरे कसे काय अपेक्षायचे ? आपणास त्याची कल्पना होतीच.

बाबा ! तुम्हाला लिहिताना मारे ठरवीत होतो फक्त आमचे कसे काय चालले आहे, त्याचेच वार्तापत्र सादर करायचे. इतर काहीही खरडायचे नाही. कारण तसे तुमचा महत्वाचा वेळ, असा कोणी स्वाल्ला की; तुम्ही संतप्त होता. तुमचे वटारलेले डोळे सांगतात, 'अरे ! अशी घाण उपसण्यापेक्षा, मला ठाऊक असलेल्या गोष्टी मलाच पुनःपुन्हा सांगण्यापेक्षा, चांगली पुस्तके वाचा. थोरामोठ्यांच्या अक्षरसहवासात राहायला शिका. आत्मभान-आत्मसन्मान प्राप्त करा. कुठेही कसल्याही तऱ्हेची लाचारी, दुय्यम-तिय्यमपण पत्करू नका.' पण होत आहे असं. आता आपल्या .. होय बाबा ! तरीही आपल्याच, देशातील हवा विचित्रच झाली आहे. सगळंच वातावरण दूषित झालं आहे. तसे तुम्ही आपण कोण ? याचे नवे रंग आपल्या 'अस्पृश्य पूर्वी कोण होते व ते अस्पृश्य का झाले ?' या ग्रंथात दाखविले आहेतच. आपल्या गुरुजींनी जोतीरावांनीही छत्रपती शिवाजी महाराजांना 'कूळवाडी कूळभूषण' अशा गौरवोद्गारांनी वाखाणले होतेच.

बाबा ! तुम्ही 'बंधुता' ह्या मूल्याचाही फार मूलभूतपणे पुरस्कार केला होतात ना. आता मात्र खूप गडबड झाली आहे. आमचे बंधुत्व खूप खूप घट्ट झाले आहे. या देशात नव्याने जाती-पोटजातीत अस्मिता उफाळली आहे. प्रत्येक ठिकाणी 'पाहिजे जातीचे' असे आग्रहाने सांगितले जाते. 'उत्खनन' स्वात्याला आणि इतिहासाला भलतेच चांगले दिवस आले आहेत. संशोधनासारखा विषय तर बाबा ! आपणास काय सांगू , पोरासोरांना दुधाचे दात पडण्याआधीच कळतो. कुठे काय होते ? कशावर काय बांधिले ? जन्मतःच काही जाती कशा श्रेष्ठ आणि काही कशा दुष्ट, यांची भविष्यदर्शी स्वप्ने; गर्भातच पडतात. त्यांचे हे ब्रह्मसाक्षात्कारी भाकीत, काही नतद्रष्ट मंडळी स्वीकारीत नाहीत. मग ह्या बालअभिमन्यूंना फार चीड येते. ते 'घटना, सरनामा, न्यायसंस्था निर्णय', असल्या फालतू गोष्टींवर वेळ घालवीत नाहीत. तुम्हाला हे कधी कळणारच नाही, बाबा ! कारण आम्हा कुणालाच ते कळले नाही. इतकेच नाही, तर ज्यांनी फार आग्रह धरला, त्यांनाही ते उमगले नाही. म्हटलंच ना मी, आमचे बंधुत्व फार फार घट्ट झाले म्हणून.

बाबा ! आपण काही ग्रंथांची होळी केली होतीत. मानवमुक्ती लढ्याला, विचित्र सामाजिक न्याय सांगणाऱ्या मनूच्या मताला, तुम्ही मातीमोल ठरवले होते. पण बाबा ! आता सगळ्यांचा जीर्णोद्धार चालला आहे. बहुसंख्यांक झुंडीचा अत्याग्रह, हाच आता इतिहास बनतो आहे. देशाचा भूगोलही आक्रसतो आहे. तुम्ही तसे राज्यशास्त्र अर्थशास्त्राचे अभ्यासक आहात. पण राज्य करण्यासाठी, हवा तसा इतिहास तयार करून, घेतल्याशिवाय काहीच अर्थ नाही; हे आपणास उमगलेच नाही, असे म्हणू की काय ? लहान तोंडी मोठा घास होतो आहे. पण पूज्य माईसाहेबांनी त्यांच्या आठवण-ग्रंथांत असे लिहिले आहे, "प्रकृती कितीही खराब असो, डोळ्यांचा कितीही त्रास असो, त्यांचे लिखाण कधीच बंद पडत नसे." (डॉ. आंबेडकरांच्या सहवासात - डॉ. सविता आंबेडकर, तथागत प्रकाशन, १४ एप्रिल, १९९० (प्रथमावृत्ती) पृष्ठ २४७)

बाबा ! आताचे संशोधन, शिवराळांचा शिमगा, गर्दीचा गदारोळ, राजनेत्यांचा रानवटपणा, संसदेतील सोंगे, राज्याराज्यातला रामरगाडा, विद्यापीठातील वांझोटेपण, धर्मांचा धांगडधिंगा, रेडिओतील रडगाणी, दूरदर्शनमधील दंगामस्ती आणि पत्रकारांची पराभूत पलायनवादी वृत्ती, आता जर आपण पाहिली असती ना; तर आपले लिखाण, कधीचेच बंद केले असतेत, याबद्दल मला खात्री आहे.

अन् बाबा ! होळी तरी कशाकशाची आणि कितीवेळा करायची हो ! अलीकडे तर टिकाऊ फारसे काही निर्माणच होत नाही. कंगव्याने केस विंचरावेत, अशी माणसे पक्ष बदलताहेत. नेते बदलताहेत. निष्ठा बदलताहेत. दोन महिन्यापूर्वी आपणच केलेल्या वक्तव्याला, आपणच हरताळ फासताहेत. फिरत्या राजनाट्याचे प्रयोग, चारसहा महिने रंगताहेत आणि कोसळताहेत. कोसळवताहेत. ठकाठकांचा रोखठोक मामला चाललाय सगळीकडे. एकजात टाकाऊ घटकांचे प्रदूषण होते आहे. टाकाऊ गोष्टींचा उत्सर्ग योग्यवेळी झाला नाही, तर प्रकृती बिघडतेच ना. तशी अस्वस्थ देशाची आणि... बाबा ! माझ्या देशबांधवांची प्रकृतीच बिघडली आहे. नुसती शारीरिक अस्वास्थाची बात असती, तर तशी चिंता नव्हती. परंपरा पाळणाराच आपला देश असल्याने, 'मरणं प्रकृती शरीराणाम्' हे सूत्र तरी मानले असते. पण बिघडले आहे, अवघ्यांचे मानसिक संतुलन. टाकाऊ द्यावच्या ऐवजी टिकविण्याचा वसा पत्करल्याने मने बनली आहेत, गोदामे. आर्षकाव्य-ग्रंथ नुसतेच टिकताहेत नव्हे, तर कॅसोटोकॅसेटी पिकताहेत. बाबा ! तुम्ही चिडाल थोडे माझ्यावर. हा पोरगा काहीतरी विचित्र शब्दसंच एकत्र करून, काहीही भरकटतो म्हणून. पण हे सारे आता, ह्या सतत कात टाकून जुनेच राहण्याच्या, नव्या रीतींचा अन्वय; मला जसा लागला, तसाच आपणाला सांगण्याची आटोकाट खटपट करीत आहे. तर हे अस.... कानाला आणि विशेषतः तुमच्या मनाला, अजबगजब वाटणारे बेरंग असे आहेत. नाही ना तुम्हाला सवय... 'चालायचेच !' म्हणायची.

बाबा ! आर्षग्रंथांसारखीच पुराणांची-पूजाग्रंथांची भलतीच चलती आहे. तुम्ही तेव्हा लिहून ठेवलेल्या रामकृष्णाच्या रिडलने, केवढा तिढा घातला होता. पौराणिक-ऐतिहासिक नाटके, कथा-कादंबऱ्या, कल्पिते, यांना उधाण आले आहे. पडद्यावरल्या स्पोट्या, प्रणयनाट्याने जीवनातल्या दुःखांचा क्षणभर विसर पडेल कदाचित; पण त्यांचा निचरा कधीच होत नाही, हेच मुळी विसरले जात आहे. तुमच्या-माझ्या, मुंबईपुरते बोलायचे झाले तर, नदीकाठावर किंवा धोबीघाटावर अथवा शेतावडांच्या सावलीला, देव-देव्हाऱ्याचे, नवनव्या बाबांचे एकेक मंदिर उगवतेच आहे. देवादेवळांची इतकी झुंबड उडाली आहे, की वाढती गर्दी घेऊन, गर्दी चुकवीत, वडापावांच्या, खिमारोटींच्या, भेळपुरी - नारळांच्या गाड्या चुकवीत, सरपटणाऱ्या बसगाड्यांना रस्ते पुरेनासे झाले आहेत. आणि आता सर्व रंगांचे झेंडे, दंडे घेऊन खडे असतात, सैन्यासारखे धाक दाखवीत जागोजाग. प्रजासत्ताक पिचते आहे जागोजाग. लोकशाही भाजली जात आहे. नाणी खुळखुळताहेत बाबा ! घुमवीत भ्रष्टाचाराची गाणी. सांगू कसा ही

लाजिरवाणी कहाणी.

बाबा ! आता लोक वाट पाहतात; अनंत अनेक गोष्टींची, घडणाऱ्या चमत्कारांची, उतरणाऱ्या किंमतींची. चिरीमिरी न मागता कर्तव्य म्हणून, सहजपणे होणाऱ्या कामाची. सेवायोजन कार्यालयात आठाठ वर्षापूर्वी केलेल्या अर्जाला, नित्य नववर्षाला नूतनीकरण केल्याने, येणार असलेल्या मुलाखती-नोकरीच्या बोलावण्याची, पोस्टातून वेळेवर येणाऱ्या पत्रांची. वेळापत्रकांप्रमाणे धावणाऱ्या गाड्या-विमानांची. अनेकदा फोन करून न येणाऱ्या गॅससिलिंडरची. कांदे-बटाट्यांना त्यांचाच भाव मिळेल ह्यांची. तेल-पीठ-मीठ-तिखट-दूध ह्या 'जीवनावश्यक वस्तूच आहेत' असे कोणीतरी, कधीतरी जाहीर करेल याची. नळाच्या पाण्याची, न खोदलेल्या गुळगुळीत रस्त्यांची लोक वाटच पाहतात. प्रदीर्घ 'वेटिंग' चाललेच आहे.

बाबा ! आता बरेच असेही आहेत. जे मनांतून आसुसून वाट पाहतात. दंगेधोपे उसळण्याची. गोळीबार लाठीमाराची. काळ्या वत्सल मातीमधील कोवळे अंकुर करपविणाऱ्या गरम धधकत्या मानवी रक्ताची. वाट पाहतात वीज पाण्याची. ब्लॅक-आऊट होण्याची. पूरपाणी घुसण्याची. पाऊस रूसून बसण्याची. वस्तूंच्या किंमती आकाशाला भिडण्याची. टंचाईच्या टंचपणाची आणि माणसांच्या लाह्याफुटाणे बनून भिरकावली जाण्याची. बाबा ! मग मोर्चे काढता येतात. घोषणा-धरणे धरता येतात, ट्रक भरभरून माणसे नेता-आणता येतात. धाकाधमक्याने मदतीसाठी थैल्या गोळा करता येतात. खूपशा 'स्वीस बँकेत' भरता येतात. शिकणाऱ्या पोरा-जावयांना लंडन-अमेरिकेत हस्तेपरहस्ते पाठविताही येतात. सरकारला नमवता येते. लोकांना दमवता येते. अनुयायांना सांगता येते. हितशत्रूंना पैसे मोजून, विकत घेऊन, शमवता येते. थोडेसे गेल्यासारखे झालेले वारेमापपटीने कमवता येते. बाबा ! लोक अशीही वाट बघतात.

आणि बाबा ! देशाचे आधारस्तंभ. बरेचसे हात उंचाविणारे मुखस्तंभ. जयजयकार करणारे.... नव्या पिढीचे काय सांगू ? ते वाट बघतात, आपापल्या गॉडफादरची. पुस्तकांकडे ढुंकूनही न बघता, मिळणाऱ्या फर्स्टक्लासची, फसफसणाऱ्या व्हिस्की-बियरच्या ग्लासची. कबाब-तंगडीच्या मेजवानीची. नशागाण्यात विरघळून चाललेल्या आयुष्यांची. 'फाईव्ह फाईव्ह 'च्या किंवा गांज्या-चरसाच्या एखाद्या कशची. खुलणाऱ्या सिमसिमची. नेत्यांच्या कृपाकटाक्षाच्या रिमझिमची. पॉप-रॉक म्युझिकची. कशानेही, केव्हाही, कुठेही बसणाऱ्या, चढणाऱ्या किकची. वाट... वाट... वाट पाहतात हे तरूण.

बाबा ! आम्ही शिकलो, धर्म सोडूनही जुन्या धर्मांच्या जातींची चर्चा करायला. आम्ही शिकलो संधी मिळेल तेव्हा एक-दुसऱ्यांच्या बोकांडी बसायला. आपल्याच घरोब्यातल्याच मंडळींना फक्त अचूकपणे कुठेकुठे उच्चस्थानी ठेवायला, लाचारी, हुजरेगिरी, तोंडपुजेपणा हा झाला आहे शब्द परवलीचा. सुखाने जगण्याचा. न कळता

कळवता नव्याने जोगता, बलुतं मागण्याचा. आम्ही पुजतो सगळे देव. आमचा धर्म देवघेव. आमचे कर्म फुकटफाकट. दुसऱ्यांविषयी बोलतो मात्र अति जहाल तिखट. तुम्ही गाजवली संसद. आमची चर्चा मनपसंद. चलता है ।

बाबा ! आता आम्हाला वेळच नाही. वाचायला वेळ नाही. वाट पाहायला वेळ नाही. कोसळत्याला सावरणे नाही. बुडत्याला धरणे नाही. कुठेही जाणे नाही. होतो त्याच जागी ओट्यागोट्यांप्रमाणे फक्त राहणे. नाही जाणे.... नाही गमन. नाही दुर्जन नाही सज्जन. नाहीच नाही आमच्या डोक्यांवर विनाशाचा कालिया फडा काढून उभा. लाख्यांच्या सभा. सगळ्या अनर्थकांचा लबेदा. काय सांगू बाबा ! कसे सांगू बाबा !

बाबा ! येते आहे आपली जन्मशताब्दी. वाटेल का थोडी लाज ? ती आली कधी गेली कधी ? आम्ही आता रिकाम्या गाभाऱ्यात, कुणासाठी कुणापुढे घंटा वाजवायच्या ? तुमच्या विचारांचे वजन कुणालाच पेलवले नाही. पुष्कळांना झाली तो विसरण्याची घाई. असे विसरायचे असले, की आकस्मिक विंचूदंश झाल्यासारखी आठवण येते. काही काही वाटत राहते. वाटते असेही, आपण आणि आपणच.... विचारशील आहोत. रक्तानेच त्यांचे वंशज आहोत. असेही वाटते... आपण लढवय्ये कडवे वाल आहोत. संकटे झेलणारी ढाल आहोत. आणि वाटते.... आपलेच सूर स्वानदानी. आपणच अवघ्या लढ्यांचे नायक. सरकणाऱ्या जथ्यांचे आपणच गायक. आपणच उभारला समुद्रतिरी स्तूप. आपणच न्याहाळले राजबिंडे रूप. बाबा ! कितीवेळ झाला तुमच्या उंचाविलेल्या बोटाचा मनाला स्वरास्वुरा भास. दास बनलो स्वतःचाच, झालोही उदास. बाबा ! वाटतात बरे कानाला जेव्हा कुणी वाजवतात आजुबाजूस स्वोट्या स्तुतीचे नसलेल्या-नासल्यांचे, कर्तृत्वाचे बद्द वाजणारे टाळ; मग कमाईच्या पैशांचा असणे विटाळ.

बाबा ! आपण गेलात. वर्षेही गेलीत. त्याहून वाईट झाले, एकजुटीने भीमटोला लगाविण्याची आमची शक्ती गेली. आता शब्दांतून तुफानांचे पिक येत नाही. विचारांची लाट मनाच्या किनाऱ्यावर फुटत नाही. निर्विकार डोळे बघतात. कुणासाठी एक अश्रू तुटत नाही, काळजातही तुटत नाही. तुम्हाला, 'बाबासाहेब' म्हणणारे आम्ही होतो काय आणि झालो काय? याचे काहीही वाटत नाही. बाबासाहेब ! आपण दयावंत-बुद्धिमंत आहात. आपल्या हातातली टेकायची काठी एकदा तरी सुटू द्या, तिच्या दणक्याने आमच्या पाठीवर रक्ताचे स्वरेस्वुरे वळ तरी उठू द्या. मार स्वाण्याचे बळ तरी मिळू द्या.

बाबासाहेब ! कधी, केव्हा हे व्हावे कसे ?.... आपणास सांगू तरी कसे ?

एवढेच हे असे.... हे असे एवढेच.

आपलाच आज्ञाधारक

(अकोलेकर)

१२. परिवर्तन, पुनरूज्जीवनवाद आणि आम्ही

प्रत्येक देशाची व समाजाची पैतृक संपत्ती असते. त्या विशिष्ट गोष्टींच्या निर्देशाने आपले स्वतंत्र व वेगळे अस्तित्व तो मिरवू शकतो. ह्या गोष्टीची आत्मसन्मानासाठी गरजही असते. ती भावनात्मक, मानसिक आणि ऐतिहासिक पातळीवरही असते. त्याचप्रमाणे भारताचीही एक परंपरा आहे. सामाजिक, धार्मिक व तत्त्वज्ञानात्मक मिळकत आहे. म्हणजे प्रदीर्घ व प्रभावी परंपरा निर्माण होण्यातच देशाचे व देशवासियांचे भूषण ठरत असते. संगीत, शिल्प, नृत्य इत्यादी घटकांसह कितीतरी गोष्टींचा काही मूर्त तर काही अमूर्त अशा, ह्यात समावेश होतो.

म्हणजे परंपरा असणे ही अस्तित्वाची खूण असते. पण जेथे परंपरा असते, तेथेच तिचा काच निर्माण होण्याची शक्यता असते. आपल्या समाजात राजकीय, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवनाची मोठी परंपरा आहे. ही धार्मिक प्रेरकतेने भरलेली आहे. त्यामुळे ठरीव, ठाशीव व धर्मविषयक रुढी-परंपरांच्या बाबतीत काहीही घडले तरी इथल्या लोकांना चुकल्यासारखी वाटते. पौर्वात्य संस्कारांना पाश्चात्य संस्कारांशी आणि प्रामुख्याने जीवनसरणीशी समन्वय-संघर्ष करण्याची जेव्हा पाळी आली, तेव्हा महाराष्ट्रात प्रचंड खळबळ उठली. राजा राममोहन रॉय यांचे विचार असोत की केशवचंद्र सेन यांच्या, 'नवविधान' पंथाची एखादी नवी शाखा असो, लोकहितवादींचे विचार असोत की भाऊ दाजी लाड आणि न्या. तेलंगांसारख्यांची विचारसरणी असो; तिने खूप खळबळ उडवलेली दिसते. म. फुले यांच्या विचारांवर तुटून पडणारे चिपळूणकर जसे आपणास दिसतात, तसेच ह्या उभय विचारधारांच्या एकत्रिकरणाचा सुजाण प्रयत्न करणारे न्या. रानडेही दिसतात.

परंपरा बोचक किंवा स्थितीशील बनली की जीवनाची गतिमानता खंडित होती. समाजपुरुषाचा श्वास अवरुध्द व्हायला लागतो. कोणत्याही गोष्टींमध्ये कालोचित असा बदल होणे, ही नैसर्गिक बाब आहे, हे भानच त्यामुळे सुटते. परस्परांविषयी किल्मिषांचे वादळ उठते. खंडन-मंडनाची राळ तरी उडते. विचारांपेक्षा आचारांच्या बाबतीत अधिक कर्मठपणा दिसतो. जहाल-मवाळ, सनातनी-सुधारक, बोलके-कर्ते; अशा विरोधी जोड्यांची; एकच गर्दी मग उसळते. निसर्गक्रमानेच परिवर्तनाला स्वीकृत केले आहे. या गोष्टीचा स्वीकार पारंपरिक कृती करीत नाही.

त्यामुळे देशातील सांस्कृतिक चळवळींच्या इतिहासांकडे ओझरती जरी नजर टाकली, तरी धर्मविचाराने आपला देश फार म्हणजे फारच प्रक्षुब्ध होतो. विश्वातही

धर्मभावना प्रखर आहेतच. इसाई आणि इस्लामी धर्मांमध्येही हे आढळते. पण आपल्या धर्मजीवनप्रणालीत ज्या लाटा उसळतात, त्याला तोड नाही असे म्हणावे लागते.

आपल्या समाजात 'ग्रंथप्रामाण्य' किती आणि केवढ्या प्रमाणात असावे. नव्या बदलत्या काळातही, मनुस्मृतीचे पुरस्कर्ते निघावेत, नव्हे वाढत जावेत. जे आपले 'संचित' आहे ते कालबाह्य झालेले, दूषित असले तरी ते वंद्य आणि पूजनीयच आहे, हा दुराग्रह परिवर्तनाला पाप मानतो. नकार देतो आणि नव्याने 'जुन्या' नको असलेल्या गोष्टीला नवी झळाळी चढवतो. कधी तत्त्वज्ञानाचे अस्तर लावतो, कधी मूळ गोष्टीला सफाईने बगल देऊन असंबद्ध पण चतुर युक्तिवादांची गुंफण करायला लागतो. भांबवून जाणाऱ्या अशिक्षित व अल्पशिक्षित व्यक्तींचा आणखीनच वैचारिक गोंधळ वाढवतो.

हिंदु धर्मांतर्गत असलेल्या, एकमेवाद्वितीय अशा अलौकिक जातीव्यवस्थेच्या दुःष्परिणामांबद्दल, इतक्या वेळा लिहिले गेले आहे की, त्याचा पुनरुच्चारही करण्याची आवश्यकता नाही. प्रत्येकाने जातीव्यवस्था ही अडचण आहे, हे सांगितले आहे आणि भारतीय समाजाच्या एकसंघ निर्मितीला, तिच्यामुळे अडथळा होतो असेही अडतरडत का होईना, सांगितलेही आहे. पण हा धर्म बदलण्यासाठी, ब्राह्मो समाज, परमहंस सभा, एकेश्वरी पंथ, प्रार्थना समाज, आर्य समाज, सार्वजनिक सत्यधर्म इत्यादी जे अनेक प्रयत्न केले गेले, त्या सगळ्यांची फार परवड केली गेली. नवा परिवर्तनाचा विचार सांगणे म्हणजे पाखंड सांगणे, असे एक समीकरणच पडून गेले.

जे बहुसंख्यांक आहेत, त्यातील विचारवंतांनी धर्माचे गांभीर्यपूर्वक संशोधन करून, पुनर्मांडणी किंवा पुनर्रचना करणे; ह्या प्रक्रियेतून, हा परिवर्तनाचा प्रयत्न केला गेला होता. पण दुर्दैवाने भारतीय भूमीत विचाराला - नव्या विचाराला फार शत्रू आहेत. ज्या काही थोड्या लोकांना त्यांची निकड पटते, त्यांचा दम मध्येच उखडला जातो. आणि पुरोगामी बनण्याच्या प्रक्रियेचा आरंभ करून, असा मध्येच नाद सोडणारी मंडळी, नुसती प्रतिगामी होतात असे नाही; तर नव्या घटकांबद्दल संशयपिशाच्च निर्माण करणारे कट्टर व अट्टल विरोधक बनतात. जरा कुठे पुढे गेलेले करणारे प्रगतीचक्र, आणखी दुष्ट परंपरेच्या गाळात घट्ट रुतून बसते. नवे काही घडत नाही.

परिवर्तनाच्या अपेक्षेने काही घडेल असे वाटावे, तर नेमके विपरित घडण्याचीच उदाहरणे अनेक दाखवता येतात. एका ठळक प्रसिद्ध उदाहरणाच्या नोंदीने हे पाहता येईल.

ज्या वेळेस ब्रिटीशांच्या विरोधात ठामपणे उभे राहायचे होते, तेव्हा टिळक-आगरकर एकात्मभावाने सहकारी मित्र होते. पण जेव्हा लग्नसंमती वय कायद्याचा रुढीधर्मांतर्गत प्रश्न धसाला लावला गेला, तेव्हा तो प्रतिष्ठाप्रश्न (Prestige Issue) बनला. त्यातही टिळकांच्या पारड्यात प्रत्यक्ष कृतीचे, लोकप्रियतेचे आणि सनातन्यांच्या पारंपरिकतेला फारसे किंवा मुळीच न दुखावण्याचे विशेष वजन होते. परिणामी

'केसरी 'तून आगरकर वेगळे झाले. 'सुधारक' वृत्तपत्राचा जन्म झाला.

इंग्रजांच्या धार्मिक बाबतीत ढवळाढवळ न करण्याच्या सावध प्रवृत्तीमुळे आणि अन्य तीव्र निर्बंधांमुळे 'शिवजयंती' आणि गणेशोत्सव सुरू केला गेला.

कार्यकर्त्यांना एकत्र आणणे, क्रांतीकार्यासाठी (इंग्रजांना पळवणे एवढेच) या उत्सवांची फार मदत होत असे. पुढच्या बऱ्याच बेतांचा विचारविनिमय ह्या ठिकाणी वेळी जमूनच केला जायचा. लोकांच्या धार्मिक भावनांचे तर्पण आणि त्यातूनच पुढल्या कामाच्या आखणीची व्यवस्था अशी संमिश्र लाभामुळे ह्या दोन्ही उत्सवांना उत्फूर्त प्रतिसाद सतत लाभत गेला.

टिळकांच्या नंतर त्यांच्या अनेकविध कल्पक समाजोपयोगी निर्मित्यांपैकी एक म्हणून ह्या उत्सवांना अधिकच जवळचे स्थान लोकांच्या मनात लाभले. पुढील दोन दशकात म्हणजे बेचाळीसचे आंदोलन व देश स्वतंत्र होईपर्यंत शिवजयंती, गणेशोत्सव ह्या गोष्टी, सार्वजनिक कार्याचा व आपल्या संस्थात्मक जीवनाचा अपरिहार्य भाग झाल्या आहेत, हे अनुभवास येते. शिवाजी महाराजांनी जरी 'गोब्राह्मणप्रतिपालक' अशी बिरूदावली स्वीकारली होती, तरी ते उमद्या मनाचे सर्वसमावेशक राजे होते. त्यांच्या 'गोब्राह्मण' 'क्षत्रियकुलावंतस' या विशेषणाचा झालेला अर्थसंकोच हे त्या त्या काळातील आणि नंतरच्या कालखंडातील स्वार्थी गटागणंगांनी केलेले अनर्थीकरण होय. 'महासंघाच्या' नावाखाली होणाऱ्या प्रक्षोभक चळचळी ह्या पुनरुज्जीवनाच्या द्योतक आहेत.

गणेशोत्सवाच्याही बाबतीत असेच घडले. त्यातील कालोचित स्वाभाविकता गढूळ झाली. आणि धर्माभिमान, पूजा-पाठ, दैवत-चमत्कार कथा, पूजेचे साग्रसंगीतीकरण, तालसूर सोडून तारस्वरात होणाऱ्या आरत्या, त्यात घेतला जाणारा 'विचित्र 'सा आनंद, या गोष्टींनी 'गणेशोत्सव' सुरू करण्यातली कल्पकता व अस्मितेचे उजागरण हा भाग संपला. त्यासाठी मग मोठ्या प्रमाणात टोळकी दारात नेऊन वर्गणी वसूल करणे, मोठ्यात मोठ्या मूर्ती विकत आणणे, आणि सांस्कृतिक कार्यक्रमाऐवजी केवळ स्वस्त करमणुकींच्या कार्यक्रमांवर, मुंबई शहरांपुरती बोलायचे झाले तर कोट्यवधी रुपये घालवायचे. सार्वजनिक पैशांचा राजरोज अपहार करायचा आणि कुणी काही पृच्छा केली की गुंडापुंडांचा वापर करून, पैसे मिळविण्याचे व जगण्याचे सोपे मार्ग अनुसरायचे, हा पुनरुज्जीवनवादाचा प्रकार आहे.

लोकशाहीच्या सरनाम्यात - 'विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांची स्वधीनता....' सांगितली आहे. पण विचार पटले, कालसुसंगत वाटले, तर त्या नव्या विचारांचा, मोकळ्या मनाने स्वीकार करण्याची मनाची तयारी ही परिवर्तनाची बाब होय. पण सगळे ऐकूनही आपलेच सांगणे बरोबर आहे, असे प्रतिपादन हा दुराग्रह, तो पटविण्यासाठी लोकांचा जमाव पुराणपरंपरावादी, कालबाह्य विचारांनी पेटवणे हा पुनरुज्जीवनवाद.

अभिव्यक्ती आणि विश्वासाचेही असेच होते. अंधश्रद्धा मान्य करावयाच्या, पण त्या जाव्यात म्हणून प्राजंळपणे प्रयत्न करण्याच्या 'निर्मूलनवाद' कार्यकर्त्यांची निंदा करायची. त्यांना काम करण्यात अडथळे आणायचे. त्यांचे कार्य म्हणजे धर्मावर आघात, अशी बोंब मारायची असे विचित्र सतत आढळते. आणि सरनाम्यातील 'उपासना स्वाधीनता' मान्य केली, तर केवळ धर्मस्थानामध्ये होणाऱ्या, मनःशांती देणाऱ्या प्रार्थना, नमाज, वंदना, शब्द, कीर्तन, भजन ह्या गोष्टींवरून सतत दंगली उसळत असतात. त्या त्या धर्माचे मुस्खंड लोकांच्या प्रक्षोभक भावनांशी खेळ करीत राहतात. तुंबडी भरत राहतात.

सर्वांभूती असणारा देव गणेश फक्त मग मंगळवारी अंगारकीला तर वाजत गाजत लांब लांब रांगा लावून पुजणे, विशेषतः 'सिद्धी विनायक' नवसाला पावतो, ह्या समजुतीने ठिकठिकाणी गणपतींच्या मूर्ती सपूजक उभ्या होतात. जमणाऱ्या दक्षिणेच्या निधीच्या लोभाने हे पसरत जाते. सर्वत्र असणारा तोच देव मग एक नवसाला पावतो, दुसरा का नाही ? असा विचार कुणी करीत नाही. कुठल्याही दिवशी कुठलाही देव पूजला तरी 'सिद्धी' मिळावी मग लांब लांब अशा रांगा का लागतात. शबनम, बॅगेत वॅट-शँपेन-व्हिस्कीच्या बाटल्या बाळगत कोणती श्रद्धा लोक व्यक्त करतात ? 'हे बरोबर आहे का ?' असा विचारही न करता पूर्वजांसारखे, किंवा पूर्वपूर्वज पंचमहाभूतांना देव मानणाऱ्या आदिमानवांसारखे वागणारे लोक पुनरुज्जीवनवादी असतात.

आम्हाला आजच्या काळात तर किती पुढे जायला हवे आहे. मंदिराचा विध्वंस झाला, मशिदीत नको ते टाकले, स्वर्णमंदिरात सैनिक घुसवले, यावरून प्रचंड मालमत्तेचे आणि मानवी रक्ताचे शिंपण-शिरकाण होते. लोक कुऱ्हाडी-तलवारी, लाठ्या-कोयते घेऊन बाहेर पडतात. रक्ताला रक्त, डोळ्याला डोळा अशी जंगलची परिभाषा व जंगलचा कायदा सुरू होतो. नव्याने नव्या शतकाच्या स्वागताला जाणारा माणूस दोन-तीन शतके मागे जातो. तो प्रचंड गर्जना करतो. माणसांचे थवे जमवतो. जातीवाचक, धर्मवाचक, अपशब्दसूचक अशा जहाल शब्दांचा कृतीसह गदारोळ उडतो, माणसे माणसांचा घास करण्यासाठी पिसाळून एकमेकांसमोर उभे राहतात.

ह्यावेळी जो प्रश्न जहाल रक्तरंजित संघर्षाने विचारला जातो, तेव्हा विचार येतो, ही माणसे महागाई, साखर, रॉकेल, गाडीभाडे, वीजभाडे, पाणी टंचाई, रोगराई, दुष्काळ, खराब रस्ते, हिंसाचार, हॉस्पिटलमध्ये मरणारी माणसे, पैसा खाणारे नगरसेवक, भ्रष्टाचारी राजकारणी, पंचतारांकित हॉटेले, मदिरालये, ट्रक-ट्रॅव्हलर्स एजन्सीचे वाढते ताफे, चढती-वाढती त्यांची संपत्ती व मग्रूरी याबद्दल हे लोक का प्रश्न विचारत नाहीत ? ह्या गोष्टींसाठी का शस्त्र उचलीत नाहीत ? बळी घेण्याची किंवा आत्मार्पण करण्याची परंपरा का पाळत नाहीत ? आमच्या ह्या देशाचे, देशबांधवांचे, अस्तित्वाचे आणि आमचे काय होणार ? ह्यासाठी अंतर्मुख का बनत नाहीत ?

भारतीय स्वातंत्र्याचा जो जो विचार करावे, तो तो मन सुन्न व उदास होत जाते. विचाराच्या क्षेत्रात ज्या लोकांनी आयुष्य वेचले, त्या विष्णुबुवा ब्रह्मचारी, लोकहितवादी, म. फुले, आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे, भाऊराव पाटील, म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मानवेंद्रनाथ रॉय, अरविंद घोष आणि असंख्य नेते, ज्या काळात वावरत होते, तो तर किती प्रतिकूल आणि दडपशाहीचा, गुलामगिरीचा काळ होता. शस्त्र-अस्त्र-शास्त्रांसहीत ब्रिटीश राज्य ऐन भरात होते. राजकीय आणि क्रांतिकारकांच्याही पुढे अनंत आव्हाने आणि विपरित काळ होता. राष्ट्र म्हणून देशाजवळ नन्नाचाच पाढा होता. पण तरी, ह्या विचारवंतांची व समाजधुरिणांची जिद्द जबरी होती.

ह्या काळाचे अत्यंत वेधक आरेखन डॉ. प्र. न. जोशी यांनी त्यांच्या ' भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास ' या ग्रंथात केले आहे. पृष्ठ ८५ वर ते लिहितात -

" आधीच देश अवाढव्य, जनता गरीब व अडाणी, अनेक भाषा, अनेक धर्मपंथ यांनी विस्कळित झालेली, तिला एका राष्ट्रीय विचाराने प्रेरित करण्याची अवघड कामगिरी त्याकाळच्या पुढाऱ्यांवर होती. चांगल्या नोकऱ्या नाहीत, लष्करात प्रवेश नाही, बढती नाही, व्यापार नाही, उद्योगधंद्यांत वाढ नाही. अशा निकृष्ट पण इमानी प्रजेला राष्ट्राची कल्पना पटवून द्यावी लागते. "

डॉ. जोशी यांनी एका विचारेरेषेत तो काळ साकार केला आहे.

' आम्ही ' ह्या शब्दाकडेही लक्ष वेधले पाहिजे. याचा एक सरलार्थ म्हणजे, आम्ही सगळे, म्हणजेच सर्व वर्णीय, सर्व धर्मीय, सर्व पंथीय, सर्व जातीय आणि पोटजातीय विचारवंत नतद्रष्ट लोक. आमच्यात दोन्ही शक्यता सामाविलेल्या आहेत. परिवर्तनाच्याही आणि पुनरुज्जीवनाच्या देखील.

दलित समाज, हरिजन समाज, आदिवासी आणि बौद्धमंडळी इतर सर्व घटकांपेक्षा अधिक प्रमाणात विभाजीत आहेत. जे शिक्षित व अधिकारसंपन्न आहेत ते अहंकाराने ग्रासलेले आहेत. मधल्या अवस्थेतले विशेष तडजोडवादी आणि स्वार्थी आहेत. अज्ञानी वर्ग तर पोटाची खळगी, शरीरावर चिरगुटे आणि डोक्यावर हक्काचे छप्पर येणार यातच घासून-झिजून चाललेला. एक असा दीप नाही, की ज्याच्या आधाराने नेमकी वाट चालावी. असा एक दीप होता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर. पण त्याला सर्वार्थाने पूर्णार्थाने ह्या त्रिवर्गाने मान्यच केले नाही. त्याचे सोयीचे-मतलबापुरते घेतले, घेतल्यासारखे दाखविले.

म्हणूनच ज्याने कधी पाळीव प्राण्याइतकीही किंमत दिली नव्हती, त्यांचे सगळे सणवार घट गोविंदा करणारा दलितवर्गही आहे. अलीकडे उद्भवलेल्या दंगलींमध्ये दलितांच्या घरावर भाले-बर्च्या घेऊन सवर्णांच्या संगतीने जाणारे व हल्ला करणारे ' हरिजनही ' आहेत.

जनमानसामध्ये धर्मसंस्कार खोलवर रुजलेले असतात. मानवी स्वभावाच्या

सहजतेशी हे सुसंगत असते. ह्या संस्कारातून त्यातील प्रतिगामी गोष्टींचा हळुवारपणे निचरा केला पाहिजे. ती मने शिंकाळून, त्वचा सोलवटून कधीच बदलणारही नाहीत, आपलीशीही होणार नाहीत. त्यांच्यावर नीट सातत्यपूर्ण कृतीप्रवण लक्ष ठेवले तरच ती मने परिवर्तनास पोषक बनतील. ही वाट फारच आडवळणाची आणि दमवणारी आहे.

लोकशाही समाजवाद आणि लोककल्याण हे साध्य असेल तर जुनाट अल्सर कुशलतेने दास्त्रवावे लागेल. काढावे लागेल. त्याने ते न सोडल्याने त्याचे नुकसान झाले, तेव्हाही प्रतिक्रियात्मक किंवा नकारात्मक पद्धतीने न वागता त्यास प्रांजळपणे साह्यभूत ठरावयाची निकड आहे. मग ह्या गोंधळलेल्या, भांबावून सोडलेल्या, मनाने भ्यालेल्या पण कबूलही करायची इच्छा नसणाऱ्या काहीशा नाठाळ माणसाला परिवर्तन श्वासस्वाभाविक वाटू लागेल.

एका विशिष्ट मयदिपर्यंत किनारा गाठून पुन्हा जुन्या गरगरत्या भोवऱ्यात, त्याच त्या निरुत्तर करणाऱ्या; कर्म, नशीब, पाप-पुण्य, शाप-अभिशाप यांच्या जंजाळातून तो फसण्याचे थांबेल. यातून बाहेर येणारा आता पटकन संरक्षण मनसंरक्षण आणि समाजमान्यता या ढालीचा आसरा घेतो. तसा घेण्याची त्यास स्वतःच आवश्यकता वाटणार नाही. घासूनपुसून गेलेल्या चाली-वहिवाटींचे - रीतीरिवाजांचे तो आदर्शीकरण किंवा तत्त्वज्ञानीकरणही करणार नाही. निदान ती शक्यता खुडली जाईल. असे पुनरुज्जीवन सांकळले की मग वर्षावर्षाची पुटे गळायला लागतील. जुनाट मारुतीवरला शेंदूर स्वपल्या धरून पडावा, अनेक वादवादंगाच्या - अनेकांच्या अंधानुकरणाच्या धुळीने भरलेला हा समाज अश्वत्थ सळसळू लागेल. त्यावर योग्यवेळी वास्तवदर्शी, कालोचित व विश्वसुसंगत वैचारिक सुसह्य सर कोसळली की ही मने तरारतील.

समाजवादी ध्येयसिद्धीची वाट चालणारांना मग, 'परंपरा' आणि तिच्यातून निर्माण होणाऱ्या कितीतरी आनुषंगिक निर्मितीघटकांना (By-Products) निश्चितपणाने वैचारिक प्रायोगिकतेवर परीक्षिता येईल.

परंपरा बोचायला लागली, काटेरी स्खारट-तुरट झाली, की परिवर्तनाला अडसर बनते. एकटा माणूस व्यक्तीगत आयुष्यात बदलणे अधिक सोपे असते. पण एका माणसाच्या बदलाने परिवर्तनाचे वादळ उठत नाही. तो 'आत्म' अहंकाराच्या आणि आत्मउपलब्धींच्या कोशातून बाहेर पडला की स्वच्छ होतो. स्वतःसहित दुसऱ्याच्या कृतीउक्तींचा, कृतीकर्तृत्वांचा वास्तवभानाने छडा लावतो. बघता बघता परिवर्तनाची हवा निर्माण होण्याची शक्यता संभवते. पुढे तिचे स्खऱ्या परिवर्तनात रूपांतर होते.

दिवसेंदिवस जागतिक वातावरणाची गती वाढते आहे. देशातील - प्रांताप्रांतातील अस्वस्थ आणि प्रक्षुब्ध करणाऱ्या घटकांचा जोरही वाढतच आहे. नुसत्या एकात्म, एकसंध, राष्ट्र, मायभूमी, महान अशा विशेषणांच्या किंवा आवाहनाच्या आपटबाराने आता काही घडत नाही, हे सगळ्यांच्याच ध्यानात आले आहे. परिवर्तनाला हे वातावरण

पोषक आहे. जुने विचार सर्व क्षेत्रातून जायला हवेत. तसा आरंभ आहे. गेल्या आठवड्यात वाचण्यात आलेल्या दै. महाराष्ट्र टाइम्समधील एका वार्तापत्राकडे मुद्दाम मला लक्ष वेधावेसे वाटते. ही बातमी सांस्कृतिक क्षेत्राबद्दलची असली तरी ती समाजशास्त्रीय, ऐतिहासिक किंवा राजकीय क्षेत्रातील नाही. ही बातमी क्रीडा क्षेत्राबद्दलची जरी आहे तरी ती निर्देशिल्या घटकांच्या अंशआशयाला स्पर्श करण्याची काम ती करते.

सध्या चीनमध्ये चालू असलेल्या 'बिजिंग' एशियाड बद्दल 'ना खंत ना खेद' ह्या शीर्षकांतर्गत ही वार्ता प्रसिद्ध झाली आहे. चीनला मिळणारे घवघवीत यश आणि तितक्याच जुन्या व वाजत्यागाजत्या आपल्या देशाचे अपयश यांच्याबद्दलची तुलना अशी -

"..... चीनचं यश हे काही एखाद्या नवसाला आलेले फळ नाही. कोणाचा गंडा-ताईत बांधला, कुणाची पूजा केली वा कुणाचा जप केला. म्हणून पावलेल्या देवाचा तो आशीर्वादही नाही. ती गेल्या सात जन्माची पुण्याई नाही."

(श्री. वि. वि. करमरकर - 'महाराष्ट्र टाइम्स' सोमवार दि. २४.९.१९९० पृष्ठ 'नऊ')

ज्या पारंपरिक भोवऱ्यात आणि अनेक दोषांच्या भोवऱ्यात आपण अडकलो आहोत त्यातून बाहेर पडून नव्या जिद्दीने विचार व सांघिक कृती केल्याशिवाय आपणास विश्वाच्या नकाशावर मानाचे स्थान नाही असेच; उपरोक्त क्रीडा समीक्षकांना सुचवायचे आहे.

रोजच्या जीवन व्यवहारात जर आपण भिन्न भिन्न ठिकाणी व वेळी, असा मोकळा आत्मशोध घ्यायला लागलो, निःसंकोच कवुली द्यायला लागलो तर अडकविणाऱ्या घातुक पुनरुज्जीवनवादाच्या भोवऱ्यात न अडकता, परिवर्तनवादाकडे आम्ही निश्चित वाटचाल करू. तोपर्यंत केशवसुतांच्या उक्तीप्रमाणे नुसते म्हणत राहावयाचे -

'आम्हीच नव्हतो आमुचे बाप
उगाच मग का पश्चात्ताप'.

परंपरेच्या पालनाच्या नेमका अन्वयार्थ हाच की त्यातून परिवर्तनवादी बीजे रूजत जावीत. ती अशा तऱ्हेने की एकदा पुढे पडलेले पाऊल, कालक्रीडेतून वजा झालेला घटक पुनरुज्जीवनाच्या नावाने पुन्हा कुरघोडी करण्यासाठी अवतीर्ण होऊ नये. आला तर त्यातले पोकळपण स्पष्ट व्हावे. संस्कृतीच्या वाटचालीत वैश्विक वेगासोबत आपला वेग टिकविण्याची महत्त्वाची कामगिरी 'आम्हा'वर येऊन पडली आहे.

पुन्हा येथे मला जे म्हणायचे आहे, त्यात राजकीय, धार्मिक किंवा ऐतिहासिक

परिवर्तनाचा रंग मला अभिप्रेत नाही. मानवी आयुष्याला, मनाला व जगण्या-बोलण्याला अवघ्यांनाच लागला आहे. संस्कृती प्रवासाचा एक अटळ रंग. आता सिंहावलोकन जरूर व्हावे, गेल्यापडल्याची झाडाझडतीही व्हावी पण त्यातून पुन्हा घुमजाव घडू नये.

क्रांती, मूलगामी बदल वगैरे मोठे शब्द वापरले नाही, तरी अनेक गोष्टी; जीवनौघात बदलायला लागतात. इतिहासाचे विळखे सुटले पाहिजेत म्हणजे वास्तवाच्या लाल माती-गाळात आमच्या अस्तित्वाला ठाम अर्थ मिळेल. आणि समाजपरिवर्तनाच्या केंद्रलक्षी वाटचालीत आमच्या पावलांना, लहानमोठ्या जखमा आघातांचे विशेष वाटणार नाही. 'आम्ही' आम्ही सगळे हे अदृश्य चक्र फिरवणार आहोत का ? आमच्या मनाशी हे आम्ही सुनिश्चित केले आहे का ? आम्ही आमच्याशीच समग्र प्रांजळ आहोत का ? या प्रश्नांच्या उत्तरातच ह्या व्यूहाचा भेद घडेल असे मला वाटते.



१३. समाजकारणावर धर्माचे सावट

भारतासारख्या अवाढव्य बहुभाषी, बहुश्रद्धी आणि बहुधर्मी देशात, लोकशाहीच्या प्रयोगाला; पाचवे दशक चालू आहे. जगातल्या प्रत्येक पुरातन राज्याला, त्या त्या कालमानात काही अवस्था, अटळ असतात. ते सारे हिंदुस्थानच्या आणि भरतवर्षाच्या वाट्यालाही आले.

आपली भाषिक गुंतागुंत मोठी विचित्र आहे. भाषा हा त्या त्या समाजाचा, एक जीवरक्षक घटक असतो. एक मानबिंदू असतो. भाषेचे नाते, आपल्या पूर्वजांशी आणि सांस्कृतिक विकसनाशी असते. त्यामुळे भाषिक प्रश्नावर, रणकंदनच घडल्याची उदाहरणे, पूर्वेतिहास काळातून जशी सांगता येतात, तशी अत्याधुनिक काळात; बांगला देशाचे, ब्रह्मदेशाचे, रशियातून विभक्त झालेल्या अनेक राष्ट्रांचेही देता येतील.

द्रविड वंशांना त्यांच्या दाक्षिणात्य कला, शिल्प, संगीत इतकाच भाषेचा, प्रस्वर अभिमान आहे. इतिहासाच्या आणि भाषाशास्त्राच्या क्षेत्रात, जशा काही सुसंगत वाटणाऱ्या, सोयीस्कर उपपत्ती Theories सांगण्यात ग्रंथबद्ध करण्यात आल्या आहेत; तशाच त्यांना छेद देणारे, अंतर्मुख करणारे, वेगळेही काही नोंदलेले आढळते.

आर्यांचे आगमन आणि वेदग्रंथांचे अपौरूषेय अनादीत्व, हा एक अतिचर्चित प्रश्न आहे. कारण आर्यांच्या आगमना-आक्रमणाआधीही आणि वेदांच्या आरंभीच्याही काळी या भूमीवर प्रगत संपन्न मानवी जमात, वावरत असणार; याची शंका घेण्याचे प्रयोजनच नाही.

मानववंश शास्त्राप्रमाणे, शिकारी - अश्मयुगीन काळातून बाहेर पडून, मानव; टोळी करणारा वसाहत प्रवृत्तीचा बनला. सामूहिक आकांक्षा निर्माण होत गेल्या. आणि त्यानंतर तो कृषी संस्कृतीचे स्वयंनिर्मित स्वयंशाषित फायदेतोटे अनुभवू लागला. आर्यांच्या टोळ्यांनी इथल्या जल-धनधान्यसंपन्न, कृषी गोधन परिपूर्ण जीवनावर धाड घातली. शेतीभातीच्या समाधानी कुटुंबजीवनात रमणारांचा, ह्या आकस्मिक व हेतुपुरस्पर आलेल्या आडदांड लोकांपुढे निभाव लागला नाही.

नाग संस्कृती, सिंधु संस्कृती आणि द्रविड संस्कृतीला शह बसला. मूळ निवासी, मूळ मालक 'अनार्य' घोषित केले गेले. दास-गुलाम-सेवक बनवले गेले. विध्वंसाच्या आगलोळातून बचावले. कसेबसे निभावले.

जेत्यांनी मग हैदोस केला. अनुभवाने सोयीचे काही राहू दिले. काही बदलले.

अनेकानेक उपलब्धींसाठी नव्या विचारधारा स्थापित व प्रतिष्ठित केल्या. त्यालाच काही इतिहास, पुराणे, देवकथा वगैरे गोंडस नावे देऊ लागले. आपल्या देशाच्या आरंभ काळात हे असे काहीसे घडत गेले, घडविले गेले.

त्यामुळेच कानडी आणि मल्याळम या सारख्याच वाटणाऱ्या तामीळ आणि तेलगू, या भाषा, वेगळेपणा प्रकट करतात. भाषांच्या प्रवाहांवरच संस्कृतीची मुक्कामस्थळे शोधता येतात.

मानवी समाज घडणाऱ्या बऱ्यावाईट गोष्टी पचवूनही वाटचाल करीतच राहतो. उपयुक्त गोष्टींचे मूळ शोधू लागतो. कार्यकारणाचा वेध न घेता आल्याने त्यांचे, सश्रद्ध अंतःकरणाने दैवीकरण करतो. देव दैवतांची रूपे दुहेरी भासतात. कधी कुटुंबवत्सल प्रेमळ तर क्रोध संतप्त प्रलयंकारी. मग क्रोधिताला तृप्त शांत करण्याचे विधी येतात. प्रसन्न देवतेला आशीर्वाद देण्यासाठी ऋचा, स्तोत्रे, प्रार्थना आकारतात. दोन्ही घटकांच्या काही दृश्य-प्रत्यक्ष कृती ठरतात. त्यांचे पावित्र्य-व्यंकटपण निश्चित होते. कर्मकांडांचा आरंभ होतो. त्यात क्लिष्टता आणली जाते. पुरोहित शरणता प्रतिपादली जाते. ह्या सर्व गोष्टी करण्यासवरण्याने तो समूह सुरक्षित व एकसंध समजायला लागतो. त्याची निश्चित धारणा होते. धर्म आकारतो. फोफावतो. महान ठरतो.

प्रत्येक धर्म जरी चिंतनशील व्यक्तिमत्वाने निर्माण केलेला असला तरी, त्याला सत्ताधीशांचा आणि पूजकांचा वरदहस्त लाभल्याने तो बलशाली ठरत असतो. पूजकांच्या श्रद्धा, अडचणी, समज, शिक्षण, आर्थिक स्थिती आणि मनोविकास यांच्या अनुरोधाने, भटजी, पुजारी, फकीर, भिक्षू, मुनी, ग्रंथी, पोप-फादर यांचा प्रभाव; कमी जास्त झालेला आढळतो.

'स्वरे मोक्षदाते आपणच' असल्याचा समज भाविकांच्या हृदयात पेरला जातो. 'स्वर्गाची दारे मला शरण आलास तरच उघडतील' 'धर्मासाठी मरण आले तरी बेहेत्तर पण परका धर्म भयकारक आणि उपद्रवकारकच असतो.' 'देवाने पाची बोटे सारखी केली नाहीत मग सगळी माणसे समान का मानायची ?' 'पुण्यवान वेगळे ते श्रेष्ठवर्णी, पापात्मे नीच योनीचे अधिकारी' अशा काही शब्दांनी, हजारो वर्षे; लोकांची समजूतच गढूळ करून टाकली आहे.

वस्त्रेप्रावरणे, पूजा प्रकार, वाद्य-गाणे, पूजा-अर्चा ह्या घरात घडावयाच्या मनःशांती प्रदान करणाऱ्या गोष्टींचे सामूहिकीकरण होते. एका समाजात एकत्र राहणारे भिन्नधर्मी, मग विरोधी गोष्टी चिडचिडून करायला लागतात. डोकी तापायला लागतात. रक्त उसळते आणि दंगली उसळून शस्त्रास्त्रे माणसाच्या रक्ताने, न्हाऊन माखून निघतात. हे असे घडण्या-घडविण्यात अदूरदर्शी, भित्र्या, पोटार्थी चतुरांचे चांगले फावत असते. मरतात बिचारी गरीब भाबडी माणसे.

पुन्हा प्रत्येक धर्मात अनेकानेक विभागप्रविभाग पडलेले असतात. शैव-वैष्णव,

लिंगायत-मानभावी, शिया-सुन्नी, महायान-हिनयान, श्वेतांबर-दिगंवर, निरंकारी-निहंग. त्यामुळे सामान्यजनांच्या गोंधळात आणि वर्तनात फरक पडायला लागतो. अशा विभिन्न श्रद्धेच्या लोकांना, लोकशाही व्यवस्थेत एकत्र नांदणे-नांदवणे कठीण कर्म असते.

आपल्या समाजरचनेची बांधणी, परस्परांच्या गुणदोषाचे संतुलन साधीत गतीशील राहील, अशा रीतीनेच झाली आहे. ह्या संमिश्र समाजाची व्यावहारिक आणि व्यावसायिक पाळेमुळे एकमेकात इतकी मिसळून गेली आहेत की, ती एकत्र एकाच मापाने मोजणेही कठीण आहे आणि एकमेकांपासून विभक्त करणेही दुष्कर आहे. थोडक्यात म्हणजे; 'तुझे नि माझे जमेना पण तुझ्या वाचून करमेना' अशी ह्या समाज-पुरुषाच्या अंगांगांची अवस्था आहे.

आपल्या पूर्वेतिहासाचे काही प्रत्यक्ष गुंते आहेत. इथली छोटी गणराजे, नगरराज्ये आणि संस्थानिकांचा सुळसुळाट होता. बलवानाने कमी बलवानाला मांडलिक करण्यात, गावे जनावरे, पिके-प्रजा उध्वस्त करण्यात पराक्रमाचे पोवाडे रचले जायचे. नव्या शस्त्रांनी लढणारे अन्यदेशीय आक्रमक आलेत. नीतीशास्त्रातील साम, दाम, दंड व भेद ह्यांचा उपयोग करीत त्यांनी सांम्राज्ये स्थापन केली. ह्या ग्रीक भाषेतील 'आयोनियन' चेच 'यवन' अपभ्रष्ट्र भाषिक रूप झाले. पुढे म्लेंछ म्हणजे हिंदु नसलेला असा धर्मवाचक अर्थ आला. सिंधुवासी-काळा माणूस तो हिंदू हा अर्थही आहेच. शास्त्रे-शासित संबंध विरोधावरच पोसले जातात. म्हणून दोन जाती-जमाती, त्यावेळी हे विरूद्ध रूप घेऊन समोरा समोर ठाकायच्या. मग आपल्या मतानुसारी माणसाला असले नसलेले सर्वच गुण लावून आदर्शरूप उभे करायचे आणि मतविरोधी व्यक्तीला जमतील तितके अवगुण लावून, त्याचे कलिपुरुषात प्रतिमांकन करायचे. ही प्रथाच कायम पडून गेलेली आढळते.

सत्ता नेहमीच व्यक्तीला भ्रष्ट करते आणि अनिर्बंध निरंकुश सत्ता, तर त्याला तिरशिंगराव-हुकूमशहाच बनवते. त्या प्रमाणे हे नवे सत्ताधारीही जुलमी, प्रजाहितविरोधी, विलासी, लंपट आणि रक्षणअदक्ष बनत गेले. परिणामी त्यांनाही ब्रिटिशांनी गुंडाळून ठेवले. आपल्या कुटुंबकलहाने, भाऊबंदकीने, हेव्यादाव्याने आणि कृत्यशैथिल्याने आधीच ते मरायला टेकलेलेच होते. दक्षिणेतील आदिलशाही, इमादशाही, बरीदशाही, कुतूबशाही आणि निजामशाही, मोगलशाही, पेशवाई, सगळ्यांचा मराठेशाहीसह, इंग्रजांनी फडशा पाडला होता.

आणि मग देशावर युनियन जॅक फडकविणाऱ्या राणीची सत्ता स्थापन झाली. इंग्रजांनी ऐतद्देशियांच्या धर्मात ढवळाढवळ न करण्याची शासन सुयोग्य रीती पाळली, पण विधर्मी मनांमध्ये एक-दुसऱ्या विषयी अढी आणि गैरसमज सतत वाढतीलच याचीही प्रणाली अंगिकारिली. दोन प्रबळ एडक्यांना एकमेकांविरूद्ध, सतत झुंजविण्याच्या तयारीत ठेवण्याची खेळीच, त्यांना ह्या प्रचंड देशात दिडशे वर्षे राज्य करू देण्यास कारणीभूत ठरली.

त्यांच्याही साम्राज्यसूर्याला उतरती कळा लागली आणि इ. स. १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. प्रजासत्ताक लोककल्याणकारी राज्याचा शुभारंभ झाला आणि घटनेच्या वटवृक्षाच्या सावलीत सगळे देशवासी विसावले.

देशाला मिळालेले स्वातंत्र्य देश विभाजनाचे प्राप्त झाले होते. आयुष्यभर आदर्शवादाची जपणूक करणाऱ्या, अहिंसावादी राष्ट्रपिता म. गांधी यांची हत्याही घडली होती. हिंदु-मुसलमान दंग्यानंतर ब्राह्मणद्वेषाची एक दाहक लाट उसळून गेली होती.

एका कोण्याही धर्माच्या, कोणत्याही जातीपोटजातीच्या आणि कोणत्याही ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या, एखाद्या विक्षिप्त प्रवृत्तीच्या, स्वयंमन्य व्यक्तीकडून चूक घडू शकते. पण त्यासाठी त्या प्रदेशाला, त्या जातीवर्णाला किंवा अवघ्या धर्मालाच बदनाम ठरवणे म्हणजे, विचारी मनाचे दिवाळे निघाल्याचे द्योतक म्हणावे लागेल. कोत्या मनाचे अविवेकी लोक आणि त्यांच्या भावनात्मक अज्ञानावर पुढारीपण मिरवणारांना अशा घटना; सुवर्ण संधी सारख्या वाटतात.

कधी कधी अत्यंत बालिश युक्तिवादांनी आपले राष्ट्रप्रेम आणि इतरेजनांची गद्दारी पटवून देण्याचा प्रयोग केला जातो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे शिकलेला असून मनाने असंस्कृत आणि वर्तनाने अशिक्षित असणाऱ्या इथल्या माणसांना, ही उदाहरणे बिनतोड वाटतात.

देशाची फाळणी जातीय व धार्मिक तत्त्वावर झाली. त्यांनी स्वतःचा प्रदेश निर्माण केला. मग इकडे त्यांच्या राहण्याचे प्रयोजन काय ? ते राष्ट्रद्रोही आहेत. लबाडधंदे, व्यापारी वृत्ती, टर्रेबाजी, हडेलहप्पीपणा, कडवेपणा आणि धर्मशरणता, म्हणजे धर्ममार्तंडाच्या फतव्याला शिरोधार्य मानण्यात त्यांचे पाऊल पुढे पडते. तिसरा मुद्दा पुढे करण्यात येतो, आम्ही स्वहित, समाजहित आणि राष्ट्रहित या गोष्टीत समन्वय साधतो, कुटुंबनियोजन, विवाहनियंत्रण आणि लहान कुटुंबनिर्माणाच्या धोरणाला आपले धोरण मानतो. पण हे धोरण अनुसरण्याबाबत पक्षपातीपणा केला, त्यामुळेच पुन्हा एकदा फाळणीच्या मान हानिकारक वाटणाऱ्या पण अटळ प्रसंगाला सामोरे जावे लागले.

अनेक वेळा जाती-जातीमधील परस्पर बंधुभाव नाहिसा करण्याच्या प्रवृत्त्या बळावलेल्या दिसतात.

अशा बऱ्याच दृष्टांतांची चवड रचली जाते. भावनात्मक खड्या-चढ्या सुरात आवाहन केले जाते आणि मग सारे पाणी ढवळून निघते. समाजाचा तळ असा खरवडून ओरबाडला की गाळच उफाळून येतो. कित्येक दिवस मग समाजडोह शांत होण्यासाठी वाट बघावी लागते. घडलेल्या भयानक संहाराची विध्वंस-विनाशाची, देशाला किंमत चुकवावी लागते. महागाईला स्वतपाणी मिळते.

ह्या सर्व इतिहासाचा आणि समस्यांचा घटना निर्माण करताना बारकाईने

आणि समग्रपणाने विचार केलेला होता. प्रत्येक माणूस देशाचा तितकाच महत्त्वाचा नागरिक व घटक असतो. त्याच्या स्वास्थात आणि प्रगतीत समाजाची आणि देशाची प्रगती सामावलेली असते. श्रेष्ठ-कनिष्ठपणाच्या श्रेणीने विचार करणे म्हणजे गुलाम-मालक संबंधाला, किंवा सेव्य-सेवक नात्याला मान्यता प्राप्त करून देणे. घटनेच्या आश्वासनात आणि आत्मसमर्पणात याचेच प्रतिबिंब आहे.

प्रदेश भाषा, जोडभाषा आणि राज्यकारभारा भाषा याचेही सूत्र सांभाळले आहे. आपापल्या मातृभाषेद्वारेच प्रत्येकाला परिपूर्ण रीतीने अभिव्यक्त होता येते. म्हणून प्रदेश-भाषेचा कस वाढविणारा विकास निश्चित घडला पाहिजे. भाषावार प्रांत रचनेमागे, छोट्या छोट्या राज्यांच्या निर्मितीमुळे अधिकाधिक लोकांना, त्या त्या प्रदेशात हमस्त्रास संधी मिळेल. सगळ्यांच्या संधीने संबंध प्रदेश विकसित होईल व राष्ट्राला सशक्त करण्यास साह्यकारी होईल, हे गृहीत होते. पण त्यातून भाषा श्रेष्ठत्वाचे अनाठायी विवाद निर्माण झालेत.

प्रदेशातील वनस्पती, जलसंपत्ती, स्वनिजसंपत्ती, महसूल, करभरणा, अन्नधान्ये, तेलबिया आणि वस्त्रद्योग व अनेक उद्योग यांच्यातील वाटपाबाबत, केंद्र - राज्यशासन संबंधाबाबत निर्माण होणारे संघर्ष, उडणारे खटके, अडेलतट्टू अहंकारी वृत्ती, यानेही फुटीरपणाचीच वाट चोखाळली जात आहे.

बंगालच्या फाळणीतच देशाच्या फाळणीची बीजे होती असे म्हणतात. काश्मीर, खलिस्तान, नागालँड, गुरखालँड, बोडोलँड याठिकाणी चाललेले, रक्तरंजित नरसंहार आणि विध्वंससंघर्ष आपल्या समाजजीवनाची घडी झपाट्याने विस्कळीत होत असल्याच्याच, जळत्या निशाण्या म्हणाव्या लागतील.

देशभराच्या प्रत्येक ठिकाणी अनेक प्रादेशिक पक्ष निर्माण होत असलेले दिसतात. एक तात्कालिक लहान घोषणा पक्षाच्या अस्तित्वाला संजीवनी देते. ज्या ज्या वेळेला जो प्रश्न, सहज तापवून, त्याचे राजकीय सत्ताप्राप्तीकडे, वाटचाल करण्यासाठी भांडवल करता येईल, तो प्रश्न; असे प्रादेशिक पक्ष उचलतात. ताबडतोबीचे झटपट अनुयायी आणि तडाखेबंद विस्तार आणि वसूल करण्यासारखी हमस्त्रास लोकप्रियता ह्यांना मिळतात. मग राजकीय देवाणघेवाणींच्या, सौद्यांची भाषा सुरू होते. नव्या स्वप्नांना झुलविण्याची भाषा सुरू होते. प्रादेशिक सत्तास्थाने बळकावता येतात. शासनावर अंकुश ठेवण्याची भाषा करीत, व्यक्ती गब्बर आणि धनदांडग्या, बनत चाललेल्या दिसतात. गर्जना करण्याची आणि वल्गना करण्याची खोड जडते. शासनाची अडवणूक करणे, आपले महत्व व वैतागमूल्य; चढवीत नेणे, एवढेच एकमेव उद्दिष्ट ठेवले जाते, आपल्या समाजकारणात ही एक मोठी फट निर्माण झाली आहे.

सतत वीस-पंचवीस वर्षे, ह्या आणि अशाच पद्धतीने, समाज, विचार आणि कृती करीत राहिला की; वैचारिक कॅन्सर जडतो. समावेशक नव्या विचारांच्या, विश्वसुसंगत आचारांच्या ग्रंथींची, वाढच नष्ट होते. फक्त आदेश आणि आज्ञा

पाळणे, यातच तरुण पिढीला; महान काहीतरी करीत असल्याचा, कृतक आभास समाधान देतो. अतिरेकी, अराजकवादी आणि अर्धपक्व, विचित्रांवर आधारलेल्या घोषणांना स्वीकारणारे अनुयायी, हे दोन्ही एकाच बिलंदर चकव्याची दोन तोंडे आहेत.

नवे काहीही रूजत नाही. वेगळ्या विचाराचे, स्वतंत्र कार्यक्रम राबवणारे, चुकत चुकत सत्याच्या शोधाकडे जाणारे, समूहोत्कर्षक नवी धोरणे राबवण्याचा, प्रयोग करून पाहणारेही, कुणी चांगले असू शकतात. त्यांचीही देशनिष्ठा, देशप्रेम, शंभर नंबरीच असते, फक्त असा संकुचित स्वव्यक्तित्व गोंजारणाऱ्या भूमिकेशी तो अजिबात जुळत नाही, एवढेच घडलेले दिसते. मग माणसे हत्या तरी करवतात किंवा अराजक, डॉन-बंडाळीवजा अवस्था तरी आणण्यात, कृतकृत्य पावतात. अशा तऱ्हेच्या प्रवृत्तींनीच पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी आणि श्री. राजीव गांधी, यांचा वध करविला. पण वधाने माणसे मारता येतात, माणसे मरतात, विचार खोलवर मनात रूजतात. नेमक्या दिशेने वाढायला लागतात.

सत्ता हेच उद्दिष्ट ठेवणाऱ्या काही वर्गवरिष्ठवाद, जातश्रेष्ठ वाद मानणाऱ्या पक्षांपासून, समाजकारण अडखळू लागले आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेप्रमाणे घटनात्मक तरतुदींनी, चातुर्यपूर्ण आधार घेण्याचे कसब, बहुतेकांनी मिळविले आहे.

अशा वंशश्रेष्ठतेच्या आणि स्वयंश्रेष्ठ अहंतेच्या रिंगणात पोसणारांनी आर. एस. एस. सारख्या संघटनेची निर्मिती केली. अशी विचार प्रणाली राबवली की, हा देश ज्यांना ते हिंदू मानतात, त्यांचाच आहे. त्यांच्या शिस्तबद्धतेमुळे, उत्तम संघटना कौशल्य आणि प्रभावी वक्तृत्वामुळे, गतेतिहासाची नशा चढणारा भारतीय अर्ध बुद्धिवादी आणि अर्धपरंपरावादी सनातनी मनांत आकर्षण वाढले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आणि घटना सिद्ध होऊन कार्यवाहीत आणण्याचा कार्यक्रम अंमलात आल्यानंतरची ह्या संघटनेचे वेगळे अस्तित्व तसेच होते. वस्तुतः लोकशाही प्रजासत्ताक राज्यप्रणालीत सर्वधर्म समभाव आणि सर्व मानव कल्याण, हे सूत्र स्वीकारलेले असल्याने, हिंदुत्व घोषणा वेगळा अर्थ सांगणारी ठरत होती. देशाचे नावही अधिकृतपणे 'भारत' असे स्वीकारल्यामुळे, मुद्दाम आणि वारंवार, 'हिंदुस्थान' असा उल्लेख, त्यांच्या स्वयंश्रेष्ठतेच्या भूमिकेशीच सुसंगत होता.

चुकूनही आणि कधीही हे नेते, 'भारत देशात' असा उल्लेख करीत नाहीत. 'जन गण मन अधिनायक जय हे' हे राष्ट्रगीत म्हणून न म्हणता, 'वंदे मातरम्' हे गीत म्हणतात. सातत्याने आम्ही राजकारण करीत नाही, म्हणत म्हणतच; ते राजकीय पक्षांची चाचपणी करीत होते. ह्या विशिष्ट प्रवृत्तीतूनच विद्यमान सामाजिक संतुलन धोक्यात आणले गेले आहे.

धार्मिक आवाहन धर्मरक्षणाचे असो, धर्म मंदिर निर्माणाचे असो की, पक्षमेळावा शिबिरांचे असो, आपल्या देशातील मध्यमवर्ग बराचसा व्यापारीवर्ग, अशा सरंजामी मध्ययुगीन कल्पना-विश्वात फार रमतो. मोठ्या प्रमाणात पैसा अशा संघटना जमवतात.

कोणाला हिशेब देणे, खुली चर्चा करणे, टीका-टिप्पणी करणे, निवडणूक पद्धती अवलंबिणे, कोणालाही शंका उरणार नाही अशी स्थिती निर्माण करणे, हे असल्या संघटनांना आणि राजकीय पक्षांना अनावश्यक वाटते. आपले अचूक असतेच, ह्या अभिमानाची, येथेही परिपूर्ती होतेच.

दुसरे चित्रही फार उत्साहवर्धक आहे, असे नाही. इतक्या दशकांच्या आपल्या देशाच्या वाटचालीत, कोणीही काळा बाजार करणारे, भ्रष्टाचारी अशा जनताद्रोही लोकांना; भर चौकात फासावर देऊ शकलेले नाहीत.

समाजाच्या सहजोत्कर्षाला स्वाभाविक वातावरणाची आवश्यकता असते. धर्म ही मानसिक गरज आहे. समाजाच्या अत्यंत निकडीच्या गरजा भागल्यानंतर आयुष्यातल्या सुखाचा त्याला अनुभव येतो. पण ही सुखे ऐहिक असतात. नाशवंत सुखाच्या सततच्या प्राप्तीचक्रात मानसिक समाधानाचा ऱ्हास होतो. मनाच्या तुष्टी-तृप्तीची क्षमता, धर्मभावनेमध्ये असते. ह्या धर्मकल्पनेतील, ' मृगाराणी सुक्ते ' म्हणजे माणसावर येणारी संकटे आणि आपत्ती दूर ठेवणारी, महत्त्वाची आहेत. त्या सूक्ताच्या वाचन-उच्चारणाने संकटे दूर जातात असे नव्हे, तर त्याने जी मनाला आतून शक्ती प्राप्त होते, त्याने त्यांचा हिमतीने मुकाबला करता येतो. यशस्वी बनता येते. ' प्रायश्चित सूत्रे ' आत्मशोधक असतात. सोने तापवून तापवून त्यातले तेज वाढवितात, तसा हा प्रकार असतो.

समाजकारणातील व्यवहार आणि धर्मकारणातील व्यंजक मानसिकता त्यांच्या परस्पर साहाय्यक उपस्थितीमुळेच समाज आणि मानव-समूह खऱ्या अर्थाने, ' सुजलाम् सुफलाम् ' अवस्थेच्या अनुभव घेऊ शकतो.

आपल्या देशातील वैदिक धर्ममतांचा, इ. स. पूर्व पाचव्या शतकातील पार्श्वनाथ महावीरांचा जैन धर्मही, जिनतत्त्वाचा अंगिकार करतो. ज्ञान हे अनेकांगांनी समजून घ्यावयाचे मूल्य आहे. स्यादवाद म्हणजे अनेकत्वाचा शोध घेणारा, पार्श्व म्हणजे तत्त्वज्ञानी यांचा संयोग जैन धर्ममतात होता. बौद्धांनी ह्या धर्मतत्त्वांतील आत्मा-गूढवाद, अकर्मत्व. पाप-पुण्य यांचे अवडंबर काढून टाकून त्याला वास्तव्याच्या आणि स्वीकारर्हतेच्या भूमीवर आणून ठेवले. शोषणाची कारणे आणि परंपरा स्पष्ट केली. अतिरेकाच्या हव्यासावर बुद्धिविचाराने अंकुशी ठेवला होता.

हिंदु धर्मशास्त्रातील अनेकदेवतापूजन आणि अनेक ज्ञान्यांच्या विचारधारेचे लावले गेलेले अर्थ, समजून घेण्यात, घोटाळेच होत गेले. शास्त्रकार-भाष्यकार आणि आचरणकार यांचा मेळ बसेनासा झाला. तत्कालीन व्यावहारिक जीवनातील, घोटाळ्याची अवस्था; सगुण-निर्गुण, द्वैत-अद्वैत, अनेकात्मवाद, श्रेयस-प्रेयस संबंध, वर्णसंबंधात निर्माण झालेले तणाव, जातीसत्ता अतिरेक यांनी, ग्रस्त आणि त्रस्त झालेला माणूस, त्याच्या मानसिक व आत्मिक उन्नतीपासून वंचित तर झालेला होताच, पण प्रत्यक्ष अनुभव व्यवहारातही शोषित आणि नगण्य ठरला होता. ह्याचीच परिणती, पुढे

ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादात झाली, असे म्हटले तर, ते अनैतिहासिक आणि अत्युक्तीपूर्ण ठरू नये.

इस्लाम आणि ख्रिस्ती धर्माची पार्श्वभूमी किंचित वेगळी आहे. प्रेषितकल्पना आणि सत्यशोधक भूमिकेचे समर्थन त्यांच्यात आहे. मानवाच्या दुःखाची मुक्ती सेवाभावातून घडू शकेल. सेवानिवृत्तीचे कसलेही मोल नाही. त्याचा आदर्श हेच प्रत्यक्ष उदाहरण आहे, असे सांगणाऱ्या येशू ख्रिस्तांनी देखील व्यावहारिक वर्तनक्रमाला अग्रस्थान दिले आहे. तो माणूस मोहव्याप्त आहे. उपभोगात आयुष्य संपले तरी न कळणारा आहे. पण ईश्वर दयाळू-कृपाळू आहे. तो न्यायनिर्वाळा करायला पात्र आहे. श्रद्धा आणि विश्वासाने त्याचा अंगिकार करा, असा आशय, महंमद पैगंबरांनी आपल्या धर्मप्रवचनात मांडला. गुरू नानकांनी सोशीकता व त्यागास महत्त्व दिले.

वरवर पाहता ह्या सर्व धर्ममतात तात्त्विक गफलत दिसत नाही. त्यांच्या तत्त्वांत सूत्रांचा, वैचारिक किसच काढण्याची वृत्ती असेल, तर हा गुंता उलगडणारच नाही. पण जोपर्यंत धर्म आपापली व्यक्तीजीवनातील स्थोल जागा नेमकेपणाने सांभाळतो, तोपर्यंत तो विकासास उपकारक ठरतो. पण समूहाच्या बाह्य व्यवहारजीवनावर जेव्हा तो त्वेष-आवेश घेऊन स्वार होतो, तेव्हा माणसे हिंसक, विध्वंसक आणि परस्पर विनाशक बनवतात.

लोकशाही व्यवस्थेत सर्वांना साह्यकारी होणारा समाजवाद सर्वांगाने, पडेल ती किंमत देऊन जोपासला गेलाच पाहिजे. काहींना वाटते तेच आणि तेवढेच आदर्श, बाकीचे जाळायच्या, मारायच्या पात्रतेचे, ही स्वास झुंडशाहीच्या आमंत्रणाची भाषा झाली. धर्म आणि समाजकारणाच्या संबंधावर जगभरच मंथन झालेले आहे आणि ते वेगवेगळ्या संदर्भात, कमीजास्त प्रमाणात नवनव्या रीतीनें चालणारच आहे. पण महामहोपाध्याय पां. वा. काणे यांच्यापासून, तो तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींपर्यंत किंवा ड्यूसेनपासून जॅकोबीपर्यंत, अथवा प्रा. दामोदर ध. कोसंबीपासून अल्ताफ हुसेन हालीपर्यंत, किंवा डॉ. एम. जी. बॅनजी, डॉ. आर. शर्मा, ओल्डेनबर्ग, थॉमस इत्यादिकांपासून दुर्गा भागवत, प. ल. वैद्य, दि. के. बेडेकर, सहस्त्रबुद्धे, प्रा. दि. मा. स्वैरकर, एस. एस. मोरे किंवा अरूण शौरींपर्यंत सगळ्यांच्या विचारांचे आलोडण केले, तर समाजकारण आणि धर्मकारण, यातल्या विभाजक रेषा आणि त्यांच्या परस्परांच्या संबंधाचा, प्रभाविता आणि अनर्थाचाही नेमका विचार त्यात आढळतो.

नव्यानव्याने होणारी निवडणूक प्रक्रिया कितीही सदोष वाटत असली, तरी तिचाच अंगिकार आपण केला आहे, हे नाकारण्यात अर्थच नाही. प्रादेशिक पक्ष आणि देशव्यापी पक्ष यांच्या भूमिका आणि जाहीरनामे, आश्वासने आणि कार्यक्रम यात डोळस सुसंवाद साधला गेला पाहिजे.

लोकमतांच्या रेट्याप्रमाणे जर आघाड्यांचेच सरकार येणार असेल तर त्याच्याकडूनही यथायोग्य कामगिरी जनतेनेच करून घेतली पाहिजे. सरकार संमिलित

घटक पक्ष योग्य वर्तन करत नसतील, तर त्यांना भाग पाडले पाहिजे. त्यांची जागा त्यांना दाखवून, योग्य कौल द्यायला पाहिजे.

आणि समजा, असेही जर घडले की, आता जातीयवादी, संकुचित आणि धर्मांध वाटणाऱ्या, पक्षाच्या हातात सत्ता जनमताने दिली गेलीच; तर तो अनुभवही घेण्याची तयारी ठेवली पाहिजे. कारण दोषारोप नेहमी सोपे असतात. " Silence the toungue that ulters the word socialism " असे जेव्हा चंगीजखानी भूमिकेने, सांगणे सोपे असते, पण अवघ्यांना देशाचे, सारखेच महत्वाचे नागरिक मानून धोरणे अंमलात आणणे कसे आणि किती अवघड असते, याचा प्रत्यय तरी जनतेला त्या राजकीय पक्षाला आणि प्रत्येकाला येईल. समाजजीवनातले तणावपूर्ण सावट सुधारण्याची शक्यता निर्माण होईल.

आपल्या अनेकधर्मी आणि अनंतवर्मी नागरिकांच्या आयुष्याला लोकशाही समाजव्यवस्थेखेरीज तरणोपाय नाही, हे सूर्यसत्य आहे. लोकशाहीची व्यवस्था लवचिक आणि कालमानाचा आदर करणारीच असायला हवी. यात वादच नाही. पण लवचिकतेच्या नावाखाली, लोकशाहीच नष्टभ्रष्ट करण्याचे कोणाचे मनसुबे असतील तर, ते देखील उघड होण्याची, कधी नव्हे ती आज नितांत गरज आहे.

लोकशाहीतील विकसित समाजाला धर्माने आणि घोषणांनी दुर्बळ बनवू नये. कारण त्याने लोकशाहीच नव्हे तर सर्वच विपरित आणि विचित्र झालेले दिसेल. आज संभाव्य अपायांचा आपण विचार तरी करू शकतो. पुढे कदाचित त्यालाही मुक्त वातावरण उपलब्ध असणार नाही. सगळ्यांनीच ह्या 'पुढल्या हाका' सावधपणे ऐकल्या पाहिजेत.



१४. जन्मशताब्दीतला महाराष्ट्र

प्रत्येक देशाप्रदेशाची काही वैशिष्ट्ये असतात. मिरवण्याच्या खास काही जागा असतात. त्याचप्रमाणे गौरवाने सांगण्याचा वारसाही असतो. आणि ह्या बलस्थानांना चिकटूनच त्याची मर्मस्थाने व कच्च्या जागाही असतात. महाराष्ट्राच्या मनाला एक दगडी शीर आहे. त्या नसेतच रक्तप्रवाह थांबविणारे काही खास विषाणुही आहेत.

वर्ष एकोणिसशे एक्क्याणवदेखील ह्याला अपवाद नाही. म. जोतिबा फुले यांच्या स्मृतीशताब्दीचे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष. पुराणातल्या कल्पित देवपुरुषांच्या आणि महापुरुषांच्या, देवीदेवतांच्या उत्सवाच्या ढोलताशांनी आणि जत्रा-कुंभमेळ्यांनी इथली स्थळे ठिकाणे जेवढी हालतात-चालतात, तेवढी चैतन्य, ज्यांनी आधुनिक भारत घडवला त्यांच्या स्मरणचिंतनाने सळसळत नाहीत, ही मात्र वस्तुस्थिती आहे. रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, वासुदेव बळवंत, मदनलाल धिंग्रा, लो. टिळक, म. गांधी किंवा आधीच्या काळातले म. फुले, बाबासाहेब बोले, आगरकर अथवा शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कोणीकोणी असू दे, त्यांच्या आठवणीत कप्प्याटप्प्यातच बंदिस्त राहिल्याचा अजब अनुभव येतो.

आषाढी-कार्तिकीची पंढरपूरची गर्दी किंवा कुंभमेळ्याची बकाल भयाणगर्दी ह्यातला हुरूप एक शतांशानेही ह्या नवभारत निर्मात्यांच्या वाट्याला का येऊ नये ? याचे मुख्य कारण म्हणजे आमच्या मातीत मुलाच्या मनात वाढ जातीपोटजातींचे, प्रदेशगावाचे, भाषा आविष्काराचे संकुचित संस्कार देऊनच घडत असते. त्यामुळेच आम्ही कोणाचेही नाव घेतले की वर्ण, जात, पोटजात, प्रदेश, कामाचे रूपस्वरूप, अन्य लोकांबद्दलचा त्याचा उपयोग, त्यांच्या जातीपातीचे राज्यकर्ते, खासदार, आमदार, मंत्री, अधिकारी यांची शासनयंत्रणेतील सत्ता, त्यांच्या जगण्याला याचा होणारा दूरगामी फायदा एवढी कलमे ध्यानात घेतली जातात. म्हणूनच गांधीजी म्हटले की, 'बनिया गुजराती, व्यापारी' आणि आंबेडकर म्हटले की, 'महार, नेता अस्पृश्य, शब्दकृती करणारा' आणि फुले यांचे नाव घेतले तर 'माळी समाजातले गेल्या शतकातले एक इंग्रजधार्जिणे पुढारी' अशा नोंदी आढळतात. ह्या नोंदी जुजबी आणि कोरड्या व कामचलाऊ आहेत हे खरे. पण त्यातूनही मनोवृत्ती प्रकट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लढा स्वानुभवांच्या चटक्यावर आधारलेला होता. 'विद्येनेच मनुष्याला मोठेपण प्राप्त होते' ह्या सुभाषिताला खोटे पाडणारे दाहक व अपमानास्पद अनुभव बाबासाहेबांनी व्यक्तिगत आयुष्यात पचवले होते.

देशभर स्वातंत्र्याची चळवळ तत्कालीन काँग्रेसपक्ष हाताळीत होता. पडेल ती किंमत मोजून, आमचे शोषण करणाऱ्या इंग्रजांना ह्या देशातून, 'चालते व्हा!' असे सांगितलेच पाहिजे. अशी मानसिकता समूहमनात रुजवण्यात काँग्रेस नेते यशस्वी ठरले होते. 'आधी काय?' ह्या अग्रक्रमाच्या वादाची मुळे खोलवर गेली होती.

सामाजिक सुधारणा आधी की स्वराज्यप्राप्ती व राजकीय सुधारणा आधी हाच वादाचा मुद्दा ठरला होता. लो. बाळ गंगाधर टिळक आणि केसरीचे प्रथम संपादक गोपाळ गणेश आगरकर या दोन बुद्धीवान सन्मित्रात मतभेद आणि तेढ निर्माण झाली होती. त्यामुळेच पुढे डॉ. बाबासाहेबांच्याही अस्पृश्योद्धाराच्या, स्वतंत्र मतदारसंघाच्या आणि पुणे कराराच्या मागणीचा सरळ देशद्रोही, इंग्रजधार्जिणे अशा शब्दांनी अधिक्षेप करण्यात आला होता.

आपल्या देशातील जातीव्यवस्था हे अवघड जागीचे दुखणे आहे. याचा निर्वाळा गतेतिहासाने शेकडो वेळा दिला आहे. पुन्हा हो जातीव्यवस्था रक्तशुद्धतेशी, रक्तशुद्धता वंशशुचितेशी आणि शुद्ध वंश संस्कृतीच्या महानतेशी, ह्या महानतेचा आपल्या धर्माचरणाशी, धर्माचा श्रेयप्रेयात्मक पापपुण्याशी, ह्याची सांगड आपल्या नास्तिकवादाशी व ईश्वरी अस्तित्वाशी आणि हे अस्तित्व स्वर्गलोकाशी आणि ती महान उपलब्धी आपल्या बंधमुक्ततेशी म्हणजे मोक्षप्राप्तीशी घट्ट बांधलेली असल्याने तिचा विचारही तर्कशुद्ध रीतीने करणे पाखंडकर्म मानले जात असे. पण बाबासाहेबांनी या जातीभेदाला अग्राहक, अतार्किक, विषमतायुक्त आणि अशास्त्रीय सिद्ध केले होते.

शेकडो वर्षे समाजपुरुषाच्या नसानसात भिनलेल्या ह्या विषाने त्याला कधीही बलशाली बनू दिले नाही. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, धर्मशास्त्र, मानववंशशास्त्र याचे अभ्यासक असल्याने मानवी जीवनात संस्कारांचे स्थानमाहात्म्य ते जाणून होते. पण संस्कार म्हणून वृत्ती असंस्कारित व दूषित बनल्याने त्या मातीत माणसांचे एक दुसऱ्याशी वागणे स्वाभाविक नव्हते. ते कोरडे किंवा दुराव्याचे असते तरी फारसे काही बिघडले नसते. पण ते द्वेषप्रसारक, शत्रुत्वाचे आणि अस्तित्वविघातक पद्धतीचे होते. त्यामुळे बाबासाहेबांनी आमच्या व त्यांच्या विद्यमान धर्मप्रणालीचा शोध घेतला. त्या शोधातून, अनुभवाच्या आचेकाचेतून निष्कर्ष काढून स्पष्ट केले की, 'हिंदू धर्म हे विषमतेचे माहेरघर आहे. शब्दात एक आणि कृती आचरणात वेगळा धर्म, मानवी विकासास अडथळा आणणारा आहे. मनाचे चैतन्य गोठवून टाकणारा आहे. म्हणून ते म्हणाले, 'दुर्दैवाने मी हिंदू म्हणून जन्माला आलो, पण मी हिंदू म्हणून मरणार मात्र नाही.'

आपल्या धर्मकारणातली आणखी एक अडचण डॉ. बाबासाहेबांनी जाणली होती. आपल्या धर्मात पाप-पुण्याचा हिशोब चुकता करणाऱ्या व्यक्तीला यज्ञ, पूजा-अर्चा अथवा समारंभ आयोजित करावा लागतो. त्यासाठी उपाध्याय- ब्राह्मण बोलवावा लागतो. त्याला दक्षिणापदार्थादी उपहार वस्तुद्रव्य देऊन प्रसन्न करावे लागते. न

कळणाऱ्या संस्कृत आशीर्वादयुक्त श्लोकांचे पठण करावे लागते. आणि मगच ह्या मध्यस्ताकडून फिर्याद, मागणे, अर्ज वरच्या सोपानावर सरकतो. ह्या पोटभरू वर्गाचा स्वार्थ शिक्षणामुळे बंद पडणार होता. मलिदा बंद होण्याची शंकाही सहन होत नव्हती. ह्या साऱ्या जुन्या व्यवस्थेला डॉ. आंबेडकरांनी बुद्धधर्मस्वीकृतीने पूर्ण नकार दिला होता. देव, आत्मा, पापपुण्य, स्वर्गनरक, भटजी, दलाली, पुनर्जन्म, पूर्वजन्म ही सगळी फसवी सास्वळी तुटली. सुकलेल्या चिखलाच्या ढलप्या पावसाच्या शिडकाव्याने गळून पडाव्यात तसे अज्ञानभयात सडणाराचे झाले. सारे अवडंबर दूर झाले. ज्यांनी बाबासाहेबांच्या बुद्धधर्माचा धीटपणे व मोकळेपणाने स्वीकार केला ते पूर्ण वेगळे झाले. बदलून गेले. आत्मविश्वासी व आत्मनिर्भर झाले.

काहींना मनावरील शतकांच्या भयाची पुटे टाकता व टाळता आली नाहीत त्यांनी 'हरिजन' ह्या तुच्छतादर्शक पंचम नववर्णाचा अंगिकार केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले घटनापरिषदेतील एकहाती कार्य हे त्यांच्या प्रखर देशभक्तीचे द्योतक आहे. जीवनात आदर्श असावे लागतात. पण आदर्शांनी उपलब्ध व्यवहारभूमी सोडून चालत नाही. व्यवहार कधीही सरळसोट नसतो. आयुष्य जगणाऱ्या माणसांच्या रागालोभाने व्यवहार आणि आदर्श मलीन होतात. त्यांच्या संकुचित दृष्टीने आदर्शाचेही डोळे मिचमिचे वाटतात. हे बाबासाहेबांना ज्ञात होते. म्हणून आपल्या देशाची घटना बनवताना, बांधताना आणि तिला अंतिम रूप देताना त्यांना खूपच बौद्धिक, सैद्धांतिक आणि व्यवहार सुसंगततेशी तारेवरची कसरत करावी लागली.

आपणच आपले भाग्यविधाते हे घटनेचे परमसूत्र आहे. त्यामुळे ही घटना आपणच-म्हणजे आपण भारतीय जनता स्वीकारणार आहोत. आपणच आपल्याला समर्पित करीत आहोत. पण भाबडेपणाने नाही. केवळ उपचार म्हणून तर मुळीच नाही आणि अगतिक कंटाळ्याच्या भावनेने तर नाहीच नाही ही ठाम प्रणाली त्यांनी स्वीकारलेली दिसते.

भारतीय राज्य घटना साकार करताना आणखीही बऱ्याच व्यवधानाचे अवधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ठेवावे लागले होते. आपल्या देशाचा विस्तार हा अवाढव्य आहे. फाळणीनंतर 'पाकिस्तान' ह्या स्वतंत्र धर्माधारित देशाची निर्मिती झाल्यानंतरही भारताचा पसारा प्रचंड असा आहे.

ह्या अफाट देशात अनेक भाषा बोलणारे लोक आहेत. त्यांच्या धर्मश्रद्धा भिन्नभिन्न आहेत. क्वचित प्रसंगी त्या परस्परच्छेदक व परस्परबाधक अशा स्वरूपातही विकसित केल्या गेल्या आहेत. तशाच त्या राहाव्यात असा उभय बाजूच्या धर्ममार्तंडांनी सास आटापिटाही केला आहे. त्याचे आदर्श, जीवनविषयक आकांक्षा, ध्येय सूत्रे, व्यावहारिक यशापयशाची गणिते याचाही विचार येथे वाजवी होता. भाषा धर्मग्रंथांशी आणि पुराणकालिक अटकळतेशी बांधलेल्या असल्याने त्यांचा प्रभावही जाणून

उपाययोजना करणे अगत्याने होते.

लोकमानसामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठतेची भावना खोलवर रुजलेली होती. शोषणाला मुक्तद्वार लाभले होते. हाताची पाचही बोटे कधी एकसारखी नसणे हा जसा नैसर्गिक नियम, तसे काही माणसे जन्मजात उच्च-शुद्ध रक्ताचे व खानदानी अशी अजब विचारसरणी नुसती मान्यच नव्हे, तर शिष्टस्वीकृत, स्वाभाविक समजली जात होती. बाकीच्या स्वार्थलिंपित घटकांनी असल्या विचारांभोवती आकर्षक परकोट उभारून ठेवला होता.

आपल्या घटनेत ह्या समजुतीला नेस्तनाबूद करून सुरूंग लावला आहे. लिंग, जात, वर्ण, वंश, सत्ता, संपत्ती, कूळ, गाव, प्रदेश, रंग, रूप, शिक्षण, सामाजिक स्थान किंवा उपद्रव-मूल्य ह्या कोणत्याही गोष्टीचे दडपण न येऊ देता, 'एक माणूस एक मत आणि समानता' याचा आग्रहपूर्वक मुद्दाम बाबासाहेबांनी पुनरुच्चार केला आहे.

घटनेच्या मूलभूत आश्वासनांची निर्मिती ही आणखी आपल्या घटनेची विशेष गोष्ट आहे. आपल्या घटनेच्या ह्या सरनाम्यातच अनेक गोष्टींची स्पष्टपणे ग्वाही दिली गेली आहे.

अनेक वर्षे स्वातंत्र्यप्राप्तीसाठी काँग्रेसने चालविलेली चळवळ टिळक-गांधीजी, राजेंद्रप्रसाद, डॉ. गोविंद वल्लभ पंत, नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, सावरकर, भोपटकर, मुंजे, यासारख्या अनेकानेक स्तरांतील राजकारणी धुरंधरासोबत बाबासाहेब पाहात होते. मोठ्या आश्वासनांचे छोट्या लोकांच्या दुबळ्या जीवनात कसे तीनतेरा वाजवितात, ते राऊंड-टेबल कॉन्फरन्स, पुणे करार, हिंदू कोड बिल, भाषावार प्रांतरचना, छोट्या राज्यांची निर्मिती, केंद्र-राज्य संबंध, निवडणूक मार्गदर्शक तत्त्वे, युद्धजन्य स्थिती आणि नैसर्गिक आपत्ती ह्या ना त्या बाबतीत बाबासाहेबांना कळून चुकले होते.

वरिष्ठ जातीच्या वृथाभिमानाचा पीळ, न्यायाने ज्यांना कधी काही, जनावरे मानून मुद्दाम मिळू दिलेला नाही, समानसंधी हजारो वर्षे नाकारली गेली; त्यासाठी त्यांनी रास्तीच जागेचे उचित तत्त्व नमूद करून ठेवले होते. पण आताच्या भ्रष्ट, नतद्रष्ट, अदूरदर्शी राज्यकर्त्यांनी आणि त्यांना वेठीस धरणाऱ्या विकृत मनाच्या अमानुष विचाराच्या स्वार्थांध राजनिष्ठांनी त्याच्यात आर्थिक निकषांची विचित्र खोडाबेडी घालून ठेवली आहे. याची किंमत भविष्यात काय, कशा तऱ्हेने मोजावी लागेल हे येणारा काळ सांगेलच.

घटनारक्षण, तत्त्वरक्षण, स्वातंत्र्यरक्षण आणि आत्मरक्षण ही एककालिक एकसंध गोष्ट असते. लोकशाहीत पुष्कळदा डोकी मोजली जातात. डोक्यात काय भरले आहे ते पाहिले जात नाही. याचा प्रत्यय आताच्या काळात आपणास येतो आहेच.

राज्यशासकांमध्ये लोकमतानुसार नवेजुने येत राहणे हे लोकशाहीचे आद्यतत्त्व असते. प्रत्येक पक्षाला, त्यांच्या विचारांना व ध्येयधोरणांना ही समानसंधी असते. त्यासाठी नियुक्त लोकप्रतिनिधींनी लोकसमस्या समजून घेऊन कालमानाप्रमाणे व्यवहार्य

रीतीने बहुजनकल्याणाचे उद्दिष्ट निश्चित करून राज्यकारभार करावा अशी ही व्यवस्था असते.

निवडणूक प्रक्रिया हा त्यातीलच एक भाग होय. आपल्या देशातील दारिद्र्याचे, समस्यांचे, नैसर्गिक आपत्तींचे, भ्रष्टाचारी व फसव्या प्रवृत्तीचे, द्वेषमूलक जगण्यावागण्याचे सांगणेच आहे की पाच वर्षांनी येणारी निवडणूकही देशाच्या अर्थव्यवस्थेला भारी पडते. निवडणूक आयोग घटनाबद्ध तत्त्वानुसार कार्यक्रमाची आखणी करतो. याचा अर्थ असा नव्हे उच्चपदस्थ माणसे सतत अचूकच असतात. ती देखिल माणसे असल्याने त्यांचेही अंतःस्थ रागद्वेष उसळून गाळ पसरण्याची काहीशी शक्यता नाकारता येत नाही. पण आयोगावरच आरोपांची राळ उडवणे, त्यालाच बदनाम करणे हा प्रकार हुकूमशाही-अरेरावी मनोवृत्तीचा द्योतक आहे. 'माझे जर साधणार असेल, तर तू चांगला नाहीतर भ्रष्ट म्हणणे' ही स्वार्थाची परिसीमा आहे. यातूनच न्यायसंस्था अमान्य करण्याचा जंगलचा कायदा येतो.

लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये सत्ताधिशांच्या निरंकुश सत्तेवर, राज्यकर्त्यापक्षांच्या रांगेमध्ये येऊ पाहणाऱ्या विपक्षीयांवर आणि विविधमतानुयायी अशा हक्कदार मतदारांवर म्हणजेच सामान्यजनांवर विश्वासाने योग्य मार्गावर ठेवण्याचे काम न्यायसंस्था करीत असते. उत्तम लोकशाही यंत्रणेत प्रखर, जागरूक आणि अचूक न्यायवितरण व्यवस्था हाच महत्वाचा घटक असतो. ह्या सर्वोच्च न्यायालयाने अमका अमका निर्णय (म्हणजे त्या संबंधित राजकीय पक्षाला जसे घडावे असे वाटते) दिला नाही तर आम्ही त्यांनाही जुमानणार नाही.' अशी भाषा करणे, हे नुसतेच अडाणीपणाचे आणि बेजबाबदारपणाचे नाही तर घातुक, मानवताद्रोही झुंडशाहीचे नागडे प्रदर्शन म्हणावे लागेल. आपल्याकडे मंदिर-मस्जिद वादात एका राजकीय पक्षाची अशीच दुटप्पी खेळी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना येथील पुराण-परंपरावादी कालबाह्य मूल्यांचे पुनरुज्जीवन करून पाहण्यातच, पराक्रम आणि पुरुषार्थ एकवटलेला आहे, अशा बहुसंख्यांक मनांचा अंदाज होता. म्हणून तर त्यांनी, 'या देशात लोकशाही व्यवस्था प्रचलित करण्यात अडथळे आणणारांचीच संख्या जास्त आहे' असे नोंदून ठेवले आहे.

एका व्यक्तीच्या मनाचे बोलून, अनुभवाने, गरजेचे आणि कालप्रवाहात मतपरिवर्तन घडविणे पुष्कळदा शक्य होते. पण ज्यांची मते ठरली किंवा ठरविलीच गेली आहेत, दुसरे काहीही सहन करण्याची, पाहण्याची, घडण्याची ज्यांना कल्पनाही सहन करवत नाही, अशी माणसे स्वतः आपल्या अनुयायांसहीत बदलत तर नाहीतच उलट बदलाच्या शक्यता अधिकाधिक जटिल आणि धूसर करण्याचा प्रयास करायला लागतात.

डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या घटनेत काहीही न्यून्य किंवा त्रुटी नाहीत असे कोणीही कधी म्हणणार नाही. इतकेच नव्हे तर स्वतः बाबासाहेब आंबेडकरही असल्या

भ्रमात कधीच नव्हते. त्यामुळेच, 'घटनामंदिरात देवाऐवजी राक्षसमूर्तीचीच स्थापना झाली आहे असे जर लक्षात आले किंवा स्पष्ट झाले तर तीच प्रदीर्घ प्रयत्नाने व अभ्यासाने सिद्ध केलेली घटना जाळून टाकेन.' असे त्यांनी रोखठोकपणाने प्रतिपादन केलेले आढळते.

शताब्दीचे वर्ष जाहीर झाले होते. बाबासाहेब जरी भारत-विश्वविख्यात नेते असले, तरी ते महाराष्ट्राचेही होतेच. महाराष्ट्राच्या राजधानी मुंबईत त्यांचे कार्यक्षेत्र आणि कर्तृत्वक्षेत्र प्रामुख्याने होते. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने थक्क करणारी जोरदार आश्वासने दिली होती. महाराष्ट्रातील शंभरापेक्षा अधिक अत्यंत नामवंत अशा,विविध क्षेत्रातील बुद्धिमंतांची, ' डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी महोत्सव समिती 'ची नियुक्ती आणि यादी प्रसिद्धही केली होती. पण प्रत्यक्षात फाईल्समध्ये कागदी गड्ड्यांची भर पडण्यापलीकडे, जवळ जवळ स्वास काही प्रगती झालीच नाही.

नाही म्हणायला लोकशाही व्यवस्थेला घरघर लागावी असा कर्मठवाद पुनर्भवित झाला आहे. डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणेने बहुजनसमाज आत्मशोधास सिद्ध झाला आहे. आपल्यातील दोषांचे आणि विभाजनकारणांचे तो मूल्यमापन करू लागला आहे. नव्या जाणीवेने व अस्मितेने प्रगतीची वाटचाल करणारा आजचा दलित समाज, त्याच्या पूर्वपिढ्यांइतका असंघटित, अगतिक अथवा अज्ञानीही राहिला नाही. नव्या आत्मविश्वासाची चैतन्यशक्ती त्याच्या कृतीतून प्रकट होत आहे. सातत्याने दलितांना छळण्याची, हीन लेखण्याची, भूतदयावादी दृष्टिकोनातून दया दाखवून मानवतेचा, माणुसकीचा व खोट्या समानतेचा फेस काढणारे जे आजचे उघड जातीयवादी पक्ष, त्यांचे अनुयायी आणि लेकावळे आहेत, त्यांना दलितांचे हे हक्कानुगामी दृढवर्तन संकटासमान वाटते आहे. त्यांना ह्या ना त्या पातळीवर आणि पायरीवर, खच्ची करण्याचे पद्धतशीर कटकारस्थान गेल्या पंधरा वर्षांपासून कार्यवाहीत येताना दिसत आहे.

विघटना हा देशाचा शत्रू जसा असतो, तसाच तो सामाजिक स्वास्थ्यालाही घातक ठरत असतो. आपल्या महाराष्ट्र राज्यात दुर्दैवाने असेच काहीसे ह्या जन्मशताब्दी वर्षात चालले आहे.

वस्तुतः महाराष्ट्राच्या दोन्ही सभागृहात तात्त्विक आणि राजकीय पातळीवर मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करण्याचा ठराव मान्य करण्यात आला होता. तीन-चार मुख्यमंत्री आले गेले. त्या सगळ्यांच्याच प्रत्यक्ष उपस्थितीत हा जाहीर निर्णय व आश्वासन दिले गेले.

पण जाती-पोटजातींच्या स्वार्थानुलक्षी कुटील राजकीय खेळीमुळे अनेक वर्षे ते प्रत्यक्षात येऊ शकत नाही. मराठवाड्याला वाङ्मयेतिहासात संतांची भूमी म्हटले जाते. पण दलितांवर जे अन्याय, अत्याचार, जाळपोळीचे अनन्वित हाल त्या भूमीने आणि तिथल्या ऊसमस्त, शिक्षणगब्बर, चोरप्रवृत्तीच्या काही लोकांनी लादले, त्याला

इतिहासात तोड नाही. आंध्रप्रदेशात किलवेनमानी ह्या गावी झालेले हरिजनग्राम हत्याकांड, मराठवाड्यातील नृशंस कृत्यापुढे अळणी वाटेल असे आहे.

आताच्या ताज्या बातम्या तर अत्यंत उद्विग्न करणाऱ्या आहेत. महाराष्ट्रातही डोळे काढणे, जाळणे, खांडोळी करणे, देवळामध्ये दगडांनी ठेचून काढणे वगैरे बातम्यांनी मन विषण्ण होते.

माणुसकीचे गोडवे गाणाऱ्या, आध्यात्मिक लोकशाहीची परंपरा मिरविणाऱ्या, टाळमृदंगाच्या गजरात आपल्या सुखदुःखाला उतारा शोधणाऱ्या, विचारवंतांची परंपरा सांगणाऱ्या, टिळक-आगरकरांचे योगदान मिरविणाऱ्या, शाहू छत्रपती आणि शिवाजी महाराजांच्या नावाने घोषणा देणाऱ्या महाराष्ट्राला मनाचे मुर्दाडपण जर आले नसेल तर बाबासाहेबांची जन्मशताब्दी नवी प्रेरणा देईल असे म्हणत अपेक्षा तेवढी करायची. नाहीतर कुणी सांगावे, "महाराष्ट्र म्हणजे महंत राष्ट्र ।" ही व्याख्याच यापुढे बदलण्याचीही पाळी येईल. महापुरुषाच्या जन्मशताब्दीला तरी असे घडू नये.



प्रथम प्रकाशन कृतज्ञता

करतो आहोत बाबासाहेबांनी जन्मशताब्दी

'अधिष्ठान' दिवाळी अंक - १९९०

बाबासाहेबांचे सर्वसमूहस्पर्शी विचारधन

अस्मितादर्श विशेषांक - १९९१

बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाहीनिष्ठा

महानगरापालिका विशेषांक - १९९१

लोकशाहीच्या भवितव्यासाठी (भविष्यकाळ क्षमा करणार नाही)

'मोहन' दिवाळी वार्षिकांक - १९९०

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची परिवर्तन संकल्पना.

गोवा शासनाचा डॉ. आंबेडकर गौरवांक - १९९१

डॉ. बाबासाहेबांचा विचारांसोबतचा धर्मप्रवास

'धर्मभास्कर' डॉ. आंबेडकर विशेषांक - १९९१

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मचिंतनाविषयी

नागपूर - युगंधर विशेषांक - १९९१

बाबासाहेब ! आपणास सांगू तरी कसे ?


फुले-आंबेडकर गौरवांक - गुलबर्गा - १९९१

परिवर्तनवाद, पुनरुज्जीवनवाद आणि आम्ही

अस्मितादर्श - दिवाळी अंक - १९९०

जन्मशताब्दीला महाराष्ट्र

ज्ञानसावली - दिवाळी अंक - १९९१



लोकवाङ्मय गृह

नवी वैचारिक प्रकाशने

१. **जोतीरावांची समता-संकल्पना**
— अॅ. भा. ल. भोळे

२. **महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ**
— डॉ. अशोक चौसाळकर

३. **जोतीबा फुले आणि स्त्री मुक्तीविचार**
— प्रा. तानाजी ठोंबरे

५. **महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष**
— भारत पाटणकर

६. **महात्मा फुले आणि धर्म**
— प्रा. आ. ह. साळुंखे

७. **प्रश्नशोध**
— केशव मेश्राम

८. **एडस्**
— चित्रा बेडेकर

९. **देवदासी आणि नग्नपूजा**
— उत्तम कांबळे

१०. **बौध्दपंडित अश्वघोषकृत 'वज्रसूची'**
— डॉ. रुपा कुलकर्णी

लोकवाङ्मयगृह
भुपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई, ४०० ०२५.
दूरध्वनी : ४२२ ६४ ६८